साप्ताहिक

# माणूस

## झेलम विशेषांक

१५ जानेवारी १९८३ . तीन रुपये

## संघबंदी



काश्मिर
पुनर्वसन विधेयक
भारत विभाजनाचे
पुढचे पाऊल !



# कॅमल
## इंक

सुंदर आणि सहज
लेखनासाठी कॅमल
इंकच्या सहा मोहक
रंगछटा. रॉयल ब्लू, रेड,
ब्लू ब्लॅक, ग्रीन, ब्लॅक
आणि व्हायोलेट.




# कॅमल
## गम व पेस्ट

आता ७०० मि. लि. च्या आकर्षक प्लास्टिक बाटली मध्ये उपलब्ध.

स्वच्छ आणि निटनेटक्या कामासाठी उपयुक्त.




S-82/6 MAR

# सफाइदार अक्षर

# कॅम्लिन
## जॉटर बॉलपेन १२४ आणि रीफिल्स

आकर्षक ब्रास-क्रोम प्लेटेड मॉडेल. जॉटर रीफिल्स अतिशय दर्जेदार आणि जास्त काळ टिकणारी असतात.

कॅम्लिन बॉलपेनचे जॉटर आणि प्लॅस्टिक रीफिल्सचे अनेक प्रकार उपलब्ध.



S-82/4 MAR

# अनुपम

# कॅम्लिन
## पिस्टन फिलिंग पेन ४७

वेळ वाया तर जात नाहीच शिवाय शाई सांडण्याचाही प्रश्न नाही. कॅम्लिन पिस्टन पेनच्या वैशिष्ट्यपूर्ण तंत्रामुळेच या गोष्टी सुलभ होतात.

एकदा भरुन पाहाच. फरक जाणवेल.

कॅम्लिनचे पेन आणि बॉलपेनचे इतर प्रकारही उपलब्ध आहेत.




पेनचा शेवटचा भाग उजवीकडून डावीकडे फिरवा — आतील हवा बाहेर येते.

डावीकडून उजवीकडे फिरवा — शाई काठोकाठ भरली जाते.



S 82/3 MAR

# JANAKALYAN SAHAKARI BANK LIMITED

For People
who have money
and
who need money

*Address* : 108/109, Ashish Industrial Estate,
Saitan Chowki,
Gokhale Road ( South ),
Dadar, Bombay 400 025.

*Phone* : *422 85 85*

**S. G. Dandekar**
*Chairman*

**Dr. L. L. Oswal**
*Managing Director*

**P. R. Mehta**
*Manager*

साप्ताहिक
माणूस

वर्ष : बाविसावे 33 - 34
अंक : एकतीस – बत्तीस

१५ व २२ जानेवारी १९८३
किमत : तीन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी
पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
शिरिष घाटे

# राष्ट्रीय प्रवाहाचे विस्मरण नको

दक्षिणेकडे तेलगूदेशम् या पक्षाने मिळवलेल्या नेत्रदीपक व स्पृहणीय यशामुळे महाराष्ट्रातही प्रादेशिक पक्ष काढून सत्ता हस्तगत करावी, असे अनेकांना वाटू लागलेले आहे. समाजवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शरद पवार यादृष्टीने हालचाल करीत असावेत. त्याना काही पत्रपंडिताचा, मित्रपरिवाराचा पाठिंबाही मिळत असावा; पण कावेरीचे पाणी वेगळे, मुळामुठेचे, भीमा–इंद्रायणीचे पाणी वेगळे, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्राने आजवर प्रादेशिक राजकारण केलेले नाही. अगदी इतिहासकाळापासून महाराष्ट्राची राजकीय प्रवृत्ती अखिल भारतीय राजकारण करण्याची आहे. शिवाजी किंवा पहिला बाजीराव, त्यानंतर रानडे-गोखले-टिळक, नंतरचे सावरकर-आबेडकर किंवा आजचे डांगे–एस. एम. जोशी-यशवंतराव चव्हाण वगैरे सर्व नेते देशाचे राजकारण करणारे होते-आहेत. दिल्लीवर, अखिल भारतावर या नेत्यांचा प्रभाव पडला की नाही, ते किती प्रमाणात यशस्वी-अयशस्वी ठरले, हा प्रश्न वेगळा पण या सगळ्यांची प्रवृत्ती, राजकीय बैठक अखिल भारतीय होती. दक्षिणेकडे, तामिळनाडू किंवा आंध्रप्रदेशातून अशी अखिल भारतीय राजकारणाची परंपरागत प्रवृत्ती दिसून येत नाही. नादिरशहा किंवा अहमदशहा अब्दाली दिल्लीवर चालून आला तेव्हा महाराष्ट्रातून फौजा घेऊन जायची तशी काय आवश्यकता होती? शिवाजीमहाराजांना सर्व दक्षिणेकडची सुभेदारी औरंजेबाकडून सहज मिळवता आली असती; पण त्यांना हवे होते हिंदवी स्वराज्य–दक्षिणोत्तर सर्व हिंदूंचे–राज्य! हिंदूपदपातशाहीसाठी ते लढले, त्यांनी स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला व त्याचीच परंपरा पुढे पहिल्या बाजीरावाने, सदाशिवरावभाऊने चालवली. पानपतला दोन लाख मराठी बांगडी फुटली हे दुर्दैव; पण यश किंवा अपयशापेक्षाही या युद्धामागची मराठी प्रेरणा महत्त्वाची! संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला प्रथम गेल्यावर, म्हणूनच यशवतराव चव्हाण याच्यासारख्यांना आजही, पानपतची धूळ मस्तकी लावावीशी वाटते. अशी ऐतिहासिक प्रेरणा, ही अखिल भारतीय राजकारण करण्याची प्रवृत्ती दक्षिणेकडे मुळातच कमी आढळते. म्हणूनच आंध्रमध्ये रामाराव चटकन पुढे येतात, विजयीही होतात! प्रांतिक भावनांना अनुकूल असे वातावरण तेथे तयारच असते. महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद असला, दलित-अदलित भेद असले तरी द्रविड मुन्नेत्रसारखी चळवळ येथे कधीच उभी राहिलेली नाही. या अर्थाने सावरकरांनी महाराष्ट्राला भारताचा खड्गहस्त म्हटलेले आहे. आपापल्या प्रांतापुरते राजकारणच देशात यापुढे वाढणार असेल तर भारतीय राजकारणाचा विचार कोण करणार? देशासमोरील राजकीय–आर्थिक सकटांच्या सोडवणुकीसाठी कोण पुढे सरसावणार? आसामचा प्रश्न आंध्र–तामिळनाडूला आज स्पर्श तरी करताना दिसतो का?

तसाच काश्मिरचा प्रश्न. या प्रश्नाची त्वरित सोडवणूक झाली नाही तर तेथे दुसरा आसाम तयार होईल! चीन–पाकिस्तानच्या सीमा काश्मिरला भिडलेल्या आहेत. अमेरिकेला तळ हवेच असतात. एकदा येथले उरलेसुरले हिंदू भारतात हाकलले की काश्मिरचे आसामच काय पॅलेस्टाइन करायलाही सगळे मोकळे! प्रादेशिक पक्षांचा आवाकाच मर्यादित असतो. काश्मिर-आसामसारखे किंवा नाणेनिधी कर्जासारखे भारतव्यापी प्रश्न या आवाक्यात बसूच शकत नाहीत आणि हे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे असतात, जितके बेळगाव–कारवारसारखे किंवा पाणीवाटपासारखे प्रश्न असतात. म्हणून इतरत्र जरी प्रादेशिक पक्ष, आपापल्या राज्यापुरते असलेले राजकारण डोकेवर काढत असले तरी महाराष्ट्राने या लाटेत वुडून जाणे, हे आजवरच्या इतिहासपरंपरेशी विसंगत ठरणार आहे. महाराष्ट्राचे खास प्रश्न आहेत, त्यांच्याकडे लक्ष पुरविले गेले पाहिजे यात वाद नाही; पण हे प्रश्न अखिल भारतीय चौकटीतच सोडवण्याची आजवरची महाराष्ट्रीय नेतृत्वाची शिकवण आहे. मग तो काळ शिवाजीचा असो की नेहरूंचा. हा वारसा महाराष्ट्राने सोडू नये. महाराष्ट्राला राष्ट्रीय प्रवाहाची मुळातच ओढ आहे. या व्यापक प्रवाहाचे विस्मरण झाले तर महाराष्ट्र हा महाराष्ट्र तरी राहील का? असा काही काळ जातो की, खड्गहस्त हा नावापुरताच खड्गहस्त राहतो. तरीपण कुणी हस्तच छाटून टाकीत नाही. प्रादेशिकतेच्या प्रवाहात वाहून जाणे हे असे हात छाटून टाकण्यासारखे आहे. महाराष्ट्रात तरी अशा अविचाराला वाव मिळू नये. राष्ट्रीय प्रवाहाचे विस्मरण निदान महाराष्ट्राला तरी न व्हावे.

◻

म्हणून हा एका अखिल भारतीय प्रश्नाचे, काश्मिर-प्रश्नाचे स्मरण करून देणारा 'झेलम किंवा जेहलम' विशेषांक.

—संपादक

# वितस्ता ते झेलम

**शांतिलाल भंडारी**

जम्मू–काश्मिर या सनातन प्रदेशाला फार पुरातन इतिहास आहे!

जम्मू प्रदेशाच्या संदर्भात एक पुराणकथा अशी सांगितली जाते. प्रभु रामचंद्राचा वंशज जाम्बुलोचन याला शिकारीचा छंद होता. असाच एकदा शिकारीच्या शोधार्थ तो या प्रदेशात आला असता त्याने एका सरोवराच्या काठावर सिंह आणि शेळी एकत्र पाणी पीत असताना पाहिले होते. ते सहृदयतेचे दृश्य पाहताच शिकारीसाठी सज्ज ठेवलेले धनुष्य, बाणासह त्याच्या हातून गळून पडले होते. हा प्रदेश पवित्र असण्याचा त्याला त्या क्षणी साक्षात्कार झाला होता.ह्या ठिकाणी एक नगर वसवण्याचा त्याने त्याच क्षणी संकल्प केला होता. तेच नगर जम्मू! ...जाम्बुलोचनाच्या नावावरून या नगराला 'जम्बू' हे नाव पडले, जम्बूचे पुढे 'जम्मू' झाले!

काश्मिरसंबंधीही अशीच पुराणकथा आहे. आजचा काश्मिरप्रदेश अतिप्राचीनकाली जलप्रदेश असावा असे इतिहासकारांचे व भूगर्भशास्त्रज्ञांचे मत आहे. भूगर्भातील स्थित्यंतरामुळे जलमय भाग कमी होऊन या ठिकाणचा भूप्रदेश वर येण्याची शक्यता साधार पटू शकते. ज्वालामुखींच्या स्फोटांनी होत्याचे नव्हते होऊ शकते. येथील असंख्य सरोवरे अतिप्राचीनकाली येथे प्रचंड सरोवर असावे याचीच साक्ष देतात!...

हिमाचलपुत्री पार्वती, तिचे दुसरे नाव सती असे होते. तिच्या नावावरून येथील विशाल सरोवराला 'सतीसार' असे नाव पडले होते. या सरोवरालगतच्या पर्वतावर भगवान शंकराचे तपस्यास्थान होते. परशुरामांनी सात वेळा क्षत्रियांचे शिरकाण केल्यानंतर जिंकलेला प्रदेश ब्रह्मर्षी कश्यपांना दान केला होता. ब्रह्मर्षी कश्यप या प्रदेशात विहार करीत असताना सतीसार सरोवराच्या काठावर आले होते. त्या रम्य सरोवराने केवळ त्यांचे मन आकर्षून घेतले नव्हते, तर अशा सुंदर स्थळी ऋषिजनांचे विशेष वास्तव्य नसावे याची रुखरुख त्यांच्या मनाला लागून राहिली होती. जे थोडे ऋषी भेटले त्यांचेकडून तेथील संकटाचे हृदयद्रावक वृत्त समजले होते. या सरोवरात जलदेव नावाचा महाभयानक राक्षस वास्तव्य करीत असून तो ऋषिमुनींना उपद्रव देतो असे महर्षींनी ऐकले होते. जलदेव राक्षसाच्या निःपातासाठी व गुणी ऋषिजनांच्या संरक्षणासाठी आपण येथे वास्तव्य करून राहावे अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाली होती. हा प्रदेश भावल्याने त्यांच्या अस्मितेला हे एक आव्हान होते. यासाठी खूप परिश्रम व घोर तपश्चर्या करावी लागणार होती, या जाणिवेने त्यांनी ब्रह्मा यांचे आशीर्वाद मागितले होते. भगवान शंकराकडेही त्यांनी शक्तीसाठी प्रार्थना केली होती. विष्णूकडे करुणा

भाकून साहाय्यासाठी याचना केली होती. ब्रह्मा, विष्णु, महेश या परमेश्वरत्रयीने ब्रह्माच्या नौबंदन तीर्थस्थानी कश्यपमुनींना सर्वतोपरी सक्रिय प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला होता. भगवान विष्णूने श्रीकृष्णबंधू बलभद्र या स्थापत्यशास्त्रज्ञाला पाचारण करून 'बारा मुल्ला' येथील पर्वत फोडण्याचा आदेश दिला होता. बलरामाने त्या आज्ञेचे पालन करून पर्वताला खिंडार पाडले होते. बलरामाच्या या पराक्रमामुळे या स्थानाला त्याच्या नावावरूनच अपभ्रंश होऊन 'बारामूला' नाव पडले. अशा रीतीने सतीसार सरोवरातील पाणी वाहून जाऊन आतील भूभाग कोरडा पडला होता! सरोवरातील पाणी कमी झाल्याने जलदेव राक्षसाच्या मर्मस्थानीच हा घाव बसला होता. त्या प्रहाराने त्याची शक्तच हिरावून घेतली होती. जलदेव राक्षसाच्या जाचापासून हा भूप्रदेश मुक्त झाल्यानंतर महर्षी कश्यपांनी आर्यावर्तातील ब्राह्मणांना व इतरेजनांना येथे येऊन वास्तव्य करण्याचे विनम्र आवाहन केले. कश्यपमुनींच्या या लोकोत्तर कर्तृत्वामुळेच या भूभागास त्यांचे नामाभिधान प्राप्त झाले आणि हा प्रदेश 'कश्यपमरू' म्हणून ओळखला जाऊ लागला होता. मरु म्हणजे मार्ग. कश्यपमरु म्हणजे कश्यपाचा मार्ग. 'मरु' किंवा 'मार' म्हणजे रमणीय प्रदेश असाही एक अर्थ 'मार' शब्दास असल्याने कश्यपमुनींनी फुलविलेले हे रमणीय स्थान म्हणून हा रमणीय प्रदेश कश्यपमरू' किंवा 'कश्यपमार' या नावाने ओळखला जाऊ लागला. पुढे कालांतराने या 'कश्यपमार' चे 'काश्मिर' या नावात रूपांतर झाले! 'काश्मिर' चा आणखी एक अर्थ 'स्फटिक' असा आहे. स्फटिकासारखा हिमाच्छादित प्रदेश म्हणून याचे नाव 'काश्मिर'! कोणी कोणी 'काश्मिर'चा 'केशर' असाही अर्थ घेतात. काश्मिरमधील अव्वल केशराच्या उत्पादनाने हे नाव सार्थ झाले आहे!...

FOR
LINE, HALFTONE,
COLOUR
**BLOCKS**
**STEREOS**
and
**MATS**
contact
**KHADILKAR**
**PROCESS STUDIO**
**COLOUR BLOCK MAKERS**
461/1, SADASHIV PETH, TILAK ROAD,
POONA 411 030 PHONE : 44 30 59

## शंभरभक्त नागांचे वास्तव्य

बाराव्या शतकातील कर्क कल्हणच्या 'राजतरंगिणी' या ऐतिहासिक महाकाव्याने काश्मिरच्या जडणघडणीवर बराच प्रकाश पडतो. 'नीलमत' पुराणावर आधारलेल्या या काव्यरचनेत काश्मिरवर कोणकोणत्या राजांनी केव्हा केव्हा नि कसे कसे आधिपत्य केले याचे विवेचन आहे. काश्मिरचा कालखंड 'लौकिकाब्द' नावाच्या शब्दाने गणला जातो. 'लौकिकाब्द' शब्दाची गणना पांडवराज युधिष्ठिर याच्या निर्वाणसंवत्सरापासून म्हणजे इसवीसनपूर्व ३०७६ वर्षांपासून सुरू झाल्याचे कल्हण प्रतिपादतो. याचाच अर्थ काश्मिरला असा पुरातन इतिहास आहे! काश्मिरच्या अधिपतींत सर्वप्रथम उल्लेख गोनंदराजाचा असून पांडवकालीन हा नृपती श्रीकृष्णद्वेष्टा होता व जरासंधाचा तो मित्र होता. या गोनंद राजघराण्यात सम्राट अशोक हा गोनंदनंतरचा सत्तेचाळिसावा राजा होता. अशोकानंतर त्याचा पुत्र जलौक. त्यानंतर आले हुष्क, जुष्क व कनिष्क. हे तुरुष्क अर्थात कुशाण राजे आणि नंतर हूण राजे, दुर्लभवर्धन, विनयादित्य, विद्याराणी, अनंतकलश हे काश्मिरनरेश याच प्रभावळीतले!... काश्मिर–अधिपतींची अशी ही परंपरा...

हिमालयाच्या परिसरातील या भूभागात श्रीशंकराचे वास्तव्य होते. शंकराची पत्नी पार्वती ही पूर्वजन्मीची शंकरभार्या सती होती. दक्षकन्या सतीशी शंकराचे लग्न झाल्यावर पुढे दक्षांनी जो यज्ञ केला होता त्या प्रसंगी शंकराचा अवमान झाला होता. म्हणून पित्याच्या यज्ञकुंडात सतीने स्वतः समर्पित होऊन भस्म करून घेतले होते. याच सतीचा पुढे हिमालयाच्या घरी 'पार्वती' म्हणून पुनर्जन्म झाला होता व पार्वतीने पूर्वजन्मीच्या पतिनिष्ठेने शंकराला वश करून घेतले होते. या सर्व घटना याच 'सतीसार' प्रदेशात घडल्या होत्या!

नागलोक तर शंकराचे परमभक्त. आपल्या परमेश्वराच्या आराधनेसाठी नागांचे वास्तव्य या प्रदेशात होते. अनेक नागराजांच्या परिश्रमाने व कश्यपमुनींच्या प्रेरणेने या भूभागाचे खूपच परिवर्तन झाले होते. नागांच्या या बहुमोल कर्तृत्वामुळे काश्मिरमधल्या अनेक स्थानांना शेषनाग, अनंतनाग, कोकरनाग, वासुकीनाग, तक्षकनाग, नरनाग, नीलनाग, वीरनाग अशी नावे पडली होती! काश्मिर प्रदेशातील श्रीशंकराची अनेक मंदिरे या विधानास पुष्टीच देतात!.. यावरून हा प्रदेश नागांचा होता असे काही जाणकार मानतात!...

परशुरामाने हा भूभाग कश्यपमुनींना दान केल्यामुळे कश्यपमुनी नर्मदातीरावरून या जलमय प्रदेशात तपश्चर्येसाठी आल्याचे जाणकार प्रतिपादतात, तर काहींच्या मते 'कास्पियन' समुद्रापासून जे आर्य लोक हिमालयाच्या रोखाने आले होते, त्यांचे औध्वर्य कश्यपमुनीकडे होते. कश्यपमुनीचा कास्पियन समुद्राशी निकटचा संबंध होता,

राष्ट्रप्रेमाचे, शिस्तबद्धतेचे, विज्ञाननिष्ठेचे, व्यसनमुक्तीचे नि लोकशिक्षणाचे धडे राजा पाटिलांनी संघाच्या छायेत नि सेवादलाच्या मैदानात गिरवले आणि आज तेच धडे पर्यटनाद्वारे, प्रसंगी प्रवाहाविरुद्धही जाऊन ते जनमानसात रुजवीत आहेत नि म्हणूनच केवळ सुज्ञ धनिकच नव्हे तर बुद्धिमंतही पर्यटनक्षेत्रात त्यांना मानतात. अशा ह्या

## "राजा" च्या २–२ शेच्या २५ काश्मीर–सफरी

५ व १२ मेच्या सफरी अर्ध्याअधिक भरल्या ! आजच भेटा ! १४ एप्रिलपासून २८ ऑक्टो. दर शुक्रवारी सफर.
१४ एप्रिल वा १६ / २३ जूनच्या सफरीत या व हवं तर आणिक ७ दिवस ७०० ते १००० रुपयांत रहा!
खास लोकाग्रहास्तव ह्या वर्षी वाढवलेल्या अशा उत्कृष्ट हंगामातील–फेब्रुवारीमधील सफरी !

| | | |
|---|---|---|
| **राजस्थान**<br>९ ते १६ फेब्रुवारी<br>२ खास डब्याद्वारे | **नेपाळ**<br>१७ फेब्रुवारी व ३१ मार्च<br>बस व हॉटेल्स | **दक्षिण भारत**<br>२६ फेब्रुवारी ते १६ मार्च<br>रेल्वे–बस व हॉटेल्स |
| **युरोप**<br>२८ मे ते १६ जून ८३ | **२ अमेरिका**<br>६ मे व २ री १६ जूनपासून | **संयुक्त सफर**<br>१० जुलै ते ६ ऑगस्ट ८३ |
| **२ जपान**<br>२ मे व ८ ऑगस्ट ८३ | **३ साउथ ईस्ट**<br>१ मार्च / २ मे व ८ ऑगस्ट | **३ मिनी फॉरेन**<br>१ मार्च / २ मे व ८ ऑगस्ट |

जगाने अद्यापि बुकिंग सुरू केले नाही अशा विख्यात

### वर्ल्ड ऑलिंपिक सफरीवर ३१ बुक !

जपान + अमेरिकासह वा युरोप + अमेरिकासह वा फक्त अमेरिकेसह ऑलिंपिक जुलै ८४.
५०० रु. प्रत्येकी भरून आजच नावे नोंदवा ! ३० जून ८३ पर्यंत रद्द केले तरी पूर्ण रक्कम परत !


फी + १० रुपयांत पासपोर्ट ! कुणीही प्रत्यक्ष ३ महिने आधी यावे.
रेल्वे / एअर रिझर्वेशन्स व पासपोर्ट–व्हिसा साठीही ३ / ४ महिने आधी यावे !
नपेक्षा निराशा वा अटींवर जावें लागेल !

## राजा / राणी ट्रॅव्हल्स ★ राजकुमार ट्रस्ट्स

स्वीट होम, ले. ज. रोड, बॉम्बे डाइंगवर मुंबई १६ (फोन ४५६३६४) सकाळी ९ ते ११ व सायंकाळी ५ ते ८.
( घरी फोन : ४६४१४९ रात्री ९ ते सकाळी ९ )पुणे प्रतिनिधी : सौ. संजिवनी औटी, इ १, मधुबन अपार्टमेन्ट, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४. फोन : ५४०५७ ( पुणे )

ह्णून कश्यपीय म्हणज कश्यपादे यावरून कश्यपाचे सार्वभौमत्व असलेल्या समुद्राला ‘ कश्यपीय ’ असे बिरुद प्राप्त झाले होते. पुढे हेच नाव ‘ कास्पियन ’ म्हणून रूपांतरित झाले.

काश्मिरभूमीत ‘ पिशाच ’ म्हणजे येथील आदिवासी रहिवासी आणि ‘ नाग ’ यांच्यात संघर्ष होऊन नागांचे वर्चस्व या भूमीवर प्रस्थापित झाल्याचा उल्लेख नीलमत पुराणात आहे. जलदेव या पिशाच्च राक्षसाची आख्यायिका या घटनेशी निगडित असावी, ‘ जलदेव ’ राक्षसाचा उल्लेख कोठे कोठे ‘ जलोद्भव ’ राक्षस असाही आढळतो, या ‘ जलोद्भव ’ राक्षसाच्या पारिपत्यासाठी कश्यपमुनी व त्यांचा पुत्र नीलमुनी या उभयतांनी शंकराकडे धाव घेतली होती. शंकराने त्यांना सतीसारखे पाणी हटवण्याचा सल्ला दिला होता. ज्या ठिकाणी ही चर्चा झाली होती त्या ठिकाणी शंकराने स्वतः आपल्या त्रिशूलाने खड्डा पाडला होता. याच ठिकाणाहून ‘ वितस्ते ’चा उगम झाला होता. वितस्तेच्या या जलौघातून सतीसारचे पाणी समुद्राकडे वाहत जाऊन जलमय प्रदेश अशा रीतीने भूप्रदेश बनला होता, जलाशयाच्या आधाराने सुरक्षित राहिलेला ‘ जलोद्भव ’ राक्षस उघडा पडल्याने निराधार अवस्थेत त्याचा शेवट झाला होता ! ... ज्या स्थानी ही घटना घडली ते स्थान ‘ वैरनाग ’ म्हणून ओळखले जाऊ लागले. याला काही जण ‘ वीरनाग ’ असेही संबोधू लागले. वैरनाग या नावामागे जलराक्षसाच्या वैराचा आशय असावा तर वीरनाग या नावामागे कश्यपमुनी व त्यांचा पुत्र नीलमुनी यांच्या पराक्रमाचा संदर्भ असावा ! वैरनाग अथवा वीरनाग याचाच कलांतराने ‘ वेरनाग ’ असा अपभ्रंश झाला असावा !




या काश्मिरभूमीत कश्यपाने ‘ पिशाच ’ व ‘ नाग ’ यांच्यात सलोखा घडवन आणला याची नोंदही नीलमत पुराणात असल्याचे विद्वान सांगतात. अदिति, दीति, दनु, काला, दयानु, सिंहिका, क्रोधा, प्राधा, विश्वा, विनिता, कपिला, मुनि, कद्रु या दक्षप्रजापतीच्या तेरा कन्या कश्यपाच्या भार्या होत्या आणि त्यांना सुर व असुर अशा दोन्ही प्रकारची संतती झाल्याची महाभारताच्या आदिपर्वात नोंद आहे. एकाच मातापित्यांना दैवी आणि दैत्यी प्रवृत्तीची संतती होऊ शकते हा पूर्वापार सृष्टिनियम आहे !

## वितस्ता .... जेलम .... झेलम

नागांची शंकर–पार्वती या आराध्य दैवतांवर असीम श्रद्धा होती हे शंकराच्या गळ्यातील नागाच्या प्रतिकाद्वारे स्पष्ट होते. नागराजांच्या नाण्यावर शंकर, पार्वती, नाग आणि त्रिशूळ यांच्या मुद्रा असण्याचा संशोधकांनी आवर्जून उल्लेख केलेला आहे ! यावरून काश्मिरभूमी ही नागांची भूमी होती व काश्मिर हे शंकर–आराधनेचे आदिपीठ व आदिमाता पार्वतीचे शक्तिपीठ होते असे निकष निघतात !

कश्यपमुनी पुत्र नीलनाग याने या प्रदेशात वासंतिक महोत्सव घडवून आणून संस्कृतिसंवर्धनासाठी समृद्धीबरोबरच परिश्रम केले होते. यासंबंधीचे उल्लेखही नीलमत पुराणात असून अद्याप काश्मिरमध्ये वासंतिक उत्सव होतो. याशिवाय ज्येष्ठाष्टमीचा क्षीरभवानी उत्सव कार्तिक महिन्यातला कौमुदीमहोत्सव व दीपमालाउत्सव आदी उत्सव व सण तेव्हापासून आजतागायत साजरे होत आले आहेत.

या भूभागाच्या जडण घडणीला ‘ वितस्ता ’ नदीचेही प्रचंड वरदान आहे, वेरीनागहून येणारी ही ‘ वितस्ता ’ अर्थात ‘ जेहलम ’ किंवा ‘ झेलम ’ काश्मिर खोऱ्यात दरवर्षी डोंगरकडयांची व कातळांची कापणी करून आपल्या प्रवाहाबरोबर बराचसा गाळ आणते. तिच्या डाव्या बाजूने तिला ठिकठिकाणी विष्णू, रामबियास, रामेशी, दूधगंगा इत्यादी व उजव्या बाजूने लंबोदरी म्हणजेच लीदर, तसेच सिंध आदी नद्या मिळतात. कोटाहर परगण्यातील असंख्य झरे, कोकर, नाम, अच्छावण, अर्पसनाग, मानसबल येथून येणारे उत्स्फूर्त जलप्रवाहही झेलमला समृद्ध करतात. पंचनदमध्ये वितस्ताला हे मानाचे स्थान आहे ! महर्षी कश्यपांनी नीलनाल म्हणजेच वेरीनाग येथे भगवान शंकराची आराधना केली होती. श्रीशंकरांनी संतुष्ट होऊन वर मागण्याची कश्यपांना आज्ञा केली होती त्या स्थानी ‘ गंगावतरण ’ व्हावे अशी कश्यपांनी याचना केली होती. महर्षी कश्यपांच्या प्रार्थनेप्रमाणे भगवान शंकराच्या मस्तकावरची गंगा भाद्रपद शुद्ध त्रयोदशीला या स्थानी अवतरली होती. ती नीलनाग म्हणजेच वीरनाग येथून स्रवू लागली होती. तीच ही गंगारूप वितस्ता ! राजा अवंतीवर्मनने वितस्तेवर जागजागी बंधारे बांधून काश्मिरला फुलवले–फळवले होते ! ‘ वितस्ता ’ ही यासाठी काश्मिरी जनतेचे विनम्र, पवित्र, परंपरापुनित श्रद्धेय स्थान आहे. दरवर्षी भाद्रपद व चैत्र शुद्ध त्रयोदशीला ‘ वितस्ते ’ची महापूजा होते व तिला दूधभाताच्या गोड खिरीचा नैवद्य भाविकतेने दाखविला जातो. ... या ‘ गंगामय्ये ’ची ही पूजा काश्मिरी जनतेच्या असंख्य अशा आकांक्षा फुलविते. काश्मिरमधल्या स्कंदपूजा, अक्षयतृतीयापूजा, कामदेवपूजा,




# पोरवाल नेत्रांजन
# डोळ्यांचा शीण घालविते

"सिनेमाचं शूटिंग, जागरण, प्रखर प्रकाश, ऊन, वारा यामुळें डोळ्यांना खूप त्रास होतो. रात्रीं झोपतांना पोरवाल नेत्रांजन डोळ्यांत घातलं कीं, क्षणांत थंडगार वाटतं. शांत झोप लागते. सकाळीं उठल्यावर ताजे तवानें वाटते."

सुप्रसिद्ध सिने तारका सुलोचनाबाई म्हणतात

रोज रात्रीं झोपतांना आपणही पोरवाल नेत्रांजन वापरा.

## पोरवाल नेत्रांजन

हें काजळ नसून डोळ्यांना सुखविणारे अंजन आहे.







पोरवाल आणि कंपनी,
टिळक रोड, पुणें-३०, फोनः ४०१६३

762

भद्रकालीपूजा, बुद्धदेवपूजा या असंख्य पूजांमागे काश्मिरी जनतेच्या अनंत आणि नितांत श्रद्धा आहेत !

काश्मिरमधल्या असंख्य सरोवरांशीही काश्मिरी माणसाच्या श्रद्धा निगडित झालेल्या आहेत. ... 'कलरलेक' याचे मूळ नाव 'महापद्म सरोवर' असून ते अनेक धर्मीयांना पूजनीय आहे. महापद्मच्या शापाने येथील नगरीला जलसमाधी मिळाल्याची आख्यायिका असून या महापद्मच्या नावावरून याला 'पद्मसरोवर' असे नाव पडले आहे. या सरोवरात उफाळणाऱ्या कल्लोळी लाटांमुळे याला 'कल्लोळ सरोवर' असेही नाव पडले की ज्याचे पुढे 'कलर' असे रूपांतर झाले ! ... 'मानसबल' सरोवरात स्नान केल्याने मोक्ष मिळतो अशी काश्मिरी भाविकांची श्रद्धा आहे. कैलासाजवळील मानससरोवरात स्नान करणे दुर्धर असल्याने हे मानसबलसरोवर त्याची प्रतिकृती मानून भाविक निष्ठेने या सरोवरात पवित्र स्नान करतात. 'दाल' सरोवराच्या पाण्यात पर्वतराशी आपली प्रतिबिंबे पहातात, तर 'अंचारलेक'मध्ये हिमशिखरे स्नानासाठी उतरतात ! असा हा रमणीय, प्रेक्षणीय, लक्षणीय भूभाग; त्याचा हा असा सनातन पुरातन इतिहास !

जो अनेकांनी घडवला... सुवर्णअक्षरांनी लिहिला... या इतिहासाची काही पाने सोनेरी तर काही घाणेरी...

## सोनेरी .... घाणेरी


सम्राट अशोकाने पांद्रेठण येथील राजधानी हलवून श्रीनगर शहर वसवले होते व तेथे आपली राजधानी स्थलांरित केली होती. सम्राट अशोकानंतर सम्राट कनिष्काने कनिष्कपूर येथे बौद्धधर्मीयांची चौथी आमसभा बोलावली होती. पंडित नागार्जुनाने ही सभा गाजवली होती. सम्राट कनिष्कानंतर सम्राट मेघवाहन या सर्व अधिपतींच्या कालखंडात येथील दऱ्या–खोऱ्यात सुखशांती नांदली होती. प्रजाजनांनी सुबत्ता उपभोगली होती. सहाव्या शतकात जैन श्रावक अजित व रत्न यांचा काश्मिरमध्ये बराच बोलबाला झाला होता. यावरून जैनधर्माचाही काश्मिरवर प्रभाव पडला होता असे दिसते. पुढे शक, कुशाण आणि हूण यांच्या स्वाऱ्यांनी येथील शांततेला तडा गेला. मिहरगुल नावाच्या हूण सरदाराने तर काश्मिरमधील सुखशांती चिरडून टाकली होती. तो काश्मिरला कर्दनकाळ ठरला होता! आठव्या शतकात ललितादित्य या हिंदू राजाने भारतात व भारताबाहेरही आपला वचक बसवून काश्मिरचा डंका जगभर पसरवला होता. राजा ललितादित्याच्या दरबारात कनोजचे भवभूती व वाक्पतीराजा या कवींना मनाचे स्थान होते. मार्तंडमंदिर व परिहासपुरा नगरी ही या राजाची काश्मिरमधली स्मारकेच म्हणावी लागतील ! त्याच्या राज्यात काश्मिर वैभवाच्या शिखरावर होते ! ललितादित्यानंतर राजा अवंतीवर्मनने काश्मिरच्या प्रगतीत मोठे योगदान दिले होते. त्याने वसवलेले अवंतीपूर आजही त्याने केलेल्या वितस्तेच्या विकसनाची आठवण करून देते ! या राजाची वंशज राणी विद्या त्याच्यासारखीच कर्तृत्ववान आणि शक्तिमान होती. तिच्या पश्चात अनेक राजघराणी आली होती आणि गेली होती ! यानंतर दर्दिस्तानचा शहा मीर जो शमसुद्दीन म्हणून प्रसिद्धी पावला होता, त्याने काश्मिरवर इस्लामी राज्य आणले होते. त्यानंतरचा शहाबुद्दीन राजा. हरिणाक्षीची नजर, मद्यपानाची नशा किंवा चंद्रप्रकाशाची शीतलता या राजाला कधी भूल घालीत नव्हती. सैन्याबरोबर स्वतः कूच करण्यात हा फाजील महत्त्वाकांक्षी राजा धन्यता मानीत होता. नंतर उल अबिद्दिन या राजाने परंपरागत हस्तकलेला पुनरुज्जीवन देऊन उत्तेजन दिले होते. पुढे पुन्हा हिंदू राजा सुखदेव ऊर्फ सिंघदेव. सिंघदेवच्या पश्चात त्याचा सेनापती रामचंद्र. रामचंद्राची हत्या करून तिबेटचा सेनापती रेचन शहा याने सत्ता बळकावली होती. हा राजा अवलिया व विक्षिप्त होता. त्याने रामचंद्राची कन्या कोटा हिच्याबरोबर लग्न केले होते. पत्नी हिंदू तेव्हा तिच्या प्रेमाखातर स्वतःचा बौद्धधर्म सोडून आपणही हिंदू व्हावे अशी रेचनशाहची मनोधारणा होती. म्हणून त्याने हिंदूधर्माची दीक्षा देण्याबद्दल तेथील ब्राह्मणांना विनंती केली होती; परंतु ब्राह्मणांनी या गोष्टीस नकार दिला होता. अखेरी चिडून विदग्ध मनःस्थितीत रेचनशाहने बुलबुल नावाच्या फकिराला पाचारण करून त्याच्याकरवी मुसलमानधर्म स्वीकारला होता ! त्याने सर्दउद्दिन नाव धारण करून स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला होता. त्या काळी काश्मिरमध्ये हिंदूंचे प्राबल्य होते, हाच या घटनेमागचा मथितार्थ होता. सर्दउद्दिनची राजवट तीनच वर्षे टिकली.


**NANDRAJ INDUSTRIES**

'BHAGIRATHI', 129 (A) Shivashankar Society, Sinhagad Road,
Pune-411 030

Tel-470030

MFRS. OF ALL TYPES OF STRIP & COIL SPRING, WIRE FORMATION, SPRING WASHERS ETC.



त्यानंतर सुलतान जैतुल आब्दीन हा शियापंथी राजा काश्मिरात लोकप्रिय झाला होता व 'काश्मिर—सम्राट' या किताबाने तो मान्यता पावला होता सरशेवटचा शियापंथी राजा याकूब शाह याचा सम्राट अकबराने पाडाव करून काश्मिरवर मोगल साम्राज्याचा पगडा बसवला होता. अकबरानंतर जहांगीर... शहाजहान... औरंगजेब... बहादूरशहा... या सर्वांनंतर काश्मिरवर अहमदशाह दुराणीची हुकमत आली होती. कालांतराने पंजाबकेसरी महाराजा रणजितसिंगचा सेनापती चंद्रमित्र याने जम्मूचे राजा गुलाबसिंह डोग्रा याची मदत घेऊन काश्मिरवर विजय मिळवला होता व आपले अधिराज्य प्रस्थापित केले होते. अशा तऱ्हेने काही काळ काश्मिरवर शिखांची सत्ता होती. पुढे इंग्रजांनी शिखाचा पाडाव करून त्यानी जम्मूचे महाराजा गुलाबसिंह यांना काश्मिर-प्रदेश पंचाहत्तर लाख रुपयास विकला होता !

डोग्रा अधिपती गुलाबसिंहमहाराजांनी आपल्या कारकीर्दीत लडाख, गिलगिटसारखे पहाडी प्रदेश काबीज करून आपल्या राज्याच्या सीमा विस्तारल्या होत्या. महाराजा गुलाबसिंहनंतर महाराजा रणवीरसिंह, त्यांच्यानतर महाराजा प्रतापसिंह आणि त्याच्या पश्चात महाराजा हरिसिंह !... अशा तऱ्हेने जम्मू, काश्मिर, लडाख, गिलगिटसह विस्तारित प्रदेश इ. स. १९४७ पर्यंत डोग्रा आधिपत्याखाली होता !

### शेख अब्दुल्ला... नवीन धुमारे

सन एकोणिसशेतीस साल हिंदुस्थानच्या राजकीय जीवनात नवा उन्मेष घेऊन आले होते. महात्मा गांधींच्या असहकार चळवळीने असंख्य हिंदी जनांची मने काबीज केली होती. स्वातंत्र्याची ज्योत काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत व द्वारकेपासून शांतिनिकेतनपर्यंत अनेकांच्या अंतःकरणात प्रज्वलित झाली होती. हिंदुस्थानातल्या संस्थानातली प्रजाही याला अपवाद नव्हती. जागजागी असंख्य नावांखाली या रसरशीत चळवळीला धुमारे फुटत होते. काश्मिरमध्ये एकोणीसशेएकतीस साली असेच एक बीज 'मुस्लीम कॉन्फरन्स पार्टी' या रूपाने अंकुरले होते. शेख महंमद अब्दुल्ला या तडफदार तरुणाने स्थापिलेल्या या पक्षाची चळवळ हळूहळू जनमत आकर्षून घेत होती; पण ती आमजनतेची चळवळ म्हणून मान्यता पावत नव्हती, म्हणून फोफावत नव्हती. जवळच वायव्य सरहद्द प्रांतात खानबंधूंचा खूपच बोलबाला होत होता. डॉ. खानसाहेब व अब्दुल गफारखान यांच्या पाठीशी हिंदू, मुसलमान, शीख आदी सर्व धर्मांचे लोक होते. गफारखान तर 'सरहद्दगांधी' म्हणून मान्यता पावले होते व 'बादशहाखान' म्हणून ते वायव्य सरहद्द प्रांतातील जनतेच्या हृदयसिंहासनावर वायव्य सरहद्द प्रांताचे अनभिषिक्त बादशहा म्हणून विराजमान झाले होते ! खानबंधूच्या लोकविलक्षण लोकप्रियतेचे रहस्य त्यांच्या जातिनिरपेक्ष विचारसरणीत व वृत्तीत आहे हे जाणून व त्यांच्या अलौकिक लोकप्रियतेने प्रभावित होऊन 'मुस्लिम कॉन्फरन्स पार्टी'च्या संस्थापकाने त्या पार्टीचे 'नॅशनल कॉन्फरन्स पार्टी' असे नामांतर एकोणीसशेअडतीस साली घडवून आणले होते. त्यासरशी काश्मीरमध्ये हिंदू, मुसलमान, शीख, बौद्ध आदी सर्व धर्मीय 'शेर ए काश्मिर'च्या पाठीशी एकदिलाने उभे राहिले होते !

शेखसाहेबांनी 'मुस्लिम कॉन्फरन्स' चे केलेले नामांतर ऑल इंडिया मुस्लिम लीगचे अध्यक्ष बॅ. महमदअली जिना याना पसंत नव्हते. त्या पार्टीचे नाव 'मुस्लीम कॉन्फरन्स पार्टी' करावे असा त्यांनी शेखसाहेबांकडे आग्रह धरला होता; पण शेखसाहेबानी त्यांची ती सूचना धुडकावून लावून ठामपणे नकार दिला होता. एवढेच नव्हे तर बॅ. जिनांची 'द्विराष्ट्र' कल्पना नॅशनल कॉन्फरन्सला मान्य नसल्याचेही त्यांनी बॅ. जिनांना ठणकावून सांगितले होते ! त्याचबरोबर नॅशनल कॉन्फरन्स पार्टी, शेख अब्दुल्ला व त्यांचे सहकारी यांनी स्वतःला राष्ट्राच्या प्रमुख राजकीय प्रवाहात झोकून घेतले होते !

हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या अशा असंख्य कार्यकर्त्यांच्या उठावाने गांधी, नेहरू, पटेल, आझाद याच्या अविश्रांत परिश्रमाने, लाल-बाल-पाल याच्या असीम त्यागाने, सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर आदीच्या हौतात्म्याने दिनांक पंधरा ऑगस्ट एकोणीसशेसत्तेचाळीसच्या मध्यरात्री खंडित भारत काळजाचा भला मोठा लचका तोडून देऊन, स्वतंत्र झाला होता! मध्यरात्रीला स्वातंत्र्याचा सूर्योदय झाला होता !

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक नवा यज्ञ सुरू झाला होता. भारतात विखुरलेल्या संस्थानाचे भारतात विलिनीकरण करण्याचा तो यज्ञ होता आणि या यज्ञाचे पौरोहित्य सरदार पटेलांच्याकडे होते. मोठमोठे संस्थानिक भारतात विलीन व्हायला तयार नव्हते. त्यांना


आपणास चटकन पसंत पडतील असे सोन्या—चांदीचे, मोत्यांचे व जवाहिराचे नाविन्यपूर्ण नाजूक अलंकार तसेच सांगली व नासिक घाटाची चांदीची नित्योपयोगी भांडी खात्रीशीर मिळतील. तसेच नवग्रहांची रत्ने, अंगठ्या, जन्ममास रत्ने मिळतील—

**मे. पु. ना. गाडगीळ आणि कंपनी**

**सराफ व जव्हेरी**

कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणे ३०. फोन : ४४५७४२



**VIJAY Enterprises**

**Facility For Dynamic Balancing Test**

**Poona :** 1231, Sadashiv Peth, Opp. Geeta Dharma Mandal, Pune 30

**Dapodi :** Opp. Vulcan Laval Ltd. Bombay–Poona Road Dapodi, Pune 411 002

स्वतःचे अस्तित्व अबाधित ठेवावयाचे होते ! काश्मिरनरेश हरिसिंह-महाराजांची अशीच महत्त्वाकांक्षा होती. त्यांनी भारतात विलीन होण्यास प्रथम नकार दिला होता. दुर्दैव हे की, त्याच वेळी पाकिस्तानी फौजेने काश्मिरवर हल्ला केला होता. हा हल्ला परतवून लावण्यासाठी व काश्मिर स्वतंत्र राष्ट्र म्हणून सुरक्षित ठेवण्यासाठी हरिसिंहमहाराजांनी सीमेपार निघालेल्या ब्रिटिश फौजाची मनधरणी केली होती; पण त्याचे हे गुफ्तगू फलद्रूप झाले नव्हते. उशिरा का होईना महाराजा हरिसिंहांनी भारतात विलीन होण्यासाठी मान्यता दिली नसती व वेळीच भारतीय सैन्याने पाकिस्तानी फौजेवर चाल केली नसती तर सर्वच काश्मिर पाकिस्तान्यांच्या घशात जाऊन पडला असता. भारतीय सैन्याच्या जबरदस्त अस्मितेमुळे व नॅशनल कॉन्फरन्स पार्टी आणि तिचे अध्वर्यू शेख अब्दुल्ला यांनी काश्मिरी जनमत प्रभावीपणे संघटित केल्यामुळे महाराजाना—हरिसिंहाना—दि. २६ ऑक्टोबर १९४७ रोजी विलीन होण्याचा निर्णय घ्यावा लागला होता. या वेळपर्यंत पाकिस्तानी फौज परतली होती; पण जाता जाता तिने काश्मीरचा लचका तोडून गिलगिट, उंझा, स्काडू वगैरे 'आझाद कश्मीर' भाग व्यापला होता. महाराजा हरिसिंहांनी आढेवेढे न घेता तत्परतेने निर्णय घेतला असता तर हा भाग पाकिस्तानला मिळाला नसता. भारतीय सेनेने पाकिस्तानी फौज परतवून लावून न थांबता पुढे आणखी धडक मारली असती तर हा पाकव्याप्त काश्मिर निदान मुक्त करता येणे अवघड नव्हते; पण आंतरराष्ट्रीय दबावापुढे भारतीय सेना व भारतीय नेते निष्प्रभ ठरले होते.


WITH BEST COMPLIMENTS FROM :

**Mahindra Engineering & Chemical Products Ltd.**

145, Bombay-Poona Road,
Pimpri,
POONA-411 018.

*MANUFACTURERS OF :*
M-SEAL CABLE JOINTING KITS,
ARC CHAMBER HOUSING,
M-SEAL COMPOUNDS.

Phone : 82771-83577-83578
Grams : "EMSEAL" Pimpri PF.
Telex : 0145-476.


स्वर्गीय लालबहादूर शास्त्री पंतप्रधान असतानाही पाकिस्तानशी झालेल्या युद्धात भारतीय सेनेने बळकावलेला प्रदेश पाकिस्तानला परत करण्याची भारतावर पाळी आली होती. रशिया हा भारताचा जवळचा मित्र, पण त्यानेही असा विश्वासघाताने व केसाने गळा कापला होता. तरीही भारत त्याची मैत्री भूषणावहच मानतो हे दुर्दैवच मानावे लागेल !

आता तर भारत आणि पाक यांनी संयुक्त आयोग स्थापन केला आहे. आता दोन्ही देशातील भाविक जनता दोन्ही देशातील धर्मस्थानांना मुक्तपणे भेटी देऊ शकणार आहे. भारतातील हिंदू काही पाकिस्तानात जाणार नाहीत. जातील ते भारतीय मुसलमानच आणि तेथून ते परततील ते न जाणो मनात पेटलेले विद्रोहाचे आणि वैमनस्याचे प्रक्षोभक अंगार घेऊनच ! या पाकिस्तानातील मुसलमान भारतात येतील व जाता जाता येथे 'शरीयत'ची विषवल्ली पेरून जातील ! संयुक्त आयोगाचा हा अव्यवहार्य आत्मघातकी निर्णय भारताच्या नरडीला नख लावणार आहे !

दि. २६ ऑक्टोबर १९४७ रोजी जम्मू—काश्मिर भारतात विलीन होताच शेख अब्दुल्ला जम्मू—काश्मिरचे पहिले मुख्यमंत्री झाले होते. कधी भारताच्या केंद्रसत्तेशी संघर्ष तर कधी सलोखा, कधी पाकिस्तानाबद्दल जिव्हाळा तर कधी दुरावा अशा राजकीय धोरणातील दुटप्पीपणामुळे अनेकांच्या मनात शेखसाहेबाबद्दल वारंवार गैरसमज व संशय निर्माण झाले होते. त्रेपन्नपासून व्याहत्तरपर्यंतच्या कालावधीत त्यांना वारंवार कारावास भोगावा लागला होता. पुन्हा ते एकोणीसशेपंचाहत्तर साली सत्तेवर आले होते. तरुणपणी बॅ. जिनांच्या द्विराष्ट्र—कल्पनेला तडफेने विरोध करणाऱ्या शेखसाहेबांनी विचारांचे व अनुभवाचे प्रौढत्व आल्यावर स्वतंत्र भारत—काश्मिरचा ध्यास घेतला होता हे गूढ नव्हते तर सत्तालोभाचे ते द्योतकच होते! तरीही हे वादळी व्यक्तिमत्त्व काश्मिराभिमुखी होते ! शेखसाहेबांच्या शासनाने घेतलेले मुस्लीम व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरोगामी निर्णय 'शरीयत'च्या शर्तीविरुद्ध असल्याचा कांगावा जमाने इस्लाम किंवा पीपल्स लीग यासारख्या पाकिस्तानधार्जिणी संघटनांनी करून त्यांनी शेखसाहेबाबद्दल काश्मिरी जनमानसात गैरसमज पसरवले होते. राजकीय, सामाजिक व धार्मिक आघाड्यावर शेखसाहेबावर अशी अधूनमधून बरी-वाईट टीका होत राहिली होती. तरीदेखील 'शेर ए काश्मिर'ची जनतेच्या अंतःकरणात एक विलक्षण पण अनाकलनीय प्रतिमा होती ! शेखसाहेब मात्र राजकीय निरीक्षकांना पडलेले अतर्क्य आणि अद्भुत कोडे होते ! स्वतंत्र काश्मिर राष्ट्राचा, स्वायत्त काश्मिर राज्याचा एकसारखा घोशा लावणारे शेखसाहेब तरीही दुर्बोध गूढ होते ! न उकलणारे कोडे होते ! "

दि. ८ सप्टेंबर १९८२ रोजी काळाने त्यांना हिरावून नेले होते; परंतु त्यांची प्रतिमा अद्यापी काश्मिरी जनमानसावर विराजमान आहे. त्यांचा राजकीय वारसा आता त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव डॉ. फारुक अब्दुल्ला यांचेकडे आलेला आहे.

### स्वर्ग — नरक

इथेही 'घराण्याची सत्ता', बलशाली ठरून 'कायम'व झाली आहे !

चढउताराच्या या भूप्रदेशाने अनेक चढउतार पाहिलेले आहेत. काश्मीर खोऱ्यातली सुखशाती अनेकदा ढवळून निघाली आहे. बर्फाच्या वर्षावाने गोठून जावे तद्वत् परकीयांच्या विध्वंसक हल्ल्यानी या प्रदेशातले शात निरव जीवन अनेकदा गोठून गेले आहे. काळाने अनेक तडाखे खाल्लेल्या या 'हॅपी व्हॅली' मध्ये अशी सुखशाती नादणार आहे का हाच खरा प्रश्न आहे. या 'ॲपल व्हॅली' ची अस्मिता निष्कलंक राहणार आहे का अशी समस्या उभी ठाकली आहे. काश्मिरी माणूस सरळ, साधा आणि कमालीचा कष्टाळू आहे. अपमान 'बदतमीजी' अथवा अन्यायपूर्ण व्यवहार याची त्याला चीड येते. तो पापभिरु असल्याने 'अल्लानाला'वर असीम श्रद्धा ठेवतो. 'बिमारी' अथवा 'फसलची बरबादी' तो पीर–फकिराचा व खुदाचा प्रकोप मानतो. 'अपनी अनख और आन के रक्षा के लिये काश्मिरी बडे से बडी कुरबानी बिनदिक्कत जरूर देंगे. मौनही जिंदगीका अंजाम आहे!' असे बुलंद विचार मनी बाळगणारा काश्मिरी माणूस 'पेट्रो डॉलर्स'च्या आक्रमणाशी मुकाबला कसा करेल व 'शरीयतच्या' 'तूफानला तोंड कसे देईल हा आता यक्षप्रश्न आहे! त्याच्या भोवती तर आता दहशतीचा कोट उभा आहे! काश्मिरच्या उत्तरेस गिलगिट, हुंझा, स्कार्डू या पाकव्याप्त भारतीय प्रदेशात चीनने भव्य लष्करी सडक बांधली आहे. मिटाका खिंडीवाटे मुझफराबाद सिकियांग याना जोडणारा रस्ता, भोरखुन, काशघर याना सांधणारा खुजराव खिंडीतला मार्ग आणि पाकव्याप्त काश्मिरच्या भारतीय प्रदेशातून जाणारी काराकोरम सडक अशा चीनने बांधलेल्या अनेक वाटानी दोन्ही बाजूचे शत्रू केव्हा घुसतील याचा नेम नाही. पाकव्याप्त आझाद काश्मीरमध्ये आता अणुशक्ती-केंद्र उभारले जाणार आहे! सीमेवरचा धोका असा तीव्र व गंभीर झाला आहे!... जर गाफिलपणा झाला तर विनाशच ओढवणार आहे!...

शालीमार बागेवर 'बेहिसाब मोहब्बत' करणारा जहांगीरबादशाह लाडक्या नूरजहाच्या माडीवर डोके ठेवून, शालीमार बागेतच म्हणाला होता, 'नूरजहा' एकच आखरी तमन्ना आहे! काश्मिर सोडण्यापूर्वी हा शालीमार बगिचा डोळे भरून पाहून घेऊ या! हा पुन्हा बघायला मिळेल असं बिलकुल वाटत नाही आम्हाला. मरणानतर स्वर्ग पहायला मिळतो म्हणतात; पण जिवंतपणी तो पाहाण्याचं भाग्य आम्हाला लाभलं. हा स्वर्ग आणखी एकदा पाहून घ्यावा वाटतो, नूरमहल!' असं बोलत असताना बादशहाची बुझती नजर बागेतील एकेक पान, एकेक फूल पहात होती, शालीमार बगिचा डोळे भरून पाहून हा काश्मिरचा आशिक काश्मिरपासून दूर निघाला होता... जान ठेवून!... कफन घेऊन!

बादशहा जहांगिरवर आलेली पाळी कुठल्याच काश्मिरी माणसावर येऊ नये, मग तो हिंदू असो, मुस्लीम असो, शीख असो, वा बौद्ध असो!

पण रात्र वैऱ्याची वाटते!

डॉ. फारुक अब्दुल्ला मुख्यमंत्री झाल्यापासून शेख अब्दुल्लांचे ज्येष्ठ जामात जनाब जी. एम. शहा रुसून आहेत. अंतर्गत भाडणावरचे जनतेचे लक्ष उडावे म्हणून डॉ. फारुक अब्दुल्ला पुनर्वसन–विधेयकाचा पिच्छा पुरवीत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी आणू इच्छित आहेत. पीपल्स लीग, जमाते इस्लाम व मुस्लिम लीग या संघटनांवरही ही 'आफत' ओढवणार आहे; पण पाकिस्तानधार्जिण्या या संघटनांतील कट्टर देशद्रोही कार्यकर्ते नॅशनल कॉन्फरन्सच्या गोटात मागील दाराने शिरत आहेत. प्रसंग मोठा बाका आहे!... तेव्हा डॉ. फारुक अब्दुल्ला यानी परिस्थितीचे अचूक आकलन करून मगच राष्ट्रीय आणि काश्मिरी हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यायला हवेत.

शहाजहान बादशहाने 'स्वर्ग येथे आहे!... स्वर्ग येथे आहे!... स्वर्ग येथे आहे!...' असे काश्मिरविषयी गौरवास्पद उद्‌गार त्रिवार काढले होते... आता त्याच काश्मिरकडे पाहून, 'नरक येथे आहे!... नरक येथे आहे!... नरक येथे आहे!...' असे म्हणण्याची पाळी काश्मिरचे शास्ते न आणोत म्हणजे मिळवली! नाही तर इतिहासाची पाने उलटी फडफडून सदरुद्दिन, शमसुद्दिन काश्मिरच्या तख्तावर परत टपकायचे!... □


# HOTEL SHREYAS

1242 B, Apte Road,
Deccan Gymkhana, PUNE 411 004

Telephones : 56423/5 Lines & 56885
Gram : SHREYAS Telex : 0145-212

- Each Room equipped with Balcony, Toilet, Telephone & Stereo Channel Music.
- Automatic Lift Service
- Lounge with TV Set
- Telex Service
- Calm & Quiet Though Centrally Situated
- Luxury Tourist Taxi Service Available Round the clock
- Delicious Maharashtrian Veg. Lunch & Dinner
- Parties are arranged
- Open-Air Terrace Restaurant
- Well Equipped conference cum Reception Hall on Top Floor



नेहरू आणि करणसिंग.

# शेख अब्दुल्लांना अटक केली तेव्हा

## सदर-ई-रियासत करणसिंग

हेअर अॅपरंट म्हणजे युवराज !

पण युवराज या शब्दाने 'हेअर अॅपरंट' चे सर्व रंग व्यक्त होत नाहीत.

प्रत्येक भाषेतील काही शब्द 'अभाषांतरीय' असतात हेच खरे !

तर, हेअर अॅपरंट हे माजी केंद्रीय मंत्री, काश्मिरचे युवराज श्री. करणसिग यांचे आत्मचरित्र !

नितांत सुंदर आत्मचरित्र आहे.

जन्मापासून बावीस वर्षांच्या आयुष्याची ही कहाणी म्हणजे आत्मचरित्र भाग एक असेच म्हणायला हवे.

पण या बावीस वर्षांच्या आयुष्याने अपार वैभव, प्रचंड घडामोडी, विलक्षण पेचप्रसंग व कर्तृत्वाचे क्षण पाहिले.

त्याची ही कहाणी !

कहाणी वाचनीय आहेच :

पण कहाणी प्रकाशनाची वेळही महत्त्वाची आहे.

काश्मिर पुनर्वसन विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाले आहे. देश फिरून एकदा विभाजनाच्या टोकावर उभा आहे.

या विधेयकाचे कायद्यात रूपांतर डॉ. फारुख अब्दुल्ला यांनी केले.

डॉ. फारुख अब्दुल्ला हे शेख अब्दुल्लांचे पुत्र !

सत्तेवर आल्यावर काही भाषणे अशी केली की जनतेला वाटले काश्मिरला खरंच उदार, निधर्मी, एकात्मवादी मुख्यमंत्री मिळाला ! लोक म्हणू लागले बापापेक्षा बेटा वेगळा आहे.

पण हे तात्पुरतेच टिकले.

विधेयकाच्या निमित्ताने खरे स्वरूप स्पष्ट झाले. एवढे निश्चित झाले की, बापापेक्षा बेटा वेगळा नाही, खरं तर बापसे बेटा सवाई आहे !

काश्मिरच्या इतिहासाचे अविभाज्य अंग शेख अब्दुल्ला, यांच्यासंबंधीचे वास्तव या आत्मचरित्राच्या निमित्ताने स्पष्ट झाले आहे.

अर्थात हे आत्मचरित्र करणसिंगांचे आहे, केवळ अब्दुल्लांचे वर्णन त्यात नाही. आत्मचरित्राच्या निमित्ताने काश्मिरचे सामिलीकरण, तत्पूर्वीचा राज्यकारभार, महाराज हरिसिंग यांच्या दरबाराचे वर्णन, लेखकाचे बालपण, शिक्षण या साऱ्यांचे वर्णन आहे.

करणसिंग युवराज होते.

स्वतःच्या जन्माचे वर्णनसुद्धा 'दरबारी' पद्धतीने केलेले आहे.

झेलमच्या तीरावर खेळत बागडत गेलेल्या बालपणीचे बहारीचे वर्णन यात आहे.

महाराजांच्या एकुलता एक करणचे भरपूर लाड झाले.

डून स्कूलमध्ये दाखल झाल्यावर मात्र एकदम वातावरण बदलले. लाड संपले !

करणसिंग लिहितात, मी होमसिक झालो. रोज रात्री मला रडू यायचे. अन्न, वेळापत्रक; नियम, स्वच्छता या सर्व आधाडयांवर मला त्रास झाला.

असे सगळे 'ललितपण' या पुस्तकात आहेच; पण फाळणीआधीचे, स्वातंत्र्याचे, पाकिस्तानी आक्रमणाचे, सामिलीकरणाचे बारिकसारिक तपशील हा या पुस्तकाचा आत्मा आहे.

जाता जाता अनेक गोष्टी स्पष्ट होतात.

शेख अब्दुल्ला महत्वाकांक्षी होते. जीनाही महत्वाकांक्षी होते शेख अब्दुल्लांनी ओळखले होते की, जीनांपेक्षा नेहरूंशी संबंध ठेवूनच फायदा होईल !

पंडितजी हे करणसिंगांचे राजकीय गुरु, राजा हरिसिंग हे वडील. या दोघांसंबंधीची आत्मीयता पानापानात प्रकट होते.

एवढे निश्चित आहे की, पुस्तक हाती घेतल्यावर संपल्याशिवाय तुम्ही थांबत नाही!

¤

शेख अब्दुल्लांच्या व्यक्तिमत्त्वावर व हालचालींवर प्रकाश टाकणारे आत्मचरित्रातील काही प्रसंग असे—

करणसिंग लिहितात—

शेख अब्दुल्लांचा माझ्या वडिलांविरुद्धचा व एकदरंच डोग्रा जमातीविषयीचा राग वारंवार उफाळून येत असे. त्यामुळे छोटया प्रसंगातही काही झगडे निर्माण होत असत.

१३ जुलै हा 'हुतात्मा दिवस' म्हणून

नॅशनल कॉन्फरन्स पाळत असे. १९५० साली या दिवशी काही नाटयपूर्ण घोषणा शेख अब्दुल्ला यांना करायची होती. म्हणून जून महिन्यात जागिरदारी व जमीनदारी नष्ट करण्यासंबंधीचे दोन प्रस्ताव माझ्याकडे मान्यतेसाठी त्यांनी पाठवले. या प्रस्तावात नुकसानभरपाईची कोणतीही तरतूद नव्हती. तरीही त्याला माझा तात्त्विक विरोध नव्हता; पण प्रश्न व्यवहाराचा होता. जम्मूमधील हिंदूंना व मोठ्या लोकसंख्येला याचा फटका बसणार होता त्याच वेळी काश्मिर विषयात लक्ष घालणारे केन्द्रसरकारचे अधिकारी श्री. विष्णू सहाय श्रीनगरमध्ये होते. त्यांच्या कानावर मी हे प्रस्ताव घातले व भारत-सरकारचे मत अजमवायचे ठरवले.

शेख अब्दुल्लांनी आठवण केल्यावर मी भारतसरकारचे मत मागितल्याचे सांगितले. हे ऐकताच शेख संतापले व त्यांनी एक संतप्त पत्र मला दिले.

या पत्रात, 'युवराज आपण केवळ घटनात्मक प्रमुख आहात हे विसरलेले दिसता' एवढेच लिहून शेख थांबले नाहीत. त्यांनी म्हटले, 'जे प्रस्ताव पाठवले आहेत ते राज्याच्या अधिकारातले आहेत व भारत-सरकारचा यात काही संबंध नाही.' विष्णू सहाय आधीच प्रस्ताव घेऊन दिल्लीला गेले होते. मी आणखी एक दूत पाठवून वरिष्ठांचा म्हणजे जवाहरलाल, सरदार व अय्यंगार यांचा सल्ला घेण्यास सांगितले. व दिल्लीच्या सल्ल्यानुसार एक पत्र शेख यांना पाठवून कळवले की, 'हे प्रस्ताव मोठ्या लोकसंख्येच्या आर्थिक जीवनावर दूरगामी परिणाम करणारे असल्यामुळे आणि राज्यातील नाजूक स्थिती लक्षात घेऊन व विधिमंडळे अस्तित्वात आलेली नाहीत हे लक्षात घेऊन भारतसरकारचे मत अजमावूनच हे प्रस्ताव करावेत.'

हे पत्र पाठवूनही दुसऱ्या दिवशी श्रीनगरमधील लाल चौकातील जाहीर सभेत शेख अब्दुल्लांनी जमीनदारी व जागिरदारी नष्ट केल्याची घोषणा केली. वस्तुतः यासंबंधी चर्चेचे दिल्लीचे निमंत्रण होते व निर्णयाला माझी मान्यता नव्हती.

आमच्यातील मतभेदांची ही सुरुवात होती.

¤

माझा दृष्टिकोन जवाहरलालजींचे हात बळकट करणे व देशाची एकता टिकवणे असा होता. आमच्या मतभेदांना डोग्रा-काश्मिरी वाद कारणीभूत आहे असेही म्हटले जायचे; पण हे खरे नव्हते. मतभेदाचे खरे कारण दोघांच्या भिन्न दृष्टिकोणात होते.

**मी स्वतःला काश्मिरमध्ये राहणारा भारतीय नागरिक समजत होतो, तर शेख अब्दुल्ला स्वतःला भारतात राहणारे काश्मिरी नागरिक समजत होते.**

पुढे सरदार पटेलांनी लक्ष घालून जमीनदारी नष्ट करण्याच्या प्रस्तावात काही दुरुस्त्या करण्यास अब्दुल्लांना भाग पाडले; पण या प्रकरणातून स्वतःची सत्ता मजबूत करण्याची व घटनात्मक तरतुदींपेक्षा पुढे जाण्याची अब्दुल्लांची मनीषा स्पष्ट झाली.

त्या वेळी काश्मिर प्रश्न सुरक्षा समितीत होता. आदर्शवादाच्या न्याय्यतेच्या नेहरूंच्या कल्पनांमुळे यात बरीच गुंतागुंत झाली होती. ही परिस्थिती व सार्वमताचे कलम दाखवून शेख अब्दुल्लांनी आपल्या कारवाया पुढे रेटल्या.

जवाहरलाल नेहरूंच्या स्वभावाचे एक वैशिष्ट्य होते. शेख अब्दुल्लांना मनोमन त्यांनी काश्मिर बहाल केले होते. तरीसुद्धा मी व द्वारकाप्रसाद धर यांचे म्हणणेसुद्धा ते लक्षपूर्वक ऐकायचे. एखाद्या माणसाच्या हेतूविषयी शंका असेल तर पंडितजी, त्याचे म्हणणे कितीही खरे असले, तरी ते ऐकत नसत. प्रजापरिषद जातीयवादी असल्याची त्यांची दृढ समजूत होती. म्हणून त्यांच्या निवेदनाकडे ते पहात नसत. मात्र एखाद्या माणसावर विश्वास असेल तर मात्र न पटणारे म्हणणेही लक्षपूर्वक ऐकत. या त्यांच्या स्वभावामुळेच शेख अब्दुल्ला व मिर्झा अफझल बेग यांच्याबरोबरच मी व धर यांच्या मतांचाही ते आदर करीत असत.

¤

राजेशाही संपुष्टात आणल्यानंतर मी, राज्याचा 'निवडलेला राज्यप्रमुख' हे पद स्वीकारावे की नाही, यासंबंधी बरेच मोठे वादळ झाले. जम्मूमधील डोग्रा जमातीला — ज्यात मी जन्माला आलो — शेख अब्दुल्लांची प्रक्षोभक भाषणे, त्यांच्या हाती आलेली अमर्याद सत्ता व अब्दुल्लांचा 'जम्मू-डोग्रा-राजद्वेष', यामुळे आपल्यावर भयंकर अन्याय झाला असे वाटत होते. तशातच मी 'नामधारी' प्रमुख होणे हे केवळ अपमानाचेच नव्हे तर काहींना देशद्रोहीपणाचे कृत्य वाटत होते!

माझे वडील राजा हरिसिंग यांना तर ही गोष्ट फार लागली होती. खरं तर आपले अधिकार संपले ही गोष्टच त्यांना अपमानास्पद वाटे व त्याहीपेक्षा त्यांना दूर करून, अब्दुल्लांशी तडजोड म्हणून माझी नियुक्ती हा दिल्लीचा विचार त्यांना नामंजूर होता. माझ्यापुढे दोनच पर्याय होते. एक इतर संस्थानिकांप्रमाणे मुंबई रेसक्लबवर जाणे अथवा लोकांमध्ये थोडी कमी पोझिशन पत्करून राहणे. ज्या भागात आपण क्रमांक एक होतो तेथे दुसऱ्या किंवा तिसऱ्या स्थानावर जाण्याची मानसिक सिद्धता मोठी कठीण असते!

शिवाय शेख अब्दुल्लांनी माझ्या वडिलांची जी 'अवस्था' केली तीच एक-दोन वर्षांत माझी करतील अशीही शक्यता दिसत होती; पण राज्याच्या त्या 'नाजुक अवस्थेत' नेहरूंच्याबरोबर राहिले पाहिजे असे मला वाटले.

अर्थात ही अस्वस्थता अशी जाणारी नव्हती. घटनात्मक संबंधाची काश्मिर व


मूळव्याधीचा त्रास?

हा एक कंटाळवाणा विकार आहे. खाज, शौचास त्रास, दुःख आणि यातना. शिवाय अतिजागरण, अतिप्रवास इतकेच नव्हे तर थोडे अनियमित खाणे-पिणे झाले तरी हा त्रास वाढतोच. अयोग्य वयातच म्हातारपणाचा हा जीवघेणा अनुभव थांबवायला एक त्वरित आणि चांगला उपाय म्हणजे 'कैलास जीवन'.

कैलास जीवन

पोटात घ्या आणि बाहेरूनही लावा. शस्त्रक्रियेवाचून मूळव्याधीपासून त्वरित आराम मिळवा.

सर्वत्र मिळते.

आयुर्वेद संशोधनालय (आसम)

११७९, शुक्रवार, नातू बाग, पुणे-४११ ००२

भारत यांची तपशीलवार चर्चा चालू होती. या चर्चेत अब्दुल्लांनी अतिशय ताठर भूमिका घेतली होती. याच वेळी मी जवाहरलालजींना भेटलो. शेख अब्दुल्लांविषयी नेहरूंना विलक्षण प्रेम होते, तरीही प्रथमच त्यांच्या भूमिकेविषयी नेहरू असमाधानी असल्याचे मला जाणवले.

पुन्हा एकदा मी नेहरूंची भेट घेतली. मी पद स्वीकारल्यास देशाच्या दृष्टीने काय काय होईल ते त्यांनी समजावले. शेख अब्दुल्लांविषयी अनेक प्रसंगांमुळे त्यांना काय वाटू लागले आहे हेही त्यांनी सांगितले व त्यामुळेच मी या पदावर राहवे असे त्यांनी आवाहन केले. अर्थात नेहमीच्या पद्धतीने त्यांनी होकारासाठी आग्रह धरला नाही; पण कदाचित काही परिस्थिती उद्भवल्यास नेहरूंना मदत करण्यासाठी, देशहितासाठी पद स्वीकारण्याचा निर्णय 'तीन मूर्ती'च्या पायऱ्या उतरताना मी घेतला !

¤

सदर–इ–रियासत हे पद धारण केल्यानंतर हिवाळ्यात नेहमीच्या प्रथेप्रमाणे राजधानीचे ठिकाण जम्मूला हलले. २४ नोव्हेंबरला मी जम्मू–विमानतळावर उतरलो. मी पूर्वी यायचो तेव्हा केवढे उत्साहाने जम्मू माझे स्वागत करायचे ! पण या वेळी मात्र परिस्थिती वेगळी होती. माझ्या पदस्वीकारण्याचा लोकांना राग आला होता. प्रजापरिषदेने फार प्रभावी निदर्शने केली. विमानतळापासून थेट राजवाड्यापर्यंत दुतर्फा काळ्या झेंड्यांनी माझे स्वागत झाले !

हे सहन करणे मला फार अवघड होते. मला हे समजत होते ही निदर्शने व्यक्तिगत माझ्या विरोधी नव्हती, तर शेख अब्दुल्लांच्या धोरणांविरुद्ध होती. 'एक निशाण, एक विधान, एक प्रधान' अशी घोषणा हजारो लोक देत होते. भारताच्या एकात्मतेच्याच या घोषणा होत्या !

दुसरीकडे शेख अब्दुलांनी डावपेच चालूच ठेवले. जम्मू-सचिवालयावर झेंडा चढवण्याचे उदाहरण तपासण्यासारखे आहे. राजघराण्याचा जुना झेंडा जाऊन काश्मिरचा नवा झेंडा लावायचा होता. त्याबरोबरच राष्ट्रध्वज लावावा असे मी मांडले; पण शेख अब्दुल्लांनी राष्ट्रध्वज लावण्यास नकार दिला. अर्थात नवा झेंडा लावण्याची सूचना मी फेटाळली !

¤

मी परिस्थितीचा अभ्यास केल्यावर असे लक्षात आले की, प्रजापरिषदेचे आंदोलन फार खोलवर पोचले आहे. मी एक सविस्तर टाचण तयार करून २२ डिसेंबर १९५२ रोजी नेहरूंना पाठविले. त्यात लिहिले होते– "लोकांना भारताबरोबर संपूर्ण विलिनीकरण हवे आहे; पण शेख अब्दुल्ला मात्र मर्यादित विलिनीकरण चाहतात !"

पुढील दिल्लीभेटीत मी पंडितजी, काटजू व राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याशी चर्चा केली. जम्मू व काश्मिरमध्ये एक प्रचंड दरी उत्पन्न झाल्याचे मी सांगितले. नेहरूंनी अब्दुल्लांना पत्र लिहिले; पण शेखसाहेबांनी ते फेटाळून लावले !

इकडे आंदोलन चालूच होते. देशात इतरत्र भारतीय जनसंघाने आंदोलन सुरू केले होते. या वेळी चर्चा करण्याची माझी सूचना नेहरू व अब्दुल्ला दोघांनीही फेटाळली.

याच वेळी 'दिल्ली करार' व जम्मूतील स्थिती यासंबंधी बक्षी गुलाममहंमद व गिरिधारीलाल डोग्रा हे पंडितजींना भेटले. बक्षीजी अब्दुल्लांपेक्षा फार वेगळे होते.

शेख अब्दुल्लांनी नॅशनल कॉन्फरन्सच्या माध्यमातून एक वाद निर्माण केला. बेग व त्यांचे साथीदार म्हणत की, फक्त तीन विषयांपुरतेच काश्मिरचे-भारताचे संबंध असावेत तर डी. पी. धर, गुलाम अहमद व गिरिधारी डोग्रा हे जास्त संबंधाची मागणी उचलून धरायचे. हळूहळू शेख अब्दुल्लांनी बेग यांच्या मर्यादित संबंधांच्या मागणीचा पुरस्कार करायला सुरुवात केली.

पंडित नेहरू यामुळे जास्त अस्वस्थ झाले. २३ मे च्या आमच्या भेटीत नेहरूंनी अब्दुल्लांच्या हालचालीविषयी स्पष्ट नाराजी व्यक्त केली.

जम्मूजवळील रणबीरसिंगपुरा येथील भाषणात तर शेख अब्दुल्लांनी भारतावर जातीयवादाचा आरोप केला.

त्याच सुमारास डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींनी बंदी मोडून सत्याग्रह केला व शेख अब्दुल्लांनी त्यांना अटक केली. लंडन येथे जवाहरलालजींना मी माझे मत कळवले व तेवढ्यात श्री. मुखर्जींच्या निधनाची बातमी कळली !

मला धक्काच बसला !

ते आजारी पडल्याचे व त्यांना दवाखान्यात नेल्याचे शेख अब्दुल्लांनी माझ्यापासून लपवून ठेवले व त्यांच्या मृत्यूची बातमीसुद्धा मला अनधिकृतरीत्या कळली!

यानंतर स्थिती अधिकच बिघडली. सबंध देशभर संतप्त प्रतिक्रिया उमटली.

पंडितजींनी वारंवार बोलावूनही शेख दिल्लीला गेले नाहीत. मौलाना आझाद प्रश्न सोडविण्यासाठी श्रीनगरला आले. त्यांचा अब्दुल्लांनी कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्यांद्वारा अपमान केला !

स्थिती खरेच धोक्याच्या पातळीला पोहोचली होती.

¤

नॅशनल कॉन्फरन्सच्या पुढील बैठकात वाद जास्त चिघळला. ७ ऑगस्टला शेख अब्दुला यांनी पंडित शामलाल सराफ यांचा राजीनामा मागितला. सराफ यांनी राजीनामा द्यायचे नाकारले. उपपंतप्रधान बक्षी गुलाम महम्मद, अर्थमंत्री गिरिधारी डोग्रा, आरोग्यमंत्री शामलाल सराफ यांनी एक पाच पानी संयुक्त निवेदन माझ्याकडे पाठवले.

या निवेदनात शेख व बेग हे काश्मिर व भारत यांचे संबंध बिघडवत असून 'दिल्ली करारा' कडे पाठ फिरवत असल्याचा आरोप केला. या निवेदनाचा विचार करणे भागच होते. सदर इ- रियासत म्हणून मंत्रिमंडळ बडतर्फ करण्याचे अधिकार माझ्याकडे होते.


पाहुण्यांना मुंबईत पर्वणी !
मध्य मुंबईत व्यापारी-पर्यटक
ह्यांच्यासाठी उत्कृष्ट लॉज




हॉटेल
अमेय

गोखले रोड (उत्तर), शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८. फोन ४६३६८५, ग्रॅम्स् स्लम्बर

मी शेख अब्दुला याना सांगावा धाडला. ते गुलमर्गला जाणार होते? पण निरोप मिळताच भेटायला आले. सराफ यांच्या बडतर्फीसाठी त्यानी किरकोळ कारणे सांगितली. सर्व मंत्रिमंडळाने माझ्याकडे सायंकाळी यावे व सविस्तर चर्चा करावी असे मी सुचविले; पण शेख अब्दुल्ला यांनी तो विषय टाळला.

**चर्चेच्या शेवटी शेखसाहेबांनी सांगितले की, हे पेच अंतर्गत उपायांनी सुटणार नाहीत. भारत व पाकिस्तान यांना मान्य होईल असा बाह्य तोडगा काढला पाहिजे!**

शेखसाहेबांचे खरे रूप बाहेर पडले. *भारतापासून विलग होण्याचीच ती पदचिन्हे* होती. मला कृती करणे भागच होते.

डी. पी. धर व ब्रिगेडियर कौल यांना मी तातडीने बोलावले. शेखसाहेबांविरुद्ध *पाऊल उचलले तरी धोके होते*. काश्मिरमध्ये ते लोकप्रिय होते. पंचमस्तंभीयांच्या कारवाया जोरात चालू होत्या. कारवाईनंतर दंगे उसळण्याची शक्यता होती. संसदेचे अधिवेशन चालू होते.

शेख अब्दुल्लाना बडतर्फ करायचे ठरले; पण बक्षीजीनी सांगितले की, केवळ बडतर्फ करून गोंधळ माजेल. अटक केली पाहिजे!

पंतप्रधानाला बडतर्फ व अटक करणे सोपे नव्हते !

डी. पी. धर हे कुशल रणनीतिज्ञ होते. पोलीस, सैन्य, वर्तमानपत्रे या सर्व आघाड्या सांभाळण्याचे त्यांनी ठरवले.

लगेच मी एक पत्र तयार केले. शेख अब्दुल्ला यांना या पत्रात त्याची चुकीची भूमिका व त्याचे देशविघातक परिणाम यांची स्पष्ट कल्पना दिली.

बडतर्फीचा आदेशही झपाट्याने तयार केला. हे होईपर्यंत संध्याकाळ झाली होती.

बाहेर विजा चमकत होत्या. हवा अत्यंत खराब होती.

गुलमर्गला जाऊन शेख अब्दुल्ला यांना बडतर्फीचे पत्र देण्यासाठी मेजर बाजवा यांची नियुक्ती केली. बरोबर पोलीसपथक दिले.

प्रचंड पाऊस व खराब रस्त्यांमुळे बाजवा यांना गुलमर्गला पोहोचायला उशीर झाला. आम्ही सर्वजण उत्सुकतेने गुलमर्गच्या निरोपाची वाट पहात 'करण महाल'मध्ये थांबलो होतो.

रात्र झाली होती. उत्सुकता शिगेला पोहचली होती. काहीही घडू शकले असते. *कारवाई यशस्वी होणे आवश्यक होते.* जर शेख अब्दुल्लांना सुगावा लागता, तर रक्तपातदेखील घडला असता !

पण सुदैवाने शेख अब्दुल्लांना काही कळले नव्हते.

मध्यरात्रीनंतर जेव्हा बाजवा व पोलीसपथक त्यांच्या बंगल्यावर पोहोचले तेव्हा ते कमालीचे आश्चर्यचकित झाले.

बडतर्फीचे पत्र व अटकेचे वॉरंट दाखवल्यावर ते संतापले. '*या माणसाला मी सदर-इ-रियासत केले. तो मला अटक करतो ?*' शेख अब्दुल्लाचा संताप उफाळत होता.

तयारीसाठी त्याना दोन तास आहेत असे बाजवांनी सांगितले.

या दोन तासांत त्यांनी अनेक कागदपत्रे जाळली.

खरं तर हे थोपवता आले असते. तसे झाले असते तर काय सापडले असते ते अज्ञातालाच माहीत !

पण शेख अब्दुल्ला यांच्याशी चांगले वागावे अशा सूचना दिल्या होत्या

अशा तऱ्हेने ९ ऑगस्ट १९५३च्या पहाटे, बडतर्फ शेख व बेगम यांना गाडीने उधमपूर येथे नेऊन ठेवले.

श्रीनगरमध्येही मिर्झा अफझल बेग व इतरांना अटक केली !

लगेच बक्षी गुलाम महंमद याची पतप्रधान म्हणून नियुक्ती करून लगेच गुप्ततेची व एकनिष्ठतेची शपथ देवविली.

शपथ देण्यासाठी मुख्य सचिव किडवाई यांना बोलावले. तोपर्यंत त्यांना काहीच माहीत नव्हते. बातमी ऐकताच ते अक्षरशः हादरले !

तसेच, जागून, राष्ट्रपती व पंडित नेहरू यांना तपशीलवार घटना कळविल्या.

पंडितजीच्या पत्रात मी एवढेच कळवले – 'गेल्या वेळी भेटल्यावर योग्य ते करा असे जे आपण सांगितले त्याप्रमाणे प्राप्त परिस्थितीत जास्तीत जास्त योग्य केले आहे !' ¤

एवढे सगळे होईपर्यन्त पहाट झाली होती. आकाशातील ढग, वादळ, विजाचा कडकडाट थांबला होता.

आकाश मोकळे झाले होते.

दिल्लीला फोन लावला; पण लागला नाही. सकाळच्या बातम्या ऐकल्या. त्यात सविस्तर बातमी सांगितली.

मी थकलो होतो. झोप अनावर झाली होती.

देशाच्या हिताचेच मी केले याची जाणीव होती.

माझी पत्नी आशाही जागीच होती.

मी सावकाश जिन्यावरून वरच्या शय्यागृहात गेलो.

आशाला सांगितले, 'सगळे व्यवस्थित पार पडले !'

दोघानी निश्वास सोडले !

ती सोळावं संपवून सतराव्या वर्षात पदार्पण करीत होती.

मी बावीस संपवले होते.

अंथरुणावर पडण्यापूर्वीच मी झोपी गेलो !

– प्रकाश


**भारतातील राष्ट्रवादासंबंधीचे भ्रम दूर करणारी आणि खऱ्या निधर्मी शासनाच्या मार्गाचे दिशा-दर्शन करणारी दोन पुस्तके :**

**१) 'निधर्मी राष्ट्रवादाचे शिल्पकार : रिशेल्यू ते केमाल' मूल्य रु. १५**

**२) 'हिंदुत्व, भारतीयत्व नि निधर्मी शासन' मूल्य रु. १५**

कम्युनिस्ट देशांतील तसेच आयर्लंड, पोर्तुगाल, स्पेन, ग्रीस तसेच इंडोनेशिया, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर देशांतील जीवनाचं धावतं चित्र दाखवणारी प्रवासवर्णने.

**१) 'साम्यवादी देशातील फेरफटका' मूल्य रु. १८**

**२) 'सुवर्णद्वीपाची (इंडोनेशिया) यात्रा' मूल्य रु. १५**

**लेखक : ज. द. जोगळेकर**

**प्राप्तिस्थान : उत्कर्ष बुक सर्व्हिस, डेक्कन जिमखाना, पुणे–४११ ००४**

विविध नेत्यांच्या, विचारशील नागरिकांच्या, सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींवर व परिस्थितीच्या प्रत्यक्ष पाहणीवर आधारित प्रदीर्घ वृत्तान्त

# जम्मू ते श्रीनगर

– माणूस प्रतिनिधी

## १ : पठाणकोट ते जम्मू

इब्न बतूनपासून फिरदौसीपर्यंत अनेक प्रवाशांनी, कवींनी, पंडितांनी पृथ्वीवरचा स्वर्ग म्हणून काश्मिरचं वर्णन केलेलं आहे, तर आधुनिक विद्वज्जनांनी भारताचं 'स्वित्झरलँड' असं काश्मिरला संबोधलेलं आहे. प्रत्येक भारतीयाला एकदा तरी काश्मिर–दर्शन घेऊन यावंसं त्यामुळंच वाटत असतं. दाल, लेक, वैष्णोदेवी, चिनार वृक्षांच्या रांगा, बोट–हाउस, झिरपणारा बर्फ आणि बर्फावरचे खेळ, सफरचंद, आक्रोड सुकामेवा ... काश्मिरच्या अशा अनेक गोष्टी आम्हाला काश्मिरात येण्यापूर्वीच माहीत असतात, खुणावत असतात. काश्मिरी शाली, काश्मिरी पोशाखातले फोटो, ते खास ड्रेस आणि खास काश्मिरी सौंदर्य मनाला मोहवत असतं. काश्मिरची सफर म्हणूनच प्रत्येकाचं एक स्वप्न असतं. त्या स्वप्नाच्या पूर्तीजवळ आल्यानंतर मन उचंबळून येणं म्हणून साहजिकही असतं. पठाणकोटहून जम्मूकडे बस धाव घेत असताना माझ्याही मनात अशी अनेक दृश्ये डोकावून जात होती, अनेक विचारही मनात गर्दी करत होते ...

पठाणकोटहून निघालेली ती जम्मू–काश्मिर मार्गपरिवहन महामंडळाची बस ठिकठिकाणी थांबत लोकलसारखी पुढे सरकत होती. ऑफिसेस, शाळा–कॉलिजेसला जाणारे वगैरे व इतरही चढत होते, उतरत होते. बसमध्ये त्यामुळे सारखी वर्दळ सुरू होती. दिल्लीत श्री. दातार ह्यांनी किंवा पुढे पठाणकोटला डॉ. महाजन ह्यांनी एकूण काश्मिरी माणसाविषयी बरंच काही सांगितलं होतं. अनेक ठिकाणी त्यांच्याविषयी वाचलंही होतं. काश्मिरी लोक तसे शांतताप्रिय! भांडलेच कधी तरी शिव्याही मवाळच असतील आणि भांडणही साधारणत: शाब्दिक वादावादीपुरतंच मर्यादित असेल. ते गुद्द्यावर येणं सहसा नाहीच ... काश्मिरी सौंदर्याची वर्णनं तर खूपच होती ... बसमधल्या तमाम लोकांचं ह्याच पार्श्वभूमीवर माझं निरीक्षण चालू होतं. आमचा ड्रायव्हर इथंही सरदारजीच होता, तर कंडक्टर मात्र अस्सल काश्मिरी वाटत होता. ड्रायव्हरच्या बसण्याच्या जागेच्या समोरच कुठल्याशा देवीचा फोटो होता. देवीला हार घातलेला होता. उदबत्तीही जळत होती. बस सुरू होताना, सरदारजींनी आणि कंडक्टरनंही देवीला नमस्कार केला होता. जम्मू–काश्मिरची बस, काश्मिरी लोकांची बसमधली गर्दी आणि काश्मिरविषयी ऐकून असलेली माहिती... त्यामुळं वाटलं होतं काश्मिरकडे जाणार म्हणजे आपण अगदी वेगळ्या वातावरणात जाणार; पण इथला ड्रायव्हर, कंडक्टर, आपल्याकडल्यासारखाच वाटला. मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या एस. टी. चा किंवा टॅक्सीचा ड्रायव्हर शिग्रोबा देवळापाशी आल्यावर थांबतो तरी किंवा न चुकता नमस्कार तरी करतो. अगदी तसं वाटलं काश्मिरी कंडक्टरचं आणि सरदारजी ड्रायव्हरचं नमन पाहून. मनात आणखीही एक विचार डोकावून गेला. तो माझ्या पंजाबमधल्या भटकंतीच्या पार्श्वभूमीवर. अकालींना, त्यांच्या त्या तोहरा–लोंगोवाल–भिंद्रनवाले मंडळींना हा व ह्याच्यासारखे अनेक सरदारजी दाखवावे. त्यांचा देवीला भक्तिभावाने होत असलेला नमस्कार दाखवावा आणि विचारावं, का उगाच ह्या लोकात तुम्ही दुही पसरवता? गुरुद्वारात जाणारा हिंदू आणि हिंदू फोटोंपुढं, मूर्तींपुढं भक्तिभावानं हात जोडणारा शीख हे दृश्य ह्या सर्व भागात इतकं परिचित आहे की, ह्या दोन भिन्न धर्म–प्रकृती, संस्कृती आहेत हा प्रचारच मनाला पटू शकत नाही. त्यांच्यात फूट पाडणं हे सामाजिक, राष्ट्रीयदृष्ट्या हानिकारक आहे. दुर्दैवाने, राजकीय स्वार्थापोटी अशी फूट पाडायला काही मंडळी आज सरसावलेली आहे. त्यातनं पितृस्थानी असलेल्या हिंदू धर्माला विरोध करणारे आणि मातृभाषा पंजाबीला लाथाडणारे फतवे निघत आहेत.

... पंजाबातली ही लागवण काश्मिरात पसरली तर परिस्थिती फार बिकट होईल. पठाणकोटमधले डॉ. महाजन हे काश्मिरी गृहस्थ माझ्याशी पठाणकोटमध्ये बोलताना म्हणाले होते. त्यांच्या मते,... 'काश्मिरात हिंदूंवर आधीच अनन्वित अत्याचार होत असतात. जम्मूत हिंदूंची परिस्थिती बरी आहे. कारण तिथे ते बहुसंख्य आहेत; परंतु त्या प्रदेशात असलेले शीखही प्राय: जम्मू परिसरातच आहेत. आज तरी जम्मूतल्या हिंदू, शीख व अन्य जमातींमध्ये सलोखा आहे. त्यामुळे ह्या अत्याचारांना निदान जम्मूमध्ये तरी पायबंद बसलेला आढळतो; पण आजचं पंजाबातलं खूळ काश्मिरात पसरलं तर परिस्थिती जम्मूतही विघडेल ! ह्या दोन जमाती आपसात भांडल्या तर इतरांना रान मोकळं मिळेल ... '

डॉ. महाजन हे पठाणकोटमधल्या काश्मिरी लोकांचे नेतेही आहेत. जम्मूत सारखे जाऊन-येऊनही असतात. 'काश्मिरमध्ये हिंदू–शीख

आधी अल्पसंख्य त्यात तिथे येणाऱ्या प्रत्येक शासनाचे, खुर्चीवर लक्ष ठेवून, मुसलमानाना खूष करण्यासाठी होणारे हिंदू–विरोधी प्रयत्न. त्यामुळं तिथे एकूण हिंदूना जिणं अवघड असतं. प्रत्येक दिवशी, आपल्याला केव्हा पळ काढावा लागेल किंवा हौतात्म्य पत्करावं लागेल किंवा मुसलमान तरी व्हावं लागेल ह्याविषयी हिंदूच्या मनात तिथे धाकधूक असते. अशा वेळी, आधीच अल्पसंख्य असलेल्या हिंदू–शीखात वैमनस्य आलं तर बघायलाच नको ... काश्मिर खोऱ्यात आज हिंदू औषधापुरतेच आहेत. जम्मूतही ती परिस्थिती यायला, अशा पद्धतीनी, अशा शासनयंत्रणांच्या मदतीने, वेळ लागणार नाही. ... म्हणून मी पुन्हा पुन्हा सांगतो की, पठाणकोट वगैरे भागासह 'जम्मू–लडाख'चा स्वतंत्र प्रांत बनवावा. ते भारतातल्या इतर राज्यासारखं एक राज्य असाव. ३७० खालचं सध्याच्या काश्मिर-सारखं *स्वायत्त नाही, तर पूर्णपणे भारतीय !*

## विचारांच्या हिंदोळ्यावर

पठाणकोटहून बस पुढे जात होती आणि डॉ. महाजन व इतरां-बरोबरचे संवाद आठवून काही विचार मनात आकार घेत होते. विचार थोडे मन चिंतावून टाकणारे, धास्तावून टाकणारे होते. एकी-कडे हे विचार, दुसरीकडे काश्मिरच्या सौंदर्याविषयीची उत्सुकता – अशा समिश्र भावनांतून माझा पठाणकोट-काश्मिर प्रवास सुरू होता. पठाणकोटहून जम्मूकडे जाणाऱ्या पंजाबातल्या खडबडीत रस्त्यामुळे बसणाऱ्या प्रत्येक धक्क्याबरोबर मन अशा विविध विचारावर हिंदो-ळत होतं ...

वाटेत एका ठिकाणी अचानक बस थांबली. बरेच लोक चहासाठी उतरले, म्हणून मीही उतरलो आणि आजूबाजूचं दृश्य पाहून हरखून गेलो. पंजाबातल्याच 'मोधोपूर'चा तो तिथल्या पर्यटण महामंडळाने विकसित केलेला निसर्गरम्य स्पॉट' होता. दुथडी भरून वाहती असलेली नदी, भरपूर दाट निलगिरीची व इतर वनश्री, पार्श्वभूमीवर हिरवीगार पर्वतराजी, त्यात विखुरलेल्या सुंदर, सुबक प्रवासी बंगल्या, एका बाजूला अक्षरश: चित्रातल्या देखाव्याप्रमाणे उभे असलेले चिमुकल रेल्वेस्टेशन. चहापानासाठी थोडा वेळ बस थांबली तेवढ्यात अगदी सहजी दृष्टीला पडलेलं ते आगळं वेगळं सौंदर्य. वाटलं ही सुरुवातीची झलक असावी नुसती. नंतरचा प्रवास नुसत्या अशा निसर्गसौंदर्यानं विनटलेल्या प्रदेशातून मार्ग काढीत जाणाऱ्या रस्त्यावरूनच व्हायचा असावा. ह्या विचारासरशी मन सुखावलं; पण ते काही क्षणापुरतंच !, शेजारी बसलेल्या सहप्रवाशानं सांगितलं, ' ... तुमची चूक होते आहे महाराज ! इथून पुढे जम्मू-पर्यंत सगळा जवळजवळ रुक्षच प्रदेश आहे. वाटेतला एक पिकनिक स्पॉट – 'मसर सोडल्यास !' ... बाकी जम्मू ते श्रीनगरही काही नाहीच. तुम्ही म्हणता ते सारं काश्मिर खोऱ्यात आहे. जम्मू अगदी साधं आहे. इतर कुठल्याही भारतीय शहराप्रमाणे ! ... '

ह्या सहप्रवाशानं सुरुवातीपासून माझी बरीच जिज्ञासा पुरवली होती. जम्मूत कुठे राहावं, श्रीनगरला कसं जाव, काय पाहावं, काय खरेदी करावी, लोक कसे आहेत, भाषा कुठली... व इतरही अनेक प्रश्नावर त्यान मला मौलिक मार्गदर्शन केलं होतं नि त्यामुळंच त्याच्या वर दिलेल्या उद्गारानी मी खट्टू झालो, तरी त्याच्यावर वैतागलो नाही. वाटलं, कदाचित हा सांगतो ते तितकंसं खरंही नसेल. मनाची अशी काही समजूत घालून मी मुकाट्यानं पुढचा प्रवास सुरू केला. बस मार्ग कापीत पुढं चालली होती. आणखी एखाददुसरी नदी लागली. मागे लांब पांढऱ्याशुभ्र पर्वतराशी कधी जवळ येताना, कधी लांब जाताना दिसत होत्या... मन विचाराच्या हिंदोळ्यावर नाचत होतं......

नि अशाच अवस्थेत असताना, मोठा आवाज करत, झटका देत बस थांबली. विचारशृंखला तुटली. समोर पाहिलं, 'Jammu & Kashmir Wel-come You'च्या पाट्या दिसत होत्या. चेक-नाक्याजवळ गाड्यांची रांग लागली होती. वाहनांची तपासणी चालू होती. सकाळचे दहा वाजत होते नि तरीही थंडी जबरदस्त जाणवत होती. बसमधून खाली उतरून चहाचे घुटके घेणं आवश्यक होतं. *लखनपूरच्या त्या चेकनाक्यावर म्हणूनच आम्ही सगळे उतरलो.* चहाचे घुटके घेत घेत सभोवार दृष्टी टाकली. रस्त्याच्या बाजूलाच लहानस मंदिर नि मंदिराचा कळस दिसत होता. बाजूच्या घराबाहेर सारवलेलं अंगण नि तुळशीवृंदावन दिसलं स्वप्नभूमी, स्वर्गभूमी म्हणतात त्या जम्मू-काश्मिर प्रदेशात मी प्रवेशत होतो नि प्रवेश-द्वाराशीच देऊळ होतं, तुळशीवृंदावन होतं. जे ऐकत आलो होतो त्या पार्श्वभूमीशी हे चित्र न जुळणारं वाटत होतं; पण तसच ते सुखदही वाटत होत. जम्मू–काश्मिरपैकी जम्मत हिंदू बहुसंख्य आहेत हे माहीत असूनही ह्या एकूण प्रदेशाच्या प्रवेशद्वाराशी हे दर्शन अनपेक्षित होत. मशीद नाही तरी हिंदू संस्कृतीचं दर्शनही होऊ नये अशी दक्ष-ताही जम्मू–काश्मिर प्रशासनानं घेतली असेल, असं एकूण माहिती ऐकून मला वाटल होतं ! ...

बाकी 'लखनपूर' तपासणी-नाक्यावरचं इतर दर्शन सुखावह निश्चितच नव्हतं. रस्त्याच्या दुतर्फा प्रचंड घाण होती. तशा अवस्थे-तच दोन्ही बाजूना ट्रक्स, बसेस, गाड्यांची रांग होती व त्या रांगेच्या अधनं-मधनं खाद्यपेयाचे, चहाचे ठेले होते. रस्त्यापलीकडे पर्यटन विभागाचं हॉटेल होत; तेही खास स्वच्छ अजिबात नव्हतं आणि तरीही तिथल्यापेक्षा ठेल्यावरच गर्दी जास्त होती ! तिथले लोकही सौंदर्य, राहणी, स्वच्छता– कुठल्याच बाबतीत मन आकर्षून घेत नव्हते. 'पर्यटकाच्या नंदनवना'च्या प्रवेशद्वारानजीकचं चित्र मनावर उलटेच परिणाम घडविणारे होते ह्यात शंका नाही ! जम्मू–काश्मि-रातली ही माझी पहिलीच प्रतिक्रिया. कळलेल्या पार्श्वभूमीवर मंदि-राचं दर्शन घडल्यानं दिलासा मिळाला तरी इतर दर्शन मात्र मना-तला उत्साह द्विगुणित करणारं खासच नव्हतं ....

लखनपूर ते खुद्द जम्मू शहर हा तासाभराचा प्रवास घोपटमार्गीच ठरला. वाटेत जम्मूची औद्योगिक वसाहत लागली. तिथे बिर्लांची कापडगिरणी आहे. एक वनस्पतिउत्पादनाचाही कारखाना आहे. पण खास 'बघणीय' काही वाटेत दिसलं नाही ....

सुमारे ११।-१२च्या सुमारास, ठिकठिकाणी थांबत थांबत मी जम्मू शहरात पोहोचलो. अफाट थंडीमुळं जम्मू-काश्मिरची राजधानी सध्या जम्मूतच हललेली होती. साहजिकच सारे मंत्री, त्यांची कार्या-लयं *ह्यांचाही मुक्काम जम्मूतच हललेला होता. माझ्या दृष्टीनं* ही एक चांगली बातमी होती ..

एका फार मोठ्या पर्यटनस्थळाला आपण भेट देत आहोत हे

जम्मूत गेल्यावर अजिबात जाणवत नाही. तिथली सरमिसळ वस्ती, साधारण हिंदीचाच जास्त वापर. गजबजलेल्या बाजारपेठा, रस्ते, दुकानं– उत्तरेतल्या कुठल्याही साधारण मोठ्या शहराचच स्वरूप जम्मूचंही असल्याचं मला जाणवलं .. पुढच्या भटकतीत ते योग्य असल्याचंच मला पटलं. पण एवढं मात्र खरं की, जम्मू–काश्मिर प्रदेशातनं भटकायचं तर जम्मूमार्गेच भारतीयाना तरी जायला हवं. भारतीय रेल्वेचं शेवटचं स्टेशनही तेच आहे. तिथे येऊनच पुढ प्रवास करावा लागतो. पुढं जाणवलं ते हे की, आज जरी काश्मिरी खोऱ्यातले मुसलमान-नेते जम्मूवर हक्क, अधिकार गाजवत असले, तरी एकूण राजकारणही जम्मूमार्गेच जावं लागतं ...

त्या दृष्टीनही माझा पहिला मुक्काम मी जम्मूतच ठोकला !

## २ : आर्थिक, सामाजिक विषमता

जम्मू–काश्मिरात नंतरच्या दिवसात मी खूप भटकलो जम्मूत हिंडलो. जम्मूच्या आजूबाजूच्या परिसरात हिंडलो. तसा काश्मिर खोऱ्यात आणि श्रीनगरमध्येही हिंडून आलो आणि ह्या भटकंतीत, वारंवार लोकानी सांगितलेली एक गोष्ट मनाला पटली पर्यटन-शौकिनाच्या दृष्टीने जम्मूत काही जागाच नाहीत, सोयीही नाहीत. काश्मिर खोऱ्यातच बहुतेक सगळी पर्यटनकेंद्रे एकत्रित झालेली आहेत एखादा वैष्णौलीसारखा अपवाद वगळता येईल साहजिकच त्याच न्यायानं जम्मूच्या मानानं काश्मिर खोरं जास्त विकसित दिसतं तिथले रस्तेही जम्मूपेक्षा चागले आहेत. सोयीही तिथे अधिक आहेत, पण दुसरही एक लक्षात आलं नि ते म्हणजे जम्मू आणि काश्मिर-मधला हा दुजाभाव गेल्या काही वर्षातला नाही तर पिढ्यान्-पिढ्यांचा आहे ! ......

रणजितसिंगमहाराजानी आजच्या जम्मू–काश्मिर राज्याची घडी बसवली, तेव्हापासूनचा इतिहास बघितला तरी हा भेदभाव लक्षात येतो. त्या काळात राजे डोगरा समाजातले आणि प्रामुख्याने जम्मू प्रदेशातले असले, तरी त्यानीही प्रदेशाची मुख्य राजधानी श्रीनगर इथेच ठेवली. तिथूनच ते राज्यकारभार करायचे आणि त्या वेळी त्याचही लक्ष काश्मिर खोऱ्यावरच जास्त केंद्रित असायचं. तिथलाच विकास त्याही काळात झाला शेवटचे महाराज गुलाबसिंग, हरिसिंग ह्याच्या काळातही ह्या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. फक्त काही जम्मू परिसरातल्या पर्यटक-स्थळाना थोडी ऊर्जितावस्था आली. जम्मूत काही लहान उद्योग उभे राहिले. हरिसिंगांच्या काळात–म्हणजे १९४७ साली–भारत आणि पाकिस्तान ही स्वतंत्र राष्ट्रे उदयास आली. काश्मिर स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून अस्तित्वात असाव असा प्रयत्न पाश्चात्य राष्ट्रानी केला. भारत आणि पाकिस्तान दोघानाही हे राज्य आपापल्या देशात विलीन व्हायला हवं होतं. महाराज हरिसिंग आणि त्याचे त्या वेळचे पंतप्रधान महाजन ह्याचे प्रयत्न काश्मिर स्वतंत्र ठेवण्याच्या दृष्टीने होते. शेख अब्दुल्ला ही त्या वेळी काश्मिरात उदयास आलेली एक शक्ती होती. तिला दाबायचा हरिसिंगानी खूप प्रयत्न केला, तर स्वातंत्र्यचळवळीचा एक भाग म्हणून भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसन व पं. नेहरूनी शेख अब्दुल्लाना नेहमी पाठिंबाच दिला......

त्या काळात, वेगवेगळ्या मार्गानी, विचारविनिमयाच्या आधारे, काश्मिरने भारतात विलीन व्हावे असा प्रयत्न नवप्रस्थापित भारत सरकारने चालू केला. भारतातर्फे असा प्रयत्न चालू असताना, पाकिस्तानने मात्र वेगळा मार्ग स्वीकारला होता. हरिसिंगांना पाकिस्तानात विलीन व्हायसाठी विनवीत असतानाच काश्मिर पादाक्रांत करण्याचेही डाव पाकिस्तानने रचायला सुरुवात केली. खुद्द ब्रिटिशानीही पाक राज्यकर्त्यांच्या ह्या कुटिल कारस्थानाला हातभार लावला आणि २२।१०।१९४७ रोजी काश्मिरवर आक्रमण झालं. त्या वेळी शेख अब्दुल्लाना पतप्रधानपदी आणण्याचं हरिसिंगानी मान्य केलं. पाकिस्तानचं आक्रमण चालू झाल्यामुळ शेख अब्दुल्ला व हरिसिंग दोघापुढेही भारताची मदत घेण्याशिवाय दुसरा तरणोपाय नव्हता. एरव्ही खुद्द शेख अब्दुल्लानाही भारतात विलीन व्हायचं नव्हतं आणि स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या ह्या मनसुब्याच दिग्दर्शन त्यानी लौकरच सर्वांना घडवून दिलं. पं. नेहरू त्यांचे खास मित्र ! राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यातले महत्त्वाचे सहकारी असं अब्दुल्लाना नेहरू मानीत; पण त्याच्याही विश्वासाला तडा देऊन शेख अब्दुल्लांनी १९४७ ते १९५३ मध्ये राष्ट्रघातक कारवाया केल्या. त्या काळात ते नेहमी आग्रहानं सांगत की, '...भारतीय उपखंडात तीन राष्ट्रे व त्या तीन राष्ट्राचे तीन पंतप्रधान आहेत हे कुणी विसरू नये ! भारताचे प. नेहरू, पाकिस्तानचे लियाकत आणि जम्मू–काश्मिरचा पतप्रधान मी .जम्मू–काश्मिरचं भारताबरोबरचं नातं निव्वळ परराष्ट्रधोरण, संरक्षण आणि दळणवळण एवढ्या-पुरतंच आहे. इतर बाबतीत जम्मू–काश्मिर हे स्वतंत्र–सार्वभौम राष्ट्र आहे, भारत–पाकिस्तान ह्यांच्याच दर्जाचं !...' त्या काळात शेख अब्दुल्लानी युनोतही 'स्वतंत्र राष्ट्र' म्हणून प्रवेश करण्याचा प्रयत्न ब्रिटन–अमेरिका आदी पाश्चिमात्य राष्ट्राच्या सहकार्याने केला. तो फसला, ते भारत सरकारमधल्या काही जागरूकाच्या समयोचित उपाययोजनामुळे ! १९५३ साली शेख अब्दुल्लाना अटक करण्यात आली. बक्षी गुलाम मोहम्मद ह्याच्या हातात सत्ता देण्यात आली. त्यानतर सय्यद, मीर कासिम, पुन्हा शेख अब्दुल्ला (१९७५ मध्ये) अशी वेगवेगळी सरकारं काश्मिरात अधिकारावर आली. मध्यंतरीच्या काळात, भारतीय संविधान, त्यातल्या कलम ३७० सह काश्मिरला लागू करण्यात आलं. त्यानुसार जम्मू–काश्मिर सरकारची स्वतंत्र राज्यघटना केंद्रानं मंजूर केली. बरेच केंद्रीय कायदे जम्मू–काश्मिरला लागू करण्यात आले नि त्या आधारे जम्मू–काश्मिरमध्ये भारतीयांना जाण्या–येण्यावरचे प्रतिबंध रद्द केले गेले. इथल्या व्यक्तीच्या काश्मिरात बदलशा होऊ लागल्या. काश्मिरच्या सदर–इ–रियासतच्या जागी केंद्रशासनाने नियुक्त केलेले राज्यपाल काश्मिरात कारभार पाहू लागले. राज्यशासनाच्या प्रमुखपदी 'पतप्रधाना' ऐवजी 'मुख्यमंत्री' आले थोडक्यात, सुरुवातीला असलेली संपूर्ण, सार्वभौम स्वायत्तता बरीचशी मर्यादित करण्यात आली.

राजकीयदृष्ट्याही सुरुवातीच्या काळात काश्मिरात राष्ट्रीय कॉंग्रेस नव्हतीच. शेख अब्दुल्लाचा 'नॅशनल कॉन्फरन्स' हाच सर्वांत प्रबळ पक्ष होता आणि ह्याच पक्षाला 'काश्मिरची कॉंग्रेस' मानली

# शासन कुठलंही आलं तरी ते शेखसाहेबांच्या पक्षाच्या ताब्यात राहिलं !

गेली. शेख अब्दुल्लाच्या उचलबांगडीनंतरही काही वर्षं नॅशनल कॉन्फरन्सचंच वर्चस्व काश्मिरात राहिलं, पण त्या वेळचे मुख्यमंत्री जी. एम. सादिक ह्यांनी, शेख अब्दुलाची नॅशनल कॉन्फरन्स १९६४ मध्ये काँग्रेसमध्ये विलीन करून टाकली व अधिकृतरीत्या काँग्रेस पक्ष काश्मिरात सत्तेवर आला. १९७५ पर्यंत काँग्रेसचं राज्य ह्या प्रदेशात राहिलं. शेख अब्दुल्लांनी तुरुंगात राहूनही आपली 'लोकप्रियता टिकवली होती. काश्मिर खोऱ्यातली मंडळी त्यांना आपला एकमेव 'उद्धारकर्ता' असंच मानीत राहिली. ही लोकप्रियता जाणून घेऊनच इंदिराजींनी शेख अब्दुल्लांना विमुक्त केलं. पुढं १९७५ मध्ये त्यांच्याशी समझौता करून करारही केला आणि शेख अब्दुल्ला पुन्हा सत्तेवर आले; पण त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यास किंवा काँग्रेसी पाठिंब्यावर मुख्यमंत्री म्हणून टिकून राहण्यास नकार दिला 'नॅशनल कॉन्फरन्स' पक्ष त्यांनी उभारला आणि त्या पक्षानं पुन्हा दणदणीत विजय मिळवला. काँग्रेस जवळजवळ नामशेष झाली !

थोडक्यात शासन कुठलंही आलं तरी ते प्राय: एकमेव प्रबळ पक्षाच्या ताब्यात राहिल आणि तो पक्ष म्हणजे 'नॅशनल कॉन्फरन्स!' पूर्वीच्या मुस्लिम लीगचं शेखसाहेबांनी नॅशनल कॉन्फरन्समध्ये रूपांतर केल. ते सत्तेवर आले. सत्ता गेली, काँग्रेसी सत्ता आली तरी त्यातही 'नॅशनल कॉन्फरन्स'चीच मंडळी होती व नंतर शेखसाहेबांच्या पुनरागमनानंतर पुन्हा एन. सी. (नॅशनल कॉन्फरन्स) च सत्तेवर आली. साहजिकच ह्या संपूर्ण काळात काश्मिरात पंतप्रधान असो वा मुख्यमंत्री, ती व्यक्ती मुसलमानच होती. ह्या व्यक्तीनं आणि त्या व्यक्तीच्या पक्षानंही, राजकीय स्वार्थासाठी, सत्ता केंद्रित करण्याच्या दृष्टीनं सतत मुसलमानांचा अनुनयच केला. ह्याचा अगदी नैसर्गिक परिणाम म्हणजे काश्मिर खोऱ्यात विकासाला गती मिळाली आणि जम्मू आणि लडाख हे प्रदेश कायम मागासलेच राहिले.

ही अनिबंध सत्ता एकाच पक्षाच्या व काही अंशी एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रित होत असताना, फक्त जम्मू प्रदेशातच ह्या सत्तेला काही विरोध होत होता. इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. 'जम्मू–काश्मीर राज्य' असं जरी आपण सहजतेनं म्हणत असलो तरी ह्या राज्याचे हे दोन स्पष्ट भाग आहेत आणि त्यांच्यात फार मोठं अंतर आहे. जम्मू प्रदेश हा बराचसा सपाट, डोंगरावरचा, तर काश्मिर हे खोरंच ! अतिशय डोंगराळ. दळणवळणाच्या दृष्टीनं अतिशय किचकट. काश्मिर खोऱ्यात प्रामुख्यानं मुसलमान वस्ती (जवळजवळ ९२%) तर जम्मूत हिंदू वस्ती (अंदाजे ७०%) काश्मिर खोऱ्यातली भाषा पुश्तू तर जम्मूतली डोगरा. जम्मूत अन्य भाषिकांची वस्तीही त्यामानाने खूपच. अशा तऱ्हेनं ह्या दोन भागांमध्ये भौगोलिक–सामाजिक–सांस्कृतिक–आर्थिकदृष्टया खूपच विभिन्नता आहे आणि साहजिकच राजकीयदृष्टयाही त्यामुळेच जम्मू, काश्मिर खोऱ्यापेक्षा अलग पडलेलं आहे. इथं प. प्रेमनाथ डोग्राजींनी स्थापलेली प्रजापरिषद म्हणजे पूर्वीच्या आर्यसमाजीच–हिंदू संरक्षण समितीचं राजकीय अपत्य. हा पक्ष म्हणजेच एकमेव विरोधी पक्ष. पुढं ह्या पक्षाचं जनसंघात रूपांतर झालं. जनसंघाला सातत्यानं जम्मूतल्या जागा विधानसभेत मिळत गेल्या. १९७७ च्या वावटळीत जनसंघ जनता पक्षात विलीन झाला. जयप्रकाशजी वगैरेंनी त्या वेळी जम्मू–काश्मिरात दौरा केला होता आणि ह्या पक्षानं जम्मूत तर धमाल उडवलीच; पण काश्मिर खोऱ्यातही नॅशनल कॉन्फरन्सच्या अनिर्बंध वर्चस्वाला धक्का दिला. दुर्दैवानं जनता पक्ष फुटला. भाजपाकडे सगळे संघवाले गेले. साहजिकच पुन्हा एकदा जम्मूतला प्रमुख पक्ष म्हणून भाजप पुढे आला. तरीही आज भाजपाकडे अविभक्त 'जनता'ची ताकद नाही आणि उर्वरित जनता पक्ष तर मोजक्या व्यक्तीपुरता मर्यादित झालेला आहे. 'अविभक्त' जनताच्या बाकीच्या तुकड्यांचं तर जम्मू–काश्मिरात अस्तित्वही नाही !

काँग्रेस हाही, एन.सी.च्या शेखसाहेबकृत पुनरुज्जीवनानंतर, एक विरोधी पक्ष म्हणूनच जम्मू–काश्मिर परिसरात वावरतो आहे; परंतु त्याची ताकद आज तरी अत्यंत खिळखिळी झालेली आहे. काँग्रेसची बरीचशी मंडळी एक तर पूर्वाश्रमीची 'एन सी.'वाली. त्यामुळं त्यांचा एन.सी. विरोध तितकासा कडवट राहात नाही. उरलेले बरेचसे हिंदू–त्यांचा विरोध असला तरी त्याला केंद्राची वेसण असते. अलीकडे शेखसाहेबांच्या मृत्यूनंतर हा पक्ष जोर धरील असं वाटत होतं, तर मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला ह्यांनी चक्क इंदिराजींना संपूर्ण पाठिंबा घोषित करून इंदिरा काँग्रेसवाल्यांची पंचाईत करून टाकली आहे. डॉक्टरसाहेब इंदिराजींना आपल्या मातृस्थानी मानू लागल्याने, इंदिराजी सांगतील ते प्रमाण असं गल्लोगल्ली, सभासभांतून सांगत सुटले आहेत. साहजिकच, शेखसाहेबांची पुण्याई व इंदिराजींशी वळेबळे जोडून घेतलेलं नातं ह्यामुळं, काँग्रेसनं त्यांना केलेला विरोध काश्मिरी लोकांच्या पचनी कितपत पडेल हे सांगणं कठीण आहे. काश्मिरातले सध्याचे काँग्रेसी खासदार मीर कासिम. त्यांना फारुख अब्दुल्ला व त्यांच्या एन.सी.शी काँग्रेस (आय) नं जुळवून घ्यावं असं वाटतं! तसा ते आग्रहही धरतात! दुसरे काँग्रेसवाले मातबर पुढारी म्हणजे खा. डॉ. करणसिंग. हे पूर्वीच्या महाराजांचे वारसदार. नंतरचे सदर–ई–रियासत व नंतरचे केंद्रीय मंत्री मध्यंतरीच्या काँग्रेस विभाजनात ते यशवंतराव चव्हाण आदींच्या मार्गाने गेले. आज ते आपल्या अनुयायांना पुन्हा काँग्रेस (आय) मध्ये सामील व्हायला सांगताहेत व स्वत: काँग्रेस आय. पक्षाची दारं ठोठावताहेत. असं असलं तरी इंदिराजी त्यांचं ऐकतात, असं म्हणतात. ते मधनं–मधनं, विशेषत: काश्मिरात 'पाकिस्तान झिंदाबाद'च्या घोषणा उठू लागल्या की एखादा सर्वसमावेशक हिंदू मेळावा दिल्लीत भरवतात. संघासकट सर्व मंडळी तिथे जमतात. मेळाव्यात बडी भाषणं होतात. काश्मिरात असं बोललं जातं की, डॉ. करणसिंगांच्या ह्या हिंदू मेळाव्यांना पंतप्रधानांचा आशीर्वाद असतो ! ह्या करणसिंगांच्या मागे काही राजवंशाला आजही मानणारी मंडळी असतात. त्यांचा स्वत:चा असा एक खास काँग्रेस अंतर्गत ग्रुपही आहे म्हणे. ते अनेक काश्मिरी शासनाच्या कृत्यांना विरोध करीत असले तरी, दुसरीकडे ते डॉ. फारुख अब्दुल्लाशी सहकार्याची भाषाही करत असतात. डॉ. फारुख अब्दुल्ला ह्या तरुण मुख्यमंत्र्याला आपण काही काळ द्यायला हवा असंही ते

# इथली मुस्लिम लीग चक्क पाकिस्तानधार्जिणी आहे.

सांगतात. मीर कासिम सय्यद आणि डॉ करणसिंग ह्याच्या मुख्य मंत्र्याना अनुकूल भूमिकेमुळे एकूण जम्मू–काश्मिरातला कांग्रेस पक्ष व त्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मुफ्ती मोहम्मद सय्यद ह्याचा एन सी. किंवा मुख्यमंत्री व त्यांचा प्रशासनविरोध वेगडी वाटतो, तोकडा वाटतो. असून असलच तर ह्या पक्षाचं थोडं अस्तित्व जम्मू प्रदेशातच जाणवतं. काश्मिर खोऱ्यात अजिबात नाही !

## पँथर्स पार्टी

वर्ष–दोन वर्षांपूर्वीच प्रस्थापित झालेला व थोडासा जोर धरू लागलेला आणखी एक पक्ष काश्मिरात अस्तित्वात आहे. तरुण पुढारी भीमसिंग ह्यांच्या नेतृत्वाखाली हा पक्ष स्थापन झालेला आहे. लडाख-मधले एक आमदार ह्या पक्षाला मिळालेले आहेत आणि आज एकूण साडेतीन–चार लाखाच्या घरात ह्या पक्षाची सदस्य–नोंदणी झालेली आहे असं म्हणतात 'पॅन्थर्स पार्टी' हे नाव धारण केलेल्या ह्या पक्षाची भिस्त तरुणांवर आहे तीही मध्यमवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासलेल्या समाजातल्या तरुणांवर. धर्मावर आधारित रचना जम्मू–काश्मिरमधल्या नॅशनल कॉन्फरन्स, कांग्रेस व भाजपा ह्या तीन प्रमुख पक्षांची आहे. ह्या सीमारेषा छेदून एकसंध काश्मिरी समाज निर्माण करायचा व प्रामुख्याने ह्या समाजाच्या आर्थिक प्रश्नावर लढे उभे करायचे हा ह्या पक्षाचा मूलभूत कार्यक्रम आहे. श्री. भीमसिंग स्वतः जनसंघ, जनता, कांग्रेस असं करत ह्या नवीन पक्षाच्या अध्यक्षस्थानी विराजमान झाले आहेत ह्या पक्षाचा कार्यक्रम काहीही असला आणि पक्षाध्यक्ष काश्मीर खोऱ्यातही आमचे सभासद मोठ्या प्रमाणावर आहेत असं म्हणत असले तरी प्रामुख्यानं ह्याही पक्षाला थोडाबहुत पाठिंबा मिळतो आहे तो जम्मूतच ! हा पक्ष जम्मू–लडाख परिसरात काही मत, एखाददुसरी जागा मिळवू शकेल आणि प्रामुख्यान भाजपा कांग्रेसला त्रास देऊ शकेल असं इतर विरोधकही मान्य करतात !

ह्याव्यतिरिक्त इतर पक्ष जम्मू–काश्मिरमध्ये नगण्य आहेत. जनता पक्ष जवळजवळ कोलमडलेला आहे लोकदल, कम्युनिस्टस वगैरे तर नावालाही नाहीत ! काश्मिर खोऱ्यात मुस्लिम लीग, लिबरेशन फ्रंट, जमाते इस्लामी, जमाते इस्लामी तुलबा वगैरे पक्ष–संघटना आहेत; पण त्याचा निवडणुकीच्या राजकारणाशी फारसा संबंध नसतो जमाते इस्लामी आणि तुलबा ह्याचा तर मुख्यमंत्र्यांना पाठिंबाच असतो. 'लिबरेशन फ्रंट' हा पक्ष सार्वमताची व काश्मिरच्या स्वातंत्र्याची मागणी करत झगडत असतो. ती खरी तर खुद्द शेखसाहेबाचीच निर्मिती ! उरता उरली मुस्लिम लीग. इथली लीग चक्क पाकिस्तानधार्जिणी आहे शेखसाहेब जिवंत असेपर्यंत ह्या पक्षाला काहीच किंमत नव्हती. आजही हा पक्ष हिंदूविरोधाचच फक्त कार्य करत असतो. काश्मिर खोऱ्यात श्रीनगर, गुलमर्ग वगैरे ठिकाणी त्याचे काही कार्यकर्ते आहेत; पण त्याचाही राजकीय काहीच उपद्रव नॅशनल कॉन्फरन्सला होत नाही. जम्मूत तर पक्षाचा प्रभावच नाही'... थोडक्यात काश्मिर खोऱ्यात विरोधी पक्षच नाही !

जम्मू–काश्मिर प्रदेशातल्या राजकीय पक्षाची आजची स्थिती ही अशी आहे. सर्वांत प्रबळ सत्ताधारी पक्ष नॅशनल कॉन्फरन्स आहे. त्याची सर्व मदार काश्मिर खोऱ्यातल्या मतावर आहे आणि तिथे दुसरा पक्षच कुणी प्रबळ नाही. एन. सी .ला प्रखर विरोध होतो तो फक्त जम्मूत आणि हा विरोध भाजपा, जनता, कांग्रेस आणि आता पॅन्थर्स पार्टी ह्याच्यात विभागला गेलेला आहे. साहजिकच हा एकूण विरोध त्यामुळेच जम्मूतदेखील तितकासा प्रभावी राहात नाही. नॅशनल कॉन्फरन्स पक्षाला जम्मूत फारसं स्थान नाही. काश्मिर खोऱ्यात त्यांना विरोध नावालाही नाही. इथं मुसलमानाची संख्या जवळजवळ ९२%त्यामुळ अगदी साहजिकच मुसलमानाचा अनुनय,त्यांच्या भावना छेडतील असे कार्यक्रम सर्व मुख्यमंत्र्याना घ्यावेच लागतात. मग त्या मुख्यमत्र्याने वरून कितीही निधर्मीवादाचा बुरखा पांघरला तरीही ! ह्याच कारणावरून प्रामुख्याने सुरुवातीला 'काश्मिर पुनर्वसन विधेयक' पुढं आलं आणि आज संघावरील बंदीचा प्रस्ताव मुख्यमंत्री मांडत आहेत...

जम्मू–काश्मिर प्रदेशात आणखीही एका विभागाचा समावेश होतो आणि तो म्हणजे लडाख ! मूळच्या तिबेटचा हा भाग. ब्रिटिश राजवटीत तो सांभाळण अति खर्चाचं नि जिकिरीचं वाटू लागल्यावर ब्रिटिशानी हा प्रांत जम्मू–काश्मिरच्या महाराजाना बहाल केला १९४२ नंतर. त्या वेळच्या काश्मिर सरकारच्या इंग्रजनिष्ठेवर खूष होऊन तेव्हापासून हा प्रांत जम्मू-काश्मिरचा एक भाग होऊन बसला आहे लेह, कारगिल वगैरे काही नावं जरी मधून मधून ऐकायला मिळत असली तरी हा प्रांत ह्या राज्यातला तसा अत्यंत उपेक्षित प्रांत आहे. 'जम्मू-काश्मिर' ह्या नावातही त्याचा उल्लेख नाही आणि तसं लडाखचं नाव कानावरून गेलेलं असल तरी तो प्रदेश 'जम्मू–काश्मिर' राज्यात आहे हेही आज पुष्कळाना माहीत नसतं. हा भाग अत्यंत डोंगराळ आहे दळणवळणाची धड साधनही तिथं नाहीत. साहजिकच इतर विकास शून्य आहे .. इथली वस्ती प्रामुख्यानं बौद्धधर्मीय ! सुमारे ३५–४०% इस्लामधर्मीय आहेत, तर हिंदू नावाला ! इथे म्हटल तर कुठलाही पक्ष प्रभावी नाही. मुसलमान विभागात अर्थात नॅशनल कॉन्फरन्सचा प्रभाव आहे आणि बौद्ध प्रदेशात, इतर कुणीच नाही म्हणून कांग्रेस आहे लडाखी लोकाचं गेल्या दोन वर्षांपासून आंदोलन चालू आहे. त्यानुसार त्याना मागासवर्गीय म्हणून मान्यता हवी आहे व त्याचबरोबर जम्मू–काश्मिर प्रदेशातर्गत स्वायत्तताही त्याना हवी आहे ह्या आंदोलनाच स्वरूप अखेरपर्यंत निव्वळ स्थानिकच राहिलं कुठल्याही अखिल भारतीय पक्षानं त्यांचा प्रश्न तसा गंभीरतेनं घेतला नाही. अलीकडेच म्हणजे १६ डिसेंबरला मुख्यमंत्र्यानी मात्र आपल्या लडाख-भेटीत ह्या लडाखी मागणीची दखल घेतली व "लडाखी लोकाना मागासलेले म्हणून घोषित करण्याची आणि लडाखला राज्यातर्गत खास दर्जा देण्याची शिफारस आपण केंद्र सरकारकडे केली असून ह्या दोन्ही मागण्या लौकरच मान्य होतील अशा आपल्याला विश्वास आहे.' अशी घोषणा त्यानी केली आहे ..

'कुणी म्हणतात हे प्रत्यक्षात घडेल की नाही कोण जाणे ! आजची

मुख्यमंत्र्याची घोषणा आगामी निवडणुकीवर डोळा ठेवून केलेली आहे ... खरं तर जम्मूतल्या ह्या सूत्रानुसार मुख्यमंत्री आज जे काही करत आहेत ते सारेच निवडणूक-स्टट आहेत. अगदी पुनर्वसन-विधेयक आणि सघावरील बंदीदेखील ! इतर अनेकांना विशेषतः संघ–भाजपा नेत्यांना ह्या युक्तिवाद तितकासा पटत नाही ...

वास्तवात ह्या निवडणुका डॉक्टरसाहेबांना ह्याआधीच घ्यायच्या होत्या. शेखसाहेबांच्या पैगंबरवासानंतर लगेच. शेखसाहेबांची पुण्याई आणि पुनर्वसन विधेयकाला काश्मिर विधानसभेनं दिलेली मान्यता या गोष्टींचं भांडवल करून आपण निवडणुका सहजी जिंकू असा डॉक्टरसाहेबाचा होरा होता; परंतु इतर अनेकानी, विशेषतः केंद्र-सरकारनी त्याना इतक्या तातडीन निवडणुका घेण्यापासून परावृत्त केलं असं म्हणतात. ह्या निवडणूका आता जून ८३ मध्ये होतील असा अंदाज आहे. तेव्हा सध्याच्या विधानसभेची सहा वर्षांची (भारतातल्याप्रमाणे पाच वर्षांची नाही !) मुदत पूर्ण होते. '...आणि तोपर्यंत ह्या अशाच घोषणा मुख्यमंत्री करत राहणार !' जम्मूतले एक व्यवसायी गुप्ताजी मला सागत होते, '... कदाचित जम्मूतल्या डोगरा जमातीलाही मागासवर्गीय म्हणून जाहीर करण्याचं आणि जम्मूलाही राज्यांतर्गत खास दर्जा मिळवून देण्याचंही ते आश्वासन देतील. वैष्णोदेवीला जाऊन ते 'जय मातादि'चा गजर करतातच. शकरजीला जाऊन नमस्कार करून तीर्थही प्राशन करतात; पण हे सारे देखावे निवडणुकीपुरते आहेत. त्यातनं इथल्या आणि लडाखच्या विकासाला कुठलीही गती मिळणार नाही. हे विभाग असेच राहतील. केंद्राकडून येणारा सारा पैसा खर्च होणार शेवटी काश्मिर व्हॅलीतच ! आजपर्यंत हेच झालं, पुढंही हेच होणार ! केंद्र सरकार खरं तर मनात आणलं तर हा प्रकार बद करू शकते; पण त्यानाही काश्मिरी मुसलमानाना दुखवणं अशक्य आहे ... त्यामुळं हे असंच चालत राहणार ! ...'

जम्मूत हिंडताना अनेक सामान्य लोकांनी ह्या नि अशाच शब्दात जवळजवळ हीच व्यथा व्यक्त केली. जम्मूत नुसत्या पर्यटन विकासाचीच आबाळ होते असं नाही, तर इतरही सर्वच बाबतीत जम्मूला डावं माप दिलं जातं हा आरोप जवळजवळ सर्वांनीच उघडपणे केला. उद्योगधंदे, नोकऱ्या, शिक्षण – सर्वच बाबतीत जम्मूची व हिंदूची उपेक्षा होते आणि त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे आर्थिक-दृष्ट्याही हा भाग आज मागं पडत चालला आहे असाही आरोप, जम्मू चेंबर ऑफ कॉमर्सच्या एका प्रवक्त्यानं केला. त्याच्या मते 'आधी एक तर केंद्राकडून येणारा सर्व पैसा काश्मिर व्हॅलीतच खर्च होतो. शिवाय परिस्थिती अनुकूल नसतानाही, नवनवे उद्योगधंदेही तिकडेच काढण्याकडे शासनाचा कल असतो. उदाहरणच द्यायचं तर सिमेंट-प्रकल्पाचं किंवा कॅलशियम कार्बाइड प्रकल्पाचं देता येईल. वास्तविक रेल्वेस्टेशन, भौगोलिक सपाटी, वाहतुकीच्या सोयी हे सगळं लक्षात घेतलं तर हे प्रकल्प कुठल्याही परिस्थितीत जम्मूतच यायला हवे होते; पण ते श्रीनगरकडे गेले. ... सफरचद हा इथला पर्यटनानंतरचा दुसरा मोठा उद्योग. सफरचंदे जम्मू किंवा लडाख इथेही उत्तम होऊ शकतात; पण त्या फळबागाच्या विकासाच्या दृष्टीने काश्मिर खोऱ्यातच फक्त वाव दिला जातो. जम्मूमध्ये जमिनीच्या मालकीच्या बाबतीत दहा एकरांचं सिलिंग आहे. काश्मिरात

## पर्यटनाची आबाळ का झाली ?

पर्यटन हा जम्मू-काश्मिरातला सर्वात महत्त्वाचा व्यवसाय. डॉलर्स देखील मिळवून देणारा. निसर्ग काश्मिरवर आणि जम्मूतल्याही काही ठिकाणांवर बेहद्द खूष आहे. आपल्या प्राचीन ऋषि-मुनीनीही ह्या हिमकाय पर्वतराजीनी वेढलेल्या प्रदेशात जप, साधना केल्या. मंदिरं उभारली. ती तीर्थक्षेत्रं म्हणून आज भाविकाना आकर्षित करतात. निसर्ग आणि ही मंदिरं ह्यामुळं पर्यटकांचं काश्मिर हे नैसर्गिक नदनवन बनलेलं आहे.

पण पर्यटकाचा स्वर्ग असलेल्या ह्या काश्मिरमधल्या पर्यटन-व्यवसायाला सध्या उतरती कळा लागली आहे. त्यासंबंधीची खाली दिलेली आकडेवारी उद्बोधक ठरावी.

| वर्ष | पाश्चात्य पर्यटक | भारतीय पर्यटक (अंदाजे) |
|---|---|---|
| १९७७ | ७८००० | एक लाख |
| १९७८ | ६५००० | एक लाख |
| १९७९ | ५७००० | ७५००० |
| १९८० | ५५००० | ६०००० |
| १९८१ | ४२००० | उपलब्ध नाही |

पर्यटनाच्या ह्या अधोगतीला ह्या व्यवसायाकडे शासनाचं जे दुर्लक्ष होत तेच कारणीभूत आहे. शेख अब्दुल्लानी, पुनरागमनानतर, "केंद्रस्थानी सत्तेवर असलेले उत्तर भारतीय जातीयवादी काश्मिरला हिंदूच तीर्थक्षेत्र बनवू पाहात आहेत." असले बेछूट आरोप केले नि त्याच ऊर्मीत अनेक देवस्थानाच्या निम्म्या भागातून मशिदी उभारल्या !

हिंदू आणि इतरही प्रवाशांना असह्य त्रासही सोसावे लागले. मुली पळवायचेही प्रकार सुरू झाले. हाटेलं, वाहतूक, पर्यटन स्थळांची व्यवस्था–ह्या साऱ्याच ठिकाणी मुसलमानाची वर्णी लागली ह्या काळात ..त्यातून वरील प्रकार वाढले अरेरावी वाढली ..

प्रच्छन्न जातीयतेच्या भोवऱ्यात सर्व पर्यटक स्थळांवरील व्यवस्था ढासळली .नवीन व्यवस्थाचा व पर्यटक स्थानाचा विकास तर दूरच राहिला ! ह्या साऱ्याची गोळा बेरीज म्हणजे पर्यटकाच्या संख्येला लागलेली उतरती कळा...!

◻

ते नाही. त्यामुळे तिथे बागायतदारांकडे शंभर शंभर एकर जमिनी आहेत. त्यांना सबसिडीही (अनुदानही) मिळते. जम्मूत असा काही वावच ठेवलेला नाही ...'

अशी अनेक उदाहरणं मला जम्मूत ऐकायला मिळाली आणि श्रीनगरकडे कूच करताना त्याचं प्रत्यंतरही मला वेळोवेळी येत गेलं. '... हे हमेशा चालत आलं आहे. म्हणूनच मुख्यमंत्री म्हणतात; त्यावर विश्वास ठेवावासा वाटत नाही.' जम्मू चेंबर ऑफ कॉमर्सचा तो प्रवक्ता ठामपणे सांगत होता ...

एकूण प्रादेशिक विषमता, राजकीय पक्षाची मांडणी ह्यामुळे ह्या गोष्टी अशाच चालू राहणार असाही ह्या प्रवक्त्याचा विश्वास आहे. '...त्यात चुकून बदल झाला तर तो फक्त जम्मू मुसलमान झाल्यास किंवा जम्मू काश्मिरपासून अलग होऊन भारतीय प्रदेशाचा भाग झाल्यासच ! ...' माझे जम्मू–वास्तव्यात काहीसे मित्र बनलेले गुप्ताजी सांगत होते आणि त्याच तिडकेनं, काहीशा अगतिकतेनं, काहीशा चिडीनं अशीच प्रतिक्रिया व्यक्त केली विद्यार्थी परिषदेच्या प्रा. निर्मलसिंगांनी ! ते म्हणतात, '...जम्मूकर भारतासाठी रक्त सांडायला नेहमीच तयार असतात. नव्हे तसं त्यांनी वेळोवेळी सांडलंही आहे; पण तरीही कुठलाही अखिल भारतीय राष्ट्रीय पक्ष (भाजपाचा काहीसा अपवाद वगळता) आमच्यासाठी लढायला उभा राहात नाही. परिणाम काय होणार ? एक तर जम्मूतला देशासाठी लढणारा हिंदू नामशेष तरी होईल किंवा कंटाळून, नाइलाज म्हणून हा हिंदू डॉ. फारुख अब्दुल्लांना, त्यांच्या नॅशनल कॉन्फरन्सला आणि पर्यायानं मुसलमानांनाही शरण जाईल ! ...'

विषमता, विषम वागणूक ही अशी काश्मिरात सर्वच क्षेत्रात पसरलेली मला जाणवली आणि त्यातून हे नैराश्यही अधिकाधिक पसरत चाललेलं आहे. अशाच वेळी पुनर्वसन विधेयक आल्यानं इथली हिंदू मनं जास्तच धास्तावलेली आहेत......

## ३ : काश्मिरातली राजकीय स्थित्यंतरे

जम्मू आणि श्रीनगर व इतरत्र हिंडताना, जम्मू–काश्मिरच्या स्वातंत्र्योत्तर राजकीय इतिहासाचा कानोसा मला आपसूकच घेता आला. आज तिथे प्रामुख्याने दोन प्रश्न गाजताहेत. एक म्हणजे पुनर्वसन विधेयक आणि दुसरा म्हणजे संघावर येऊ घातलेली बंदी. येऊ घातलेली विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक, जम्मू आणि लडाखची राज्यातर्गत स्वायत्ततेची मागणी हे त्या अनुषंगाने येणारे दुसरे प्रश्न. आर्थिक प्रश्न तिथे आहेत. काही ठिकाणी ते फार गंभीर आहेत; पण त्यासाठी जम्मू–काश्मिरात लढे नाहीत, चर्चाही नाहीत. सप वगैरेही फारसे नाहीत. जम्मू–काश्मिरमधल्या प्रमुख राजकीय पक्षांनीही प्रामुख्यानं आपलं लक्ष केंद्रित केलं आहे तेही वरील काहीशा 'जातीय' वाटणाऱ्या प्रश्नांवरच. आर्थिक प्रश्न व इतर काही तितकेच गंभीर प्रश्न हे राजकीय पक्ष मधनं–मधनं डिवचतात जरूर; पण ते त्याबाबत फारसे गंभीर कधीही नसतात आणि ह्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे जम्मू–काश्मिर सरकारला मिळणारं केंद्राचं प्रचंड अर्थसहाय्य ! 'किंबहुना केंद्राच्या अनुदानावर आणि मदतीवरच 'जम्मू–काश्मिर' प्रशासनाचं संपूर्ण अर्थकारण अवलंबून असतं असं म्हटलं तरी हरकत नाही...' जम्मूतल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात, भाजपाच्या पदाधिकाऱ्याबरोबरच्या गप्पात आणि नंतर कॉंग्रेस आणि पॅन्थर्स पार्टीच्या कार्यालयातही हे वाक्य मला अनेकदा ऐकायला मिळालं.

ह्याच सूत्रांनी पुढं असंही सांगितलं की, '...विशेष म्हणजे कॉंग्रेससकट आतापर्यंतच्या प्रत्येक सरकारनं हे केंद्रीय अनुदान वाढवून कसं मिळेल इकडेच जास्त लक्ष दिलेलं आहे. त्यासाठी च

### जम्मूत विकासाला भरपूर वाव

आधी मुळात काश्मिरातच विकासाला गती अशी मिळालेलीच नाही. जो काही थोडा-बहुत विकास आहे त्यात जम्मूवर नेहमीच अन्याय होत आलेला आहे. ह्या विषयी बोलताना संघाच्या कार्यालयातले एक कार्यकर्ते म्हणाले, '... व्यवस्थित रस्ते झाले तर जम्मूत काश्मिरपेक्षाही काही सरस अशी पर्यटन स्थळे आहेत. वैष्णोदेवी, पटनी टॉप, सनासर, सुरिंदसर मानसर, शुद्धा महादेव, प्राणमहल, उत्तर वाहिनी वगैरे वगैरे इथे गेलेला प्रवासी–तिथनं त्याचा पायच निघू शकणार नाही... पण तिथपर्यंत पोचायला धड रस्तेच नाहीत. जम्मू काश्मिर सरकारच्या पर्यटक–नकाशात त्याना स्थानच नाही...

'सरहद्दीलगतच्या डोडा जिल्ह्यातल्या खाणीकडेही असंच दुर्लक्ष चालू आहे तियल्या खाणीतली खनिज संपत्ति खरे तर राष्ट्रीय संपत्ती ! तिच्या साहाय्याने, जम्मूचाच नाही तर संपूर्ण राज्याचा कायापालट होऊ शकतो. पण केंद्राच्या अनुदानावर इथल्या जातीय राजकारणात मश्गूल राहून स्वत:ची गादी टिकवणं एवढंच इथल्या सत्ताधाऱ्यांना माहित. त्यामुळं हाही उद्योग दुर्लक्षित आहे ...

'इथे मिळणाऱ्या स्लेट् दगडाला जगभर मागणी आहे त्याचीही तीच स्थिती ... इथे सफरचंद उत्तम पिकू शकतात. पण एकूण कायदेच असे की इथे कुणी सफरचंदाची लागवडच करू नये ... इथे असलेल्या आणि येऊ शकणाऱ्या उद्योगांचीही हीच कहाणी आहे !'

'... एवंच हिंदू जम्मू मागासलेला राहावा (प्रगतीला वाव असूनही !) अशी शासनाची प्रत्येक कृती असते...

# ‘You Indians-why do you come here ? ’

एक खास रामबाण उपायही प्रत्येक सरकारनं वेळोवेळी वापरलेला आहे आणि तो म्हणजे काश्मिर खोऱ्यात अधूनमधून पाकिस्तान-धार्जिण्या कारवाया घडवून आणणं. ‘इस्लाम’च्या नावावर जनतेला भडकवून सोडणे आणि नंतर ह्या साऱ्याचे रिपोर्ताज केंद्र शासनाला पाठवून अधिक अनुदानाची मागणी करणे ..’ शेखसाहेबांच्या काळात देखील असे प्रकार घडले. असं म्हणतात की, हजरतबाल प्रकरण हेही असंच एक मुद्दाम घडवून आणलेलं प्रकरण !

कुठल्याही निश्चित आणि कणखर धोरणाअभावी आणि अनुनया-पायी अशा मागण्या होत गेल्या हेही विशेष ! काश्मिर आपण होऊन भारतात विलीन झालं होतं. ते विलिनीकरण वास्तवात भारतानं लगेच पक्कं करून टाकायला हवं होतं; पण आधी सार्व-मताला मान्यता देऊन, नंतर ‘युनो’ची मध्यस्थी मान्य करून व शेवटी ३७० कलमाखाली काश्मिरला विशेष अधिकार प्रदान करून नेहरू सरकारनं काश्मिर–प्रश्न निष्कारण चिघळत ठेवला आणि नंतरच्या सरकारांनी, ह्या चिघळत्या, निसरड्या पार्श्वभूमीवर काश्मिर खोऱ्यासाठी फार मोठी किंमत मोजली ! आजही ती आपण मोजत आहोत. अनुदान तर आहेच आहे; पण सुरक्षेसाठी जे सैन्यबळ काश्मिरात आहे त्याचीही संख्या फार मोठी आहे. एवढं असूनही वेळोवेळी काश्मिर खोऱ्यातून फुटीरतावादी शक्ती डोक वर काढत असतातच. पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा उठत असतातच. हिरवे ध्वजही फडकत असतात. असा एक आरोप खुद्द काश्मिर खोऱ्यात ऐकायला मिळाला की, पाकिस्तान सरकारकडूनही काश्मिरात पैसा येत असतो. दोन्हीकडचा पैसा वापरून, खुद्द शासनकर्ते म्हणे स्वतः-च्याच वेगळ्या धुंदीत वावरत असतात. निदान शेखसाहेबांच्या काळात तरी, तशी प्रवृत्ती निश्चित होती असं म्हणतात त्याना अलीकडच्या पुनरागमनानंतरच्या काळातही म्हणे खरी ओढ होती ती स्वतंत्र सार्वभौम काश्मिरची ! नि तशा काश्मिरच्या पतप्रधान-पदाची !....

अशा तऱ्हेनं भरपूर पैसा येत असल्यानं आर्थिक स्वावलबनाकडे मात्र प्रत्येक प्रशासनानं विशेष असं लक्ष पुरवलंच नाही. पर्यटन-व्यवसाय हा खरा तिथला मुख्य व्यवसाय. काश्मिरला भरपूर पैसा मिळवून द्यायची खर तर ह्या व्यवसायात ताकद आहे; परंतु अशा सोनखनी उद्योगाचीदेखील व्यवस्थित जोपासना काश्मिर प्रशासनानं केली नाही. परिणामतः सर्वच पर्यटनकेंद्रावरील होती ती व्यवस्था ढासळत गेली. सर्व ठिकाणी खाबूगिरी वाढत गेली. बुजबुजाट, बनवाबनवी, ढोंगबाजी वाढत गेली. नवीन आकर्षणं, नवीन पर्यटन-केंद्रं निर्माण करणं अशा अवस्थेत दूरच राहिलं; अर्थातच देशी-विदेशी पर्यटकांची संख्या काश्मिरात दरवर्षी रोडावत चाललेली आहे परप्रांतातून येणाऱ्या भारतीय प्रवाशाना तर काश्मिर खोऱ्यात फारच छळलं जातं. ‘You Indians–why do you come here ? ’ अशा शब्दात कधीकधी त्यांची हेटाळणी होते. हिंदू स्त्रियांची छेड काढली जाते. ‘...पण आता हे हिंदूपुरतंच मर्यादित राहिलेलं नाही, तर युरोपीय, जपानी प्रवाशाच्या वाटधालाही अलीकडे काश्मिरात अशी अवहेलना येऊ लागली आहे...’ इति श्री. मनोहर-रावजी. ‘...साहजिकच प्रवाशांचा ओघ दिवसेंदिवस कमी होत चाललेला आहे ..’

काश्मिरातला दुसरा महत्त्वपूर्ण व्यवसाय म्हणजे सफरचंदे आणि सुकामेवा ‘...ह्याही बाबत हीच अरेरावी अंगलट येऊ लागली आहे विशेषत. बाहेरची मागणी पूर्ण करण्याबाबत काटेकोरपणा कधीच पाळला जात नाही आणि ह्याचा फायदा आज हिमाचल प्रदेश उचलत आहे तिथला शिस्तबद्ध व्यवसाय, तिथनं दळण-वळणाची सुविधा ह्यामुळं काश्मिरी व्यवसायाला हिमाचल प्रदेशानं आज चांगलाच शह दिला आहे’ ‘...वास्तवात अगदी हिमाचल-च्याच धर्तीवर ह्या व्यवसायाचा विकास जम्मूत होऊ शकतो; पण तिथे राजकारण आडवं येतं...’ संघाच्या कार्यालयात माझ्याशी गप्पा मारताना मनोहर रावजी सांगत होते......

एकूण काय तर सगळ्याच अर्थकारणाबाबत शासन तसं उदासीन आहे आणि गाडी एवढ्यावरच थांबत नाही. सर्वसामान्य जनतेची आर्थिक पातळी उंचावी ह्याहीबाबत शासन फारसं उत्सुक नाही. तिथं तशा हेतून राबवलेले तसे फारसे प्रकल्पही आढळत नाहीत आणि ह्याचं एकमेव कारण म्हणजे केंद्राकडून मिळणारी भरपूर मदत ! त्यामुळच कदाचित इथले राजकीय पक्ष, मुख्यतः नॅशनल कॉन्फरन्स लोकांच्या धार्मिक भावनांना आवाहन देतच आपली खुर्ची टिकवण्या-साठी धडपडत असतात. आज जम्मू–काश्मिरला भेडसावणारे महत्त्वाचे प्रश्नही अशाच धडपडीतून निर्माण झालेले आहेत. ‘पुनर्वसन-विधेयक’ आणि ‘संघावरील बंदी’ ह्या प्रश्नामुळे आज काश्मिरातलं वातावरण ढवळून निघालेलं आहे. हे दोन्ही वाद प्रामुख्यान हिंदू अल्पसंख्याकांच्या विरोधातून निर्माण झाले आहेत. ‘... कदाचित् त्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणारे आहेत ...’ इति भाजपा–नेते.

प्रत्यक्ष हे वाद, त्यांच्यासंबधीचं राजकारण ह्यांच्या सदर्भात खोलवर विचार करण्याआधी, ह्यामागची थोडी पार्श्वभूमी समजा-वून घेणं आवश्यक ठरेल आणि त्यासाठी नॅशनल कॉन्फरन्स, कॉंग्रेस आणि भाजपा ह्या पक्षांच्या इतिहासात डोकावणंही क्रमप्राप्त ठरावं.

ह्यापैकी नॅशनल कॉन्फरन्स हा सर्वात महत्त्वाचा पक्ष. स्वातंत्र्य-संपादनापासून तहत आजतागायत जवळजवळ सतत हा पक्ष काश्मि-रात सत्तेवर होता १९६४ ते १९७५ ह्या काळातच फक्त कॉंग्रेस सत्तेवर होती; पण ती सुद्धा त्या वेळचे मुख्यमंत्री जी. एम सादिक ह्यांनी नॅशनल कॉन्फरन्स कॉंग्रेसमध्ये विलीन केल्यामुळंच ! १९७५ मध्ये शेखसाहेबांच्या पुनरागमनानंतर हाच पक्ष पुन्हा सत्तारूढ झाला. कॉंग्रेसवासी झालेल्या बहुसख्य एन. सी. वाल्याना पुन्हा बरोबर घेऊन. त्यामुळं जवळजवळ सतत हाच एकमेव पक्ष सत्ता-स्थानी आहे असं म्हटलं तर त्यात फारसं वावगं ठरू नये...

आणि हा पक्ष एका अर्थी सर्वस्वी मरहूम शेख अब्दुल्ला ह्यांचाच होता. त्यांनीच तो बांधला, वाढवला, रुजवला नि सत्तास्थानी नेला आणि त्यापाठी मुस्लिम राजकारण होतं हेही निर्विवाद ! शेखसाहेब

# शेखसाहेबांची महत्त्वाकांक्षा फार मोठी होती....

राजकारणात आले ते 'मुस्लिम लीग'च्या माध्यमातून; पण काश्मिरी महाराजांविरुद्ध, राजेशाहीविरुद्ध लढताना निव्वळ मुसलमानांनाच नव्हे तर सर्व काश्मिरी जनतेला एकत्रित केल्याशिवाय तरणोपाय नाही हे त्यांनी लगेच जाणलं आणि त्यातूनच नॅशनल कॉन्फरन्स ह्या पक्षाचा जन्म झाला. भारतात सुरु असलेल्या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा देऊन त्यांनी नेहरूंचा पाठिंबा स्वतःला मिळवला. ह्यामागे हेतू एवढाच होता की, जम्मूतल्या जनतेचाही पाठिंबा नॅशनल कॉन्फरन्सला मिळावा. काही प्रमाणात हा हेतू सफल झाला तरी जम्मूतल्या हिंदूंचा आणि मुसलमानांचाही पूर्ण पाठिंबा शेखसाहेबांना कधीच मिळाला नाही. त्यांचं वर्चस्व राहिलं ते काश्मिर खोऱ्यातल्या, त्यांना आपले उद्धारकर्ते मानणाऱ्या काश्मिरी मुसलमानांच्या जोरावरच! ह्या परिस्थितीचीही पूर्ण कल्पना शेखसाहेबांना पूर्णपणे होती आणि म्हणूनच हिंदू जम्मूचा प्रभावी मुकाबला करण्यासाठी त्यांनी काश्मिरी मुसलमानांच्या पदरात नेहमी झुकतंच माप घातलं. भाजपा कार्यालयात व नंतर काही पत्रकारांशी गप्पा मारताना कळलेला एक किस्सा ह्या संदर्भात सांगण्याजोगा आहे. त्यांच्या मते : ... जम्मूत त्या काळी काही मातब्बर मुसलमान पुढारी शेख अब्दुल्लांच्या विरोधात होते. ह्या पुढाऱ्यांचा काश्मिर खोऱ्यातही चांगला प्रभाव होता आणि हिंदू समाजही त्यांना मानायचा. हे




पुढारी जर काश्मिरात राहिले असते तर शेख अब्दुल्लांना मिळाली तशी अनिर्बंध सत्ता कधीच उपभोगायला मिळाली नसती. ह्या मंडळीचा काटा काढायची आयती संधी पाकिस्तान टोळीवाले काश्मिरवर चालून आले तेव्हा शेख अब्दुल्लांना मिळाली. ह्या पुढाऱ्यांना त्या वेळी पाकिस्तानात पिटाळून लावण्यात शेख अब्दुल्ला व त्यांच्या साथीनीच पुढाकार घेतला हा आता मान्य झालेला इतिहास आहे... अशा काश्मिरात गेलेल्या मुसलमानांना बोलावण्यासाठी आज हे विधेयक शेखसाहेबांनी आणावं ह्यापरता विनोद कुठला होऊ शकेल? म्हणूनच, दोन-तीन वर्षांपूर्वी प्रथम मांडल्या गेलेल्या ह्या बिलाबाबत शेखसाहेबांनी, जनतेला वारंवार आश्वासनं देऊन देखील; फारसा कधी आग्रह धरला नाही...

## मुस्लिम मताधिक्याचे राजकारण

त्या काळी अशा प्रकारे प्रतिस्पर्धी मुसलमान पुढाऱ्यांना जसं पाकिस्तानात पिटाळलं गेलं, तसंच हिंदूंना मोठ्या प्रमाणावर काश्मिर खोऱ्यातून जम्मूत आणि भारतात इतरत्र पिटाळलं गेलं. एवंच शेखसाहेबांनी काश्मिरात स्वतःमागे हुकमी बहुमत उभं केलं, तर दुसरीकडे जम्मूत स्वतःला असलेला विरोध खूपसा बोथट करून टाकला आणि एकूण देवाण-घेवाणीत काश्मिर हे मुस्लिम मताधिक्य असलेलं राष्ट्र (राज्य?) कसं तयार होईल इकडेही लक्ष पुरवलं. मुस्लिम लीगमध्ये राजकारणाचे धडे घेतल्याचाच हा परिणाम नव्हता का? आणि हेच धोरण त्यांनी पुढेही राबवलं हा इतिहास आहे. साहजिकच काश्मिरी खोऱ्यावर सारी रक्कम त्यांनी वापरायला सुरुवात केली. जम्मूवर त्यांचा राग होताच. तो प्रदेश पूर्वीप्रमाणेच दुर्लक्षित राहत गेला ... ह्या पद्धतीने व आपल्या अमाप लोकप्रियतेच्या जोरावर खरं तर शेखसाहेब काश्मिरला खूप काही देऊन जम्मूतल्या हिंदूंवर प्रहार करीत राहू शकले असते. पं. नेहरूंची त्यांच्यावर विलक्षण माया होती. शिवाय भारताचं सेक्युलर धोरण! त्यात सेक्युलरपणाचा अर्थ साधारणतः मुसलमानांचा अनुनय असाच लावला जातो की काय कोण जाणे!! पण ह्या दोन्ही कारणांनी कदाचित त्या काळी शेखसाहेबांच्या कृत्यांकडे कानाडोळा केला गेला असताही आणि जम्मूचं आजचं स्वरूपही कदाचित बदललेलं असतं!

पण इतिहासाची पानं वेगळ्या पद्धतीनं उलटली जायची होती. शेखसाहेबांना भारतांतर्गत स्वायत्त काश्मिरच्या पंतप्रधानकीत फारसं स्वारस्य नव्हतं. त्यांची महत्त्वाकांक्षा मोठी होती. त्या भानगडीत, काश्मिरात सार्वमत घ्यावं ह्यासाठी त्यांनी यूनोकडे धाव घ्यायचा प्रयत्न केला. आणि काश्मिरातली सत्ता गमावली ... !

बक्षी गुलाम महम्मद, सय्यद, मीर कासिम, जी. एम. सादिक आदींच्या काळातला नॅशनल कॉन्फरन्स पक्ष म्हणजे काँग्रेसचीच काश्मिरातली शाखा होती; पण तरीही ह्या पक्षानंही आपली मदार कायम काश्मिर खोऱ्यातल्या मुसलमानांवरच ठेवली. साहजिकच त्यांनीही केंद्राकडून येणारी मदत शेखसाहेबाप्रमाणेच वापरली...

"... पुनरागमन झालेले शेखसाहेब तर पूर्वीपेक्षाही कडवट

झालले होते. इस्लामाधिष्ठित राजकारणावरच त्यांनी नंतरच्या काळात अधिकाधिक भर दिला. असं म्हणतात की, ह्या काळात त्यांनी हिंदू समाजावर खूपच अत्याचार केले. वयामुळे कडवेपणा वाढला होता की काय न कळे; पण ह्या काळात हिंदूंवर सामाजिक, राजकीय हल्ले चढवायला त्यांनी प्रारंभ केला. जमाते इस्लामी, जमाते इस्लामी तुलबा आदी पक्षांनाही त्यांनी उघड-उघड पक्षपाती वागणूक द्यायला सुरुवात केली. ह्या काळात हिंदू मुली पळवल्या जायचे प्रकार वाढले. १९७० मध्ये एकट्या डोडा जिल्ह्यात अवघ्या तीन महिन्यात असे बत्तीस प्रकार घडल्याचे अधिकृतरीत्या त्या काळात सांगितले गेले.

–१९७५ नंतर,पुनरागमनानंतर शेख अब्दुल्लांच्या कार्यप्रणालीविषयी रा. स्व. संघाचे श्री. डोंगरे त्यांच्या कार्यालयात माझ्यापाशी बोलताना म्हणाले, “... हिंदूंवर ह्याबरोबरच दुसरा सामाजिक हल्लाही ह्या वेळी होत होता. काश्मिर खोऱ्यात श्रीनगरनजीकच्या शंकराचार्यमंदिराचा काही भाग मुसलमानांना मशिदीसाठी देण्यात आला. कारण काय तर म्हणे, ते देखील पूर्वाश्रमीचे हिंदू असल्याने त्यांचाही ह्या देवस्थानावर अधिकार आहे! शेखसाहेब इथेच थांबले नाहीत, तर त्यांनी कागदोपत्री ह्या स्थानाचं नाव बदलून ते ‘सुलेमान टाँग’ असं केलं! ह्याच पद्धतीनं ‘गंगभग’चं नाव खुशहालपुरा होऊन तिथंही मशीद उभी राहिली!! आणि असे कित्येक प्रकार काश्मिर खोऱ्यात घडत गेले...”

राजकीय अत्याचारांविषयी बोलताना ते म्हणाले की, “... शेखसाहेबांच्या गेल्या आठ वर्षांत अनेक हिंदूविरोधी कायदे अस्तित्वात आले. जम्मू परिसरात जमिनीवर सीलिंग बसवण्यात आलं तर खोऱ्यात अनिर्बंध जमीनसंपादनाला परवानगी मिळत राहिली ... जम्मूत जमिनीवर टॅक्स बसवण्यात आला तर काश्मिर खोऱ्यात सारा माफ करण्यात आला. ... एक ना दोन अनेक उदाहरणं देता येतील ... इंजिनियरिंग महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय सारं काही काश्मिरात. जम्मूला मात्र वाटाण्याच्या अक्षता! ...”

एवढं असूनही जनता–लाटेत जनता पक्षानं काश्मिर खोऱ्यातही नॅशनल कॉन्फरन्सशी जबरदस्त टक्कर दिली. त्या ठिकाणी प्रथमच शेख अब्दुल्ला आणि त्यांची नॅशनल कॉन्फरन्स हादरले आणि ह्याच एका कारणासाठी शेखसाहेबांनी, एक विधानसभासदस्य अब्दुर राथार ह्यांच्यामार्फत पुनर्वसन–विधेयकाचं पिल्लू सोडून दिलं. त्या विधेयकानुसार, १ मार्च १९४७ व तदनंतरच्या गडबडीत काश्मिर सोडून पाकिस्तानात निघून गेलेल्या काश्मिरींना काश्मिरात परत येऊन स्थायिक होता येईल असा प्रस्ताव मांडला. राथार हे पुढे विधानसभेचे सभापती झाले आणि त्यांचा मूळ ठराव पुढं सरकारनं शासकीय ठराव म्हणून मांडला. खरे तर हा ठराव तीन-चार वर्षांपासून काश्मिर विधानसभेपुढे रेंगाळतो आहे. शेखसाहेबांनी त्याचा आग्रह कधी धरला नाही आणि तरीही काश्मिर खोऱ्यातनं होणाऱ्या प्रत्येक भाषणात त्यांनी ह्या ठरावाचा उल्लेख केला. ह्या ठरावाच्या अंमलबजावणीमुळं दुरावलेले आप्तेष्ट एकमेकांना कसे भेटणार ह्याचीही वर्णनं केली. हेतू एवढाच की, काश्मिरी मुसलमान मतदारांना खूष करावं!

इथं एक मुद्दा आणखीही मांडावासा वाटतो. १९४७ ते १९५३ शेखसाहेब सत्तेवर होते. तो काळ तसा शांततेचा होता भारतात. तर पाकिस्तानची परिस्थिती तेव्हा अत्यंत बिकट होती. शासन स्थिर नव्हतं. काश्मिरातून गेलेल्या निर्वासितांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळत होती. त्यांची परिस्थिती केविलवाणी होती. नेहरू–लियाकत अली ह्यांच्यात निर्वासितांच्या पुनर्वसनाची बोलणी तेव्हा चालू होती. एवढं असूनही, त्या वेळी, नेहरूंचे खास मित्र असलेल्या शेखसाहेबांनी हा प्रश्न कधीही उपस्थित केला नाही ...... नंतरही त्यांनी वा त्यांच्या सार्वमत आघाडीनंही हा प्रश्न कधी हाताळला नाही. मग आताच, ३५ वर्षांनी, किंवा पुनरागमनानंतरच्या ३।४ वर्षांनी त्यांना ह्या त्या वेळच्या निर्वासितांचा व आजच्या पाकिस्तानी नागरिकांचा पुळका का यावा? जम्मू आणि श्रीनगरमध्ये अनेक पत्रकारांशी, राजकारण्यांशी चर्चा केल्यानंतर जाणवलेलं उत्तर एकच होतं. १९७७ नंतरच्या जनतालाटेचा रेटा पाहून काश्मिरातल्या मुसलमान मताला आपल्याकडे वळवण्याचं हुकमी साधन शेखसाहेबांना हवं होतं. ह्या विधेयकाचं पिल्लू म्हणूनच त्यांनी सोडलं. त्याला होऊ शकणारा देशव्यापी विरोधही त्यांना माहीत होता नि म्हणूनच कदाचित त्यांनी या विधेयकाबाबत फारसा आग्रहही धरला नाही. मुस्लिम मतापुरताच या विधेयकाचा त्यांना फायदा करून घ्यायचा होता. त्यांनी तो तसा करून घेतलाही!

दुसरीकडे जम्मू आघाडीवरही ते स्वस्थ बसले नाहीत. हिंदू मत अजिबात झिटकारून चालणार नाही हे त्यांनी एव्हाना जाणलं असावं. इंदिराजींशीही त्यांचे संबंध, इंदिराजींच्या पुनरागमनानंतर फारसे चांगले नव्हते. किंबहुना ते जास्तीत जास्त बिघडलेलेच होते आणि


**संतति प्राप्तीवर अपूर्व शोध!!**

मूल होण्यासाठी फॅलोपिन ट्यूब्स
ऑपरेशन्सशिवाय उघडणे,
शुक्रजंतूंची संपूर्ण वाढ करणे

यासाठी भेटा –

**गुरुप्रसाद औषधालय**

**घुगे बिल्डिंग, गणेश पेठ लेन, शिवाजीमंदिरजवळ,**
**दादर, मुंबई–४०० ०२८ टेलिफोन : ४५३५२१**

BYP



मुख्यमंत्री डॉ. फारूख : शेखसाहेबांची अखेरची इच्छा

म्हणूनच इंदिराजींना शह देण्यासाठी, जम्मू महापालिकेत सत्तेवर येण्यासाठी त्यांनी 'भाजपा'ला सहकार्य दिलं ... "ते जिवंत राहिले असते तर कदाचित पुनर्वसन विधेयक आजच्या स्थितीपर्यंत ताणलंही गेलं नसतं. नॅशनल कॉन्फरन्स–भाजपा सहकार्य पुढेही, म्हणजे विधानसभा निवडणूकीतही चालूच राहिलं असतं."

... असं ह्या संदर्भात मत पॅन्थर्स पार्टीच्या भीमसिंगांनी व्यक्त केलं ...

'काश्मिर टाइम्स'चे संपादक श्री. वेद भसीन. त्यांच्याही कार्यालयात असंच मत काहीसं ऐकायला मिळालं. तिथे, कॉंग्रेसच्या कार्यालयात, पॅन्थर्स पार्टीच्या आतल्या गोटात तर नॅशनल कॉन्फरन्स आणि भाजपा हे दोघं 'मिलीभगत आहेत' असंच अजूनही मानलं जातं...

कदाचित, इंदिराजींबरोबर शेवटीशेवटी बिनसलेल्या संबंधांमुळं त्यांना व त्यांच्या कॉंग्रेस आयला शह देण्यासाठी हा स्नेहसंबंध शेखसाहेबांनी जोडला असावाही. यांची त्या काळात वाजपेयींशी देखील अनेक वेळा चर्चा झाली होती असं म्हणतात.... 'आणि आजही, उघडउघड एकमेकांविरुद्ध बोलत असले तरी हे दोन पक्ष आणि आर. एस. एस. सुद्धा सर्व एकमेकांना आतून मिळालेले आहेत. त्याशिवाय जम्मूत आलेले बाळासाहेब देवरस डॉ. फारुख अब्दुल्लांच्या भेटीसाठी खास श्रीनगरला जाते ना ! ...' असा उघड आरोप जम्मू–काश्मिर कॉंग्रेस अध्यक्ष मुफ्ती महम्मद सय्यद करतात.

## अंतर्गत विरोध

कॉंग्रेसचं, 'काश्मिर टाइम्स'चं मत काही का असेना; पण भाजपा आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यालयातनं मिळालेल्या माहितीनुसार आणि दोन्ही पक्षांच्या विविध नेत्यांशी झालेल्या चर्चेनुसार, मला स्वत:ला मात्र हे पक्ष आज एकमेकांशी आतून बांधलेले आहेत असं वाटत नाही. वडिलांनी घालून दिलेलं धोरण पुढे चालवावं अशी इच्छा असली तरी सध्याचे मुख्यमंत्री डॉ. फारुख अब्दुल्ला ह्यांना तसं वागणं शक्य होणार नाही ही खरी परिस्थिती आहे. नाही म्हटलं तरी, शेखसाहेबांच्या मृत्यूनंतर डॉ. फारुख अब्दुल्लांची स्थिती बाहेरून वाटते तेवढी भक्कम नाही. एक तर वडिलांची अमाप लोकप्रियता त्यांच्याकडे नाही. दुसरा त्यांना धोका बाहेरच्या पक्षांकडून नाही. तर घरातनंच आहे. शेखसाहेबांनी मृत्युसमयी आपला वारस म्हणून डॉ. फारुखची घोषणा केल्यामुळं ते मुख्यमंत्री झाले. नॅशनल कॉन्फरन्सचं अध्यक्षपदही त्यांच्याकडे ह्या मृत्युपत्राद्वारे आलेलं आहे. तरीही नॅशनल कॉन्फरन्स पक्ष खऱ्या अर्थानं त्यांच्या कह्यात नाही. बेगम अब्दुल्ला (मुख्यमंत्र्यांच्या आई), मेव्हणे शाहसाहेब ह्यांच्याशी बोलल्यावर ह्या गोष्टी स्पष्ट जाणवतात. ते मुख्यमंत्र्यांच्या अनेक धोरणांवर कडाडून हल्ला चढवतात. आज ही मंडळी काहीशी स्वस्थ आहेत; पण त्यांच्या आतून कारवाया चालू आहेत. मुस्लिम लीग, जमाते इस्लामी वगैरेंना आपल्या बाजूला ओढण्यात ते काहीसे यशस्वीही झाले आहेत. मुख्यमंत्री व शाह ह्यांच्यात दिलजमाई करण्याचे बेगम अब्दुल्लांचे प्रयत्न वरवर चालू असल्याचं भासवलं जात असलं तरी तो गट कारवाईसाठी टपून आहे. संघटना आजही बरीचशी त्यांच्या ताब्यात आहे.

डॉ. फारुख अब्दुल्लाही हे जाणून आहेत आणि त्याचबरोबर ते हेही जाणतात की, ह्या गटाच्या कारवायांना वेसण घालायची तर इंदिराजींना खूष ठेवायला हवं. त्याचबरोबर मुस्लिम समाजाला आपल्या बाजूनं वळवायला हवं. त्याचसाठी त्यांनी पुनर्वसन विधेयकासाठी जोर धरला असं म्हणतात की, राज्यपाल बी. के. नेहरू ह्यांनी विधेयकाची कडक निर्भर्त्सना करून ते परत पाठवल्यावर, विधेयक पुन्हा 'सिलेक्ट कमिटी'कडे पाठवायचं अब्दुल्लांनी कबूल केलं होतं; परंतु मुख्यमंत्र्यांनी हे आश्वासन मोडून विधेयक पुन्हा विधानसभेत मंजूर करून घेतलं. ह्याचं मुख्य कारण म्हणजे मुस्लिम समाजाचा अनुनय .. ह्याच धोरणाचा पाठपुरावा करत, इंदिराजींना खूष करण्यासाठी त्यांनी संघ–भाजपाला शिव्या द्यायला सुरुवात केली. संघावरील बंदीचं तुणतुणंही त्याचसाठी... आणि मुस्लिम समाजाला असं भुलावत असतानाच, भारतीय राजकारणात शिरण्याचाही ते प्रयत्न करताहेत. त्यातूनच ते अमृतसर इथे गेले. परवा बडोद्याला आले. सर्व भारतातल्या मुसलमानांचं नेतृत्व मिळालं, तर काश्मिरातला अंतर्गत विरोध प्रभावीपणे मोडून काढता येईल हे त्यांचं गणित असावं...

साहजिकच ह्या विचारधारेतून ते आज संघ-भाजपावर तुटून पडले आहेत, तर इंदिराजींना खूष करणे व स्वपक्षीय विरोधावर मात करणे ह्या ध्येयातून त्यांनी डॉ. करणसिंग व माजी मुख्यमंत्री मीर कासिम ह्यांच्याहीबरोबर सहकार्याचे प्रयत्न चालू केले आहेत. वेळ पडलीच तर, येईल तेवढा नॅशनल कॉन्फरन्सचा भाग बरोबर

घ्यायचा आणि काँग्रेसच्या सहकार्यानं सत्तेवर राहायचं असा हा पवित्रा आहे. त्यात मुसलमानांचा आणि केन्द्रसरकारचा अनुनय ओघानंच येतो...

अशा काहीशा नाजूक अवस्थेत नॅशनल कॉन्फरन्स आज आहे आणि केवळ हे जाणूनच, शेखसाहेबांच्या लोकप्रियतेच्या तापल्या तव्यावर पोळी भाजून घेण्यासाठी डॉक्टरसाहेबांची धडपड सुरू आहे. त्यातून ते वर सांगितलेली विचित्र सर्कस खेळत आहेत. ह्यात भाजपाशी संगनमत हे सूत्र बसूच शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. निवडणुका होऊन सहा वर्षांसाठी अभयदान मिळालं आणि केन्द्रस्थानी बदल झाला तर कदाचित पावलं वेगळी पडतील. एरवी इंदिाजी–रारजीव मैत्री आणि मुसलमानांचा पाठिंबा गमावणं डॉ. फारुखना परवडणारं नाही...

काही अंशी, हा पक्षच खऱ्या अर्थी जम्मू-काश्मिरातल. एकमेव पक्ष आहे असं मी आधीही म्हटलेलं आहे. पुनरुक्तीचा दोष पत्करूनही हे वाक्य पुन्हा दोहरावंसं वाटतं ! काँग्रेस हा दुसरा महत्त्वाचा राजकीय पक्ष. त्याची स्थिती बरीचशी गोंधळाची आहे. तो ना धड विरोधी पक्ष आहे, ना धड सत्ताधारी ! त्याची काही माणसं इकडे आहेत, काही तिकडे. पक्षाची स्वतःची संघटनाही फारशी नाही. तो-आज कागदोपत्री तरी पुनर्वसन विधेयकाला विरोध करत आहे. संघ बंदीबाबतही हा पक्ष तितकासा अनुकूल नाही. तसा विचार खुद्द इंदिराजींनी व्यक्त केला होता ! पण काँग्रेसचेच मान्यवर नेते डॉक्टर-मजकुरांच्या बाजूनं आज उभे आहेत. स्वतः मुख्यमंत्री पंतप्रधानांचा शब्द म्हणजे अखेरचा निर्णय मानतात. साहजिकच ह्या सर्वांचा एकात्रित परिणाम म्हणजे कमकुवत काँग्रेस! .. ' आम्ही विधायक रचनात्मक विरोधी पक्षाची भूमिका जबाबदारीनं निभावत आहोत. ' असं पक्षाध्यक्ष मुफ्ती मोहम्मद सैद म्हणतात खरे; पण प्रत्यक्षात काँग्रेसी विरोधात फारसं तथ्य नसतं हेच खरं ...

**आणि अशा परिस्थितीत खऱ्या अर्थानं विरोधी पक्षाची जबाबदारी येऊन पडते ती भाजपावरच !** हिंदू बहुसंख्य असलेल्या जम्मूत ह्या पक्षाला तसा भरपूर पाठिंबा आहे.एकूण जम्मू-काश्मिर प्रांताची विभागणीच मुळात काहीशी धर्मानुसार झालेली आहे. साहजिकच काश्मिर खोरं, तिथल्या लोकांचं जम्मू-काश्मिरवर वर्चस्व आहे ते संख्याबळावर, नि त्यामुळं मुसलमानांचं प्राबल्य ह्या प्रदेशावर एकंदरीनं जास्तच. ओघानंच हिंदू समाज कळत न कळत नॅशनल कॉन्फरन्सविरोधी गोटातच जातो. खरा तर तो काँग्रेसकडे वळायला हरकत नव्हती; पण काँग्रेस–नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचा इतिहास पाहता त्यांच्यात तसा मतभेद करणं फारसं शक्य नाही त्यामुळं भाजपा हाच पर्याय राहतो. सुरुवातीला, शेखसाहेबांच्या मुस्लिम लीगच्या विरोधात त्या वेळचे जम्मूतले लोकप्रिय नेते पं. प्रेमनाथजी डोग्रा ह्यांची हिंदू कृतिसमिती उभी राहिली. मुस्लिम लीगचं रूपांतर नॅशनल कॉन्फरन्समध्ये झालं तर कृतीसमितीची प्रजापरिषद झाली पुढे हे दोन्ही पक्ष अनुक्रमे काँग्रेस आणि जनसंघात विलीन झाले जनसंघ–जनता–भाजपा हा पुढचा प्रवास राष्ट्रीय प्रवाहाबरोबरच झाला; तरी आजही हा पक्ष जम्मू–काश्मिरात प्रामुख्यानं जनसंघ म्हणूनच ओळखला जातो. अखिल भारतीय पक्षाप्रमाणेच इथल्या पक्षाचाही मूलभूत पाया राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हाच आहे आणि


**खऱ्या 'कान' सेनाची पसंती**
**फिलिप्स स्टिरिओ सिस्टिम**

डिस्को म्युझिक
जोशिलं...नशिलं... झिंग आणणारं..
धुंद करणारं... बेभान बनवणारं...
आणि डोक्यात जाणारा धमाल
रिदम ! तो सूर-तो रिदम
आपल्याला स्पष्ट आणि स्वच्छ
ऐकू येणे महत्वाचे !
ती जबाबदारी घेते-
फिलीप्स स्टीरिओ
सिस्टीम.
तुम्ही साक्षात
डिस्कोमध्येच
सामील !



LDB
प्रमुख विक्रेते :
**एल.डी.भावे ॲण्ड सन्स**
डेक्कन जिमखाना, पुणे-४
म. गांधी पथ, पुणे-१

PHILIPS

*फिलीप्स : एल. डी. भावे ॲण्ड सन्स आता याही क्षेत्रात!*

PROGRAF/LDB/821

# तांत्रिक शिक्षण हाच जगाच्या प्रगतीचा पाया आहे.

तुम्हीही एखादा तांत्रिक कोर्स निवडून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करा.



- रेडिओ रिपेअरिंग
- ट्रान्झिस्टर रिपेअरिंग
- टेलिव्हिजन रिपेअरिंग
- टर्नर फिटर
- वायरमन
- टेलिफोन ऑपरेटर
- मोटर मेकॅनिक
- मोटर रिवाइंडिंग
- टेलेक्स ऑपरेटर
- पंच ऑपरेटर
- वॉच रिपेअरिंग
- कंपोझिंग-प्रिंटींग
- मशिनिस्ट

## कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट

दादर
कोहिनूर भवन, सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई-४०००२८. फोन: ४६५१४१,४६५६८७

अंधेरी
स्टेट बँक ऑफ इंडियाचेवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-५८. फोन : ५६९७११

ठाणे
ठाणे स्टेशन समोर, ठाणे (पश्चिम) फोन : ५०१७७५

पुणे
डॉ. मधुमालती गुणे हॉस्पिटलमागे, डेक्कन जिमखाना, जंगली महाराज रोड


संघावर अगदी १९५० पासून कागदोपत्री बंदी असली तरी संघाचे कार्यक्रम, संघ-शाखा जम्मूत बिनधास्त चालू आहेत...

'... संघ आणि जनसंघ आहेत म्हणून आम्ही अजूनही ह्या प्रदेशात तग धरून आहोत ह्यात वाद नाही. ह्यांचा विरोध नसता तर जम्मूचं इस्लामीकरण आणि आमची हकालपट्टी ह्यापूर्वीच झाली असती ! ...' असं जम्मूतल्या प्रा. निर्मलसिंग ह्यांनी प्रांजळपणे कबूल केलं. ह्यालाच अनुमोदन देऊन एक सरकारी कर्मचारी म्हणाले, ... 'स्वातंत्र्य मिळालं तेव्हा काश्मिर खोऱ्यात हिंदू सुमारे अठरा टक्के होते ते आज आठ टक्क्यांवर घसरले आहेत, तर जम्मूत मुसलमानांची संख्या तीस–बत्तीसवरून पस्तीस टक्क्यांपर्यंत वाढली आहे ! ... संघ–जनसंघाची विरोधी चळवळ नसती, त्यांची वेळोवेळीची आंदोलनं नसती तर हे प्रमाण वाढत गेलं असतं ह्यात वाद नाही... ते तसं नसतं तर जम्मूतही श्रीनगरपणे संपूर्ण एकाधिकारशाही आली असती ! !

### हिंदू बहुसंख्या

या ठिकाणी अलीकडेच वेळोवेळी केलेल्या भाषणांतून सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस ह्यांनी मांडलेल्या एका विचारातलं तथ्य मला जाणवलं. मा. बाळासाहेब म्हणतात, '...देशातली लोकशाही राजवट टिकणं आवश्यक आहे नि त्यासाठी देशात हिंदू बहुसंख्य असणंही आवश्यक आहे ... ' पाकिस्तान, बांगलादेश वगैरे आपले शेजारी देश. एके काळी हिंदू असलेले आणि इस्लामी बनलेले. कुठेही लोकशाही रुजू शकली नाही. स्थिर राजवट उभी राहू शकली नाही ! काश्मिर खोऱ्यातही खऱ्या अर्थानं 'लोकशाही' आहे असं मानता येणार नाही. शेखसाहेब नि त्यांच्या घराण्याची सत्ताच तिथे चालू आहे. काहीशी एकतंत्रीच. जम्मूमुळं ह्या अनिर्बंध सत्तेला काहीसा पायबंद बसतो. तिथंच फक्त खुलेपणानं वेगवेगळे विचार व्यक्त होताना दिसतात. राजकीय, वैचारिक स्वातंत्र्य थोडं तरी अनुभवायला मिळतं ...

जनसंघ अशा तऱ्हेनं विरोधी भूमिका बजावत असला तरी, नॅशनल कॉन्फरन्सच्या तुलनेत ती एक राहुटीच आहे आणि ही राहुटीही वाटते तेवढी भक्कम नाही. '...विशेषतः पं. डोग्राजींनंतर त्या पातळीचा खंबीर नेताच जनसंघाला जम्मू–काश्मिरमध्ये मिळाला नाही!' भाजपाचेच एक नेते व तिथले कार्यवाह श्री. यश भसीन मला सांगत होते, ' ... कै. श्यामाप्रसाद मुखर्जींना ते काश्मिरात असताना मृत्यू आला. त्या मृत्यूचं कोडं अजूनही उलगडत नाही! त्याच्या चौकशीची वारंवार मागणी करूनही ती मागणी पूर्ण करण्यात आलेली नाही. जनसंघावर (तेव्हा प्रजापरिषद होती) तेव्हापासून सतत शासनातर्फे हल्ले चढवले जात आहेत... संघावर बंदी तेव्हाही आलीच! ...'

आज ठाकर बलदेवसिंग हे भाजपाचे स्थानिक अध्यक्ष आहेत. ते आमदारही आहेत आणि भाजपाच्या ह्या माणसाविषयी जम्मू–काश्मिरात मला सर्वत्र आदराची भावना आढळली. '... व्यक्तिशः ठाकरसाहेब फार चांगले आहेत. त्यांचं राजकीय चारित्र्यही फार स्वच्छ आहे. त्यामुळं त्यांचा व्यक्तिगत दबदबा चांगला आहे; पण त्याचबरोबर ते फार शांत, काहीसे मवाळही आहेत. त्यामुळं पक्षातल्या विविध गटांना एकत्र राखून पक्ष वाढवायच्या दृष्टीनं त्यांचं

नेतृत्त्व काहीसं कमी पडतं.' असं त्याच्याच एका सहकाऱ्यानं मला सांगितलं. ह्या व इतर काही सूत्रांशी गप्पा मारल्या तेव्हा समजलं की, भाजपातही इथं गटबाजी आहे.' विशेषत: जम्मू नगरपरिषदेत नॅशनल कॉन्फरन्सच्या सहकार्यानं सत्तास्थानी आल्यापासून ही गटबाजी वाढली आहे. अगदी खरं सांगायचं तर ही सत्ता भाजपाला फार त्रासदायक ठरत आहे. जम्मूत भाजपाची विश्वासार्हता तेव्हापासून काहीशी घटत चाललेली. जम्मू नगरपरिषदेत आज मोठ्या प्रमाणावर लाचलुचपत चालू आहे ...' अशी तक्रारही ह्या गोटाने केली. विशेषत: जम्मूचे नगराध्यक्ष (ते भाजपाचे आहेत!) व त्यांचा गट ह्यांच्या अनेक कृत्याविषयीच्या कहाण्या मला ऐकायला मिळाल्या. '... हा सगळा विरोध वरवरचा आहे. 'इलेक्शन स्टंट' आहे. रात्री ही मंडळी नॅशनल कॉन्फरन्सच्या लोकांबरोबर एकत्र असतात. बाटल्या फुटत असतात. परवाने एकमेकांना मिळत असतात. एकमेकांचे खिसे ओले करण्याचे अनेक पर्याय ह्या पाटर्यांतून चर्चिले जात असतात.' असं काहीसं चिडूनच पॅन्थर्स पार्टीच्या भीमसिंगांनी माझ्याशी बोलताना सांगितलं ...

भाजपा प्रदेशाध्यक्षांना मी भाजपातर्गत दुहीबद्दल जेव्हा छेडलं तेव्हा ते काहीसे त्रस्त झाले. '... तात्त्विक मतभेद असणं कुठल्याही लोकशाही पक्षाच्या जिवंतपणाचंच लक्षण असतं.' अशी काहीशी सारवासारवही त्यांनी केली; पण 'हा पक्ष दुहीच्या भोवऱ्यात सापडला आहे ह्यात शंका नाही.' अशीच प्रतिक्रिया काश्मिर टाइम्सच्या कार्यालयात ऐकायला मिळाली. '... किंबहुना ह्या दुहीमुळच पुनर्वसन विधेयकाविरुद्ध जो आवाज चार वर्षांपूर्वी उठायला हवा होता तो उठलाच नाही. चार वर्षांपूर्वी जेव्हा आमदार अब्दुर रहीम राथार ह्यांच्याद्वारे शेखसाहेबांनी ह्या विधेयकाचं पिल्लू सोडलं तेव्हाच खरं तर हलकल्लोळ माजायला हवा होता. तेव्हाच खरं तर गव्हर्नरांनी केंद्रशासनाला जागं करायला हवं होतं; पण तब्बल चार वर्षं ही सगळीच मंडळी ह्या प्रश्नावर शांतच होती. विधेयक विधानसभेत संमत झाल्यानंतरच भाजपानं आंदोलनाला सुरुवात केली ..'

राष्ट्रीय स्वयंसेवक संघानं मात्र आपल्या पद्धतीनं ह्या प्रश्नावर सुरुवातीपासून जनमत जागृत करायचा प्रयत्न केला. संघ, भाजपाच्या मानानं अधिक संघटित आहे. स्वत:च्या नेहमीच्या शिस्तबद्ध पद्धतीनं त्याचं कामही चालू आहे. डॉ. मेंधी जम्मू प्रांताचे सरसंघचालक. त्यांच्याविषयीही सर्वत्र, संघाच्या विरोधकातही, आदराची भावना आढळली. एवढंच नाही तर जम्मू-श्रीनगर प्रवासात एका सैनिकी अधिकाऱ्यानं सांगितलं की, '... संघियांचं आम्हाला वेळोवेळी फार चांगलं सहकार्य मिळालं, मिळत असतं. अनेक संघीय मंडळी आम्हा सैनिकांची त्यामुळं चांगली मित्रमंडळी बनलेली आहे ...' संघावर सध्या बंदी घालण्याचा डॉ. फारुखसाहेबांनी चंग बांधला आहे. त्या विचारावर टीका करताना, एरवी त्यांचे समर्थक, हितचिंतक असलेले डॉ. करणसिंग म्हणतात, '... हा निर्णय दुर्दैवी आहे. संघ आणि त्याचे कार्यकर्ते ह्यांच्या कट्टर राष्ट्रीय बाण्याविषयी कुणाचंही दुमत असू नये आणि त्या भूमिकेतून, काश्मिरात तरी त्यांचं कार्य फार मौलिक आहे. त्यांच्यावर बंदी घालण्याचा हट्ट धोकादायक आहे ..!'

पुनर्वसन विधेयकानंतर संघाने त्याला उघडपणे कसून विरोध करायला सुरुवात केली. भाजपाचीही त्याला चांगली साथ मिळाली.

## वचक!

तीन-चार वर्षांपूर्वी डोडा जिल्ह्यावर प्रसिद्धीचा मोठा झोत होता. जम्मू प्रांतातला हा जिल्हा पाकिस्तानी सरहद्दीला लागून आहे. अनेक पाकिस्तानी इथल्या खेड्यातून नियमित जातयेत असतात. पाकिस्तानी नागरिक इथे येतात, व्यापार करतात, परत जातात. तिथे काठावरच्या दोन्ही बाजूंच्या लोकांमध्ये रोटीबेटी व्यवहारही सुरू असतात. पूंच, राजौरी भागातही हे प्रकार नित्याचे आहेत.

ह्याच भागातल्या डोडा जिल्ह्यात ३॥ वर्षांपूर्वी अवघ्या तीन महिन्यात बत्तीस हिंदू मुली मुसलमानांनी पळवल्याचे प्रकार घडले. त्याचे पडसाद विधानसभेतही उमटले...

ह्या भागात हिंदू-मुसलमान वस्ती साधारणत: समसमान आहे; पण हिंदू समाज, डोग्रा समाज, पंजाबी परिषद, राजपूत महासभा, हरिजन बिरादरी वगैरेमध्ये विभागला गेलेला आहे. त्यामुळे एका हिंदू जमातीतली मुलगी पळवून नेली तरी बाकीचे गप्प बसत. त्यातून मुसलमानांना चेव येई ..

ह्या भागातनं हिंडणाऱ्या एका अवलिया ब्रह्मचाऱ्याला ह्या गोष्टीचा संताप आला. त्यानं ह्या सर्व जमातींना एकत्र बोलावलं. 'राजपूत असो, पंजाबी असो, मारवाडी असो वा हरिजन. प्रत्येक मुलगी हिंदूच नाही का?' असा सवाल ह्या अवलियानं सर्व जमातीच्या नेत्यांना केला. त्याच्यात एकी घडवून आणली.

पुढची हिंदू मुलगी पळवली गेली तेव्हा राजपूत-शीख-हरिजन सर्वांनी मिळून मुसलमान तरुणाला बेदम मारलं आणि मुलीची सुटका केली.

राजपूत महासभेचा एक तरुण दोन पावलं पुढे गेला. त्यानं एका मुस्लिम युवतीलाच पळवून आणलं. चार दिवस स्वत:च्या घरी पाहुणीसारखी, 'बहेनजी बहेनजी' म्हणून तिची बडदास्त ठेवली. पाचव्या दिवशी स्वत: त्या युवतीला घेऊन तिच्या आईवडलांकडे तो तरुण गेला. त्यानं सांगितलं, 'केवळ मुसलमान समाजाला थोडा वचक बसावा म्हणून आम्ही ह्या तरुणीला पळवलं; पण तिच्या केसालाही कुणी शिवलेलं नाही! ...'

'तरुणीनंही वडिलांना आपल्याला मिळालेल्या 'अत्यंत चांगल्या' वागणुकीची हकिगत सांगितली. ती मुलगी आजही-लग्नानंतरही, त्या हिंदू तरुणाला राखी बांधते न् वर सांगते, 'त्याही घरात मला बेटी मानणारी माँ मिळाली, अब्बाजान मिळाले. खंबीर भाऊ मिळाला! ...'

ह्या गोष्टीला दोन वर्षे उलटून गेली त्या भागात त्यानंतर एकही मुलगी पळवायचा प्रकार घडलेला नाही असं म्हणतात.

◘

त्यामुळे डॉ. अब्दुल्ला काहीसे बिथरले होते. त्यात मागच्या विजयादशमीला संघानं जम्मूत शानदार संचलन केलं. त्या संचलनाच्या वेळी अग्रभागी लाठ्या–तलवारी–ढाली ह्यांचीही मिरवणूक होती.संघाच्या मते तो शस्त्रपूजेचा एक भाग होता, तर नॅशनल कॉन्फरन्सच्या प्रवक्त्याच्या मते, 'नवीन मुख्यमंत्र्यांना स्वतःची ताकद दाखवून देण्याचा तो एक दहशतवादी मार्ग संघानं चोखाळला होता ...' मुख्यमंत्र्यांच्या स्थानाला, जीविताला संघ हाच धोका आहे असंच कुणीसं त्यांच्या कानातही भरवून दिलं म्हणे. त्यातूनच आज डॉ. फारुख अब्दुल्ला ठामपणे संघाविरुद्ध उभे आहेत. संघबंदीच्या धमक्या देत आहेत. त्यासाठी वटहुकूम काढायच्या मागे आहेत ! ...

ह्या सर्व काळात मात्र भाजपा–संघ सहकार्य चांगलं चालू आहे असं मला जाणवलं. काश्मिर खोऱ्यात जरी ह्या गोष्टीची फारशी गंधवार्ता नसली तरी जम्मूत हे दोन्ही गट एकत्र येऊन पुनर्वसन विधेयकाला कसून विरोध करीत आहेत. जनजागृती होत आहे. त्या अनुषंगानं भाजपानंही आपली तीन–चार वर्षांची मरगळ झटकून टाकल्यासारखी वाटत आहे. त्यातूनच आठ डिसेंबरला यशस्वी 'जम्मू बंद 'चा कार्यक्रम पार पडला. इतरही आंदोलनं आज चालू आहेत. त्यातल्या पोलिसी कारवाईत अनेक आंदोलक जखमीही होत आहेत. भाजपातर्फे जम्मूत आणि काश्मिरातही जनजागृतिसाठी प्रचार-सभांचं जाळं विणलं जात आहे. येत्या १७–१८ जानेवारीस जम्मूत भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठकही आहे. बडे राष्ट्रीय नेते त्यासाठी त्या वेळी जम्मूत येतील नि ह्या पुनर्वसन विधेयकाच्या निमित्ताने सरकारवर तोफा डागतील.

एवंच, आज जम्मू–काश्मिरातलं राजकीय वातावरण ढवळून निघत आहे. एरवी वातावरण तसं शांत असतं. काश्मिर खोऱ्याच्या आधारावर नॅशनल कॉन्फरन्सची एकतंत्री सत्ता सुरू असते. जम्मूत हिंदू, भाजपा–कांग्रेस आदी राहुटयांत विखरूनही, तसे शांतच असतात. खुर्चीच्या राजकारणाचा एक भाग म्हणून पुनर्वसन विधेयक आज पुढं आलं. त्यातूनच संघावरील बंदीची चाहूल आली आणि ह्या तशा खदखदत शांत राहणाऱ्या राज्यात राजकीय वादळ आज उठू पाहात आहे ...





हार्दिक शुभेच्छा

**वामन हरी पेठे**

(स्थापना : १९०९)

**हिरे, मोती, सोने, चांदी**
**व कापडाचे व्यापारी**

सरकारी कामासाठी दागिने व चांदी मालाची किंमत करून सर्टिफिकेट देण्याचा परवाना.

**कापड विभाग फक्त दादरला**

# ४ : विधेयक आणि विरोधक

जम्मू-काश्मिरचं राजकीय वातावरण आज ढवळून निघालं आहे आणि त्याचं मुख्य कारण, आधी म्हटल्याप्रमाणे, ' पुनर्वसन विधेयक ' हे आहे. या विधेयकामुळे, १ मार्च १९४७ नंतर जे काश्मिरी नागरिक पाकिस्तानात गेले त्यांना, इच्छा असेल तर पुन्हा काश्मिरमध्ये परत येऊन स्थायिक व्हायचा अधिकार मिळती. त्या परिस्थितीत त्याना त्याचं काश्मिरी नागरिकत्व व पर्यायाने भारतीय नागरिकत्वंही परत मिळू शकतं. एवढंच नव्हे तर भारतातून पाकिस्तानात जाताना जी काही मालमत्ता ह्या काश्मिरींनी आपल्यामागे सोडली असेल तीही त्याना परत मिळण्याची तरतूद ह्या विधेयकात आहे. त्या वेळी काश्मिर सोडून गेलेल्याची मालमत्ता आजतागायत शासनाने अबाधित ठेवलेली आहे. ती मालमत्ता, मालमत्तेचे मालक ह्यांची नोंद तर राज्यशासनाच्या खास खात्यामार्फत ठेवली गेली आहेच; पण ही मालमत्ता आज जे कुणी भाड्याने, लीझने वापरत आहेत त्याच्याकडून मिळणाऱ्या भाड्याचा, मोबदल्याचा वेगळा हिशोब मालक नि मालमत्तानिहाय ठेवला जात आहे. मालमत्तेपासून गेल्या पस्तीस वर्षांत मिळालेलं उत्पन्न, वजा मालमत्तेची देखभाल, दुरुस्ती, मरम्मत इत्यादीसाठी झालेला खर्च ही रक्कमही पुनर्वसनासाठी परतणाऱ्या काश्मिरींना देण्याचा राज्यशासनाचा मानस आहे. ' नव्हे तसा निर्धार आहे. ' असं जम्मूतले एक निष्णात कायदेपंडित म्हणाले. हे कायदेपंडित सध्या मुख्यमंत्र्याविरुद्ध कोर्टात लढत आहेत. त्यानी दिलेल्या पुढील माहितीला पुढे, कॉंग्रेस कार्यालयातल्या तेजासिंगांनी, पॅन्थर्स पार्टीच्या भीमसिंगानीही दुजोरा दिला. त्यांच्या मते, ' ......पुनर्वसन-विधेयक नसतानाही कित्येक पाकिस्तानी आजही काश्मिरात येऊन स्थायिक होत आहेत. त्याच्या बेकायदा प्रवेशाला रीतसर करून घेतलं जातं आणि त्यांना त्यांचे सर्व हक्कही बहाल केले जातात. १९७५ ते १९८१ ह्या शेखसाहेबाच्या पुनरागमनानतरच्या सहा वर्षांच्या काळात सुमारे १९३ कुटुंबाचं काश्मिरात—म्हणजे प्रामुख्यानं जम्मूत—पुनर्वसन तर झालंच; पण सुमारे दहा कोटी रुपयाची मालमत्ताही, त्यावर पस्तीस वर्षांत मिळालेल्या उत्पन्नासह ह्या पुनर्वासिताना परत मिळाली ! आज हा प्रकार सर्रास चालू आहे. प्रत्यक्ष कायदाच जर ह्या स्वरूपात झाला तर मग काही विचारायलाच नको ! ... ..'

पुनर्वसन-विधेयकाच्या बाबतीत ही सार्थ भीतीही अनेकाना आज काश्मिरात भेडसावते आहे आणि अशा काश्मिरींमध्ये काही मुसलमानही आहेत. १९४७ च्या त्या काळरात्रीनंतर जेव्हा काही काश्मिरी मुसलमान, विशेषत: जम्मूतून पाकिस्तानात स्थलांतरित झाले तेव्हा त्याच्यामागे बरीच मालमत्ता—घरं, शेतं, जमिनी इत्यादि काश्मिरातच राहिली. ह्या गोष्टीची स्वतंत्र जपणूक जरी काश्मिर सरकारने केली आणि ह्या मालमत्तेचे मालकी हक्क जरी इतर कुणा नवागताना बहाल केले गेले नाहीत, तरी ह्या जागांमध्ये लोकाना राहायला भाड्याने जागा दिल्या गेल्या. काही जमिनी भाडेपट्टीवर लोकांना दिल्या गेल्या. तर बहुतेक सगळी शेतं कसायला म्हणून पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांना व इतरही काश्मिरींना दिली गेली. पाकिस्तानात गेलेली मंडळी जर आज परतली आणि त्यानी आपल्या मालमत्तेवर हक्क मागितला तर तो त्यांना मिळणार अशी गेल्या सहा वर्षांतल्या अनुभवावरून बहुतेकाना खात्री वाटते. तस झालं तर आमचं व आमच्यासारख्या अनेकाचं काय होणार ? असा प्रश्न करून पाकिस्तानातून भारतात आलेल्या निर्वासिताच्या कृतिसमितीचे अध्यक्ष बच्चनसिंग पंछी पुढे म्हणाले, ' ......आधीच आमचे अतोनात हाल चालू आहेत. आधी मुळात, पस्तिसाहून अधिक वर्षं इथे काढूनही आम्हाला इथलं सरकार ' आपलं ' मानत नाही. इथ आम्हाला मालमत्ता विकत घेता येत नाही. आमच्या मुलाबाळाना इथं शिक्षण, नोकऱ्या, सर्वच बाबतीत मज्जाव आहे आहे त्या अवस्थेत काही व्यवसाय करून, मिळालेल्या जमिनीची मशागत करून आम्ही कसेबसे जीवन जगत आहोत. त्यातून आता हे विधेयक येत आहे. त्यामुळे ज्या घराच्या, जमिनीच्या तुकड्याच्या आधारे आम्ही आज काहीसे तारले गेले आहोत, ते आधारही आमच्यापासून हिरावले जाणार आहेत. हे विधेयक आम्हाला अक्षरशः देशोधडीला लावील अशी आज आम्हाला भीती वाटते आहे पस्तीस वर्षांपूर्वी आम्ही भारतात यायचा निर्णय घेतला. त्यासाठी अनंत हाल सहन केले. पस्तीस वर्षं ह्या काश्मिरसाठी, देशासाठी आम्ही खूप काही सहन केलं, भोगलं आणि तरीही ह्याच देशासाठी आम्ही झिजत आलो, जेहलमच्या साक्षीनं आम्ही इथली माती भाळी लावली; तशीच ती मिरवली. त्या साऱ्याचं हेच फलित व्हावं नं ?......'

बच्चनसिंग पंछीच्या ह्या भावनात्मक वक्तव्याला रघुबीरसिंगपुऱ्यातल्या एका वकीलसाहेबांनीही पाठिंबा दिला. ' निर्वासित कृतिसमिती, रघुबीरसिंगपुरा ' चे अध्यक्ष असलेल्या वकीलसाहेबानी सांगितलं, ' .. ..पाकिस्तानातून भारतात आलेले लाखभर लोक आणि नंतर आझाद काश्मिरमधून काश्मिरात आलेले दोन लाखभर—असे जवळजवळ अडीच-तीन लाख निर्वासित आज काश्मिरात आहेत. हे सर्व निर्वासित हिंदू ( विशेषत: हरिजन ) आणि शीखच आहेत ह्या निर्वासिताच्या पुनर्वसनासाठी गेल्या पस्तीस वर्षांपासून आमचा लढा सुरू आहे. पाकिस्तानातून काश्मिरात आलेल्या सुमारे लाख निर्वासिताना इथल शासन आज पस्तीस वर्षं इथं राहूनही काश्मिरी नागरिक मानायला तयार नाही. त्यामुळं आम्ही इथं विधानसभेसाठी मतदान करू शकत नाही निवडणुकीला उभं राहणं दूरच ! आमच्या मुलाना इथं शिक्षण घेता येत नाही. सरकारी नोकऱ्या मिळू शकत नाहीत त्यामुळं हॉटेलात कपबश्या विसळणं, दुकानात मालाच्या पुड्या बाधणं, हातगाड्या ओढणं ह्यापरत-आमच्या मुलाना कुठला उद्योग करताच येत नाही ! राहाण्याच्या साध्या सुविधाही धड नाहीत. ..तर आझाद काश्मिरातून आलेल्या निर्वासिताचा प्रश्न आणखी वेगळा आहे त्याना काश्मिरी नागरिकत्व मुळातच आहे; पण ' आझाद काश्मिर ' ह्या स्वतंत्र पाकिस्तानात गेलेला विभाग आहे हेच मुळी इथल्या शासनाला मान्य नाही. त्यांच्या मते तो विभाग ' जम्मू-काश्मिर ' राज्याचा अविभाज्य भाग आहे आणि आज ना उद्या तो प्रदेश मूळ राज्यात सामील होईलच. तसा तो सामील झाल्यावर त्या भागातून आज जम्मू-काश्मिरात आलेल्या निर्वासिताना पुन्हा आपापल्या घरांतून परत

जायला मिळेलच. ह्या सबवीवर नि खुळचट आशावादावर, 'ह्या भागातून आलेल्या निर्वासितांच्या पुनर्वसनाचा प्रश्नच उद्भवत नाही' असा मतलबी युक्तिवाद शासन करतं......ह्या दोन्ही प्रकारच्या निर्वासिताच्या प्रश्नांना शासन सोडवत नाही ह्याचं मुख्य कारण म्हणजे हे दोन्ही निर्वासित बहुतांश हिंदू किंवा शीख आहेत हेच होय! हे निर्वासित मुसलमान असते आणि काश्मिरातून बाहेर गेलेले लोक हिंदू किंवा शीख असते, तर आज निर्माण झालेला प्रश्न उद्भवलाच नसता......!'

'......शासनाचा आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या प्रवक्त्यांचा एक युक्तिवाद असा की, केवळ मानवतावादी धर्मातूनच आजचं हे पुनर्वसन विधेयक माडलेलं आहे. ह्या अडीच-तीन लाख निर्वासितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न पस्तीस वर्षं रेंगाळत ठेवताना, शासनकर्त्यांचा मानवतावाद कुठे जातो?' असा कडवट प्रश्न करून पॅन्थर्स पार्टीचे भीमसिंग पुढे म्हणाले, '......पण ह्यातून निर्माण होणारा मुख्य प्रश्न आर्थिक आहे. सरकारी गोटानुसार पाकिस्तानात गेलेल्या काश्मिरींची संख्या सहा लाखांच्या घरात आहे. दुसऱ्या एका अंदाजानुसार ही संख्या तीन-चार लाखाच्या आसपास आहे कुठलीही संख्या ग्राह्य धरली, तरी राज्याच्या आकाराच्या मानाने ही संख्या मोठी आहे. एवढ्या लोकांना आज सामावून घेणं आर्थिकदृष्ट्या आम्हाला झेपणारं आहे का? त्यात पुन्हा जर ह्या पुनर्वसितांना त्यांची मालमत्ता परत दिली गेली तर आज त्या मालमत्तेच्या आधारे गुजारा करत असलेल्यांचं काय? आज आपण ह्या राजेन्द्र बझार परिसरात बसलेले आहोत. ही सर्व मालमत्ता पाकिस्तानात निघून गेलेल्यांची आहे. ही दुकानं, हे कार्यालय, इथली ऑफिसेस हे सगळं काही! ह्या सगळ्यातनं केवढे मोठे आर्थिक प्रश्न निर्माण होणार आहेत ह्याची शासनाला कल्पना तरी आहे का? एका मोठ्या आर्थिक अराजकाला शासन या विधेयकाद्वारे आमंत्रण देत आहे असं माझं स्पष्ट मत आहे......या विधेयकापेक्षा, काश्मिरच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची अशी किती तरी कामं वास्तविक इथं पडलेली आहेत. तिकडे लक्ष पुरवण्याऐवजी, आर्थिक-सामाजिक-धार्मिक-राजकीय वातावरण बिघडवून टाकणारं हे विधेयक शासनानं ह्या वेळी पुढं आणावं हेच मुळात दुर्दैवी आहे. वास्तवात विकासासाठी सर्व काश्मिरी जनतेत एकी, परस्पर-विश्वास निर्माण करून त्याना आर्थिक कार्यक्रम देणं आवश्यक आहे. त्याऐवजी नेमकी बेकी पसरवणारं विधेयक शासनानं पुढं आणलेलं आहे......मी तुम्हाला जम्मू–काश्मिर–लडाख तिन्ही भागातल्या खेड्यात घेऊन चलतो. तिथ तुम्हाला दिसेल की हिंदू–मुसलमान–शीख वगैरे सर्व काश्मिरीमध्ये सुंदर सलोखा आहे; पण हे विधेयक ह्या सलोखा बिघडवून टाकणार आहे!!......

जम्मूतल्या आणि श्रीनगरमधल्याही काँग्रेस कार्यालयातूनदेखील असाच सूर ऐकायला मिळाला. काँग्रेसचे प्रदेशअध्यक्ष मुफ्ती महम्मद म्हणतात, '...स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर अनेक दुर्दैवी घटना घडल्या ह्यात वाद नाही. त्यामुळं एकाएकी पाकिस्तानात स्थलांतर करावं लागलेल्या अनेकाना आपल्या अगदी जवळच्या आप्तेष्टाना मुकावं लागलं हेही खरं. तरीदेखील आज ह्या घटकेला वेगळ्या पुनर्वसन-विधेयकाची काही आवश्यकता होती असं वाटत नाही. भारतीय नागरिकत्व कायद्याखाली आजदेखील भारतात परत येऊ इच्छिणाऱ्या काश्मिरींना परत आणता येतील असे कायदे आहेत. गेल्या पस्तीस वर्षांत असे अनेक नागरिक परत आलेही आहेत. त्यांचं इथ व्यवस्थित पुनर्वसनही झालं आहे. अशा वेळी ह्या विधेयकाची आवश्यकताच काय? त्यातनं काश्मिर व काश्मिरींच्या फायद्याऐवजी तोटेच जास्त संभवतात. पुनर्वसन कायद्याखाली इथं परतणाऱ्यांमुळं इथल्या आजच्या हिंदू आणि मुसलमानही काश्मिरींना अनेक अडचणींना तोंड द्यावं लागणार आहे. अनेक मुसलमानदेखील अशा मालमत्ताचा, मागे राहिलेल्या जमिनीचा स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी उपयोग करून घेत आहेत. त्यात आणखी काश्मिरात आलेल्या निर्वासितांच्या उपजीविकेचा प्रश्नही गुंतला आहे......'

'अनेक वर्षं काश्मिरात काँग्रेस राजवट होती. तेव्हा ह्या निर्वासितांचा प्रश्न का सोडवण्यात आला नाही?' ह्या प्रश्नावर समाधानकारक उत्तर काही काँग्रेस अध्यक्षाकडून मिळू शकलं नाही. '...आमची पूर्ण सहानुभूती ह्या निर्वासिताना आहे. त्याचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी आम्हीही धडपडत आहोत; पण त्यांना काश्मिरी नागरिकत्व मिळवून देण्यात काही तांत्रिक अडचणी आहेत...' असं काहीसं वेळ मारून नेणारं उत्तर त्यांनी दिलं......

## 'आयुर्वेद' विद्यालय बंद

'...त्याचं आणि ह्या विधेयकाचं मूळ कारण अगदी सरळ आहे. हे सारे निर्वासित बहुतांश हिंदू आहेत!' भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार ठाकूर बलदेवसिंगानी अशा तऱ्हेचा सरळ हल्ला करून पुढे सांगितले, '...ह्या निर्वासितांना नागरिकत्व बहाल केलं तर हिंदूंच्या संख्येत, हिंदू मतदारांच्या संख्येत वाढ होते. आजपर्यंतच्या कुठल्याच सरकारला हे नको होतं. आजच्या सरकारला तर मुळीच नको आहे. तसे तर जम्मूतल आजचं हिंदू मताधिक्यही काश्मिर सरकारला सलत असतं. त्यामुळेच ह्या निर्वासिताना नागरिकत्व तर मिळत नाहीच; पण शिवाय पाकिस्तानातून प्रत्यही मुसलमान आणून जम्मू प्रदेशात वसवले जातात. शेख अब्दुल्ला १९७५ साली सत्तेवर परतल्यावर ह्या कृत्यांना अधिकच जोर चढला. ह्या सहा वर्षांत, लडाखमधल्या बुद्धांच्या बहुसंख्येत घट होत होत आज त्या प्रदेशात बौद्ध आणि मुसलमान जवळजवळ समसमान आहेत! कारगिल आणि आणखी एक असे दोन जिल्हे तर मुस्लिम बहुसंख्येचेच बनून गेले आहेत... जम्मू प्रांताची स्थितीही तीच बनविण्याकडे आज शासनकर्त्यांचा कल आहे. गेल्या सहा वर्षांत जम्मू प्रांतातल्या एकट्या पूछ जिल्ह्यात दोन हजारावर हद्द ओलांडून आलेली मुसलमान कुटुंबे वसवली गेली आहेत. राजौरी, पूंछ, छम्ब–जोडिया सेक्टर, डोडा वगैरे जिल्ह्यांत तर सरहद्दीपलीकडून रोजचंच जाणं-येणं सुरू असतं. रोटी-बेटी, तस्करी व्यवहारही सुरू असतात......'

भाजपाचे यश भसीन, प्रा. चमनलाल गुप्ता, तिलक राज, संघाचे मनोहर रावजी, विद्यार्थी परिषदेचे प्रा. निर्मल सिंग आदी अनेकांशी बोलताना हिंदूवर आज होणाऱ्या आर्थिक–सामाजिक–धार्मिक अन्यायाची अनेक उदाहरणं मला ऐकायला मिळाली. काश्मिरी घटनेप्रमाणे एखादी मुलगी लग्न होऊन काश्मिरबाहेर नांदायला गेली तर तिचं काश्मिरी नागरिकत्व रद्द होतं. असं असूनही, एका

काश्मिरी मुसलमान युवतीच पाकिस्तानात लग्न झाल्यानंतरही तिला काश्मिरमध्ये मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळाला......काश्मिरातल्या हिंदू देवळांमधून मशिदी उभारण्याचे प्रकार..... हिंदूना 'जय मातादि 'चा गजर देवळातून जाता–येताना करायला मज्जाव होतो......पब्लिक सर्व्हिस कमिशनचे अध्यक्ष भारतभूषण, शिक्षण-खात्यातले वरिष्ठ अधिकारी सत्यदेव भूषण आदी हिंदू अधिकाऱ्यांवर झालेले अन्याय !...एक मंत्रीमहोदय नूर मोहम्मद ह्यांची मुलगी परीक्षेच्या प्रथम निर्णयात नापास झाली. उत्तरपत्रिकांची 'फेर-तपासणी' करून घेतल्यावर ती ४६% गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याचं घोषित तर करण्यात आलच; पण ७५% गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही नाकारण्यात आलेला मेडिकल प्रवेश तिला देण्यात आला !......जम्मूतलं 'आयुर्वेद महाविद्यालय' हिंदू वैद्यक पद्धती म्हणून बंद करण्यात आलं......संस्कृतला शिक्षणातून डच्चू देण्यात आला......राजौरीजवळील आद्रोला गावी रामुवाल नावाच्या हरिजनावर, त्याच्या कुटुंबातल्या चौदाजणांसह इस्लाम धर्मात प्रवेश करण्यासाठी दडपण आणण्यात आलं. त्या दडपणात शासनाचा हातच मोठा होता......शिक्षण, नोकऱ्या, पोलीसदलातली भरती वगैरे प्रत्येक बाबतीत मुसलमानानाच प्राधान्य दिलं जातं .....जम्मू–काश्मिरचे मुख्य न्यायाधीश श्रीनगरमधल्या हायकोर्टावर तिरंगी ध्वजही फडकावायला नकार देतात. काश्मिरचे मुख्य न्यायाधीश गुलाम मोहम्मद मीर ही शेख अब्दुल्लाची खास व्यक्ती ! ते भारतीय घटनेलाही फारसे जुमानत नाहीत. स्वतः ते अत्यंत जातीय आहेत. त्यांच्यावर सुप्रीम कोर्टाने वेळोवेळी अत्यंत कठोर कोरडे ओढलेले आहेत !......

अशा एक ना अनेक घटनाचे दाखले देत ही भाजपा–संघीय मंडळी पुढे आवेशाने सांगतात, '...ह्याच हिंदूवरील अत्याचारांचा पुढचा भाग म्हणजे हे पुनर्वसन विधेयक. प्रामुख्यानं जम्मूतल हिंदू मताधिक्य नष्ट करण्याच्या दृष्टीनं टाकलेलं पुढचं पाऊल आहे. ह्याला वेळीच विरोध करून हे विधेयक चिरडलं गेलं नाही तर जम्मूही मुस्लिम मताधिक्याचा प्रांत होईल ! जम्मू–काश्मिरमधला सत्ताधाऱ्यांना असणारा उरलासुरला विरोधही मिटला जाईल आणि इस्लाममय झालेलं संपूर्ण जम्मू–काश्मिर राज्य मग कितपत भारतात राहील कोण जाणे ! त्या वेळी जेहलमला अश्रू गाळत राहण्यावाचून दुसरं काहीच गत्यंतर उरणार नाही !

भारतीयांना परमप्रिय आणि पवित्र वाटणारी सिंधूनदी ! तिच्यावर अशाच संकटाचं सावट आलं तेव्हा स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अक्षरशः टाहो फोडून, मोठा आकांत मांडून, आपल्या देशबांधवांना जागृत करण्याचा, वेळीच सावध होण्याचा अकटोविकट प्रयत्न केला; पण त्याचा काही उपयोग झाला नाही ! ती सुरसरिता सिंधू अश्रू ढाळीत-ढाळीत भारतीयाना दुरावलीच ! आज पाळी आहे जेहलमची, त्या वितस्तानदीची !! तिच्यावरही तीच पाळी येणार का ?

'...तशी पाळी जेहलमवर येऊ नये म्हणून संघ, भाजप, आर्यसमाज, विश्व हिंदू परिषद वगैरे सर्व धडपडत आहेत; पण संपूर्ण राष्ट्राचा, आम्हाला ह्या लढ्यात पाठिंबा हवा आहे ..अन्यथा, भारतीय जर निव्वळ बघ्याचीच भूमिका घेत राहिले, तर परिस्थिती गंभीर राहील!...' आमदार ठाकूर बलदेवसिंग म्हणाले.

पुनर्वसन विधेयकाला सर्वांत जास्त कडवा विरोध साधारणत: हयाच गोटामधून आहे. 'धार्मिकदृष्ट्या तर हे विधेयक अत्यंत जहरी आहेच; पण त्याचे राजकीय परिणाम त्याहूनही भयानक ठरण्याची शक्यता आहे.' असं सांगून हे विरोधक पुढे म्हणतात, '...या विधेयकाचा आधार घेऊन अनेक फुटीर शक्ती आज काश्मिरात कार्यरत आहेत. पाकिस्तानच्या काश्मिरविषयक डावपेचानाही त्यामुळे खतपाणीच मिळू शकेल. पाकिस्तान, अनेक संशयास्पद लोक हृया विधेयकाचा फायदा घेऊन काश्मिरात घुसबू शकेल की ज्याच्या कारवाया या देशाला मारक ठरू शकतील ..एकदा तर अशी शंका येते की, हे मुळातच आंतरराष्ट्रीय कारस्थान आहे. 'पॅन इस्लाम' या इस्लामिक आंतरराष्ट्रीय डावपेचांचा हा एक भाग असावा आणि दिवंगत मुख्यमंत्री व आजचे मुख्यमंत्री डॉ. फारुख अब्दुल्ला हे या डावाचेच बळी असावेत...पूर्वी शेख अब्दुल्ला तुरुंगात असताना काश्मिरबाबत जे पाकिस्तानी शिष्टमंडळ यूनोत पाकिस्तानी बाजू समजावून सांगायला गेलं होतं त्यात फारुख अब्दुल्लांचे धाकटे बंधू तारिक अब्दुल्ला हृयाचा समवेश होता. डॉ. फारुख अब्दुल्ला त्या काळात इंग्लंडमध्ये होते. तिथून ते 'काश्मिर लिबरेशन फ्रंट' या संघटनेची सूत्रं हाताळीत. त्यांनीही त्या वेळी आपल्या बंधूना व पाकिस्तानी शिष्टमंडळाला मदत केली होती असं म्हणतात...हृया पार्श्वभूमीवर डॉ. फारुख अब्दुल्लानी हिरीरीनं आणलेल्या या विधेयकाचा विचार केला तर, आम्ही वर केलेल्या आरोपात तथ्य आहे असं जाणवेल...'


**श्रेय एंटरप्रायझेस**

**SHREYA ENTERPRISES**

*Manufacturers of*

**Aluminium Sliding Windows, Doors, Partitions and Auto Windows**

*Address* :

**A1, Renuka Apartments, Erandwana, Pune 411 004**

**Tel. : 52741**

## कलम ३७० चा अडथळा

'आणि आता ह्या अराष्ट्रीय, राष्ट्रघातक विधेयकाला विरोध करण्यात पुढाकार घेतला म्हणून चिडून जाऊन डॉ फारुख अब्दुल्ला संघावर बंदी आणू पाहात आहेत.' असं सांगून प्रांतसंघटक श्री. मनोहर रावजी पुढे म्हणाले, 'संघावरची बंदी म्हणजे हिंदूवरील हल्ला आहे असं देवरसांनी काश्मिर शासनाला ठणकावून सांगितलं आहे आणि ही वस्तुस्थिती आहे. ह्याचाच पुढचा अर्थ मी असाही लावतो की, हिंदूवरील हल्ला म्हणजे भारत राष्ट्रावरील हल्ला आहे. इथल्या नेहरूंच्या काळापासून जपलेल्या लोकशाही परंपरावरील हल्ला आहे. ज्या दिवशी हिंदूवरील हल्ला सहन केला जाऊन माघार घेतली जाईल त्या दिवशी इथली लोकशाही कोसळेल आणि त्यातून भारतीय स्वातंत्र्यालाच धोका निर्माण होईल!

'...आणि हे सगळे धोके जाणूनच ह्या विधेयकाला भारताच्या लष्करप्रमुखांनीही विरोध केलेला आहे. भारताच्या लष्करप्रमुखांनी अशा तऱ्हेच्या राजकीय प्रश्नावर मत व्यक्त करण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी; पण एकूण प्रश्नाचं गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी हे राष्ट्रघातकी पाऊल असल्याचा व त्यामुळे अनेक संरक्षणात्मक व सैनिकी प्रश्न निर्माण होण्याचा धोका असल्याचा इशारा दिलेला आहे ..पुनर्वसन-विधेयकाला असलेल्या विरोधाला मिळालेलं हे सर्वांत महत्त्वाचं समर्थन आहे असं आम्ही मानतो आणि कदाचित् ह्या समर्थनाचा प्रभाव म्हणून असेल किंवा त्यानाही या प्रश्नाचं गांभीर्य आणि विधेयकात असलेला राष्ट्रीय धोका लक्षात आला म्हणून असेल, पण पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनीही ह्या विधेयकाला प्रखर विरोध दर्शविला आहे. संघावर येऊ घातलेली बंदीही त्यामुळेच कदाचित् त्यांना मान्य नाही. तशा अर्थाचं पत्रही त्यामुळेच केंद्रीय गृहमंत्रालयाकडून राज्यशासनाकडे आलेलं आहे ...'

'असं असलं तरी फार मोठा हस्तक्षेप करून बिल उधळून लावणंही केंद्रसरकारला जमत नाही असं दिसत. इथे मोठा अडसर भारतीय संविधानाच्या कलम ३७० चा येतो. या कलमान्वये जम्मू-काश्मिरला खास दर्जा मिळाला असून तिथलं सरकार अतर्गत बाबींबाबत संपूर्ण स्वायत्त आहे. संपूर्ण देशात केवळ काश्मिरमध्येच स्वतःची अशी स्वतंत्र घटना आहे. त्यानुसार काश्मिर विधानसभा स्वतःचे कायदे करू शकते आणि त्या कायद्याना रद्द करण्याचा अधिकार लोकसभेला नाही. इतर सर्व राज्यांबाबत लोकसभा सर्वश्रेष्ठ असली तरी तिच्या सार्वभौमतेला काश्मिरात खीळ बसलेली आहे. त्यामुळेच हे सगळ प्रकरण आज सर्वोच्च न्यायालयाकडे त्यांच्या अभिप्रायार्थ पाठविण्यात आलं आहे ...परंतु ३७० खाली काश्मिरला मिळणारी स्वायत्तता एवढी मोठी आहे की, सर्वोच्च न्यायालयाकडून निर्णय येण्यापूर्वीच आज काश्मिर सरकारने समत विधेयकाच कायद्यात रूपांतर केलं आहे आणि कायद्याच्या अमलबजावणीच्या दृष्टीनं पावलं टाकायला सुरुवात केली आहे ..'

ह्या गोष्टीचा उल्लेख भाजपचे अध्यक्ष अटलबिहारीजी वाजपेयींनी राष्ट्रपतींना (ऑक्टोबर, १९८२ रोजी) लिहिलेल्या पत्रातही केला आहे. एवढच नव्हे, तर राज्यपाल श्री. बी. के. नेहरूंनीही ह्या गोष्टीबद्दल आश्चर्य आणि खेद व्यक्त केला आहे! ... "पण ह्या शाब्दिक खेदापलीकडे कुणीच काही करत नाही. ह्या बिलावरील विधानसभेतल्या चर्चेच्या वेळी नॅशनल कॉन्फरन्स, जमाते इस्लामी व इतर काश्मिरी आमदारानी राज्यपाल, केन्द्रशासन, लोकसभा, पतप्रधान, भारतीय सविधान ह्या सर्वांचीच अवहेलना केली. ह्या सर्वांबाबत अत्यंत अनुदार शब्द वापरले. काहींची भाषा हे सर्व झिडकारून देऊन सार्वभौम काश्मिरी संविधानाची भलावण करणारी होती, तर काहींची चक्क पाकिस्तानधार्जिणी होती. ह्या सर्व घटना काश्मिर विधानसभेत घडत असताना मुख्यमंत्री डॉ. फारुख अब्दुल्लांची भूमिका निव्वळ बघ्याची होती हे विशेष! ..." इति श्री. चमनलालजी गुप्ता.

"...या विधेयकाची आणखी एक गंमत आहे. उद्या एखादा पाकिस्तानी नागरिक ह्या विधेयकान्वये भारतात (म्हणजे काश्मिरात) आला तर त्याला काश्मिरी नागरिकत्व मिळू शकेल. साहजिकच त्याला भारतीय नागरिकत्वही मिळू शकेल; पण त्याच वेळी त्याला पाकिस्तानी नागरिकत्वाचा त्याग करण्याची आवश्यकता राहणार नाही. थोडक्यात तो पाकिस्तानचाही नागरिक राहून तिथे जमा केलेली स्थावर मालमत्ताही स्वतःच्या कब्जात राखू शकतो. विधेयक खास करून मुसलमानांना बहाल करीत असलेल्या दुहेरी नागरिकत्वाचा फायदा उचलून ही पुनर्वसित मंडळी मनात येईल तेव्हा पाकिस्तानात, मनात येईल तेव्हा काश्मिरात राहू शकतील. इतकंच नाही, तर भारतीय नागरिकत्व मिळत असल्यानं भारतभरही त्यांना मुक्त संचार करता येईल. त्यामुळं 'दुरावलेल्यांच पुनर्मीलन' असं गोडस वर्णन जरी राज्यशासन ह्या विधेयकाचं करत असलं तरी त्यात छुपलेले हे धोके फार मोठे आहेत आणि विधेयकातले हे छुपे 'हेतू' मुद्दामच, जाणीवपूर्वक सांभाळले गेलेले आहेत .." इति आमदार भगोत्रा. हे आमदार जनता पक्षीय आहेत आणि त्या पक्षाचाही या विधेयकाला कडाक्याचा विरोध आहे, पण आश्चर्य हे की, भाजपचा जसा राष्ट्रीय पातळीवरही या विधेयकाला विरोध आहे तसा जनताचा किंवा कॉंग्रेसचा आढळत नाही वास्तवात कॉंग्रेसचा विरोध भाजपापेक्षाही मोठा असायला हवा कारण तो पक्ष केंद्रस्थानी सत्तेवर आहे. त्या पक्षाच्या 'सबकुछ' इंदिराजींचा ह्या विधेयकाला विरोध आहे. एवढ असूनही कॉंग्रेसची अखिल भारतीय पातळीवर ह्या विधेयकावरील मोठी प्रचारआघाडी आढळून येत नाही. खुद्द काश्मिरातही अध्यक्ष मुफ्ती मोहम्मद, एक आमदार, एक खासदार ह्या विधेयकाला विरोध करत असले तरी, डॉ. करणसिंग, खा. मीर कासिम आदी नेते ह्या विधेयकाबाबत काहीसे दबकतच बोलतात ..

**'विधेयकातले हे छुपे 'हेतू' मुद्दामच सांभाळले आहेत!'**

### समतोल कसा येईल ?

काही अंशी कॉंग्रेसचे प्रवक्तेच मानले जातील असे ‘ काश्मिर टाइम्स ’चे संपादक श्री. वेदभसीन ह्यानाही हे विधेयक अनावश्यक असंच वाटतं. त्यांच्या मते, हे विधेयक जात्या शांतताप्रिय असणाऱ्या काश्मिरीमध्ये जातीय तणाव वाढवायला कारणीभूत ठरणारं आहे... कॉंग्रेससह सर्व विरोधी पक्षानी त्याला विरोध करायला हवा हेही खरंय ! ... वास्तवात मात्र, ज्या प्रश्नाविषयी सहानुभूति दाखवून हे विधेयक मांडण्यात आलं आहे त्या प्रश्नात तथ्य नाही असं म्हणता येणार नाही. अनेक काश्मिरींचे जवळचे नातेवाईक, अगदी आई–वडील–भाऊ–बहिणी इतक्या जवळचे, आज पाकिस्तानात आहेत. वर्षानुवर्षे ते एकमेकापासून दुरावलेले आहेत. त्यांचं आपसात पुनर्मीलन घडवून आणणं ह्यात काहीच गैर नाही. ते मानवतावादीच कृत्य आहे ! परंतु मला असं वाटतं की, भारतीय संविधानानं ह्या गोष्टीची आधीच दखल घेतलेली आहे. ‘ जेन्युइन ’ बाबतीत पाकिस्तानात गेलेल्या काश्मिरीना भारतात येता याव ह्या बाबतीत आपल्या संविधानात पुरेशी तरतूद ह्याआधीच आहे आणि त्यानुसार अनेक काश्मिरी, गेल्या ३५ वर्षांत काश्मिरात परतलेही आहेत ...’

‘... देशात सर्वत्र फुटीरतेची भावना आज वाढीला लागलेली दिसते. त्याला काश्मिर पुनर्वसन विधेयकानं खतपाणीच मिळेल. हा धोका टाळायचा एकमेव मार्ग म्हणजे जम्मू–काश्मिरला खास दर्जा देणारं भारतीय संविधानातलं कलम ३७० रद्दबातलच करून टाकावं!’ ह्या सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरसाच्या सूचनेला मात्र श्री. भसीन विरोध दर्शवितात. त्यांच्या मते, ‘ काश्मिरच्या प्रश्नावर हा उपाय निश्चितच नाही ! त्यासाठी मला तरी असं वाटतं की, जम्मू–काश्मिरच्या सध्याच्या घटनेत काही सुधारणा घडवून आणून जम्मू, काश्मिर आणि लडाख ह्या राज्यातल्या तिन्ही प्रांतांना राज्यांतर्गत जादा अधिकार देऊन एका समान पातळीवर आणणे. ह्यातून काश्मिर खोऱ्यात एकवटलेली सत्ता विकेंद्रित होईल व त्यातूनच ह्या तीन प्रांतांतला समतोल राखला जाऊन, संपूर्ण राज्याच्या इस्लामीकरणाला किंवा काश्मिर खोऱ्याच्या हुकुमशाहीला आळा बसेल. तिन्ही विभागाचा समतोल विकास होऊन एकूण राज्याचाही चेहेरा–मोहरा बदलेल !

‘ १९६८ मध्ये झालेल्या काश्मिर जनता परिषदेतही मी हाच विचार मांडला होता. मरहूम शेख अब्दुल्ला त्या वेळी चिडलेही होते, पण समेलनाच्या अध्यक्षस्थानी असलेले साथी जयप्रकाशजी ह्यानी मात्र माझ्या सूचनेनाला पाठिंबा जाहीर केला होता ... मला वाटतं आजही काश्मिरच्या सर्व प्रश्नांवर तोच एक तोडगा आहे ...’

जम्मू–काश्मिरात मी अनेकांशी बोललो तेव्हा बऱ्याच जणांना ह्या राज्यांतर्गत स्वायत्ततेच्या कल्पनेचं बरंच आकर्षण वाटलं. ह्या स्वायत्ततेनुसार, त्या त्या प्रांताला सर्व स्थानिक प्रशासनाबाबतचे अधिकार राहावेत अशी कल्पना आहे. केन्द्राकडून मिळणारं अनुदान तिन्ही प्रांतांत समसमान विभागलं जाऊन त्याद्वारे त्या त्या विभागाच्या विकासाच्या योजना आखल्या जाव्यात हा या योजनेचा आणखी तपशील. नोकऱ्या, शिक्षण वगैरे बाबतीतही स्वयंनिर्णय असावा असंही ह्या लोकांना वाटतं. ह्याच मागण्या घेऊन लडाखी लोकांनी गेल्या दोन-तीन वर्षांपासून चळवळ सुरू केली होती. त्यावर अगदी अलीकडेच मुख्यमंत्री डॉ. फारुख अब्दुल्लांनी सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचं आश्वासन लडाखी जनतेला दिलं आहे. त्याचं स्वागत करून डॉ. करणसिंगानी हाच न्याय जम्मूलाही लागू करावा असं सांगून श्री. वेद भसीन ह्यानी सुचवलेल्या पर्यायाचीच री ओढली आहे ...

ह्या परिसरात हिंडताना काही नॅशनल कॉन्फरन्स मंडळींच्या तोंडून तर मी असंही ऐकलं की, डॉ. करणसिंगाना हिमाचल प्रदेशासह विशाल जम्मू प्रांताची (भारतांतर्गत) कल्पनाही पसंत आहे. त्यात त्याना लडाखचाही समावेश अभिप्रेत आहे... हीच कल्पना थोड्या वेगळ्या पद्धतीने पठाणकोट इथल्या डॉ. महाजनांनी मांडली होती आणि विद्यार्थी परिषदेच्या प्रा. निर्मल सिंगानीही शेवटचा उपाय म्हणून ह्याच योजनेचा उल्लेख केला होता; पण ह्या संदर्भात संघाची, भाजपाची आणि कॉंग्रेसचीही भूमिका वेगळी आहे. त्यांच्या मते, ‘... अशा पद्धतीने काश्मिर खोऱ्याचं जर अगदी वेगळं राज्य आपण निर्माण केलं तर आपणहून जेहलमच्या त्यागाची आपण सिद्धता केली असच होईल ! काश्मिर खोऱ्यातल्या काही अतिरेक्यानाही असा वेगळा काश्मिर हवा आहे. त्यामुळे त्यांच्या फुटीरतेच्या चाळयाना अगदीच मुक्त वाव मिळेल. ‘जम्मू–लडाखचा वेगळा प्रांत’ म्हणूनच धोकादायक वाटचाल ठरेल. त्या पद्धतीनं तयार झालेला निर्विवाद मुस्लिम–काश्मिर कोणत्याही क्षणी भारतापासून फुटून ‘ आझाद काश्मिर ’ बरोबर एक होईल ह्यात शंका नको ... ह्यावरचा ‘ एकमात्र ’ उपाय मात्र कॉंग्रेस, जनता, भाजपा, पॅन्थर्स वगैरे

हार्दिक शुभेच्छा !

**सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस**
**सुदर्शन ऑफसेट**

५/१०, वडाळा उद्योगभवन,
नायगाव क्रॉस रोड,
मुंबई ४०० ०३१

फोन : ८८२ ३५७३ – ८८२ ७३३२

सर्व विरोधी पक्षांच्या मते वेगवेगळा आहे. काँग्रेसला आणि जनताला ' राज्यांतर्गत ' स्वायत्तता जम्मू, लडाख आणि खोरे प्रदेशाला मिळायला हवी आहे, तर भाजपाला कलम ३७० रद्दबातल करावे हाच एकमात्र उपाय वाटतो आणि पॅन्थर्सना मात्र राज्याचं अर्थकारण सुधारण्याने प्रश्न सुटतील असं वाटतं ...

वरवर विरोधी पक्षाची मतं अशी असली तरी कलम ३७० रद्दबातल करण्याबाबत व्यक्तिगत मतं अनेकांची भिन्नभिन्न आहेत. जम्मूतल्या एका संघवादी वकीलसाहेबांना कलम ३७० आहे असंच राहावं असं वाटत. त्याना असही वाटतं की, ' ... हे कलम रद्दबातल केलं तर बाहेरच्या लोकाना ह्या राज्यात येऊन स्थायिक व्हायचे अधिकार मिळतील. त्या वेळी मोठी शक्यता मला तरी बंगाली, बिहारी व उत्तर भारतीय मुसलमानच इथे मोठ्या प्रमाणावर येण्याचीच वाटते. पाकिस्तानशी इथून संपर्क ठेवणं त्यांना जास्त सोयिस्कर ठरणार आहे. ... हिंदू समाज त्या मानाने मोठ्या प्रमाणावर येण्याची शक्यता मला तरी जवळजवळ शून्यच वाटते ..'

अर्थात ह्या मताशी अनेक सहमत होत नाहीत; पण त्यांनाही ३७० कलम राहाव असं वाटतं. त्यापोटी, राज्यात बाहेरून येणाऱ्या लोकांवर अंकुश राहून या राज्यात लोकसंख्येचा स्फोट होणार नाही अशी त्याची प्रामाणिक समजूत. त्याचप्रमाणे काही विशिष्ट सुरक्षिततेची भावनाही ह्या ३७० मुळे मिळते; राज्याची अलग अस्मिता राखता येते अशीही भावना आहे.

' ...ह्या ३७० कलमामुळे काश्मिरी जनता मूळ भारतीयत्वाच्या प्रवाहापासून वेगळी राहते, अलग राहते. त्यामुळे स्वत:च्या भारतीयत्वाची जाणीवही ह्या लोकांना नसते. कुठल्या राष्ट्रातली जनता अशा प्रकारे राष्ट्रीय प्रवाहापासून विभक्त असणे त्या राष्ट्राला भूषणावह नसते ... भूषणावह नसते एवढंच नव्हे, तर राष्ट्रपुरुषाला अशा अलगतेच्या भावनेतून धोकाच पोहोचू शकतो ... ' असं सांगून संघाचे प्रांतप्रमुख पुढे म्हणाले, ' ... त्यातूनच राष्ट्रविरोधी घोषणा इथे वरचेवर उठू शकतात. भारत पाकिस्तान सामन्यामध्ये पाकिस्तानच्या विजयासाठी इथेच फक्त कदाचित् प्रार्थना होत असतील. हॉकी—क्रिकेटमधल्या प्रत्येक पाकिस्तानी विजयानं काश्मिर खोरं आनंदून जातं. पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा उठतात ... मकबूल भट्टांना फाशी दिलं गेलं तेव्हा खुद्द पाकिस्तानात किंवा आझाद काश्मिरात काही विशेष घडलं नाही; पण काश्मिर खोऱ्यात मात्र दंगली उसळल्या. हरताळ पाळले गेले . ही राष्ट्रविरोधी प्रवृत्ती काश्मिरात राहाण्याचं, वाढीस लागण्याचं मुख्य कारण म्हणजे भारतीय संविधानातलं हे कलम ३७० ! स्व. पंडित नेहरूंनी लोकशाहीची मोठी देणगी भारताला दिली खरी; पण काश्मिरबाबत त्याची पावलं दुर्दैवानं नेहमीच चुकीची पडत गेली. आमच्या सैनिकांच्या जे सहज आवाक्यातलं होतं ते सारं माउंटबॅटनचं ऐकून यूनोच्या माध्यमातून त्यानी सहज गमावलं ! काश्मिरला खास राज्याचा दर्जा देऊन त्यानी या पहिल्या चुकीवरही कडी केली आणि त्याच्या ह्या दोन घोडचुकामुळे काश्मिर ही भारताची कायम डोकेदुखी होऊन बसली ! ... आज ह्याच्यावरचा मार्ग म्हणजे हा खास दर्जा रद्द करून जम्मू काश्मिरचं भार-


१९३२–८२ सुवर्ण महोत्सवी वर्ष

ग्राहकांना धन्यवाद

आधुनिक मनमोहक साड्या तसेच फॅन्सी कापडासाठी

शाहाडे आठवले प्रा. लि. दादर

न. चिं. केळकर मार्ग, मुंबई–४०० ०२८

दूरध्वनी – ४५ ४५ ५४

शाहाडे आणि कंपनी – गिरगांव

जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई–४०० ००४

दूरध्वनी – ३५ ६१ ३९

तातलं विलिनीकरण पक्कं करणं हाच होय ! त्यातनंच काश्मिरींची उर्वरित भारतीयांशी सरमिसळ वाढून त्यांच्यात राष्ट्रीय भावना वाढीस लागू शकेल. ह्या राज्यातल्या फुटीरतेच्या भावनेला त्यातूनच आळा बसू शकेल ... '

' एक पाऊल पुढें जाऊन मला असंही सुचवावंसं वाटतं की, संपूर्ण काश्मिर–पाकिस्तान सीमेवर आपल्या निवृत्त जवानांना जमिनी देऊन वसवावं. त्यातून सीमेच्या सुरक्षेला तर हातभार लागेलच; पण इतरही, विशेषतः स्थानिक अतिरेक्याचाही प्रश्न शासनाला व्यवस्थित हाताळता येईल. ही सूचनाही माझी स्वत:ची आणि नवीन अशी मुळीच नाही. ही सूचना ह्यापूर्वीही अनेकदा पुढे आली आहे. असं म्हणतात की, काही आजी–माजी वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांनीही ही कल्पना उचलून धरली होती. आजच्या संदर्भात ह्या सूचनेला नव्यानं महत्त्व प्राप्त झालं आहे ... '

## ५. पुनर्वसन विधेयक : विविध प्रतिक्रिया

आज मराठी विरोधक पुनर्वसन विधेयकाविरुद्ध गदारोळ उठवीत आहेत. खुद्द केंद्रसरकारलाही हे विधेयक पसंत नाही. म्हणूनच केन्द्रसरकारनं विधेयक आता सर्वोच्च न्यायालयाकडे धाडल आहे. एवढ असूनही राज्यसरकारविरुद्ध किंवा विधेयकाविरुद्ध राष्ट्रव्यापी आवाज मात्र उठताना दिसत नाही. असं का व्हावं ? काँग्रेस पक्ष अंतर्गत दुफळीनी आज सर्वत्र जराजर्जर झालेला दिसतो आहे. निवडणुका आणि ठिकठिकाणची सरकारं साभाळणं ह्यातच ह्या पक्षाचा महत्त्वाचा वेळ बहुधा खर्च होत आहे विरोधी पक्षाची परिस्थितीही फारशी कुठे चागली नाही. शिवाय जिथे शक्य असेल तिथे सत्ताधारी काँग्रेस आय्ला ठोकून काढणं आणि प्रत्येक ठिकाणी त्या पक्षाला विरोध करणं एवढाच कार्यक्रम या विरोधी पक्षाकडे असतो. ह्या नि अशाच कारणांमुळे काँग्रेस आय् आणि विरोधी पक्ष ह्या काश्मिर विधेयकावर राष्ट्रमत तयार करू शकत नाहीत, अस आहे का ? की काश्मिर प्रातच एवढया लाब आहे की तिथल्या प्रश्नाचं गाभीर्य सपूर्ण भारतवर्षाला उमगू शकत नाही हे त्याचं कारण आहे ? की काश्मिर हे वर्षा-दोन वर्षांतून सुटी घालवण्यासाठी जाऊन यायचं प्रेक्षणीय स्थळ एवढंच भारतीय काश्मिरला महत्त्व देतात व म्हणून ह्या विधेयकाचं खास सोयर-सुतकच त्यांना वाटत नाही ?

मला वाटतं यातलं प्रत्येक कारण काही अंशी खरं असावं; पण त्याहीपेक्षा माझ्या मते मोठं कारण म्हणजे केंद्रसरकार आणि काँग्रेस पक्षाची अगतिकता हे असावं ! एक तर खुद्द काश्मिर काँग्रेसचा त्या राज्यात फारसा दबदबा नाही. दुसरं म्हणजे त्यातलेही निम्मे लोक नॅशनल कॉन्फरन्सला जवळचे वाटणारेच आहेत; पण त्याहीपेक्षा विशेष म्हणजे नेहरूंच्या काळात केन्द्रसरकारनं शेख अब्दुलांशी जे करार केले त्यामुळे ते सरकार आणि नेहरूंचे वारसदार काश्मिरमधल्या या पुनर्वसन विधेयकाबाबत काही अंशी अगतिक झालेले आहेत. त्यामुळंच इंदिराजीचा या विधेयकाला निक्षून विरोध असला तरी त्या फारसं काही करू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे ! केन्द्रसरकारची व सत्ताधारी पक्षाची अगतिकता लक्षात येण्यासाठी आपल्याला या पुनर्वसन विधेयकाच्या थोडं इतिहासात जाणं आवश्यक आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेव्हा जम्मू–काश्मिरच्या त्या वेळच्या महाराजानी शेख अब्दुलांच्या सहकार्यानं भारतात विलीन व्हायचं ठरवलं तेव्हा खरं तर काश्मिरच्या संपूर्ण विलिनीकरणावर शिक्कामोर्तब करून घ्यायचा संपूर्ण अधिकार भारताला होता. भारतानं ती संधी दवडली. काश्मिरला खास दर्जा देऊन भरघोस स्वायत्तता तर दिलीच पण त्याचबरोबर, त्या वेळचे गव्हर्नर जनरल माउंटबॅटन. शेख अब्दुल्ला ह्यांच्या मोहजालात फसून जम्मू-काश्मिरचं भवितव्य सार्वमताशी निगडित करून प्रश्न अधिक बिकट करून ठेवला; त्यावर भागलं नाही म्हणून की काय, २० जुलै १९५२ रोजी पं. नेहरू आणि शेख अब्दुला ह्यांच्यात ऐतिहासिक दिल्ली करार झाला. काश्मिरचा खास दर्जा, त्याची स्वायत्तता ह्यावर शिक्कामोर्तब करून ह्या करारानं आणखी पुढं पाऊल टाकलं. १ मार्च १९४७ नंतर पाकिस्तानात गेलेल्या काश्मिरी स्थलांतरितांबद्दलही एक समझोता या करारान्वये पक्का करून टाकण्यात आला. त्यानुसार अशा स्थलांतरिताना काश्मिरात परतता यावं म्हणून आवश्यक त्या तरतुदी भारतीय आणि जम्मू-काश्मिर संविधानात केल्या जाव्यात ह्यावरही उभय नेत्यात एकमत झालं.

ह्या करारान्वये ह्या दोन्ही घटनांमध्ये अशी तरतूदही करण्यात आली. भारतीय संविधानाचा भाग दोन नागरिकत्वासंबंधी आहे, त्यातल्या पोटकलम सात प्रमाणे, ह्या पुनर्वसनासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात आली असून त्या संबंधात आवश्यक तो कायदा करण्याचे अधिकार राज्य विधानसभेला देण्यात आले आहेत.

### डॉ फारुख अब्दुल्ला

डॉ. फारुख अब्दुल्लानी नेमक्या याच मुद्द्यावर बोट ठेवून सांगितलं की, ' ... ह्या विधेयकाद्वारे आम्ही फक्त ह्या घटनात्मक तरतुदीची पूर्ती करत आहोत. ह्यात घटनाविरोधी तर काहीच नाही आणि राष्ट्रविरोधी तर काही नाहीच नाही. आम्ही पूर्णपणे राष्ट्रीय आहोत. भारतीय आहोत आणि भारतीय घटनेशी बांधलेले आहोत. निधर्मी राज्याच्या कल्पनेला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. आणि केवळ त्याचमुळे मुस्लिम बहुसंख्य असलेल्या काश्मिर राज्यानं मुस्लिम पाकिस्तानात सामील न होता 'सेक्युलर' भारतात विलीन व्हायचं ठरवलं. त्याच सेक्युलरवादाचे आम्ही कट्टे पुरस्कर्ते आहोत आणि जातीय निर्मूलनासाठी आम्ही वचनबद्ध आहोत राष्ट्रप्रेम आम्हाला कुणी शिकवू नये. ते आमच्या नसानसात भिनलं आहे. उलट धर्मांधता म्हणजेच राष्ट्रीयता, राष्ट्रीय बाणा मानणाऱ्यांनीच देशात सर्वत्र जातीय विषाचा फैलाव करून राष्ट्रद्रोही कृत्यं केलेली आहोत... एवढं सागून मुख्यमंत्री राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरनं प्रामुख्यानं कडाडून हल्ला चढवतात. ह्या राज्यात अराजक माजवून मला सत्ताभ्रष्ट करण्याचा, राज्यातली सत्ता तलवारीद्वारे ताब्यात घेण्याचा कट संघानं केला होता असा आरोपही करतात.

## 'या लोकांनी स्वतःबरोबरच प्रशासनही भ्रष्ट केलं आहे !'

'... अशांच्या अतिरेकी चाळयांना जमाते इस्लामी, मुस्लिम लीग वगैरेंसारख्या दुसऱ्या टोकाच्या, मुस्लिम जात्यंधाकडून प्रतिकार होतो... म्हणून ह्या जातीय संस्था-संघटनावर बंदी घालणंच योग्य होईल. मला तर वाटतं देशभर सर्वच राज्यांनी या संघटनावर बंदी घालणेच योग्य होईल... निदान काश्मिरात तरी अशी बंदी अगदी लौकरच येईल एवढं निश्चित !

ह्यानंतर पुन्हा पुनर्वसन विधेयकाकडे वळून तो तरुण, तडफदार नि तितकाच आदबशीर वाटणारा, तसा वागणारा मुख्यमंत्री म्हणतो; ' हे विधेयक म्हणजे आश्वासनपूर्ती आहे. वचनपूर्ती आहे. भावाला भावा-बहिणीपासून, तोडणारी, आई-बापांना आपल्या मुला-मुलीपासून तोडणारी कृत्रिमता नष्ट करण्याचा आमचा [हा प्रामाणिक प्रयत्न आहे... आणि या विधेयकाची अंमलबजावणी करताना कुणावरही अन्याय होणार नाही, देशाला खतरा पैदा होणार नाही अशी काळजी घ्यायला आम्ही वचनबद्ध आहोत. वाटेल त्या पंचमस्तंभियांना या विधेयकामुळं काश्मिरात येऊन गडबड करायला मोकळीक मिळेल हा हितशत्रूंचा आरोप निव्वळ बिनबुडाचा, प्रचारी थाटाचा आणि विषारी असा आहे. या विधेयकाच्या आधारे काश्मिरात परतू इच्छिणाऱ्या प्रत्येकाची कसून चौकशी केली जाईल आणि पूर्ण समाधान झाल्यावरच त्याला 'स्वगृही' परतण्याचा परवाना दिला जाईल. शिवाय अशा परवानाधारकालाही व्हिसा हा मिळवावाच लागेल आणि तो अधिकार केन्द्रसरकारलाच आहे. एवढ्या चाळण्यातून नको असलेली व्यक्ती इकडे येणं अशक्यच आहे. त्यातूनही 'माणसाच्या हातून चुका होतातच' या न्यायानं एखादी 'अशी' व्यक्ती आलीच तर तिचा बंदोबस्त करायला आमचं प्रशासन, पोलिसयंत्रणा, केन्द्रीय सुरक्षा दलाचे सैनिक सगळे हुशारीत असणारच आहेत तेव्हा असल्या धोक्याच्या इशाऱ्याचा बाऊ करण्याचं काही कारण आहे, असं मला तरी अजिबात वाटत नाही ...

...आणि मुळात हा कायदा जारी होत आहे तो प्रामुख्याने कौटुंबिक जिव्हाळ्याला वंचित झालेल्यासाठी होत आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तानी तुरुंगातून निष्कारण खितपत पडलेल्या काश्मिरी नागरिकांसाठीच होत आहे. त्यांना मायदेशात येऊन स्वावलंबनानं जीवन जगता यावं हाच आमचा खरा हेतू आहे...

...ह्या सरळ साध्या हेतूनी प्रेरित होऊन मांडलेल्या विधेयकाविरुद्ध निष्कारण गरळ ओकलं जात आहे. हे विधेयक निव्वळ जातीय आहे, जम्मूत मुसलमानांची संख्या वाढवण्यासाठी आणलेलं आहे वगैरे, वेछूट आरोप आज हिंदू जातीयवाद्यांकडून होत आहेत. ह्या लोकांनी माझ्या वडिलांच्या उदारमतवादी धोरणाचा खूपच गैरफायदा उचलून, गेल्या सहा वर्षांत बरेच बेलगाम उद्योग केले आहेत. लोकांच्या धार्मिक भावना त्यांनी चाळवल्या आहेत. ह्या लोकांनी स्वत.बरोबरच प्रशासनही भ्रष्ट केल आहे. ह्या जातीयवाद्यांना वेळीच निपटून नाही काढलं तर संपूर्ण राज्यात हे लोक धर्मांधतेचं विष पसरवतील आणि शांत काश्मिरची शांतता नष्ट करून टाकतील. काश्मिरचं पारंपारिक पावित्र्य नामवून टाकतील !...

...असाच दुसरा अपप्रचार या विधेयकासंबंधी होतो आहे. तो म्हणजे पाकिस्तानातून व आझाद काश्मिरमधून काश्मिरात आलेल्या निर्वासितांवर ह्या विधेयकामुळं अन्याय होत असल्याचा. असत्य कथनाचा नि खोट्या प्रचाराचा असला नमुना कुठे सापडणार नाही ! मी आणि माझ्या शासनानं पुन्हा पुन्हा सांगितल आहे की, पाकिस्तानातून परतणाऱ्या पुनर्वासित काश्मिरीमुळे कुठल्याही निर्वासितावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. तो कसत असलेली जमीन, करीत असलेला धंदा, राहात असलेली जागा ह्यापैकी काहीही त्याच्यापासून हिरावून घेतलं जाणार नाही, ह्यासंबंधी आम्ही वचनबद्ध आहोत !...ह्या निर्वासित बंधूंच्या प्रश्नाचीही आम्हाला जाण आहे. तो सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत आणि काही मार्ग त्यातून निघेल ह्याची मला खात्री आहे...'

जम्मू-काश्मिरचे कायदामंत्रीही आपल्या मुख्यमंत्र्याच्या विचारांशी बरेच सहमत असलेले दिसले. त्यांच्याशी बातचीत करताना कळलं की, संघावरील बंदीचा वटहुकूम जवळजवळ तयार आहे. संघ, जमाते इस्लामी ह्यांना जातीय पक्ष तर जमाते इस्लामी तुलबाला अतिरेकी पक्ष ठरवून त्याच्या कार्यावर बंदी घालायची आणि त्याच वेळी मुस्लिम लीग, नॅशनल फ्रंट ह्याना फुटीरतावादी ठरवून त्यांना बेकायदेशीर ठरवायचं असा ह्या वटहुकूमाचा गाभा आहे. काही सरकारी गोटातनं असंही कळलं की, वटहुकूम व आधीच जारी असलेला सुरक्षा किंवा 'मिनी मिसा' कायद्याखाली अटक करायच्या जवळजवळ दोनशे संघकार्यकर्त्यांची यादीदेखील राज्यशासनानं तयार केली आहे...

ह्या संभाव्य बंदीबद्दल संघकार्यालयात कडवट प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या, तर जमाते इस्लामी वगैरे संघटनाच्या कार्यालयातून त्यासबंधी कुणी बोलायलाच तयार दिसलं नाही. तरी एकान सांगितलच—श्रीनगरमध्ये.. आम्ही तर डॉक्टरसाहेबांना मदतच करतो. त्यांना आमचा पूर्ण पाठिंबादेखील आहे. ह्या तथाकथित बंदीनं फारसा काय तो फरक पडणार आमच्या भूमिकेत ?...' संघाच्या कार्यालयात ह्यासबंधीची जाण अर्थात स्पष्ट आहे. वाईट दिसू नये, सेक्यूलरपणाचं ब्रीद मिरवता यावं म्हणून संघाबरोबर बाकीची नावं घेतली आहेत एवढंच ! खरी बंदी घालायची आहे ती फक्त संघावरच !...

सध्याचे कायदामंत्री श्री. लाडू प्रत्यक्ष भेटीत शासनाचीच तरफदारी करताना दिसले, तरी त्यांच्याच एका कर्मचारी सहकाऱ्याकडून कळलं की, खाजगीत ते ह्या दोन्ही बिलांसंबंधी फारसे आशावादी नसतात. सर्वोच्च न्यायालय पुनर्वसन कायद्याला संपूर्ण हिरवा कंदील दाखवील हे त्याना पटत नाही. त्याचप्रमाणे संघावरील बंदीचा वटहुकूम कोर्टात टिकू शकणार नाही ह्याहीबद्दल त्याना खात्री वाटते असे म्हणतात. त्यामुळं हा वटहुकूम मुख्यमंत्र्यांच्या आग्रहाखातरच निघाला तर निघेल; कायदामंत्र्याच्या अनुकूलतेतनं मात्र नक्कीच नाही ! अर्थात प्रत्यक्ष बोलताना ते विधेयकाची भलावणच करतात. संघावर लौकरच बंदी येणार याची ग्वाहीदेखील देतात आणि ह्या

दोन्ही गोष्टी राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यक असल्याचंही ठामपणे सागतात...

मुख्यमंत्र्यांच्या आणि कायदामंत्र्याच्या ह्या साऱ्याच प्रतिपादनावर विरोधक, विशेषतः संघीय मंडळी 'लोकाच्या डोळयांत धूळफेक' अशीच प्रतिक्रिया व्यक्त करतात. ...केंद्रानं व्हिसा दिल्याशिवाय हे पुनर्वसन-विधेयक खऱ्या अर्थानं अमलात येऊ शकत नाही हा मुख्यमंत्र्याचा दावा साफ खोटा आहे. सपूर्ण विधेयकात तशी तरतूद कुठेही नाही. फक्त विशिष्ट अधिकारसमितीला योग्यता पटली तर कुठल्याही पाकिस्तानातून येऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला काश्मिरात येण्याचा परवाना मिळू शकतो आणि अशी परवानाधारक व्यक्ती काश्मिरात येऊन काश्मिरी व पर्यायाने भारतीय नागरिकत्व मिळवू शकते, इथे स्थायिक होऊ शकते.. फक्त दुरावलेलो मने साधण्यासाठी आणि पाकिस्तानी तुरुंगात खितपत पडलेल्या काश्मिरीच्या मुक्ततेसाठीच केवळ हे विधेयक आहे हेही साफ खोटं. तशी कुठलीही खबरदारी ह्या विधेयकात नाही. उलट 'कुठल्याही' पाकिस्तानी नागरिकाला इथे येऊन 'काही' करायला मुक्त वाव देणारंच हे विधेयक आहे ...' इति सघचालक !

सघियांचं असं मत असलं तरी आज मुख्यमंत्र्याविरुद्ध न्यायालयीन लढा लढणारे ॲडव्होकेटसाहेब मात्र म्हणतात की, '...व्हिसा देण्याचे अधिकार केन्द्राकडेच असल्याने तसं हे विधेयक निरर्थक आहे. अर्थात ज्याना राज्यसरकार परवाने देईल त्यांना केन्द्राकडून व्हिसा मिळणार हे जवळजवळ गृहीत धरायला हवं. पुनर्वसनासाठी येणाऱ्या प्रत्येक अर्जाची छाननी राज्यसरकारच करणार आहे. साहजिकच राज्याची शिफारस डावलून एखाद्याला व्हिसा नाकारण केन्द्राला जड जाणार आहे...त्यात पुन्हा राज्याच्या खास दर्जाला धक्का लावण्यासारखंही होणार म्हणजे पुन्हा राज्यातल्या बहुसंख्याकांची गैरमर्जी ओढवून घेण. केन्द्रसरकार एवढा मोठा धोका पत्करायला तयार होईल, असं आजपर्यंतच्या इतिहासावरून मानणं चुकीचं ठरेल... ...मी ह्या बिलाला निरर्थक म्हटलं त्याला आणखीही कारणं आहेत. त्यात महत्त्वाचं म्हणजे ह्या विधेयकातल्या आशयाची पूर्तता करणारी तरतूद ह्याआधीच आपल्या घटनेत आहे. त्यानुसार बरेचसे सच्चे काश्मिरी याआधीच काश्मिरात परतलेलेही आहेत. असं असूनही हे विधेयक पुढे येतय यातच या विधेयकाची खरी गोम आहे. किंबहुना त्यामुळेच, हे विधेयक पुढे आणताना शासनाचे हेतू शुद्ध आहेत हे कुणालाही पटणार नाही...मूळ सविधानात्मक तरतुदी किंवा १९५२ चा दिल्ली करार फक्त काश्मिरातून पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्याचाच उल्लेख करतात, तर आज पुढे आलेल्या विधेयकाची व्याप्ती फार मोठी आहे. नुसते असे काश्मिरीच नाहीत, तर त्याच्या पुढच्या पिढीतल्या नातेवाइकानाही काश्मिरात येऊन स्थायिक होण्याची मुभा हे विधेयक देते...ह्यामुळच हे विधेयक राष्ट्रविरोधी आहे असं माझ स्पष्ट मत आहे...'

### एका पत्रकाराचे मत

ॲडव्होकेटसाहेबांच्या मताची, श्रीनगरमधले एक पत्रकार मात्र टिंगल उडवतात हे पत्रकार हिंदू असले तरी शेख अब्दुल्ला व आता डॉ. फारुख अब्दुल्लाच्या खास मर्जीतले आहेत. किंबहुना मुख्यमंत्री


हा देश हिंदूंचा आहे, हिंदूंमुळे देशाला श्रेष्ठत्व आहे. मुसलमान व इंग्रज यांच्या आक्रमणामुळे हिंदूसमाजाचा ऱ्हास झाला हे पूर्णांशाने खरे नसून समाजातील राष्ट्रीय भावना शिथिल झाल्याने व्यक्ती व समाज यांचे वास्तविक संबंध विस्कटले व असंघटित अवस्थेमुळे हा समाज आक्रमणाचे भक्ष्य बनला व शेकडो वर्षे परकीयांच्या पाशवी सत्तेखाली चिरडला गेला, हा डॉक्टरांनी काढलेला निष्कर्ष होता.
"मी या राष्ट्राचा घटक आहे व राष्ट्राकरिता माझे जीवन समर्पण केले पाहिजे !" ही कर्तव्याची जाणीव पुसट झाल्याने सर्व प्रकारच्या शक्तींची साधने असूनही समाज पराभूत झाला. यासाठी समाजाच्या नसानसात राष्ट्रीयत्वाची भावना खेळवून सारा समाज अनुशासित संघटनेच्या संजीवन मंत्राने पुनर्जीवित करून त्याने दिग्विजयी भव्य राष्ट्रस्वरूप उभे करावे असा महामंगल दिव्य संकल्प डॉक्टरांनी सोडला. तो संकल्प म्हणजेच "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ !"

**—परमपूजनीय कै. श्री. गुरुजी**

सौजन्याने—

**डी. पी. मोडक**

४१०, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी क्रमांक : ४४४३५७

ह्याच्यापर्यंत चटकन पोचायचं असेल तर ह्या पत्रकारमहाशयां-मार्फतच जाणं उत्तम ! ह्याची मतं, साधारणत: सरकारी 'बाजू' ची भलावण करणारी असतात. माझ्याशी बोलताना मात्र एखादी खास कानगोष्ट सांगावी अशा आविर्भावात बोलत ते म्हणाले,

'...हे विधेयक किंवा संघावरील बंदी या दोन्ही गोष्टी खरे तर विशेष गांभीर्याने घ्यायची आवश्यकताच नाही. हे दोन्ही उघडउघड राजकीय स्टंट आहेत आणि त्यापलीकडे ह्या गोष्टीना कुठलंही महत्त्व नाही. भाजपा आणि संघालाही हे माहीत आहे; पण त्यानाही ह्यातून राजकीय फायदा उठवायचा आहे म्हणून तेही विरोधाचा 'स्टंट' करीत आहेत....जास्तीत जास्त जून-जुलैपर्यंत विधानसभेच्या निवडणुका जम्मू-काश्मिरात घ्याव्याच लागतील. त्या वेळी आपल्या मतदारांना आपल्या बाजूनं ओढण्यासाठी दोन्ही बाजूना काही तरी बनाव हवेच असतात. ह्या विधेयकामुळं आणि संघवंदीमुळं अशी संधी दोन्ही बाजूना मिळणार आहे. विधेयक मांडल्यामुळं मुसलमान खूष होऊन नॅशनल कॉन्फरन्सची आहे ती फळी तशीच मजबूत राहणार. दुसरीकडे हिंदूविरोधी बिल असल्याच्या प्रचाराची जम्मूत धमाल उडवून तिथलं मत आपल्या बाजूनं ठाम वळेल अशी पावलं भाजपावाले टाकत आहेत. थोडक्यात एकीकडे एकमेकांना विरोधाचं नाटक करून हे दोन्ही पक्ष प्रत्यक्षात सिद्धसाधकाचा डाव खेळत आहेत ... एरवी दोन्ही बाजूना माहीत आहे की, असं विधेयक मंजूर झालं म्हणून कुठलाही लोंढा पाकिस्तानातून काश्मिरात येण्याची सुतराम शक्यता नाही. पस्तीस वर्षं तिकडे राहिल्यावर, तिथे आपलं घरदार-धंदा-नोकरी असं बस्तान बसवल्यावर काश्मिरात परतणं कुणालाच परवडणारं नाही हेही दोन्ही बाजूना माहीत आहे. अलीकडेच इस्लामाबादहून एक मूळचे काश्मिरी असलेले पत्रकार श्रीनगरला आले होते. त्यानीही गप्पांच्या ओघात हेच सांगितलं की, कुणीही पाकिस्तानी नागरिक इकडे येईलसं वाटत नाही ... आणि मला विचाराल तर आज, ह्यापूर्वीच भावनिक जवळिकेतून ह्या राज्यात आलेल्या फक्त सतरा पाकिस्तानी नागरिकांनाच काय तो ह्या विधेयकाचा लाभ मिळणार आहे. ह्या साऱ्या गोष्टी अगदी स्पष्ट आहेत आणि त्या दोन्ही बाजू मनोमन जाणून आहेत ... संघावरील बंदीचंही तेच ! ती बंदी येणार आणि आली की, फक्त कागदावरच ती राहणार हेही दोन्ही बाजू जाणून आहेत ... कारण राज्यांतर्गत संतुलन टिकवायच्या दृष्टीनं हाच एकमेव पर्याय आहे आणि अशा संतुलनाशिवाय आपल्या जातीय राजकारणाला फळ मिळणार नाही ह्याबाबत दोन्ही बाजूत एकमत आहे. साहजिकच दोन्ही बाजू अधूनमधून अशी पिल्लं सोडून वातावरण तापवीत राहतात एवढंच ! आता निवडणुका जवळ आल्यानं हे वातावरण थोडं जास्त तापवलं जाणं तसं साहजिकही आहे ... आणि म्हणूनच मला वाटतं, तुम्ही म्हणता तसे कुठलेही धोके ह्या विधेयकापासून किंवा संघबंदीपासून नाहीत. हा सगळाच एक राजकीय डाव आहे आणि आश्चर्य वाटलं तरी आज कट्टर विरोधक भासणारे नॅशनल कॉन्फरन्स आणि भाजपा हे ह्या डावातले भिडू आहेत, हे माझं मत लिहून ठेवा ! विधानसभेच्या निवडणुकानंतर ह्या मताची प्रचीती आली तर मात्र मला अवश्य पत्र लिहा !...'

## ६ : जनाब अब्दुल राथार यांची पुस्तिका

जम्मू ते श्रीनगर सफर म्हणजे एक अवर्णनीय सफर ठरावी. मी तिथे असताना मी श्रीनगरला जाऊ शकेन की नाही ह्याचीच शाश्वती नव्हती. काश्मिर खोऱ्यात त्या वेळी सतत बर्फ पडत होता आणि जम्मू-श्रीनगरला जोडणाऱ्या एकमेव रस्त्यावर बर्फाचे-डोंगराचे कडे कोसळून रस्ता साफ बंद झाला होता. बसेस दोन दिवसानंतरही बंदच होत्या; पण थोड्याशा उघडिपीनंतर, मिनतवारीनं टॅक्सीज मात्र श्रीनगरकडे धावत होत्या. अशाच एका टॅक्सीचा आश्रय घेऊन मीही श्रीनगरकडे निघालो. वास्तवात राजधानी हिवाळ्यासाठी जम्मूत हलल्यामुळं बहुतेक सगळे महत्त्वाचे पुढारी जम्मूत होते. बहुतेकांशी माझ्या भेटीगाठीही झाल्या होत्या. तरीही श्रीनगरला जाऊन येणं मला आवश्यक वाटत होतं. जम्मूत प्रामुख्यानं हिंदू वस्ती जास्त आहे. साहजिकच तिथलं वातावरण काही अंशी आपल्याला परिचित असं सरमिसळच होतं. सामाजिक आणि राजकीयही ! तिथं राजकीय मतांचा गलबलाही बराच ऐकायला मिळाला. तरी अस्सल 'नॅशनल कॉन्फरन्स'चं मत श्रीनगरमध्येच ऐकायला मिळेल असंच मला वाटलं. ही मंडळी जम्मूत तशी फार जपून बोलत होती. मी तर म्हणेन त्यांचं बोलणं मिठ्ठास, आदबशीर, मत बदलवून टाकणारं होतं. ऐकलेला किंवा प्रामुख्यानं संघ-भाजपा नेत्याकडून ऐकायला मिळालेला मुसलमानी कडवेपणा जम्मूत अनेक मुसलमानाशी बोलताना कुठे जाणवला नाही.

हे जाणवूनच मी श्रीनगरकडे कूच केलं. वेडीवाकडी वळणं घेत, डोंगर चढत-उतरत, मनाला खिळवून टाकणाऱ्या वाटेवरनं टॅक्सी धावू लागली, न् खरंच सांगतो काही वेळ, आपण काश्मिरमध्ये कशासाठी आलो आहो त्याचं भानच राहिलं नाही ! पठाणकोटहून जम्मूकडे जाताना, पंजाब ओलांडल्यावर मी काहीसा खट्टू झालो होतो सर्वत्र शुष्क उजाड माळरानं पाहून ! जम्मूहून श्रीनगरकडे कूच करताना मात्र हा खट्टूपणा पार पळाला ! निसर्ग तिथे जणू उधळून बरसत होता. सफरचंदाच्या बागा कधी दिसायच्या तर कधी उत्तुंग पर्वतराजी; लगेच दुसरीकडे थांग न घेता येण्याजोगी खोल दरी ... त्यात मधूनमधून झिरपणारा बर्फ ... तर एखाद वेळी पाऊस ... कडाक्याच्या थंडीतून मार्ग कापीत आम्ही पुढे चाललो होतो.

हा निसर्ग मनाला कितीही खुलवत असला तरी दुसरीकडे, झपाट्यानं बदलत जाणारं सामाजिक चित्र ते मन ताळ्यावर आणत होतं..... हिंदीचा लवलेश कुठं दिसत नव्हता. त्याचप्रमाणे हिंदू संस्कृतीही झपाट्याने मागे पडत असल्याचंही जाणवत होतं. खुद्द श्रीनगरमध्ये आलो आणि जम्मूतलं चित्र साफ उलट झाल्याचं मनोमन जाणवलं. इथे तुळशीवृंदावन नव्हतं आणि मंदिराचा कळसही नव्हता. त्याऐवजी मशिदीच दर्शन होतं !......

श्रीनगरात पोचल्यानंतर आम्ही जम्मूहून आणलेल्या टॅक्सीचा निरोप घेऊन स्थानिक टॅक्सीत बसलो आणि श्रीनगरमध्ये मला पहिला धक्का बसला ! आम्हाला जम्मूहून एका हिंदू हॉटेलचा पत्ता मिळाला होता. तिथे टॅक्सी घ्यायला सांगितल्यावर आमचा नवा

टॅक्सी-ड्रायव्हर काही तरी पुटपुटला त्याची भाषा अर्थातच आम्हाला कळली नाही तरी ' इंडियन ' अशा अर्थाचा शब्द ऐकू आला. नतर उघडपणे त्यानं आम्हाला त्या जम्मूहून कळलेल्या हॉटेलविषयी बरच काही उलटसुलट सांगितलं आणि शेवटी टॅक्सी एका भलत्याच हॉटेलपाशी थांबवली आत शिरल्यावर पाहिलं तर ते खास मुसलमानी हॉटेल होतं. तमाशा नको म्हणून आम्ही, मॅनेजरच्या सांगण्याबरहुकूम ॲडव्हान्स देऊन हॉटेलातल्या खोल्यात प्रवेश केला. नंतर मी सहज खोलीबाहेर आलो तो मॅनेजर टॅक्सी-ड्रायव्हरला पैसे देत होता. बहुधा आमच्यासारखं गिऱ्हाईक मिळालं म्हणून टॅक्सी-ड्रायव्हरला दिलेलं ते ' कमिशन ' असावं. नंतर श्रीनगरमध्ये काही ओळखी झाल्यावर कळल की, हे प्रकार नित्याचेच आहेत. ज्या हॉटेलचा जम्मूत पत्ता मिळाला होता त्या हॉटेलच्या मालकानी दुसऱ्या दिवशी सांगितलं की, ' ... .. अशी आमची कित्येक गिऱ्हाइकं, अगदी रिझर्वेशन करून येणारीही, दुसरीकडे नेली जातात ! मग दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी ती आमच्या हॉटेलात पत्ता शोधत शोधत येतात.....पोलिसाची किंवा स्थानिक जनतेची अशा वेळी प्रवाश्याना काहीच मदत मिळत नाही.....'

' .....हे असले प्रकार अलीकडे, गेल्या चार-पाच वर्षांतच फार वाढले आहेत. पूर्वी असं नसायचं. हिंदू-मुसलमान असा भेदही खरं तर काश्मिरी पूर्वी कधी करत नसायचे. दोन्ही जमातीत उत्कृष्ट परस्पर सहकार्य होतं; पण गेल्या चार-पाच वर्षांत परिस्थिती हळूहळू बदलत चालली आहे. मुसलमानांना इथे उघड उघड चिथावणी मिळते. राज्यकर्त्यांची, पोलिसाची साथही त्यानाच मिळते. हे असंच चालू राहिलं तर उरल्या-सुरल्या हिंदूना इथे वावरणं, धंदा करणं अशक्य होऊन जाईल.- इथून आम्हाला पळच काढावा लागेल म्हणा ना ! ......'

## कलम् ३७० आणि काश्मिरी नागरिकत्व

भारतीय संविधानाच्या कलम ३७० मुळे जम्मू–काश्मिर राज्यशासनाला विशेष अधिकार मिळाले आहेत. भारतातर्गत सपूर्ण स्वायत्तता ह्या राज्याला मिळालेली आहे. ह्याची काही वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत–

१) भारताप्रमाणे काश्मिरचीही स्वत.ची अशी स्वतंत्र घटना असून ह्या दोन्ही घटना एकाच वेळी जम्मू-काश्मिरला लागू पडतात.

२) जम्मू–काश्मिरला स्वतंत्र नागरिकत्वाचे नियमही आहेत. त्यानुसार जम्मू–काश्मिरचा प्रत्येक नागरिक हा भारताचाही नागरिक हा हक्काने आहे. पण हयाउलट इतर भारतातला नागरिक काश्मिरचा नागरिक मात्र होऊ शकत नाही. एवढंच नाही तर काश्मिरात वर्षानुवर्ष काढलेला एखादा इसम भारतीय नागरिक असला तरी काश्मिरी नागरिक असेलच असं ठामपणे सागता येत नाही.

३) संरक्षण, परराष्ट्र–व्यवहार आणि दळणवळण ह्या बाबी वगळता इतर सर्व बाबतीत स्वतःचे कायदे करण्याचा, स्वयंनिर्णयाचा सपूर्ण अधिकार राज्यशासनाला देण्यात आलेला आहे.

४) काश्मिरी नागरिकत्वाचेही चार प्रकार आहेत. त्यानुसार इ स. १८४६ पूर्वी काश्मिरात स्थायिक झालेल्याना व त्याच्या वंशजाना प्रथम दर्जाचे नागरिकत्वाचे हक्क बहाल झालेले आहेत.

१८४६ नंतरच्या वीस वर्षांत काश्मिरात येऊन स्थायिक झालेल्याना व त्यांच्या वशजाना दुसरा दर्जा आहे. त्यानंतर येऊन स्थायिक झालेल्यांना व त्या त्या वेळच्या सरकारांनी मान्यता दिलेल्यांना तिसऱ्या व चौथ्या क्रमाकाचं नागरिकत्व मिळालेलं आहे. हे १९२७ साली मंजूर झालेल्या कायद्यानुसार ठरलेलं आहे.

नागरिकत्वाच्या दर्जानुसार शिक्षण, नोकरी, मालमत्ता-खरेदी आदी बाबतीत अग्रक्रम मिळू शकतो.

काश्मिरी नागरिक नसलेल्या कुणालाही काश्मिरात जमीन खरेदी करण्याचा मालकी हक्काचा अधिकार नाही. मग भले तो भारतीय नागरिक असला तरीही !

५) काश्मिर सोडून बाहेर गेलेले नागरिक दोन तपापेक्षा अधिक काळ काश्मिरबाहेरच राहिले तर त्याना काश्मिरी नागरिकत्व गमवावं लागतं. अशा लोकाना परत यायचं झाल्यास त्यांना पुन्हा नागरिकत्वासाठी अर्ज करावा लागतो. ते बहाल करणं, न करण्याचे अधिकार राज्यशासनाकडे राखून ठेवलेले आहेत.

६) लग्न होऊन काश्मिरबाहेर गेलेली काश्मिरी तरुणी नागरिकत्वाचे अधिकार लगेचच गमावते. मात्र परप्रांतातून काश्मिरात लग्न होऊन आलेल्या तरुणीला नागरिकत्वासाठी अर्ज करावा लागतो. असे अर्ज बहुश: नाकारले जातात असंही ह्या संदर्भात कळलं !

७) भारतीय नागरिकाना काश्मिरात शिक्षण, नोकरी आदीलाही मज्जाव आहे !

८) राज्यातर्गत अर्थकारण, व्यवस्थापन, कायदेकानू, विकास आदीबाबत राज्यशासनाला संपूर्ण अधिकार असून राज्याने केलेले कायदे नाकारण्याचा अधिकार केन्द्रसरकारला नाही! एवढंच नाही तर शेख अब्दुल्लाच्या मते, राज्याला लागू करण्यात येणारे कायदे, राज्याच्या स्वायत्ततेच्या आड येत असतील तर ते रद्द करण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे...

आज प. बंगाल, केरळ, तामिळनाडू, ईशान्येकडील राज्ये सर्वांनीच अशा तऱ्हेच्या सपूर्ण स्वायत्ततेची मागणी पुढे केली आहे.

तसं घडलं तर ?...

परवाचंच उदाहरण. कॉलेज-युवतींचा एक ग्रुप सहलीसाठी दिल्लीहून आला होता. त्याना खूपच सोसावं लागलं. इतक की, एक-दोन मुलींना पळवून त्यांची अब्रू लुटण्याचेही प्रयत्न झाले. बिचाऱ्या तरुणींना सहल अर्धवट सोडून दिल्लीला परतावं लागलं ! पोलिसांनी याची सुटका केली हे खरं; पण अत्याचाऱ्यांविरुद्ध त्यांनी कुठलीही कारवाई केली नाही !! हे कुठलं उरलंय आज 'नंदनवन...?'

श्रीनगरमध्ये हिंडताना अशा अनेक घटना ऐकायला मिळाल्या. थोडीबहुत अतिरंजितता कदाचित् असेलही; पण त्यात तथ्याचाही भाग असणारच हे विसरून कसं चालेल ?'

पुनर्वसन विधेयकाचा जेव्हा श्रीनगरात उल्लेख केला तेव्हा अत्यंत अल्पसंख्य असलेल्या हिंदूंनी त्याविषयी चीड, सताप आणि भीतीही व्यक्त केली, तर सर्वसाधारणपणे सर्वसामान्य मुसलमानात ह्या बिलाविषयी खूपच उत्सुकता आढळली, पाठिंबा दिसून आला. कुणी म्हणालं, आमचे सगे-सोयरे आम्हाला भेटतील, तर पुष्कळांचा असा गैरसमजही आढळला की हे विधेयक दोन्ही देशातल्या काश्मिर प्रदेशांचं एकीकरणच घडवून आणणार आहेत ! दिवंगत पंतप्रधान मरहूम शेख अब्दुल्लावर इथल्या लोकांचा मोठा विश्वास आहे. त्यांच्या कारकीर्दीत हे विधेयक पुढं आलं. त्याला त्यांचा पाठिंबा होता त्या अर्थी हे विधेयक काश्मिरच्या हिताचंच असलं पाहिजे असं सर्वसामान्याना वाटतं. त्यांचा हा शेखसाहेबांवरचा विश्वास आणि इस्लामवरील श्रद्धा ह्याच्यातही अतूट असं नातं आहे. त्या दोन्हींना खतपाणी मिळेल अशी काळजी नॅशनल कॉन्फरन्सचे नेते सतत घेत असतात. काश्मिरी मुसलमानांच्या भावना सतत चेतवत राहिल्याने निवडणुकीत त्यांचा फायदा होतो हेही कॉन्फरन्सचे नेते ओळखतात. त्यामुळे कॉन्फरन्सची पावलं साधारणत. ह्याच दिशेनं पडतात हं विधेयकही असंच मुसलमानाना खूष करण्यासाठी आहे असं त्यामुळंच प्राय: सर्वत्र बोललं जातं आणि म्हणूनच मुस्लिमलीग, लिबरेशन फ्रंट आदी तथाकथित कॉन्फरन्स विरोधकांचा ह्या विधेयकाला मात्र अजिबात विरोध नसतो. किंबहुना हे विधेयक, त्यातल्या तरतुदी नि नेहमीची काश्मिर सरकारची धोरणं सौम्य असतात असंच ह्या नेत्यांचं म्हणणं असतं.

'...... हिंदु हिंदुस्थानाकडून मुस्लिम काश्मिरवर सतत अन्याय होत असतो. काश्मिरमधलं आजचं लोकसंख्येचं गणित 'हिंदू' हिंदुस्थानला बदलायचं आहे ह्याच स्पष्ट दिग्दर्शन १९५३ नंतर हिंदुस्थानानं काश्मिरवर जे अनेक हिंदी कायदे लादले त्यात होऊ शकेल . ..' असं सांगून लिबरेशन फ्रंटचे सवकुछ असलेले वयोवृद्ध नेते सुफी मोहम्मद पुढे म्हणतात, '.. . ह्या ठिकाणी महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, नेहरू-शेख अब्दुल्ला करारातल्या सर्व कलमांना हिंदुस्थान सरकारनं हरताळ फासला आहे. काश्मिरात सार्वमत घ्यायचं नेहरूंनी मान्य केलं होतं. ते पाळलं गेलेलं नाही. काश्मिरला संपूर्ण स्वायत्ततेचा खास दर्जा देऊन हिंदुस्थान पाकिस्तान ह्यांच्या बरोबरीचं स्थान मिळेल, इथला शासनप्रमुख सर्व स्थानिक राज्यकारभाराबाबत सार्वभौम पंतप्रधान असेल. ह्याही आश्वासनाला हरताळ फासला गेला. त्याचबरोबर काश्मिरीच्या स्वयंनिर्णयावर प्रतिबंध आणणारे अनेक कायदेही काश्मिरवर सातत्याने लादले गेले आणि काश्मिरची स्वतंत्र प्रतिमा जगाच्या मनातून पुसून टाकण्याचेच प्रकार हिंदुस्थान सरकार करीत आहे.

'.. ..पूर्वी हरिसिंग, गुलाबसिंग आदी हिंदू राजाच्या कारकीर्दीत काश्मिरात इथल्या महत्त्वाच्या अशा मुसलमान जमातीवर अनन्वित अत्याचार झाले जम्मू प्रांतात ह्या राजाच्या दबावामुळं मुसलमान अल्पसंख्य झाले. तेच धोरण या राजांनी काश्मिरातही अवलंबायचा प्रयत्न केला. आज हिंदुस्थानातलं सरकारही सेक्युलरवादाच्या नावाखाली हाच अत्याचार इथल्या मुसलमानावर पुढेही करत आहे .....'

लिबरेशन फ्रंटच्या नेत्याच्या ह्या उद्गारात आणि अलीकडल्या काळात पै. शेख अब्दुल्लानी, 'केन्द्रस्थानी सत्तेवर असलेल्या उत्तर भारतीय हिंदू जातीयवाद्याविरुद्ध' चढवलेल्या हल्ल्यात खूपच साम्य आहे अशीच काहीशी गत मुस्लिम लीगच्याबरोबर कॉन्फरन्सच्या असलेल्या संबंधाची आहे. जमाते इस्लामीचे नेते उघड काही बोलत नाहीत; पण त्यांचाही असाच कॉन्फरन्सला पाठिंबा आहे हे मात्र कॉन्फरन्स त्यांच्या अनेक कृत्यांवर वेळोवेळी जे पांघरूण घालतं त्यावरून लक्षात येऊ शकतं... इथं असंही म्हटलं जातं की, काश्मिर खोऱ्यात मधनमधनं ज्या 'पाकिस्तान झिंदाबाद', 'अल्ला हो अकबर', 'आझाद काश्मिर यही हमारा नारा' सारख्या घोषणा उठतात त्यामागेदेखील प्रत्यक्षात सत्ताधारी पक्षाचीच प्रेरणा असते...आणि जेव्हा कॉन्फरन्सच्या नेत्याशी श्रीनगरमध्ये माझ्या गप्पा झाल्या तेव्हा, सरकारी सावधानतेचा बुरखा गळून पडून कॉन्फरन्सवाले बोलत असलेले मला जाणवले...त्या सर्व नेत्यांचा सूर काहीसा असाच होता की, 'हे विधेयक आज आवश्यक असंच आहे. मुसलमानावर इथे सातत्यानं अत्याचार होत आले आहेत. हिंदुस्थान सरकार सतत, काश्मिर साधारणत: हिंदू तीर्थक्षेत्रच बनवण्याच्या दृष्टीनं पावलं टाकत आले आहे आणि एकूण पावलं अशी पडत आहेत की, ३७० कलम रद्द करून काश्मिर हा एक भारतातला सर्वसामान्य प्रांत बनवून टाकायचा. भारताच्या इतर प्रांतातल्या लोकाना काश्मिरात पाठवायचं आणि इथली स्वतंत्र काश्मिरी व बरीचशी इस्लामिक संस्कृती नष्ट करायची !...'

कॉन्फरन्सचं हे मत प्रामुख्यानं तिथले सध्याचे सभापती व ह्या विधेयकाचे मूळ प्रवर्तक श्री. राथार ह्यांच्या एका पुस्तिकेतून फार स्पष्ट होत ..

जनाब अब्दुर राथार ह्यांचं हे पुस्तकच नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यालयात मला देण्यात आलं आणि सांगितलं गेलं, '...विधेयकाची संपूर्ण पार्श्वभूमी ह्या पुस्तिकेत सापडेल. काश्मिरचा इतिहास सापडेल. ...ह्या इतिहासावरनं तुम्हालाही हे पटेल की काश्मिरात मुसलमानाची खच्ची करण्याचे सातत्याने प्रयत्न झाले आहेत. 'खूनका रिस्ता' असलेल्याना एकमेकांपासून अलग करण्यात आलं आहे. मायभूमीपासून तोडण्यात आलं आहे . त्याना आज न्याय मिळवून द्यायचा आमचा प्रयत्न आहे. अन्यायाचं परिमार्जन करण्याची धडपड आहे..

## सावधानतेचा बुरखा जेव्हा गळून पडतो...

राथारसाहेबांच्या पुस्तकातलं प्रत्येक वाक्य, संपूर्ण विचार म्हणजे नॅशनल कॉन्फरन्सची अधिकृत भूमिका नसली, तरी ते बहुतांशी एक-मेकांशी जुळणारे आहेत...'

## मुंबईतील प्रतिक्रिया

जनावसाहेबांची ही छोटीशी पुस्तिका उर्दूत आ                 ।
काही उर्दू जाणणाऱ्या मित्राना मी ती पुस्तिका दाखवली तेव्हा त्यानी सागितलं की, लेखकाचं भाषेवर चागलं प्रभुत्व आहे. स्वत: राथारसाहेब उच्चशिक्षित आहेत. थोडेफार पत्रकारही आहेत. त्यांनी हृया पुस्तिकेत जालंधर, लाहोर आदी ठिकाणाहून त्या काळी प्रसिद्ध होणाऱ्या 'मिलाप' वगैरे उर्दू वृत्तपत्रातल्या वृत्ताचा, लिखाणाचा, मताचा आधार घेतला आहे व त्यांच्या आधारावर काही निष्कर्ष काढले आहेत. हृया पुस्तकाचा सपूर्ण परामर्श घ्यायचा तर त्यासाठी खास वेगळा लेखनप्रपच मांडावा लागेल! पण तो मोह मी इथे आवरत आहे. ते पुस्तक मुबईत दाखवल्यावर आमच्या काही मित्रांनी काढलेले उद्‌गार त्या पुस्तकाची प्रक्षोभकता पटवून देऊ शकतील. त्यांच्या मते, '...काश्मिरात हे बोलणं ठीक आहे. तिथे मुसलमान बहुसंख्य आहेत...पण इथे हे पुस्तक वाचतानादेखील थरथरायला होतं आहे.. हृयातनं जे जातीय विष ओकलं आहे त्यामुळं इतरत्र मात्र मुसलमानांना कमालीचा त्रास होऊ शकेल...काश्मिरात मुसलमान समाजाच्या भावना भडकावण्यासाठी मात्र ह्या पुस्तिकेचा फार चांगला उपयोग होऊ शकेल! ...'

हृया कारणानीच हृया पुस्तिकेचा संपूर्ण परामर्श घेतला नाही तरी त्यात दिलेल्या काही मुद्‌द्याना मात्र मी इथे स्पर्श करणार आहे...

उर्दू वृत्तपत्रातल्या बातम्याचा हवाला देऊन लेखक पुस्तिकेत असं दाखवतो की, 'जम्मू-काश्मिर प्रात हा पूर्वी संपूर्ण मुसलमान होता. (फार पुरातन काळी नसेलही कदाचित्!) पुढे काश्मिरवर आक्रमणं करून काश्मिर पादाक्रांत करणाऱ्या हिंदू राजानी, इथली शांतता तर कायमची नाहीशी करून टाकलीच; पण इथल्या स्थानिक व वंशपरंपरागत इस्लामिक जनतेवरही ह्या राजानी अत्याचार केले. काश्मिरी हा तसा शांतताप्रिय; पण त्याच्यावर हिंसा लादली ती हृया हिंदू राजानी! तसं करण्याचं कारणही उघड होतं. जम्मू-काश्मिरात हिंदू बहुसंख्य करणं! त्यासाठी अनेक कारस्थानं काश्मिरात झाली. हिंदूना मोठ्या प्रमाणावर इथे आणून वसवण्यात आलं. सैन्यदलं, इतर मुलकी नोकऱ्या, शिक्षणसस्था–वगैरे प्रत्येक क्षेत्रात बाहेरून आलेल्या हिंदूनाच फक्त नोकऱ्या दिल्या गेल्या...एवढ्यावरच जातीय हिंदू राजाचं समाधान झालं नाही. अनेक मुसलमानाना पोत्यात भरभरून जेहलममध्ये हृया हिंदू राजांनी बुडवून टाकलं. जेहलम हृया इस्लामिक बाधवाच्या रक्तानं त्यांनी रंगवून टाकली... हृया अत्याचाराची धास्ती घेऊन अनेकानी आपली प्रिय मायभूमी सोडून इतरत्र धाव घेतली तिथं हिंदूना वसवलं गेलं.. अशा पद्धतीनं जम्मू प्रात हिंदू राजानी झपाट्यानं हिंदू केला. पुढे त्याची नजर काश्मिरवर होती. ते सत्तास्थानी असते तर त्यानी तेही केलं असतं...

...शेख अब्दुल्लाच्या चळवळीनी आम्ही आणि काश्मिर वाचलो. त्यांनी राजेशाहीविरुद्ध उभारलेल्या लोकशाही चळवळीला भारतातल्या राष्ट्रीय कॉंग्रेसचाही पाठिबा मिळाला आणि इथे एक लक्षात घेतलं पाहिजे की, शेखसाहेबानी उभ्या केलेल्या चळवळीत त्यानी इथल्या शीख, हिंदू वगैरे सर्वांना सामावून घ्यायचा प्रयत्न केला होता...इतिहासाचा मागोवा घेतला तर असं लक्षात येईल की, शेखसाहेबाच्या चळवळीपासून हिंदू जम्मू प्रात व तिथला हिंदू काहीसा अलिप्तच राहिला. नेहरूंचा व त्याच्या कॉंग्रेसचा पाठिबा असूनही. त्यामुळं काश्मिरातली स्वातंत्र्याची चळवळ प्रामुख्यानं मुसलमान आणि शिखानीच पुढं चालवली. तेच दोघे स्वातंत्र्यासाठी लढले. त्यानीच छातीची ढाल करून, प्रसंगी रक्त साडूनही, काश्मिरला स्वातंत्र्य मिळवून दिलं! त्याही वेळी काश्मिरमध्ये मुसलमान बहुसंख्य होते. मुस्लिम पाकिस्तान त्या वेळी काश्मिरला पाकिस्तानात सामील व्हायला सांगत होता, विनवीत होता. शेखसाहेबानी, (त्यांना त्या काळी मिळालेल्या मोठ्या जनमान्यतेचा आधार होता!) मनात आणलं असतं तर काश्मिर पाकिस्तानचा भाग केव्हाही बनू शकला असता; पण पं. नेहरूंच्या भारतानं 'निधर्मी' राज्याची शपथ घेतल्याच पाहून व नेहरू आणि भारताविषयी असलेली निष्ठा हृयामुळं शेखसाहेबांनी मुस्लिम पाकिस्तानला अव्हेरलं! भारतात सामील व्हायचा निर्णय घेतला आणि तो अंमलातही आणला! ..

'...स्वातंत्र्यलढयातल्या हृया त्यागाच, भारतात सामील

## भ्रष्टाचाराचे बळी

डॉ. फारुख अब्दुल्ला आपल्या वडिलाच्या पुण्याईवर आज मुख्यमंत्री झालेले आहेत. इंदिराजीचा आशीर्वादही आहेच! राजकीय स्वार्थासाठी म्हणून असेल, पण ते आजही शेखसाहेबाचं गुणगान करत असतात. इंदिराजीना मातेसमान मानतात!

मात्र प्रत्यक्ष कृती करताना शेखसाहेबाच्या गेल्या सहा वर्षांच्या कारकीर्दीवर ते सडकून टीका करतात. विशेषत: त्याचा भडिमार असतो प्रामुख्याने नोकरशाहीवर. ही नोकरशाही आज खिळखिळी करून तिची पुनर्रचना करण्याचं काम त्यानी हाती घेतल आहे. त्यानुसार अनेक अधिकाऱ्याच्या बदल्या, कुणाला डच्चू इत्यादी प्रकार त्यांनी अवलंबले आहेत त्याच्या मते गेल्या सहा वर्षात पिताजीनी उदारमतवादी धोरण अवलबिल्यामुळं प्रशासनात गलथानपणा, भ्रष्टाचार बोकाळला आहे. त्यामुळं संपूर्ण प्रशासन धुऊन निघायला हवं आहे असंही ते अनेकदा सांगतात ..

असं म्हणतात त्याच्या या धोरणाचे बळी ठरताहेत, बहुतेक फक्त हिंदू अधिकारीच! ...

भ्रष्टाचाराविरुद्धच्या मोहिमेतून न्यायाधीश, वकील कुणीही सुटलेले नाहीत. एकही न्यायाधीश किंवा वकील स्वच्छ नाही. सगळे भ्रष्टाचारी, लाचखाऊ असा उघड आरोपही त्यांनी जाहीर भाषणातून केला आहे ..

त्यातूनच आज एका प्रथितयश वकिलांनी मुख्यमंत्र्यावर 'अब्रू नुकसानी'चा दावा लावला आहे... ◻

।। सत्फलाय सहकारिता ।।

# द वाई अर्बन को-ऑप. बँक लि०, वाई

मुख्य कार्यालय : ५९१ गणपतीआळी, वाई ( सातारा )

शाखा कार्यालय : डॉ. बिलिमोरिया रोड, पांचगणी

स्थापना : १९२१

ऑडिटवर्ग ' अ '

दूरध्वनी : वाई : ७

पांचगणी : २२०

* सातारा जिल्ह्यातील प्रमुख नागरी सहकारी बँक !
* ठेवींना विम्याचे संरक्षण !
* ठेवींवर आकर्षक व्याजदर !
* सुलभ हप्त्यांची हायर परचेस योजना !

| ठेवी रु. | कर्जे रु. | खेळते भांडवल रु. |
|---|---|---|
| १७० लाख | ११५ लाख | २२० लाख |

मुदत ठेवींवरील व्याज दर ( द. सा. द. शे. )

| १ वर्ष | २ वर्षे | ३ वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|
| रु. ९% | रु. १०% | रु. ११% | रु. १२% |

८५ महिन्यांत दामदीडपट; तर

७२ महिन्यांत दुप्पटीहून अधिक रक्कम घ्या !

प. कृ. अभ्यंकर B. Com., LL. B.
व्यवस्थापक

द. न. पटवर्धन
चेअरमन

: संचालक मंडळ :

सि. ना. जोशी
ह. द. बनारसे
डॉ. श्री. द. देशपांडे
कृ. ना. शिंदे
पा. स. ओसवाल
भ. दा. शहा
अ. रा. शेवडे
स. वा. शेंडे

व्हायच्या निर्णयाच कोणत बक्षीस काश्मिरी मुसलमानाना मिळाव? स्वातंत्र्यानंतर दोन्ही देशात उठलेल्या प्रचड जातीय दंगलीची झळ काश्मिरलाही लागली. काश्मिर हिंदुस्थानात राहणार म्हणून इथल्या मुसलमान-हिंदू जमातीत तणाव येणार नाहीत अस वाटलं होतं; पण हिंदूनी जम्मूत मुसलमानावर अनन्वित अत्याचार करायला सुरवात केली. त्याची घरं, वस्त्या पेटवून द्यायला सुरवात केली. त्यामुळ अगदी पूर्वीच्या हिंदू राजांच्या कृत्याचीच आठवण झाली. अनेक मुस्लिमांना त्या अत्याचारांमुळ पाकिस्तानात आश्रय घेण्यावाचून गत्यतरच उरल नाही. त्यामुळं असंख्य कुटुंबामध्ये अत्यंत हृदयस्पर्शी परिस्थिती निर्माण झाली. एक भाऊ काश्मिरात तर दुसरा लाहोरला. वडील श्रीनगरमध्ये तर त्याची लाडकी पत्नी, मुलगी पाकिस्तानात! ही ताटातूट, हा मनस्ताप, हे अत्याचार-स्वातंत्र्यासाठी, भारतात सामील व्हायच्या निर्णयासाठी मोजलेली ही किंमत होती!

... स्व. नेहरू खरोखरच थोर होते. त्यांच्या काळात शेखसाहेबांबरोबर झालेल्या बोलण्यातून अशा स्थलांतरिताना परत आणण्याचे उभयपक्षी ठरले होते ... पण नेहरूंबरोबरच्या, हिंदुस्थानातल्या बाकीच्यांची दृष्टी एवढी उदार नव्हती...त्यामुळंच शेखना सत्ताभ्रष्ट करून हिंदुस्थानातल्या जातीय नेत्यांनी पुन्हा काश्मिरवरील अत्याचार सुरू केले. त्यात त्यांनी नेहरूंनी दिलेल्या सर्व आश्वासनांना हरताळ फासला...काश्मिरची स्वायत्तता हिरावून घेऊन, काश्मिर खोऱ्यातली हिंदूंची बहुसंख्या वाढवून, इथली इस्लामिक संस्कृती मिटवून टाकायच्या योजना आखल्या...मुसलमान आणि शिखांनी इथे खस्ता काढल्या. त्या वेळी हिंदू स्वातंत्र्यलढयाच्या आसपासही फिरकले नाहीत. आता स्वातंत्र्यानंतर मात्र फळे चाखण्यासाठी हिंदू पुढे सरसावले आहेत. नुसते पुढे सरसावले आहेत असं नाही, तर मुसलमान आणि शिखांना फळावरील न्याय्य हक्क डावलून टाकण्यासाठीही ते प्रयत्नशील आहेत....

'...ह्या पार्श्वभूमीवर हे विधेयक आहे. आमच्या दुरावलेल्या जिवाभावाच्या आप्तेष्टांना परत आणण्यासाठी आणि इथलं सामाजिक संतुलन आज आहे तसं टिकविण्यासाठी! पिढ्यान्‌पिढ्या काश्मिरींवर (मुसलमानावर!) झालेल्या अन्यायाला धुऊन काढण्यासाठी. ह्यात काश्मिरचं राष्ट्रीय हितच डोळ्यांसमोर ठेवलं गेलं आहे. इतरांप्रमाणे, बिगरमुसलमानांवर अन्याय करण्याचा किंवा इतर कुठलाही जातीय मानस त्यात नाही...'

जनाब अब्दुल राथार ह्यानीच हे विधेयक विधानसभेत मांडलं. त्यामुळं त्यानी ह्या विधेयकाची तरफदारी करणारी पुस्तिका काढली. त्यात आपले विचार मांडले. त्यात व सत्ताधारी पक्षाच्या विचारसरणीत तशी फार मोठी तफावत नाही, असं त्या पक्षाचे नेतेही मानतात आणि आता तर राथारसाहेब विधानसभेचे सभापतीही झाले आहेत...त्यामुळंच त्याच्या विचारांना खूपच महत्त्व प्राप्त होतं....

हे विचार, मुख्यमंत्री व इतर शासकीय प्रतिनिधींनी घेतलेल्या सरकारी भूमिकेशी ताडून पाहिले तर एक गोष्ट चटकन् लक्षात येते.


ठाणे शहरांतील अग्रगण्य बँक!

**ठाणे जनता सहकारी बँक लि.,**

**दीनदयाळ भवन, ठाणे ४०० ६०१**

★ तीन शाखांसह सदैव सेवेत!

★ हक्काची सेवा व आपुलकीची वागणूक.

★ दहा वर्षांत ६॥ कोटीपर्यंत ठेवी.

★ सामाजिक जीवनात सहभाग.

शाखा

| मुख्य शाखा | : नौपाडा शाखा : | औद्योगिक शाखा |
|---|---|---|
| दीनदयाळ भवन, | संजीवनी, गोखले पथ, | टीएम्‌ए हाउस, |
| ठाणे–१, | ठाणे–२ | ठाणे–४ |

नौपाडा शाखेचा बचत विभाग : सम्राट, घंटाळी, ठाणे

## Amal Electrocrafts

*Manufacturers of*

**Offset Print-aid &**
**Process Equipments**

A/5, Sriram Industrial Estate,
G. D. Ambekar Road,
Wadala, Bombay 400 031.

Phone : 88 27 458

*With Best Compliments From :*

## Modern Technical Centre

**144 Narayan Peth,**
**Pune 411 030**

**Phone : 44 26 20, 44 65 03**

*Exporters & Manufactures of*

R. C. C. Spun Pipes &
P. C. C. Poles Manufacturing
Machinery & Moulds
Conductor of Technical Courses
with Production Section,

## जॉली ऑफसेट

**फोटो ऑफसेट प्रिंटर्स**

१४, वडाळा उद्योग भवन, वडाळा
मुंबई ४०० ०३१

फोन : ८८२९३७४

शासनाचा प्रचार चालतो तेवढा साधा आशय ह्या विधेयकाचा नाही. पाकिस्तानातल्या कैदेत खितपत पडलेल्या काश्मिरीना फक्त परत आणण्यापुरतं ते मर्यादित नाही ! दुसरं म्हणजे ह्या विधेयकामार्फत व त्याची पार्श्वभूमी सांगताना 'इस्लाम खतरेमें' अशासारखा आभास निर्माण करून सत्ताधारी मंडळींनी काश्मिरातल्या मुसलमानाच्या भावना भडकवण्याचाच प्रयत्न केलेला आहे...त्याचबरोबर शिखांना चुचकारून त्यांना हिंदूपासून अलग पाडण्याचाही प्रयत्न ह्या पुस्तिकेद्वारे करण्यात आला आहे. त्या संदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अमृतसरच्या भेटी आठवतात. जामा मशिदीचे शाही इमाम ह्यांना गोवून मुसलमान, शीख ह्यांच्यासह सर्व अल्पसंख्यांकांना एकत्र आणून हिंदू-बहुसंख्यांकाविरुद्ध कृतीच्या प्रयत्नाचीही आठवण होते... ह्यामुळेच हे केवळ 'राजकीय स्टंट' आहेत ही विचारसरणी पूर्णपणे पटत नाही. ह्या विधेयकाचा तात्कालिक राजकीय फायदा नॅशनल कॉन्फरन्सला मिळून आगामी निवडणुकीत त्यांना यश मिळेल ह्यात वाद नाही; पण तेवढं मर्यादित उद्दिष्ट ह्या विधेयकाचं नाही. संघबंदीचंही नाही निदान संघ-भाजपाला तरी तसं वाटतं आणि ह्या मताशी सहमत व्हायला मलाही हरकत नाही. इंदिराजी, त्यांचं सरकार आणि राज्यपाल नेहरू ह्यांनाही बहुधा असं वाटत नसावं. त्यांना या विधेयकात मोठाले धोके वाटतात ...

## जनजीवन आणि खोमेनी

श्रीनगरमध्ये एका शास्त्राच्या प्राध्यापकाकडे जायचा योग आला. त्यांच्या घरी मी जाण्याआधी ते माझ्या ओळखीच्या हिंदू गृहस्थाकडे आले होते पूजेनिमित्त झालेल्या पानसुपारीसाठी. '...असे कित्येक किस्से तुम्हाला काश्मिरात आढळतील. शेजारीशेजारी असलेले हिंदू-मुसलमान एकमेकाकडे उठता-बसताना, गप्पा मारताना दिसतील. एकमेकासाठी धडपडताना दिसतील. ईदच्या वेळी त्यांच्या घरातल्या तयारीसाठी आमच्या घरातले लोक राबताना दिसतील, तर दिवाळीला मुसलमान आमच्या घरात सरमिसळून गेलेले दिसतील... आणि एकूण सर्वसामान्यांना वास्तवात ह्या विलात फारसं स्वारस्यही नाही...पण मुसलमान हा जात्याच आपल्यापेक्षा थोडा अधिक कडवा असतो. 'इस्लाम खतरे में'सारखी आवई कुठे उठली की त्याची धर्मभावना उफाळून येते !

माझ्या श्रीनगरमध्ये झालेल्या 'धर' नावाच्या हिंदू मित्राच्या ह्या उद्‌गारांना मुसलमान प्राध्यापकांनी मनःपूर्वक दुजोरा दिला. त्यांच्याकडे नंतरच्या दिवशी गप्पा रंगल्या तेव्हा ते म्हणाले, '...आज ह्या सगळ्या लोकांच्या डोक्यात अयातोल्ला खोमेनी घुसलेले आहेत. 'पॅन इस्लामिक'च ही मंडळी स्वप्न बघताहेत आणि त्यासाठी त्यांना म. पैगंबरकालीन सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक व्यवस्थांचं पुनरुज्जीवन करायचं आहे भारतातली 'सेक्युलर' वादाची कल्पना राजकारणाच्या सोयीपलीकडे म्हणूनच ह्यांना मानवणार नाही. दारिद्र्यात खितपत ठेवल्या गेलेल्या सामान्य मुसलमानांना तर ती अजिबात पटणार नाही. रोजचा व्यवहार म्हणून ते हिंदूशी ह्या देशात सरळ वागतील; पण जेव्हा धार्मिक भावनेतून त्यांना हाक घातली जाते तेव्हा ते शेजारी म्हणून असलेले संबंध, रोजचा व्यवहार-सगळं काही विसरतात !...त्यांचं योग्य प्रशिक्षण, त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणं हा एकमेव उपाय ह्या सर्वसामान्य मुसलमानांना एकूण राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्याचा आहे; पण खोमेनीप्रमाणे इथले सत्ताधारीही राजकीय स्वार्थासाठी हे होऊ देणार नाहीत ! उलट कुराण, कुराणातले कायदे ह्यांचच शिक्षण अधिक कर्मठ करून ते ह्या सामान्य लोकांना भडकवतच ठेवतील ! राष्ट्रीय प्रवाहापासून अलगच ठेवतील, त्यातच त्यांची सत्ता अबाधित राहील ! ...'

मला वाटतं प्राध्यापकसाहेबांच हे मत आजच्या काश्मिरी परिस्थितीचं चपखल वर्णन करतं; पण त्यातनं काही धोके संभवतात. मुसलमानांना व खरं तर सर्वच अल्पसंख्यांकांना राष्ट्रीय प्रवाहापासून दूर ठेवून, त्यांच्या प्रश्नांचं भांडवल करून, त्यांच्या मतांचा जोगवा मागायचा उद्योग बहुतेक सर्वच पक्षांनी ह्या देशात केलेला आहे. कॉन्फरन्सही त्याला अपवाद नाही; पण कॉन्फरन्स हा उद्योग करतं ते मुस्लिम बहुसंख्य असलेल्या राज्यात ! तिथे मुसलमानांना अलग राखणं, त्यांच्या धार्मिक भावनांना आवाहन करणं वगैरे गोष्टींनी परिस्थिती उलट बिघडते. त्यातून 'इस्लाम सर्व एक' ह्या भावनेलाही तिथे खतपाणी मिळतं आणि म्हणूनच भारतात राहूनही भुत्तोच्या हत्येनंतर पाकिस्तानपेक्षा तीव्र प्रतिक्रिया काश्मिर खोऱ्यात व्यक्त होते. पाकिस्तानाच्या विजयावर जल्लोश साजरा होतो, तर पाकिस्तानच्या भारतानं केलेल्या कुठल्याही पराभवानं खोरं खट्टू होतं ! इंडोनेशिया संपूर्ण इस्लामिक राष्ट्र आहे. तसंच इराक किंवा इजिप्त किंवा इतर अनेक; पण ह्या इस्लामिक राष्ट्रांमध्ये धर्मापेक्षा राष्ट्रहित महत्त्वाचं मानलं जातं. भारतात मात्र असं घडत नाही !

भारतातही राष्ट्रीय मुसलमानांची संख्या कमी नाही; पण दुर्दैवानं अशा लोकांना राष्ट्रीय नेतृत्वानं फारसं जवळ केलं नाही. एरवी महम्मदअली जीना पुढे आले नसते. फाळणीचाही प्रश्न कदाचित पुढे आला नसता. स्वातंत्र्योत्तर काळातदेखील छागलांसारख्या राष्ट्रीय वृत्तीच्या व्यक्तींला मुसलमानांचं राजकारण खेळताना फारसं महत्त्व दिलं गेलं नाही. छागला, स्व. मौलाना आझाद, काँग्रेसचे सादिक अली, आजचे उपराष्ट्रपती ही मंडळी शंकातीतरीत्या राष्ट्रीय बाण्याची आहेत. तसा तो राष्ट्रीय बाणा जपताना ह्या नेत्यांनी व्यक्तिगत जीवनात स्वधर्मही जोपासला. किंबहुना धर्म सोडावा असं कुणीच म्हणणार नाही. व्यक्तिगत जीवन स्वतःच्या धार्मिक श्रद्धांच्या आधारे माणसानं अवश्य गुजरावं; पण राष्ट्र आणि धर्म ह्यांच्यात झगडा आल्यास राष्ट्रहिताला प्राधान्य देणं हे प्रत्येकाचं कर्तव्यच ठरावं...

दुर्दैवानं ह्या गोष्टींची पुरेशी जाण आपल्याकडे कुठल्याही समाजात निर्माण करण्यात इथले पुढारी यशस्वी झालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे स्वातंत्र्यपूर्व काळात दादाभाई-टिळकांपासून, मौलाना आझाद-गफारखानापर्यंत व विशेषतः गांधीनीही संपूर्ण देशात

**एरवी एकमेकांत सरमिसळून राहणारे 'इस्लाम खतरे में'चा नारा उठल्यावर...**


क्रांतिकारक एकात्म राष्ट्रीय वातावरण तयार केलेलं होतं. स्वातंत्र्याच्या ऐनवेदीवर ही एकात्मता तुटली. भारताचे तुकडे झाले आणि स्वातंत्र्योत्तर काळात ही एकात्मता शब्दांपलीकडे पोहोचूच शकली नाही. आधी म्हटल्याप्रमाणे मतांच्या जोगव्यासाठी किंबहुना प्रत्येक जातीच्या, जमातीच्या, धर्माच्या स्वतंत्र अस्मिता जागृत ठेवण्याचा, प्रसंगी त्याला फुंकरण्याचा प्रकार घडत आला नि त्याची परिणती आज देशभर दिसत आहे......

### इस्लामिक बाँब

पण ह्या साऱ्या गोष्टी आज वेगळ्या थराला पोचल्या आहेत. विशेषतः काश्मिर खोऱ्यात फुटीरतेचा आवाज वारंवार निघतो आहे. तिकडे शेख अब्दुल्लांपासून आजतागायत, काँग्रेससह सर्वच मंत्रिमंडळींनी ह्या आवाजावर अंकुश ठेवण्याऐवजी किंवा आवाज उठणार नाही अशा पद्धतीने तिथल्या मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याऐवजी, ह्या आवाजाचा फायदाच उठवला. केंद्राकडून प्रत्येक वेळी मदत वाढवून घेतली. एवढंच नाही तर शेख अब्दुल्ला, बेग, कॉन्फरन्सचे इतर नेते, त्यातल्याच काहींनी सुरू केलेली लिबरेशन फ्रंट, ह्या सर्वांनी वेळोवेळी काश्मिरात सार्वमत होण्याच्या प्रश्नाचं तुणतुणंही चालूच ठेवलं तर जमाते इस्लामी, तुलबा, काश्मिर मुस्लिम लीग ह्यांनी उघड-उघड पाकिस्तानच्या बाजूनं आवाज उठवले. खुद्द पाकिस्तान सरकारनं हा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर सारखा पुन्हा पुन्हा काढला. ह्या प्रश्नाचं पाकिस्ताननं वेळोवेळी भांडवल केलेलं आहे. १९४८ साली सुरुवातीलाच पाकिस्तानच्या सहकार्यानं टोळीवाल्यांनी काश्मिरवर हल्ला चढवला. त्यातून 'आझाद काश्मिर' निर्माण झालं. ही डोकेदुखी आजही सुरू आहे!

आंतरराष्ट्रीय इस्लामी चळवळीलाही सध्या जोर चढलेला आहे. सनातनी इस्लामचं पुनरुज्जीवन करून कुराणात सांगितलेली ती पुरातन जीवनपद्धती, राजकीय पद्धती पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न इस्लामी जगतात सुरू आहेत. इराणमध्ये खोमेनी ह्यांनी हा प्रकार सुरू केलेला आहे आणि इराणच्या धार्मिक शुद्धीकरणात हजारोंचा बळी एव्हाना गेलेला आहे! 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल' ह्या संस्थेच्या आवाहनानुसार ह्या बिगरमुसलमानांच्या इराणातल्या हत्येचा आकडा वीस हजारावर आहे! इस्लामी पुनरुत्थानाची ही प्रक्रिया हळूहळू सर्वत्र सुरू आहे आणि पाकिस्तानात झियांनीही त्याच दिशेनं पावलं टाकायला सुरुवात केली आहे. इस्लामिक बॉम्ब ही त्याची पुढची पायरी आहे आणि त्या कल्पनेने अनेक काश्मिरी हुरळून जाताना मी श्रीनगरच्या मुलुखात बघितलेले आहेत.

अशा पार्श्वभूमीवर आज हे पुनर्वसन-विधेयक आणि संघबंदी येत आहे. पार्श्वभूमी स्फोटक आहे. त्यात पाकिस्तानसारख्या परराष्ट्राचा संबंध आहे. पाकिस्तानची निर्मिती हिंदू विद्वेषातून झालेली आहे. तो विद्वेष त्यांनी जोपासला आहे. तीन वेळा त्यातून ह्या देशावर आक्रमणं झालेली आहेत. काश्मिर आजही त्यांना प्रतिष्ठेचा प्रश्न वाटतो आणि अजूनही, पाकिस्तानातल्या काश्मिरी मुसलमानांना आपण भारतात बोलावून घेत आहोत. आमंत्रण देऊन! त्यातून पाकिस्तान किती गनिमांना काश्मिरात घुसवू शकेल ह्याचा अंदाज ज्याचा त्याने करायला हरकत नाही. एरवीही अनेक गनिम काश्मि-

सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध

रात पाकिस्तान पाठवत असतं. १९४८ साली उघडउघड गनिम पाठवून पाकिस्तानने हल्ला चढवला. आता त्याना उघडपणे कायदेशीररीत्या अनेक पाकिस्तानी काश्मिरात पाठवायची संधी मिळत असता तिचा फायदा पाकिस्तान उचलणार नाही हे कसं शक्य नाही? अशा पाकिस्तान्याच्या स्वागतासाठी अनेक काश्मिरी मुसलमान काश्मिरात सिद्धही आहेत आणि वेळ पडल्यास पैसा पुरवायला 'पॅन इस्लामिक' तयार आहे .....त्यात भर पडते ती राथार ह्यांच्या पुस्तिकेतून व्यक्त झालेल्या नॅशनल कॉन्फरन्सच्या विचाराची. यामुळे प्रकरणाची गभीरता अधिकच वाढते. त्याला प्रभावी विरोध करू शकेल तो फक्त रा. स्व. संघ! त्याच्यावरील बंदीची घोषणा म्हणूनच प्रश्नाचं गाभीर्य आणखी वाढते......वास्तवात संघानं राष्ट्रविरोधी, काश्मिरविरोधी किंवा जातीय भावना भडकावणारंही कुठलंच कृत्य काश्मिरात केलेलं नाही याची ग्वाही काँग्रेससह सर्व संघविरोधी काश्मिरात देतात मग ही बंदी का? केवळ इंदिराजीना खूष करण्यासाठी? पण त्यानाही ही बदी नको आहे. मग उरतो तो खूष होणारा गट म्हणजे मुसलमान! थोडक्यात, संघ नव्हे, फारुख अब्दुल्लाचंच जातीय राजकारण आज चालू आहे बुरखा मात्र निधर्मीपणाचा फारुखसाहेब उत्तम घेत आहेत!

त्यात पुन्हा फारुख अब्दुल्ला, राथार आणि अन्य कॉन्फरन्समंडळी आज पंजाबात उठलेल्या हिंदू–शीख वादाचा फायदा उचलून शिखांना हिंदूविरुद्ध चिथावू पहात आहेत, शीख–मुसलमान ऐक्याच्या घोषणा करीत आहेत.

म्हणूनच हा प्रश्न गंभीरपणे हाताळायला हवा आहे. माझ्या व्यक्तिगत विचारानुसार पंतप्रधान इंदिरा गांधी ह्या प्रश्नाचं गाभीर्य पूर्णपणे ओळखून आहेत. त्याना काश्मिरात पुनर्वसन कायदा येऊ नये, सधावर बदी घालू नये असं वाटत आहे. त्यातून नुसत संतुलन बिघडेल असं नाही तर राष्ट्रालाही धोका निर्माण होऊ शकतो आणि म्हणूनच कितीही विरोध असला तरी झेलम दुरावू नये असं वाटत असेल तर पंतप्रधानाना विरोधी पक्षानी, विशेषत. संघ–भाजपानी पूर्ण विश्वासात घेऊन त्याच्या काश्मिर धोरणाना पाठिंबा दिला पाहिजे! अन्यथा आधी १९५३ पूर्वीची संपूर्ण स्वायत्तता, स्वतंत्र काश्मिर वगैरे मागण्या जोर धरत राहतील आणि त्या काश्मिरपुरत्याच मर्यादित राहणार नाहीत! पंजाबात त्याची लागण झालीच आहे.....आसाम, ईशान्य भारत अशी सर्वत्र ती साथ फैलावते आहे. ह्या फुटीर प्रवृत्तीच्या बाबतीत, स्वयंनिर्णयाच्या व दुर्बल केंद्राविरुद्धच्या धोरणात काँग्रेस आणि भाजपा ह्याच्यात खूप विचारसाम्य आहे. त्यातून निदान ह्या प्रश्नापुरता परस्पर सहकार उभा राहून आज झेलम वाचवली पाहिजे! त्याकरता पाहिजे तर कलम ३७० रद्द करा, पाहिजे तर इस्रायल–रशियाप्रमाणे मुसलमान वस्त्यामधल्याचं चागल्या तऱ्हेनं स्थलातर करून सरहद्दीवरील जमीन निवृत्त सैनिकामध्ये वाटून द्या किंवा दुसरा कुठलाही मार्ग अवलंबा! झेलम वाचली तर देश विघटनाच्या शापापासून वाचेल!! नाही तर परिस्थिती गंभीर आहे – झेलम आज टाहो फोडून हेच पुन्हा पुन्हा सागत आहे!!! □

## केंद्राचं आर्थिक साहाय्य बंद झालं तर?

पं. नेहरू आणि शेख अब्दुल्ला हे दोघे एकमेकांचे परम मित्र होते. ह्या मैत्रीला नेहरू नेहमीच फार महत्त्व देत; पण शेख अब्दुल्लाना स्वतःच्या महत्त्वाकांक्षेला अधिक महत्त्व द्यावंसं वाटे व त्या दृष्टीने नेहरूंच्या मैत्रीचा ते वेळोवेळी उपयोग करून घेत. काश्मिर हा नेहरूचा 'वीक पॉइंट' होता हेही शेखसाहेबानी ताडलं होतं. त्यामुळंच, हिंदू जातीयवादावर आगपाखड केली, काश्मिरी मुसलमानाच्या भावनांचं तुणतुणं वाजवलं की पडितजी विरघळायचे. त्यातून काश्मिरला विशेष सवलती मिळायच्या. अनुदान वाढवून मिळायचं.


१९५३ ते १९७१ नाइलाजाने कारावासात काढल्यावर, इंदिराजीच्या मध्यस्थीने शेर–ए–काश्मिर पुन्हा १९७५ मध्ये सत्तेवर आले.. तेव्हा परिस्थितीत खूप बदल झाला होता. 'गुगी गुडिया' इंदिराजी अत्यंत प्रभावशाली, धूर्त नि मुत्सद्दी नेत्या बनल्या होत्या आणि शेखसाहेब पंतप्रधानाऐवजी 'मुख्यमंत्री' म्हणून सत्तेवर परतले होते आणि तेही काही अंशी इंदिराजीच्या मर्जीनुसार!

१९७७ ते १९८० राजकीय विजनवासात काढल्यावर इंदिरा गांधी पुन्हा पतप्रधान झाल्या तेव्हा शेख अब्दुल्लांना नव्या परिस्थितीशी जुळतं घेणं अवघड जाऊ लागलं. इंदिराजी त्यांना अधिकाधिक 'टफ' वाटू लागल्या. त्यातूनच त्यानी 'उत्तर भारतीय जातीयवाद्याच्या हातात दिल्लीची सूत्रे' असल्याचा आरोप केला. मतभेद अधिकाधिक वाढून शेखसाहेबांना पूर्वीप्रमाणे मनसोक्त कारभार चालवणं जड जाऊ लागलं तेव्हा केन्द्राविरुद्ध उघड बंडाचाच झेडा फडकावल्यागत, 'झेलमवर आगडोब' उसळेल अशी धमकी इंदिरासरकारला दिली, तेव्हा इंदिराजीनीही कणखरपणे धमकावलं, '... शेखसाहेबानी हे लक्षात ठेवावं की, केंद्रशासनानं आर्थिक मदत बंद केली तर जम्मू–काश्मिरचं सरकार अवघ्या अर्ध्या तासात कोसळू शकतं!!...

केन्द्राकडून अनुनय करून घेण्याची सवय जडलेल्या शेख अब्दुल्लाना ही धमकी फारच लागली. तिचा योग्य तो परिणामही झाला!

त्यातून झेलम पेटवून देणं तर शेखसाहेबांना शक्य झालं नाहीच; पण जम्मू–काश्मिरमधली आर्थिक दुरवस्था व आर्थिक परावलंबित्व दोन्ही प्रखरपणे चव्हाट्यावर आली!! □

[ माणूस प्रतिनिधी : बंडू ठाणंकर ]



# मागील दाराने पाकिस्तानी नागरिकांना भारतात मुक्त प्रवेश देणारे पुनर्वसन विधेयक

**प्रकाश जावडेकर**

भारताच्या एकात्मतेला बाधा आणण्याची व देशाला फुटीरतेच्या कड्यावर उभे करण्याची एक शर्यत या देशात जणू चालू आहे· या शर्यतीत अनेक शक्ती आहेत. फुटीरतेची बीजे पेरण्याचे आपले काम त्या इमानेइतबारे करीत आहेत. मुस्लिम लीग, पूर्वांचलातील नागा, मिझो बंडखोर, सीमावर्ती प्रांतातील गनीम आहेतच. आनंदपूरसाहिब ठरावाद्वारे अकाल्यांनी असेच आव्हान दिले आहे; पण या सगळ्यात आघाडीवर आहेत जम्मू–काश्मिरचे नवे मुख्यमंत्री डॉ. फारुख अब्दुल्ला! फुटीरतेच्या शर्यतीत ज्या गतीने डॉ. अब्दुल्लांनी आघाडी मिळवली ती अजोड आहे. घटनेला, एकात्मतेला, संसदेच्या अधिकारांना व सर्वोच्च न्यायालयाला डॉ. अब्दुलांनी असे काही आव्हान दिले आहे की, या आव्हानाचे रूपांतर खऱ्या पेचप्रसंगात झाले आहे. या झपाट्यातले काही टप्पे पाहण्यासारखे आहेत.

८ मार्च ८० रोजी पुनर्वसन विधेयक खाजगी विधेयक म्हणून विधानसभेत आले. विरोधी पक्षांनी विरोध केला; पण सरकारने विरोध न केल्याने ते दाखल झाले. लगेच ते ‘ चिकित्सा समितीकडे ’ पाठवले गेले. यालाही विरोधी सदस्यांनी विरोध केला; पण बहुमत वेगळे होते. चिकित्सा समितीची पहिली बैठक २५ ऑगस्ट ८१ रोजी भरली व कामकाज न होता तहकूब झाली. दुसरी बैठक १९ जानेवारी ८२ रोजी झाली. नऊपैकी चार सदस्य उपस्थित असल्यामुळे परत तहकूब झाली. तिसरी बैठक १९ मार्च ८२ रोजी भरली व कोणतेही कामकाज माहितीअभावी होऊ शकले नाही.

अचानक २९ मार्चला दुरुस्त विधेयक विधानसभेत आले. विपक्षी सदस्यांनी गदारोळ केला की, चिकित्सा समितीने हे विधेयक केव्हा दुरुस्त केले? राज्यशासनाने सांगितले ‘ २५ मार्च रोजी.’ चिकित्सा समितीवरील एच. एल. भगोत्रा हे भाजपाचे आमदार. त्यांनी सांगितले ‘ २५ मार्च रोजी बैठक झाली नाही. शेवटची तहकूब बैठक १९ मार्च रोजी झाली व त्यात कामकाज झाले नाही. ’ तेवढ्यात शासनाने चिकित्सा समितीचा अहवाल दिला. त्यात विरोधी सदस्य अनुपस्थित होते असे दाखविले. खरे एवढेच घडले की, २५ तारखेच्या बैठकीचे निमंत्रण विरोधी सदस्यांना मिळू नये अशी ‘ व्यवस्था ’ केली होती.

एवढे झाल्यावर ३० मार्च रोजी लगेच विधेयक संमत झाले. या वेळच्या भाषणात नॅशनल कॉन्फरन्सच्या आमदारांनी भारतीय संसदेवर व तिच्या अधिकारांवर बरेच तोंडसुख घेतले.

राज्यपालांकडे पाठविलेले हे विधेयक त्यांनी १८ सप्टेंबरला परत केले. देशभर चर्चा सुरू झाली. चिंता व्यक्त होऊ लागली. २५ सप्टेंबरला चर्चेसाठी विधेयक परत आले. विरोधी सदस्यांनी एक होऊन दटून विरोध केला; पण ४ ऑक्टोबरला घाईघाईत विधेयक पुनः पारित केले गेले !

१ ऑक्टोबरला जम्मूमधील २४ संस्थांनी निवेदन दिले; पण शासनाने ते कचऱ्याच्या टोपलीत टाकले.

पुढे आणखी एक षट्कार डॉ. अब्दुल्ला यांनी मारला. सर्वोच्च न्यायालयाच्या मतासाठी राष्ट्रपतींनी हे विधेयक पाठवल्यावर या विधेयकाला कायद्याचे रूप देण्यासाठी लागणाऱ्या सर्व बाबी घाई-

घाईने पूर्ण केल्या. आज हा कायदा विधिवत पूर्ण झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या मताला म्हणूनच केवळ 'शैक्षणिक महत्त्व' रहावे अशी स्थिती डॉ. अब्दुल्ला यांनी निर्माण केली आहे.

या विधेयकाचे परिणाम काय काय होतील? देशाच्या दृष्टीने 'बरेच व गंभीर'; पण डॉ. अब्दुल्लाच्या मते 'किरकोळ.'–

**– पाकिस्तानात पळून गेलेल्या नागरिकांची मालमत्ता ३० वर्षांपूर्वीच माजी सैनिक, हरिजन, भूमिहीन मुस्लिम व निर्वासित यांना दिली आहे. असे दोन लाख गरीब लोक बेघर होतील.**

– भारतावर १९६५ व १९७१ साली आक्रमण करणाऱ्या पाकिस्तानी सेनेचे *नायक असगरखान व त्यांचा पायलट मुलगा* – ज्याने बाँबफेक करून भारतीय नागरिकाचे व जवानांचे प्राण घेतले – हे दोघे व असे अनेक जण काश्मिरमध्ये राहण्याचा कायदेशीर हक्क मिळवतील.

– स्थलांतरित ६ लाख व त्यांचे (अंदाज कायदामंत्र्याचे कार्यालयाचा) नातेवाईक वगैरे मिळून सुमारे १५ लाख पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्याचा कायदेशीर परवाना मिळाला आहे.

–आज भारतातील नागरिक काश्मिरमध्ये मालमत्ता घेऊ शकत नाही, डॉ. अब्दुल्ला मात्र मुंबईत बंगला घेऊ शकतात. केन्द्रीय कायदा उपमंत्री गुलाम नबी आझाद महाराष्ट्रातून निवडणूक लढवू शकतात; पण महाराष्ट्रातले कोणी काश्मिरमध्ये निवडणूक लढवू शकत नाही. तात्पर्य भारतातील नागरिकाला नसलेले सर्व अधिकार या येऊ घातलेल्या १५ लाख पाकिस्तानी नागरिकांना मिळतील.

–भारतात आलेले व काश्मिरमध्ये राहणारे निर्वासित काश्मिर विधानसभेसाठी मतदान करू शकत नाहीत; पण येऊ घातलेले पाकिस्तानी नागरिक केवळ मतदानच नाही तर काश्मिरचे मुख्यमंत्री बनू शकतात.

असे अनेक परिणाम होतील, काश्मिरचा मिटलेला प्रश्न जगाच्या व्यासपीठावर जागा ठेवण्याचाच हा प्रयत्न आहे.

राज्यपाल नेहरूंनी काय म्हटले आहे हे पहाणे योग्य होईल. विधेयकाच्या तरतुदीसुद्धा पहा. म्हणजे एकूण पेचप्रसंगाची कल्पना आपोआप येईल.

क्रमांक जी. एस. – ८९ / जी / एक्यू / ८२
राजभवन.
श्रीनगर
सप्टेंबर १८, १९८२.

श्री. उपसभापती,

जम्मू–काश्मिरच्या घटनेच्या कलम ७८ अन्वये मी सोबतचे 'जम्मू–काश्मिर पुनर्वसन परवानापत्र विधेयक' दोन्ही सभागृहांच्या पुनर्विचारासाठी परत पाठवत आहे. माझ्या संमतीसाठी आलेले हे विधेयक परत पाठविण्याची कारणे सोबत जोडली आहेत, त्या अनुषंगाने विचार व्हावा.

कळावे.
आपला
सही / –
बी. के. नेहरू.

(१) 'जम्मू–काश्मिरमध्ये पुनर्वसनासाठी येणाऱ्या नागरिकांना परवानापत्र देण्याचे नियम ठरवणारे, दोन्ही सभागृहांनी पारित केलेले खाजगी विधेयक मी अभ्यासले. कायदेमंत्र्याचे स्पष्टीकरण, घटनातज्ज्ञ व कायदेशीर तज्ज्ञ यांचा सल्ला घेतल्यावर माझे असे मत झाले की, हे विधेयक घटनात्मकदृष्ट्या व इतर अनेक दृष्टींनी घातक आहे. घटनेच्या पालनाची, रक्षणाची व सरक्षणाची जी शपथ पदग्रहण करताना मी घेतली आहे, तिचे पालन करण्यासाठी घटनेच्या ७८व्या कलमातील तरतुदीप्रमाणे मी हे विधेयक परत पाठवत आहे.

(२) या विधेयकामुळे पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्या व पाकनागरिकत्व धारण केलेल्या लोकांना भारतात परत येता येईल. त्यासाठी केवळ चार अटींची पूर्तता करावी लागेल.

(अ) १ मार्च ४७ नंतर त्याने पाकिस्तानात स्थलांतर केले असले पाहिजे. (ब) भारतात तो कायमचा परत येऊ इच्छित असला पाहिजे (क) १४ मे ५४ पूर्वी तो जम्मू-काश्मिरचा घटक असला पाहिजे *अथवा त्याची बायको वा वंशज असला* पाहिजे. (ड) भारताच्या व काश्मिरच्या घटनेशी त्याने निष्ठा प्रकट केली पाहिजे.

(३) या सोप्या अटींमुळे अनेक घातक परिणाम होतील व सभागृहाचा खरं तर असे परिणाम व्हावेत असा उद्देश नसेल.

(अ) जे जाणीवपूर्वक व स्वच्छेने पाकिस्तानात गेले, पाकिस्तानी नागरिकत्व ज्यांनी स्वीकारले, निर्वासितांची मालमत्ता बळकावली (भारतात ज्यांना पळून यावे लागले) पाकिस्तानी लष्करात नोकरी करून भारताविरुद्ध लढले, घातपात व इतर कृत्ये केली अशा माणसांना काश्मिरमध्ये घुसण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होईल.

(ब) केवळ पूर्वीचे नागरिकच नव्हेत तर त्याचे वंशज, पत्नी, विधवा यांना परतण्याचा अधिकार तर अधिकच घातक आहे. कारण भारतात न जन्मलेल्या, भारताचे कधीही नागरिक नसणाऱ्या पाकिस्तानी लोकांना प्रवेशाचा कायदेशीर हक्क मिळेल.

(क) आणखी एक धोका उद्भवेल. परत येण्यासाठी 'कायम परतण्याची' फक्त इच्छा व्यक्त करायची आहे. पाकिस्तानात पळून गेलेल्या निर्वासितांची जी मालमत्ता आज विश्वस्ताच्या ताब्यात आहे, ती विकून अथवा भारताकडून नुकसानभरपाई घेऊन असे लोक परत पाकिस्तानात गेले तर त्यांना रोखण्याची तरतूद विधेयकात नाही.

(ड) येऊ इच्छिणाऱ्या माणसाचा पूर्वेतिहास पाहण्याची तरतूद नसल्यामुळे पंचमस्तंभी, घातपाते आणि हेर यांना जणू मोकळे द्वार मिळेल.

(इ) भारताच्या सीमेतून आत येण्याचा अधिकार केंद्राचा आहे म्हणून हे विधेयक अमलात आणणे शक्य होणार नाही.

(४) काश्मिरच्या घटनेच्या कलम ६ व भारतीय घटनेच्या कलम ७ (२) याच्या अर्थाचे योग्य आकलन न करता हे विधेयक संमत केले आहे.

(५) सातव्या परिशिष्टातील पहिल्या यादीतील विषय क्र. १,१०,१७ व १९ यांच्याशी संबंधित जे पूर्णतः भारतीय संसदेचे अधिकार आहेत–विषयांवर हे विधेयक आहे.

भारतात प्रवेश, स्थलांतर, भारतातून हकालपट्टी, पासपोर्ट, व्हिसा, नागरिकत्व, संरक्षण व तदनुषंगिक सर्व बाबी, परराष्ट्रसंबंध हे–

विषय संसदेचे आहेत व या विधेयकाचा या विषयाशी सबंध आहे.

(६) काश्मिरच्या घटनेच्या कलम ६ प्रमाणे 'कायम रहिवासी' कोण हे ठरविण्याचा अधिकार राज्याला आहे; पण त्यात तो रहिवासी भारताचा नागरिक असला पाहिजे हे अनुस्यूत आहे. त्यामुळे नागरिकत्व द्यायचा अधिकार राज्याला नाही.

(७) भारतीय घटनेच्या दुसऱ्या भागातील नागरिकत्वासंबंधीची कलमे क्र ५ ते ११ आणि पहिल्या भागातील सातव्या कलमातील तरतूद क्र. १ व २ याचा एकत्रित विचार केला तर राज्याला हे विधेयक करण्याचा अधिकार पोहोचत नाही.

(८) घटनेच्या सातव्या कलमाप्रमाणे नागरिकत्वाचा अधिकार आपोआप प्राप्त होत नाही व राज्य यासंबधी कायदा करू शकत नाही

(९) याचे कारण इतर देशाचे नागरिकत्व स्वीकारल्यावर सातव्या कलमाप्रमाणे मिळणारे नागरिकत्व, नवव्या कलमातील तरतुदीप्रमाणे नाहीसे होते. १९५५ च्या नागरिकत्व कायद्यानुसार सातव्या कलमाप्रमाणे गेलेले नागरिकत्व परत मिळू शकते. नवव्या कलमासाठी हे लागू नाही. थोडक्यात पाकिस्तानी नागरिकत्व न स्वीकारलेल्या लोकानाच नागरिकत्वाचे प्रमाणपत्र देण्याचा राज्याला अधिकार आहे. आता पाकिस्तानी नागरिक असलेल्याना नागरिकत्व द्यायचा राज्याला अधिकार नाही.

(१०) सातव्या कलमातील दुसरी तरतूद ही घटनेतील इतर कलमांना खोडत नाही. कारण राष्ट्रपतींनी ३७० व्या कलमाखाली घटनेतील दुसरा भाग जम्मू-काश्मिरला लागू केला आहे.

(११) कारण सातव्या कलमातील दुसरी तरतूद 'दिल्ली करारावर' आधारित आहे– ज्यात हे स्पष्ट केले आहे की, '१९४७ च्या दंग्यामुळे व घबराटीमुळे जे नागरिक राज्य सोडून गेले त्याना परत येता येईल.' ११ ऑगस्ट १९५२ रोजी स्वतः शेख अब्दुल्ला यानी म्हटले होते की, 'ही तरतुद एकतर्फी अमलात आणण्याची नाही.'

(१२) घटनात्मक तरतुदी, कायदा अमलात आणण्याची असमर्थता व धोके या गोष्टी लक्षात घेऊन मी हे विधेयक पुनर्विचारासाठी पाठवत आहे.

(१३) मला याची जाणीव आहे की, अनेक वृद्ध लोकाना जे पूर्वी काश्मिरमध्ये होते – पाकिस्तानात त्रास होतो आहे व कौटुंबिक कारणासाठी परत यायचे आहे; पण त्यासाठी वेगळ्या कायद्याची आवश्यकता नाही. १९५५ च्या घटनेतील ५ (१) (अ) मधील तरतुदीनुसार हे नागरिकत्व देणे शक्य आहे व हे सोयीचे व्हावे म्हणून राज्याने काही दुरुस्त्या केल्या तर ३५ अ प्रमाणे त्याला पूर्ण संरक्षण मिळेल.

सही–

बी. के. नेहरू


मुंबईत आल्यावर मध्यवस्तीत रहाण्याचे
व भोजनाचे उत्तम ठिकाण म्हणजेच

**न्यू श्रीकृष्ण बोर्डिंग हाउस**

गोकुळनिवास, रानडे रोड
दादर–मुंबई २८


### पुनर्वसन....विधेयक

विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्सचे सदस्य श्री. राथार यांनी मांडलेल विधेयकच ते स्वतः सभापती झाल्यानंतर सरकारी विधेयक बनलं. या विधेयकाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे –

'... जम्मू–काश्मिरच्या कायम नागरिकांना ह्या राज्यात पुनर्वसनासाठी (किंवा कायमचे परत येण्यासाठी) परवाने देता-येण्याच्या नियमाना मान्यता देण्यासाठी हे विधेयक आहे. (विधेयक क्र. ९ : १९८०).

'... जम्मू काश्मिरचा कायम नागरिकांना पुनर्वसनासाठी (किंवा कायमचे परतण्यासाठी) परवाने देण्याचा १९८२ चा कायदा' असं ह्या कायद्याला ओळखलं जावं.

'...ह्या कायद्यानुसार, कायम नागरिक म्हणजे १९२७ च्या कायद्यानुसार पहिल्या व दुसऱ्या दर्जाचं नागरिकत्व धारण करणारी व्यक्ती वा तिची कुटुंबीय मंडळी असं गृहीत धरलेलं आहे. तसेच अशी व्यक्ती १४ मे १९५४ पूर्वी अशा तऱ्हेचं नागरिकत्व असलेली व १ मार्च १९४७ नंतर आज पाकिस्तानात अंतर्भूत झालेल्या प्रदेशात स्थलांतरित झालेली असावी. अशा व्यक्तींनं, शासनानं नेमलेल्या अधिकारी सामतीकडे पुनर्वसनासाठी ठराविक अर्जाचे फॉर्म्स भरून विनंती करावी.

'... असे विनंतीअर्ज आल्यानंतर समितीने विशेषतः दोन गोष्टींबद्दल खात्री करून घ्यावी–

अ) राज्यात परत येऊन कायम वास्तव्याची व्यक्तीची प्रामाणिक इच्छा.

ब) अर्ज करणारी व्यक्ती खरोखरच १४ मे १९५४ पूर्वी १ ल्या किंवा दुसऱ्या दर्जाची नागरिक आहे, तिनं १ मार्च १९४७ नंतर पाकिस्तानात स्थलातर केलं आहे. आणि किंवा अशी व्यक्ती वर वर दिलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या व्यक्तीची जवळची आप्तेष्ट, पत्नी वा विधवा पत्नी, वारसदार आहे.

'... समितीनं अशा व्यक्तीची शिफारस शासनाला केल्यानंतर शासनानं तिची खातरजमा करून घेऊन शिफारस केलेल्या व्यक्तील 'पुनर्वसना योग्य' जाहीर करावे.

'... ह्या घोषणेनंतर शासनाने अशा व्यक्तीला पुनर्वसन परवाना द्यावा. मात्र अशा व्यक्तीनं घटनेशी प्रामाणिक राहण्याची शपथ असा परवाना मिळाल्यावर महिन्यात (वा पाकिस्तानात राहून परवाना मिळवलेली व्यक्ती काश्मिरात परतल्यावर लगेच) घ्यायला हवी. ही निष्ठा काश्मिर आणि भारत अशा दोन्ही संविधानांबाबत असावी...'

ह्यानंतर विधेयकात, विधेयकाची अंमलबजावणी कशा पद्धतीनं व्हावी त्याची चर्चा आहे. त्यात शासनाकडे परवाना शिफारस समितीच्या शिफारशींचा केव्हाही पुनर्विचार करण्याचे व शिफारस योग्य अयोग्य ठरवण्याचे अधिकारही राखून ठेवण्यात आले आहेत.

ह्या संपूर्ण विधेयकात काश्मिरात परतू इच्छिणाऱ्या व्यक्तीची पार्श्वभूमी तपासण्याची, त्याच्या ३५ वर्षातल्या पाकिस्तानातल्या वास्तव्यातल्या कामगिरीचा मागोवा घेण्याची तरतूद मात्र कुठेही नाही !!

□

पुनर्वसन विधेयक १९४७ च्या गडबडीमध्ये अगतिकतेने, भीतीने पाकिस्तानात गेलेल्या काश्मिरींना काश्मिरात परत येण्यासाठी मार्ग मोकळा करून देण्यासाठी आहे असं सांगितलं जातं...

पण हे विधेयक येण्यापूर्वीही अनेक पाकिस्तानी, सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांच्या आधारे काश्मिरात येऊन स्थायिक झालेले आहेत. आजही कित्येक येत आहेत. विशेष, ह्यापैकी अनेक पाकिस्तान्यांनी पाकिस्तानात प्रशासन, वृत्तपत्रे याही क्षेत्रातून महत्त्वाच्या जागा भूषवल्या होत्या आणि आज काश्मिरी नागरिक म्हणूनही ते भारतात–काश्मिरात महत्त्वाच्या जागांवर विराजमान झालेले आहेत. अशा व्यक्तींपैकी एक आज केन्द्रसरकारात राज्यमंत्री आहेत, तर दुसरे श्री. लाल मोहम्मद साबर जम्मू–काश्मिर शासनाचे कॅबिनेट मंत्री आहेत. १९५६ साली ते राज्यमंत्री होते व तत्पूर्वी काही वर्षेच ते पाकिस्तानात महत्त्वाचे सरकारी पदाधिकारी होते... अशी एक-दोन नाही अनेक उदाहरणे आहेत...

नव्या पुनर्वसन विधेयकामुळे ज्या पाकिस्तानी नागरिकांना काश्मिरात परतण्याचा कायदेशीर हक्क उपलब्ध होतो त्यातही अशा अनेक व्यक्तींचा समावेश आहे. अशा व्यक्ती आज पाकिस्तानात महत्त्वाच्या जागांवर काम करीत आहेत, लष्करात, प्रशासनात, रेल्वेत, हवाईदलात ! ह्यातल्या अनेकांनी भारताविरुद्धच्या लढायात भाग घेतला आहे. भारतविरोधी कारवायात ते सहभागी झाले आहेत...


□

हे आजवर कसे जमले ? शक्य झाले ?

काश्मिरची सीमा पार करून अनेक पाकिस्तानी काश्मिरात प्रत्यही घुसतात. अशा अनेकांना सीमा सुरक्षा दलाचे जवान पकडतातही; पण नियमाप्रमाणे अशा पकडलेल्यांना राज्य पोलिसांकडे व न्यायालयांकडे सुपूर्द करण्यात येतं. असं म्हणतात की, अशा पकडलेल्यांना बहुधा चौकशीचं नाटक करण्यात येऊन सोडून दिलं जातं आणि ह्या प्रकाराला न्यायदेवतेचाही आशीर्वाद लाभतो ! □

---

## खोटे बोला पण रेटून बोला



डॉ. फारुक

जम्मू व काश्मिर पुनर्वसन विधेयकाद्वारे भारतभर कुप्रसिद्ध झालेले मुख्यमंत्री डॉ. फारुख अब्दुल्ला नुकतेच दिल्लीत आले होते.

या प्रसंगी झालेल्या पत्रकार–परिषदेत पत्रकारांच्या प्रश्नांच्या सरबत्तीला उत्तर देताना डॉ. अब्दुल्ला यांनी बेधडकपणे सांगून टाकले की, पाकिस्तानव्याप्त काश्मिरमधून येणाऱ्या हिंदूंना आम्ही जम्मू व काश्मिरमध्ये नागरिकत्वाचे पूर्ण अधिकार दिले आहेत !


या विधानाइतके धादांत असत्य विधान दुसरे नाही. पाकिस्तानव्याप्त प्रदेशातून येणाऱ्या मुसलमानांइतके अधिकार हिंदूंना मिळत नाहीत. या हिंदूंकी बहुसंख्य दलित आहेत. त्यांना काश्मिरच्या विधानसभेसाठी मतदानाचा अधिकार नाही. ते जम्मू व काश्मिरमध्ये जमीन विकत घेऊ शकत नाहीत. अगदी सुईच्या टोकावर मावेल एवढीसुद्धा ! कुबेराचा खजिना रिता केला तरी नागरिकत्वाचे अधिकार नसल्यामुळे त्यांची मुले कोणत्याही व्यावसायिक महाविद्यालयात प्रवेश घेण्यास पात्र ठरत नाहीत.

उलटपक्षी पुनर्वसन विधेयकामुळे फाळणीपूर्वीही पाकिस्तानात गेलेल्या व राहिलेल्या मुस्लिमांना, त्यांच्या वंशजांना, सर्वांना काश्मिरात सर्वाधिकार देण्याचे अभिवचन डॉ. फारुख अब्दुल्ला देत आहेत !

ही सारी वस्तुस्थिती एका पत्रकाराने या पत्रकार-परिषदेत डॉ. फारुख अब्दुल्ला यांच्या ध्यानात आणून देऊनही ते आपल्या खोट्या विधानावर ठाम राहिले.

'असत्य सुद्धा शंभर वेळा सांगितले तर सत्य ठरू शकते' या गोबेल्सच्या प्रचारनीतीच्या अनुयायांकडून आपण दुसरी कोणती अपेक्षा करणार ?

—प्रमोद महाजन



**डॉ. अरविंद लेले**

# ........जहाँ हुए बलिदान मुकर्जी

भारताच्या उत्तरेला पुन्हा एकदा विभाजनाच्या संकटाचे वारे घोंघावू लागले आहेत. पित्याला जे जमले नाही ते करून दाखविण्याचा विडा पुत्राने उचलला आहे. प्रागतिक राष्ट्रवादाला प्रतिगामी धर्मवेडाने पुन्हा एकदा आव्हान दिले आहे. प्रांतीय स्वायत्ततेच्या आत्मघातकी वृत्तीने हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाला जणू पुन्हा खिजवले आहे. स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानच्या कपाळावर अश्वत्थाम्यासारखी असलेली चिघळती जखम पुन्हा रक्ताळली आहे. रा. स्व. संघासारख्या राष्ट्रोद्धारक संघटनेवर बंदी घालण्याचे दुःसाहस श्री. फारुक शेख करू पहाताहेत आणि परक्या पाकिस्तानी नागरिकांना म्हणजेच दुसऱ्या भाषेत केवळ भारतद्रोही मुस्लिमांना, या देशाचे नागरिकत्व वहाल करून स्वतःचे स्वतंत्र काश्मिरचे स्वप्न पुरे करण्याचा मनसुबा ते रचताहेत. हिंदुस्थानच्या घटनेला तुच्छ मानून एका प्रांताचा मुख्यमंत्री केन्द्र सत्तेलाच धमकावतो आहे. आमच्या सत्ताधाऱ्यांच्या तथाकथित उदारमतवादी आणि धर्मनिरपेक्ष राजकारणाची एक विदारक शोकांतिकाच आज जणू श्रीनगर-जम्मूच्या परिसरात आकार घेत आहे.

चार-पाच महिन्यांपूर्वी काश्मिरच्या विधानसभेने पुनर्वसन-विधेयक संमत केले, साऱ्या देशाचा मनोमन विरोध असतानाही 'आम्ही ते विधेयक अमलांत आणणारच' अशी दर्पोक्ती श्री. फारुकसाहेबांनी केली आणि काश्मिरचा विषय ज्वालामुखीसारखा उफाळून आला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेली तीन तपे ज्या काही समस्यांनी आपल्या राष्ट्रपुरुषाचे रक्त सतत, जळवांसारखे शोषण केले आहे, त्यात 'काश्मिर, तेथील पं. शेख अब्दुल्लांची राजवट, काश्मिरचा निराळा दर्जा, घटनेचे कलम ३७०' या विषयांचा क्रम पहिला लागेल! १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्याबरोबर इतर सर्व संस्थानांचे विलिनीकरण झाले. हैद्राबादवर तर आपण पोलिसीकारवाई केली; परंतु पं. नेहरूंच्या

लाडक्या काश्मिरचे मात्र भलतेसलते सारे लाड तसेच चालू राहिले. तो प्रश्न पं. नेहरूंनी राजकीय अदूरदर्शित्वाने यूनोत नेला आणि उण्यापुऱ्या छत्तीस वर्षांनतरही तो प्रश्न तसाच, किंबहुना जास्तच ठसठसत राहिलेला आहे. रशिया, चीन, पाकिस्तान याच्या सीमा भिडलेला काश्मिर एक 'स्ट्रॅटेनिक टेरिटरी' म्हणून, आमच्या स्वायत्ततेलाच सुरुंग लावण्याच्या तयारीत आज उभा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेचच झालेल्या पाकिस्तानी आक्रमणात जनरल थिमय्याच्या कुशल डावपेचानी विजय हातातोंडाशी आलेला असताना कॉंग्रेस सरकारच्या –विशेषत: पं. नेहरूंच्या-अवसानघातकीपणानं एकतृतियांश काश्मिर त्या वेळी पाकिस्तानकडेच राहिला आणि उरलेल्या दोनतृतियांश काश्मिरच्या रक्षणासाठी आजपर्यंत किती पैसा खर्च झाला, सैन्याची किती शक्ती वाया गेली, किती माणसाचे बलिदान झाले याचा ताळेबंदही माडता येणार नाही आणि एवढे स्वतंत्र झाल्यानंतर, पाकिस्तानचे आक्रमण थोपविल्यानंतर, उरलेला काश्मिर हा आमचा आहे हे सिद्ध करण्यासाठी एका महापुरुषाचे बलिदान झालेले होते, त्यासाठी एक भारतव्यापी आदोलन उभे राहिले होते व शेवटी नाइलाजानं पं. शेख अब्दुल्लाना कारावासात टाकणे पं. नेहरूना भाग पडले होते. त्या इतिहासाचा मागोवा घेतला नाही तर सध्याच्या संकटाचे, आपल्याला नीट आकलनच होणार नाही. जहाँ हुअे बलिदान मुखर्जी, वह कश्मीर हमारा है। ही गगनभेदी गर्जना त्याशिवाय आपण पुन्हा करूच शकणार नाही!

काश्मिरचे भारतात विलिनीकरण झाल्यानंतर अन्य संस्थानाप्रमाणे तो भारताचा एक भाग आहे हे जरी राज्यकर्ते सांगत होते तरी पहिल्यापासून काश्मिरचा दर्जा वेगळा ठेवण्याची घोडचूक त्या वेळी झाली. पुढे श्री. शेख अब्दुल्ला यांना त्या प्रांताचे 'प्रधानमंत्री' जेव्हा मानण्यात आले, त्या यूनोत पाठविले. एकीकडे काश्मिर भारताचाच अविभाज्य भाग आहे असे म्हणत म्हणत पं. नेहरूंनी, 'काश्मिरची स्वायत्तता' हा मंत्र सतत घोकणाऱ्या शेख अब्दुल्लाना, आपला विश्वासू म्हणून काश्मिरचे रान मोकळे सोडले, जगातही त्यांना मान्यता दिली, ही केवढी विसंगती होती? पण महाराजा हरिसिंगासंबंधीच्या आकसाने घेरलेल्या पं. नेहरूंना शेख अब्दुल्ला सर्वांत जवळचे वाटत होते आणि त्यांनाही पं. नेहरूंच्या उदारमतवादी प्रतिमेचा उपयोग आपल्या स्वार्थी राजकारणाच्या पूर्तीसाठी करून घेता येत होता. १० एप्रिल १९५२ ला शेख अब्दुल्लानी रणबीरसिंगपुरा येथे एक भाषण केले होते. त्यात ते म्हणाले होते–

'Kashmir's accession to India will have to be of a restricted nature so long as communalism has a foot hold on the soil of India. ......*Many Kashmiris fear what*

# वह कश्मीर हमारा है ॥

करूनही काश्मिर हा 'शेख अब्दुल्लाचा काश्मिर' म्हणून आजही ओळखला जातो, आजही तेथे जायला विशेष परवानगी लागते, काश्मिरचा नागरिक हा भारताचा नागरिक आहे; पण भारतीय नागरिक मात्र काश्मिरचा नागरिक नाही अशी लोकविलक्षण 'एकात्मता' (?) तेथे नांदते आहे. धर्मनिरपेक्षतेच्या गोड अवगुंठनात राष्ट्रद्रोहाचे हलाहल तेथे उकळते आहे. श्री. फारुकसाहेबानी संमत करून घेतलेल्या 'पुनर्वसन विधेयका' ने तर या भारतीय राष्ट्रपुरुषाच्या जखमेवर मीठ चोळले आहे. 'काश्मिर हा भारताचा अविभाज्य भाग आहे' हे वचन सार्थ करण्यासाठी पुन्हा एकदा कदाचित् बलिदानाच्या बलिवेदीवर काहींना चढावे लागणार आहे!

इतिहासाची पुनरावृत्ती होते असे म्हणतात. काश्मिरबाबतही तेच घडलेले आहे. त्यासाठी इतिहासाची काही पानं उलटून आपल्याला तीन तपे मागे जावे लागेल. भारत वेळेपासूनच काश्मिर हा प्रांत इतर प्रांतापेक्षा वेगळा आहे हे भारत सरकारने मानले. १९४७ ते १९५१ पर्यंत घडलेल्या साऱ्या घटनांपासून नेहरू सरकारने काहीच बोध घेतला नाही असे त्यानंतरच्या घटना पाहिल्या की म्हणावेसे वाटते. शेख अब्दुल्लानी 'काश्मिर खोऱ्याचा सुलतान्' होण्याची आपली महत्त्वाकांक्षा जगापासून कधीही लपवून ठेवली नव्हती. तरीही पं. नेहरूनी शेख अब्दुल्लानाच काश्मिरचा एकमेव प्रतिनिधी मानले आणि चुकांची मालिकाच सुरू झाली! शेखसाहेबांच्या 'नॅशनल कॉन्फरन्स' या पक्षाचे स्वरूप वरवर राष्ट्रीय वाटत असले तरी ते निखालसपणे मुस्लिम जातीयवादी होते तो पक्ष काश्मिरपुरता मर्यादित असा प्रादेशिक पक्षच होता व शेख अब्दुल्लानी सतत तो तसाच ठेवला; परंतु अशा प्रादेशिक आणि जातीय अधिष्ठानावर उभ्या असलेल्या शेखसाहेबानाच पं. नेहरूनी भारताची बाजू मांडण्यासाठी 'देशाचा प्रतिनिधी' म्हणून will happen to them and their position if, for instance, something happens to Pandit Nehru, we do not know. As realists we Kashmiris have to make provision for all eventualities'......पुढे ते एका ठिकाणी म्हणाले होते की, 'काश्मिरच्या संपूर्ण सामिलीकरणाची भाषा पोरकट, अव्यवहारी आणि वेडेपणाच्या अवस्थेतली आहे.' काय सिद्ध होते या भाषणानी?

२९ मार्च १९५२ ला काश्मिरच्या घटनासमितीत बोलतानाही शेर-ए-काश्मिरानी 'आम्ही शंभर टक्के सार्वभौम आहोत. आमच्या प्रगतीत कोणताही देश अडथळे आणू शकणार नाही. भारताच्या ससदेचाही आमच्या प्रांतावर काही अधिकार नाही.' असे उद्‌गार काढले होते. भारतीय संसदेचा नियुक्त सभासद म्हणून शेख अब्दुल्ला काश्मिरचा कारभार पहात असतानाचे त्यांचे हे उद्‌गार होते हे लक्षात ठेवले पाहिजे!

अशा रीतीने एकाच देशात दोन पंतप्रधान, दोन घटना व दोन ध्वज यांची निर्मिती शेखसाहेबांनी केली आणि याच कारणासाठी भारतीय जनसंघाने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली काश्मिरच्या रक्षणासाठी आपली कंबर कसली !

त्यापूर्वी १९४७ मध्ये श्री. हरि वझीर (जे पुढे पाकिस्तानी सैन्याशी लढताना मरण पावले) यांच्या नेतृत्वाखाली ' प्रजा-परिषद ' हा पक्ष स्थापन झाला होता. त्या पक्षाने अब्दुल्लांची खेळी वेळीच ओळखून आपली ' काश्मिर–विलिनीकरणा 'ची चळवळ सुरूच ठेवली होती. शेख अब्दुल्लांचे मनसुबे जसजसे अधिकाधिक स्पष्ट होत गेले तसतसे कै. पं. प्रेमनाथ डोग्रा यांच्या नेतृत्वाखाली प्रजा परिषदेचे आंदोलनही तीव्र बनत गेले. ते आंदोलन दडपून टाकण्यासाठी शेखसाहेबांनी सर्व प्रकारचे अत्याचार सुरू केले होते व त्या अत्याचाराच्या व दडपशाहीच्या वार्ता बाहेर जाऊ नयेत म्हणून निर्बंधही घातले होते. पं. डोग्रांनी १९५२ च्या अखेरीस डॉ. मुखर्जींची दिल्लीत भेट घेतली आणि त्यांना सर्व परिस्थितीची हकिकत सांगितली. प्रजापरिषदेचे आंदोलन राष्ट्रव्यापी बनण्याची गरज डॉ. मुखर्जींनी ओळखली आणि नुकत्याच स्थापन झालेल्या भारतीय जनसंघाने त्या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देऊन काश्मिरमधल्या आंदोलनाला एक व्यापक राष्ट्रीय अधिष्ठान प्राप्त करून दिले.

## काश्मिर-दिन पाळला

१८ जून १९५२ ला जनसंघाच्या कार्यकारिणीने एका ठरावान्वये काश्मिरचे अलगपण टिकविण्याचे सारे प्रयत्न हाणून पाडण्याचा निर्धार व्यक्त केला आणि २९ जूनला सर्व देशभर ' काश्मिर दिवस ' पाळण्याचे आवाहन केले.

२६ जूनला डॉ. मुखर्जींनी लोकसभेत अत्यंत प्रभावी भाषण करून प्रजापरिषदेच्या आंदोलनाचे मर्म व महत्त्व साऱ्या देशासमोर मांडले. डॉ. मुखर्जींनी आपल्या भाषणात ध्वज, शेखसाहेबांचे पंतप्रधानपद व वेगळा दर्जा देणारे घटनेचे ३७० वे कलम यावर घणाघाती हल्ला करून ते कलम रद्द करण्याची मागणी केली. त्यांनी घोषणा केली की, ' एक देशमे दो विधान, एक देशमे दो प्रधान, एक देशमे दो निशान, नही चलेगा—नही चलेगा !' २९ जूनचा ' काश्मिरदिन ' भारतात अनेक ठिकाणी पाळण्यात आला आणि हजारो सभांतून जनसंघाच्या प्रवक्त्यांनी काश्मिर–प्रश्नाचे काळे अंतरंग भारतासमोर स्पष्ट केले. त्यामुळे शेखसाहेब अधिकच अस्वस्थ झाले व त्यांनी डॉ. मुखर्जी व भारतीय जनसंघ, प्रजापरिषद, पं. प्रेमनाथ डोग्रा यांच्यावर आगपाखड सुरू केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकीकडे डॉ. मुखर्जींच्या आवाहनाला देशभर वाढता प्रतिसाद मिळत असताना, अनेक वृत्तपत्रांतून शेखसाहेबांच्या चालबाजीवर टीका होत असताना, दुसरीकडे पं. नेहरू मात्र काश्मिरला अधिकाधिक स्वायत्तता देण्याबाबत शेख अब्दुल्ला व त्यांच्या शिष्टमंडळाशी वाटाघाटी करीत होते ! त्यातूनच पं. नेहरूंनी २४ जुलै १९५२ ला कुप्रसिद्ध ' जुलै-योजना ' लोकसभेला सादर केली. भारताच्या एकात्मतेवर त्या दिवशी भारताच्या पंतप्रधानांनीच घाव घातला. शेख अब्दुल्लांच्या फुटीरपणाच्या कारस्थानांना त्या दिवशी अधिकृतपणे मान्यता मिळाली. ७ ऑगस्ट १९५२ ला त्या ' जुलैयोजने 'वर डॉ. मुखर्जींनी पुन्हा एकदा प्रखर हल्ला करून, तर्कवाद व इतिहास यांच्या आधाराने पं. नेहरूंच्या युक्तिवादाच्या चिंध्या चिंध्या केल्या; परंतु पाशवी बहुमतापुढं काय करणार ? पं. नेहरूंची अनास्था पाहून ८ ऑगस्टलाच काश्मिरमध्ये जाण्याचा मनोदय डॉ. मुखर्जींनी जाहीर केला आणि स्वतंत्र भारताच्या इतिहासातील पहिल्या लोकशाही युद्धाला तोंड लागले ! ९ व १० ऑगस्टच्या प्रजापरिषदेच्या ' जुलै करारविरोधी ' संमेलनाला हजर रहाण्याचा निश्चय करून डॉ. मुखर्जींनी 'काश्मिर-भारत एकात्मते 'चा पहिला हुंकारच जणू दिला ! डॉ. मुखर्जींचा निर्धार पाहून शेवटी त्यांना काश्मिर–प्रवेशाचा परवाना मिळाला. डॉ. मुखर्जींचे व पं. प्रेमनाथ डोग्रांचे काश्मिरमध्ये जे अभूतपूर्व स्वागत झाले ते पाहून शेख अब्दुल्ला अतिशय अस्वस्थ झाले व त्यांनी डॉ. मुखर्जींना चर्चेचे निमंत्रण दिले.




पहिल्यापासून काश्मिरलढ्यात अग्रभागी
अटलबिहारी वाजपेयी

त्या चर्चेचे वेळीदेखील सर्व युक्तिवाद पणाला लावून त्यांनी शेख अब्दुल्लांचे पितळ उघडे पाडले; परंतु शेखसाहेब युक्तिवादातील पराभवाने मार्ग थोडाच बदलणार होते? चर्चेच्या वेळी आपला युक्तिवाद लंगडा पडतो आहे हे पाहून शेर ए काश्मिरांचा आवाज एवढा चढला होता की, बक्षी गुलाब अहंमद यांना 'ही लोकशाही मार्गांनी चर्चा करण्याची पद्धत नव्हे!' असे सांगावे लागले. शेवटी 'बॅ. जिनांच्या मार्गानेच आपण जात आहात हे ध्यानात ठेवा!' असा इषारा देऊन डॉ. मुखर्जींनी शेखसाहेबांचा निरोप घेतला!

### सत्याग्रहांची हाक

डॉ. मुखर्जी, भारतीय जनसंघाचे व प्रजापरिषदेचे कार्यकर्ते साऱ्या देशभर हवा तापवून पं. डोग्रांच्या मागे जनमत उभे करीत होते, तर शेख अब्दुल्ला काश्मिर 'स्वतंत्र' करण्याच्या घाईला आले होते. १७ जुलै १९५२ ला त्यांनी काश्मिरचे स्वतंत्र निशाण सचिवालयावर फडकविण्याचा निर्णय घेतला तर प्रजापरिषदेनेही सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले! जनतेच्या चळवळीचे उग्र रूप पाहून शेवटी शेखसाहेबांना निशाण फडकविण्याचा निर्णय बदलावा लागला; परंतु शेख अब्दुल्लांचे अंतरंग स्पष्ट झाल्यावर अधिक थांबण्यात अर्थ नाही असे पाहून भारतीय जनसंघाने साऱ्या देशाला सत्याग्रहाची हाक दिली व त्याला प्रचंड प्रतिसाद मिळू लागला. साऱ्या देशातून कार्यकर्त्यांच्या व नागरिकांच्या हजारो तुकड्या दिल्लीत सत्याग्रहासाठी येऊ लागल्या. साऱ्या दिल्लीत १४४ कलम लावले गेले. सत्याग्रहींवर लाठ्या, अश्रुधूर यांचा मारा होऊ लागला. १९४२ साली पुण्याच्या काँग्रेसभवनवर राष्ट्रध्वज लावण्याच्या प्रयत्नांत वीर दाभाडे ज्याप्रमाणे इंग्रजांच्या गोळीला बळी पडला त्याचप्रमाणे दुर्दैवाने स्वतंत्र भारतात जम्मूच्या सचिवालयावर भारताचा तिरंगा लावताना वीर मेलाराम हा सत्याग्रही शेख अब्दुल्लांच्या पोलिसी गोळ्यांचा पहिला बळी ठरला आणि आंदोलन अधिकच उग्र बनले! त्या आंदोलनात भाग घेण्यासाठी महाराष्ट्रातूनही एक मोठी तुकडी गेली होती. आमदार श्री. हशू अडवानी, सांगलीचे श्री. बाबा पोतदार, इचलकरंजीचे श्री. शेगुणशे, श्री. नाना ढवळीकर,



शेख अब्दुल्लांचे मनसुबे धुळीस मिळवणारे जनसंघ-नेते
पं. प्रेमनाथ डोग्रा

मुंबईचे श्री. मधुकरराव महाजन, पुण्याचे श्री. वसंतराव गीत, कै. अण्णा गोडबोले आदींचा त्यांत पुढाकार होता.

भारतीय जनसंघाने, १९५२ च्या डिसेंबरमध्ये कानपूरला झालेल्या अधिवेशनात काश्मिरच्या लढ्याची भूमिका विशद करणारा ठराव केला होता व त्यानुसार पंतप्रधान पं. नेहरू, शेख अब्दुल्ला व केन्द्रसरकार यांना ३७० वे कलम रद्द करण्याचा आग्रह धरला होता. त्या ठरावाला पं. नेहरूंनी काडीचीही किंमत दिली नाही, त्यामुळे आंदोलन छेडावे लागले. त्या आंदोलनालाही पोलिसी बळाने दडपण्याचा पंडितजींचा व शेखसाहेबांचा इरादा स्पष्ट झाल्यावर डॉ. मुखर्जींनी स्वतःच काश्मिरप्रवेश करणार असल्याची घोषणा केली आणि त्या लढ्याला वेगळेच तेज चढले. त्याआधी काश्मिरप्रवेशाचा प्रयत्न करणाऱ्या सर्वश्री कै. वि. घ. देशपांडे, बॅ. उमाशंकर त्रिवेदी, वैद्य गुरुदत्त आदी प्रमुख नेत्यांना भारतसरकारने प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याने अटक केली होती. पुढे त्यांना सुप्रिम कोर्टाने निर्दोष सोडून दिले; पण त्यापाठोपाठ साऱ्या पंजाबात व दिल्लीत १४४ कलम, जमावबंदी लागू करण्यात आली. त्याविरुद्ध दिल्लीत डॉ. मुखर्जींनी, बॅ. चटर्जी, श्री. गुरुदत्त आणि श्री.

नंदलाल शास्त्री यांच्यासह सत्याग्रह केला. त्या सर्वांवर भारतीय दंडसंविधानाच्या १८८ कलमानुसार खटला भरला गेला. त्यानंतर २६ एप्रिलला डॉ. मुखर्जींनी लोकसभेत पं. नेहरूंना अखेरची विनंती केली; परंतु या कशाचाच परिणाम पंडितजींवर झाला नाही व शेवटी डॉ. मुखर्जीना ८ मे १९५३ ला काश्मिरप्रवेशाचा मनोदय जाहीर करावा लागला !

### संशयास्पद मृत्यू

डॉ. मुखर्जींच्या काश्मिर-प्रवेशाच्या निर्णयाने शेख अब्दुल्लानीही मनात काही निर्णय पक्के केले असावेत आणि त्यानुसार त्यानी पावले टाकायला सुरुवात केली प्रथम त्यानी 'सध्याच्या वातावरणात आपले काश्मिर मध्ये येणे अकाली ठरले व आपणास वाटतो तसा त्याचा काही फायदाही होणार नाही.' असे डॉ. मुखर्जीना कळविले; परंतु त्यामुळे डॉक्टराच्या नियोजित कार्यक्रमात काहीही बदल झाला नाही. हे पाहून शेखसाहेबांनी दुसरा एक कुटिल डाव टाकला. डॉक्टर पठाणकोटला पोचल्यावर आपल्याला जम्मूला बिनापरवाना जाण्याची अनुमती भारतसरकारने दिली आहे,' असे गुरुदासपूरच्या पोलिस उपआयुक्ताने त्याना सांगितले; पण त्याचबरोबर 'आपण मोजकेच सहकारी बरोबर घेतले तर बरे होईल' असे सुचविले. यामागे काही काळेबेरे आहे अशी शंका देखील डॉ. मुखर्जी व त्यांच्या सहकाऱ्याना आली नाही; परंतु नंतरच्या घटना पाहता शेख अब्दुल्लांनी एक कारस्थानच रचले असावे असे वाटते. कारण पोलिसअधिकाऱ्यांचा तो निरोप मिळाल्यावर डॉक्टर व त्याचे सहकारी सर्वश्री अटलबिहारी वाजपेयी. प्रा. बलराज मधोक, डॉ. बर्मन, श्री. टेकचंद, श्री. गुरुदत्त आदी सर्वजण माधोपूर या चेकपोस्टजवळ पोचल्यावर गुरुदासपूरचे पो. अधिकारी व अन्य अधिकारी यानी शुभेच्छा देऊन त्याचा निरोप घेतला; परंतु पुलाच्या मध्यावर आल्यानंतर कठुआच्या म्हणजे काश्मिरमधील एका पो. सुपरिटेंडेंटने त्याना अडवून, काश्मिरच्या सचिवांची १० मेची काश्मिर-प्रवेशबंदीची आज्ञा दाखविली. 'मला भारतसरकारने काश्मिरप्रवेशाची अनुमती दिली आहे व मी काश्मिरात जाणारच !' असे डॉक्टरानी सांगितल्यावर त्या अधिकाऱ्याने खिशातून दुसरा अटकेच्या आज्ञेचा कागद काढला. ती आज्ञा पाहून डॉ. मुखर्जी 'ठीक आहे' म्हणून खाली उतरले. डॉ. मुखर्जी, श्री. गुरुदत्त व श्री. टेकचंद याना शेखसाहेबांचे बंदी करण्यात आले. भारतसरकारने अनुमती द्यायची व काश्मिर सरकारने प्रवेशबंदी करायची हे दोघांच्या संगनमताशिवाय कसे घडेल ? डॉ. मुखर्जी ११ मेला लाडग्याच्या घरात शिरले ते कधीच न परतण्यासाठी !

डॉ. मुखर्जींना अटक झाल्यानंतरही भारतीय जनसंघाचा व प्रजापरिषदेचा सत्याग्रह चालूच होता. स्वतंत्र भारतात भारताच्या एकात्मतेसाठी झगडणाऱ्यांना सक्तमजुरीच्या शिक्षा होत होत्या, हातापायात बेड्या घालून राजधानीतून फिरवले जात होते. महाराष्ट्राच्या व पुण्याच्या सत्याग्रहीनाही आग्रा येथील तुरुंगात तीन महिन्याची स. म.ची शिक्षा भोगावी लागली होती.


" चारित्र्याच्या निर्माणाविण
समाजजीवन व्यर्थ असे
कर्तव्याची जाणीव नसता
प्रगतीलाही अर्थ नसे "

आर्थिक प्रगतीच्या अनेक ठेव योजना दाखविणारी
सहकार क्षेत्रातील अग्रगण्य बँक

**जनता सहकारी बँक लि., पुणे**

**मुख्य कचेरी : १४४४ शुक्रवार पेठ**
**थोरले बाजीराव रोड, पुणे ४११ ००२**

**दूरध्वनी : ४४ ३२ ५८**


७ जिल्ह्यांतील ३० शाखा व ३ एक्स्टेंशन कौंटर्ससह
सदैव आपल्या सेवेसी

**भा. रा. किराड**
कार्याध्यक्ष

**का. श्री. काकतकर**
कार्यकारी संचालक

डॉ. मुखर्जींना १३ मे ला अटक झाली. त्यांना श्रीनगरच्या सेंट्रल जेलमधील निशात-बागेजवळील एका छोटया बंगल्यात ठेवण्यात आले. तेथे ते नंतर आजारी पडले. त्या आजारपणात सर्वश्री प्रेमनाथ डोग्रा, गुरुदत्त, टेकचंद, त्रिवेदी हे तुरुंगात असतानाही, डॉक्टरांना त्यांची भेट घेऊ दिली नाही आणि अशा स्थितीतच दि. २३ जून १९५३ ला डॉ. मुखर्जींची प्राणज्योत मालवली! त्या दिवशी भारतात सर्व ठिकाणी उत्स्फूर्त हरताळ पाळण्यात आला! सर्व व्यवहार बंद झाले. पुण्यातही त्या दिवशी एक अविस्मरणीय शोकसभा झाली! त्या सभेनंतर शनवार-वाडयापासून मंडईतील लोकमान्यांच्या पुतळ्यापर्यंत मूक मिरवणूक काढण्यात आली होती. सारे भारतीय मूक अंतःकरणाने आपला संताप व्यक्त करीत होते. ज्या संभ्रमावस्थेत डॉ. मुखर्जींना मृत्यू आला त्याची चौकशी करण्याचे आवाहन पं. नेहरूंना करण्यात आले. डॉक्टरांच्या ऐंशी वर्षांच्या मातोश्री श्रीमती महामायादेवी यांनीही तशी विनंती केली; पण ..पण ती चौकशी कधीच झाली नाही. अजूनही त्या मृत्यूचे गूढ कायम आहे!

आजच्या परिस्थितीत तीस वर्षांपूर्वीच्या आंदोलनाचा आणि बलिदानाचा मागोवा अशासाठी घ्यायचा की त्यामुळे भारतीयांच्या ध्यानी यावे की, देशांतील किमान एका तरी विचारप्रवाहाला काश्मिरच्या सत्ताधाऱ्यांच्या मनातील स्वायत्ततेच्या वेडाचे पूर्ण भान तेव्हाही होते. कारण भारतीय जनसंघाने त्यानंतर जेव्हा-जेव्हा काश्मिरबाबत एखादा सार्वत्रिक चर्चेचा विषय समोर आला तेव्हा-तेव्हा ठराव, आंदोलन, जनजागरण यांच्या माध्यमातून जनमत जागते ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. १९५१–५२ पासून सुरू केलेल्या जनजागरण–अभियानाचा पाठपुरावा थेट १९६७ च्या कालिकत अधिवेशनापर्यंत जन-संघाने केला होता. सर्वश्री दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवानी, सुंदरसिंग भंडारी, जगन्नाथराव जोशी, प्रा. मधोक आदी मान्यवर नेत्यांनी संसदेत व संसदेच्या बाहेरही काश्मिरबाबतची भारतीय अस्मिता जागी ठेवल्याचे आढळेल. डॉ. मुखर्जींच्या मृत्यूनंतर अवघ्या काही महिन्यांत शेख अब्दुल्लांना स्थानबद्ध करणे पं. नेहरूंना भाग पडले. कारण त्यांच्या देश-



पुनर्वसन विधेयकाविरुद्ध नुकत्याच झालेल्या जम्मूतील आंदोलनात जखमी झालेले भाजप कार्यकर्ते

विरोधी कारवायांवर पांघरूण घालणे पंडित-जींनाही अशक्य झाले. भारतीय जनसंघाने शेख अब्दुल्लांबद्दल वेळोवेळी दिलेले इशारे काळाच्या कसोटीवर खरे ठरले होते. आता पंडितजी, डॉ. मुखर्जी व शेख अब्दुल्ला हे तिघेही आपल्यात नाहीत; परंतु पं. शेख अब्दुल्लांनी लावलेली विषारी विचारांची वेल नव्या कटु फळांना आता जन्म देत आहे! श्री. फारुक शेख पुन्हा एकदा काश्मिरमधील मुस्लिम जनसंख्या, पाकिस्तानमधील नाग-रिकांना परत बोलावून वाढवू पहाताहेत. शेख अब्दुल्लांपेक्षा त्यांच्या पुत्राने घेतलेली दिशा अधिकच घातक आहे. १९५३ पेक्षा १९८३ मध्ये काश्मिरचे लष्करी महत्त्व किती तरी पटींनी वाढले आहे. जगातल्या सर्व बड्या सत्ता या ना त्या रूपाने काश्मिरच्या सीमेवर दबा धरून बसल्या आहेत. अशा वेळी डॉ.मुखर्जींच्या बलिदानानतर देशभर उठलेल्या

जहाँपे हमने लाल गवाँया
जहाँपे हमने खून बहाया
जहाँपे हमने फूल लुटाये
वह कश्मीर हमारा हैं।
जहाँ हुअे बलिदान मुखर्जी
वह कश्मीर हमारा हैं।
नही नही जागीर किसी की
वह कश्मीर हमारा हैं॥

–या घोषणांचा निनाद आठवतो. पुन्हा एकदा सर्वांना पक्ष, पंथ, जाती, प्रांत, धर्म यांच्यावर उठून एकदिलाने फारुख शेख यांच्या राष्ट्रद्रोही कारवायांविरुद्ध उभे रहावेच लागेल असे आवाहन तो निनाद करीत आहे! कारण आमचे पुनर्वसन विधेयक हे उद्यांच्या काश्मिरच्या विभक्तीकरणाची व परकीय शक्तींच्या प्रवेशाची नांदी आहे आणि एकदा खैबरखिंड पार केलेला शत्रू थेट दिल्ली गाठतो हा इतिहासाने वारंवार शिकविलेला धडा आहे तो धडा नीट गिरविला असेल तर 'काश्मिर भारत एकता के अमर प्रतिक' बनलेल्या स्वर्गीय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींना स्मरून साऱ्या राष्ट्राला पुढील वाटचाल करावीच लागेल! □

# जरा भूतकाळात डोकवा!

ज. द. जोगळेकर

ज्याला भविष्यात काय घडेल याचा वेध घ्यायचा असेल त्याने भूतकाळात काय घडले याचा अभ्यास केला पाहिजे. या मॅकिअॅव्हेलीच्या सूत्राची भारतातील राष्ट्रीय चळवळीतल्या सावरकर, डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवार असे नेते वगळता, बाकीच्या नेत्यानी योग्य प्रकारे नोंद घेतली नाही असे खेदपूर्वक म्हणावे लागते. राष्ट्रीयत्वाच्या संबधात हिंदुस्थानमध्ये ज्या अडचणी आल्या नि येत आहेत त्याचे कारण, मॅकिअॅव्हेलीच्या वरील सूत्राची येथील नेत्यांनी केलेली उपेक्षा, हे होय.

भारतीयाना प्रिय आणि पवित्र वाटणारी सिंधूनदी दुरावत चालली तेव्हा सावरकरानी अक्षरशः टाहो फोडून, मोठा आकात मांडून, आपल्या देशबांधवाना जागृत करण्याचा, वेळीच सावध करण्याचा मोठा एकाकी प्रयत्न केला हे ऐतिहासिक सत्य आहे; पण गेल्या शंभर वर्षांचा इतिहास पहाता जे घडले ते अपरिहार्य होते असेच म्हणावे लागते.

न्यायमूर्ती रानडे यानी 'राइज ऑफ द मराठा पॉवर' हा ग्रंथ लिहिला. त्याच्या उपोद्घातात ते म्हणाले, 'हा प्रबंध पुढील दोन धडे स्पष्ट करू इच्छितो: १) मराठी सत्तेचा उदय हा योगायोगाच्या संयोगाने निर्माण केलेला अपघात नव्हता; २) तसेच हिंदू राष्ट्रीयत्वाचा (हिंदू नॅशनॅलिटी) केवळ स्वातंत्र्य मिळविण्याचा उद्देश नव्हता, तर यापूर्वी जे साध्य करण्याचा प्रयत्न झाला नव्हता तो प्रयत्न, म्हणजे देशभक्तीच्या उद्दिष्टाने भारले गेलेल्या संस्थानाचे सयुक्त राज्य स्थापन करणे, हा होता आणि...'

परंतु न्यायमूर्तींचा राष्ट्रीयत्वासबधीचा हा अत्यंत महत्त्वाचा विचार त्यानी स्वत.च सोडून दिला आणि कॉंग्रेसच्या नवीन राष्ट्रवादाचा, म्हणजे हिंदी राष्ट्रवादाचा,पुरस्कार केला. परिस्थितीच्या रेटघामुळे प्रारंभी हे घडले असेल असे आपण म्हणू शकतो; पण हिंदी राष्ट्रवादाला बहुसंख्य मुसलमानानी कधीच पाठिंबा दिला नाही. अलीगढ मुस्लिम युनिव्हर्सिटीचे सस्थापक सर सय्यद अहमद यांनी 'हिंदी राष्ट्र' या कल्पनेला विरोध केला आणि हिंदू नि मुस्लिम याचे हितसंबध परस्पर विरोधी आहेत अशी भूमिका घेतली. हीच भूमिका बहुसख्य मुसलमानांनी मान्य केली.

मुसलमानाची ही पृथकपणाची भूमिका पाहून कॉंग्रेसच्या हिंदू नेत्यानी न्यायमूर्ती रानडे याच्या 'हिंदू राष्ट्रीयत्वा'च्या कल्पनेकडे परत वळणे आवश्यक होते; परंतु तसे घडले नाही. उलट मुसलमानाच्या मनधरणीच्या राजकारणाचा त्यानी जोराने पुरस्कार केला आणि हिंदी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या कांग्रेसवर जातीयतेचा आरोप कधीही येऊ नये म्हणून त्यानी 'हिंदू' हा शब्द राजकीयदृष्ट्या बहिष्कृत केला. स्वातंत्र्याची विलक्षण ओढ लागलेल्या सुशिक्षित समाजावर या हिंदी राष्ट्रवादाचा विलक्षण प्रभाव पडला आणि आपण सर्व हिंदी आहोत असे तो समजू लागला. या सुशिक्षितवर्गात हिंदू बहुसख्य असल्याने त्याचे हिंदीकरण वेगाने झाले. प्रारंभीच्या काळातील काही मुस्लिम नेत्यानाही या विचाराने आकर्षित केले; परंतु अल्पकाळच. थोड्या समयातच मुसलमान समाज पृथक आहे या विचाराचा प्रभाव पडू लागला, नि कालौघात त्याचे स्वतंत्र विचारसरणीत परिवर्तन झाले.

जगभर पसरलेला मुसलमान समाज हा आधुनिक राष्ट्रवादाच्या विचारप्रवाहात अजून आलेला नाही. आधुनिक राष्ट्रवादाचा उगम युरोपमध्ये झाला आहे. त्यात भूमिनिष्ठेला प्राधान्य असते. मुसलमानी समाजातील वृद्धिवादी नेत्याना ही गोष्ट समजलेली नाही किंवा पटलेली नाही. त्याचा अजूनही विश्वास 'मिलत'च्या म्हणजे जगभर पसलेले मुसलमान हे एक राष्ट्र आहेत, या विचारावर आहे. त्यामुळे भूमिनिष्ठेचे आकर्षण त्याना अजिबात नसते. परिणामत. कुठल्याही भूमीवर आपला निवास असला तरी त्या भूमीवरच्या इतर समाजापेक्षा आपण पृथक आहोत असे समजणे हा त्याचा स्वभाव झाला आहे. त्यामुळेच चीनमधला मुसलमान हा स्वत ला चिनी लोकापेक्षा निराळा समजतो. त्यामुळेच फिलिपाइन्समध्ये ख्रिश्चन नि मुसलमान याच्यात यादवी युद्ध होते. त्यामुळेच थायलॅंडमधला मुसलमान पृथक वृत्ती दाखवतो. त्यामुळेच नेपाळ, सिलोन, ब्रह्मदेश यातील मुसलमान स्वत.ला निराळे मानतात.

एक वेळ युरोपीय समाजाची स्थिती हीच होती. सगळा समाज स्वत.ला ख्रिस्ती समजून रोममधल्या पोपला एकनिष्ठ रहात असे; पण पुढे पोपच्या राजकीय वर्चस्वाविरुद्ध बंड होऊन हळूहळू युरोपीय समाजात राष्ट्रनिष्ठेचे म्हणजे मूलतः भूमिनिष्ठेचे बीज पेरले गेले आणि कालौघात युरोपच्या भूमीवर ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन, रोमेनिया, हंगेरी वगैरे राष्ट्रे उभी झाली. ही राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया तीनशे–चारशे वर्षे चालली होती. या ऐतिहासिक अनुभवापासून बहुसख्य मुसलमान समाज फार दूर आहे. त्यामुळे मुस्लिम विश्वबंधुत्व, अरब जग, अशा शब्दांचा त्याला मोह पडतो. या मोहातून पूर्ण मुक्त होणारा पहिला नेता म्हणजे तुर्कस्थानचा कमाल अतातुर्क हा होय. त्याने आपल्या देशाला आधुनिक राष्ट्राचे रूप देण्याचा मोठा प्रयत्न केला. तरीही त्या देशात 'मुस्लिम फंडॉमेंटॅलिस्ट' नेते असून त्याना थोडा पाठिंबा आहे. त्यामुळे तुर्की सेनानीना राजकारणात हस्तक्षेप करून या 'फंडॉमेंटॅलिस्ट' चळवळीवर बंधने घालावी लागली.

ज्या विचारांचा प्रभाव तुर्कस्थानावर पडला त्याच विचारांचा प्रभाव इजिप्तवर पडला आणि मग तिथले नेते इजिप्तच्या स्वतत्र व्यक्तिमत्त्वाविषयी बोलू लागले नि आपली परंपरा पिरॅमिड बाधणाऱ्या लोकांपर्यंत ते नेऊ लागले; परंतु तरीही अरब जगाविषयीचे आकर्षण नासेरपर्यंत राहिले. सादतने हे आकर्षण कमी करून इजिप्तच्या

स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे संगोपन करण्यास सुरुवात केली. या विचारातूनच इस्राएलबरोबर स्वतंत्र संबंध बाधण्याचा निर्णय त्याने घेतला. एका इजिप्शिअन प्राध्यापकाच्या मते इजिप्तमधील प्रक्रिया ही तीनशे–चारशे वर्षांपूर्वी युरोपमध्ये जे घडले तशा प्रकारची आहे. अर्थात या नवीन राष्ट्रवादाच्या विचाराला मोहोर येण्यास युरोपसारखा जरी प्रदीर्घ काळ लागणार नसला तरी पाउणशे–शंभर वर्षे निश्चित लागणार. या नव–विचाराला यशस्वी होण्यासाठी 'इस्लामी फंडॉमेंटॅलिस्ट' गटाच्या विरोधाला मोडून काढावे लागणार आहे. कदाचित अरब जगापासून फारकत घेण्यापेक्षाही हा वैचारिक संघर्ष अधिक प्रखर स्वरूपाचा होईल. या धार्मिक गटानेच सादतचा बळी घेतला होता. थोडक्यात म्हणजे मुसलमानी जगात भूमिनिष्ठेला प्राधान्य मिळून आधुनिक राष्ट्रवादाचा विकास भिन्न भिन्न मुस्लिम देशात होण्यास किती तरी दशके लागणार आहेत.

युरोपमधल्या ख्रिस्ती जगात झालेल्या राष्ट्रीयत्वाच्या संबंधातील क्रातीची कल्पना युरोपबाहेरील ख्रिस्ती समाजांना असल्याने ते समाज आपापल्या देशातील राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप होण्यास त्या मानाने लवकर तयार होतात किंवा होतील. कारण प्रॉटेस्टट असो किंवा कॅथॉलिक असो युरोपीय मनुष्य हा प्रथम फ्रेंच, जर्मन किंवा स्पॅनिश असतो याची पूर्ण कल्पना अयुरोपीय कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट वगैरे साप्रदायिक गटाना असते. युरोपीय ख्रिस्ती जगातल्या या राजकीय विचाराचा इस्लामी जगतात आताच कुठे प्रवेश झाला आहे. आपण तुर्क, इजिप्शिअन, सिरिअन, इराकी अशा भिन्न राष्ट्रीयत्वाचे आहोत याची अधुक जाणीव त्या त्या देशात निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे अजून शंभर वर्षे तरी मुसलमानी समाजाला मग तो कुठेही रहात असो, भूमिनिष्ठेचे आकर्षण तितके वाटणार नाही.

ही गोष्ट ध्यानात ठेवून हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाचा विचार केला पाहिजे. हिंदी राष्ट्रवाद देशाचे अखंडत्व टिकवू शकला नाही. त्यामुळेच सिंधूनदीपासून हिंदू दुरावला. एक गोष्ट आपण कायम लक्षात ठेवायला हवी आणि ती म्हणजे भूमी नि मद्यो स्वामित्वाखालून जाण्यापूर्वी तेथील माणसे दुरावलेली असतात. ज्या समाजाला हिंदी, इंडिअन, भारतीय किंवा हिंदू–हिंदुस्थानमधला निवासी या अर्थाने हिंदू–या एकाही शब्दाविषयी ममत्व नाही तो समाज आपला म्हटल्याने आपला होणार नाही. या कटू नि कठोर परिस्थितीचा सर्व प्रातातल्या नि जातीतल्या हिंदू अग्रणींनी विचार केला पाहिजे. हिंदी राष्ट्रवाद मूळ धरू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे तेव्हा ज्या हिंदू राष्ट्रीयत्वाचा–हिंदू नॅशनॅलिटीचा–न्यायमूर्ती रानडे यानी उल्लेख केला आहे आणि जे राष्ट्रीयत्वच देशाची एकात्मता टिकवू शकेल त्याचाच आश्रय घेणे पुढील शभर वर्षे तरी आवश्यक आहे. या गोष्टीकडे आपण दुर्लक्ष केले तर जॉर्ज सातायनाच्या पुढील सूत्राचा हिंदू समाजाला पुन्हा अनुभव येईल: 'जे आपला भूतकाळ विसरतात त्याना त्याचा पुन्हा अनुभव घ्यावा लागतो.

□


With
Best Compliments
From

**BALSONS PLASTIC INDUSTRIES PVT. LTD.**

*Regd. Office :*
'Gayatri', Suyog Colony,
464 / A, Gokhale Road
**Pune 411 016**
■ *Phone : 55811*

*Factory & Office :*
206–C, opp. Buckau Wolf
PIMPRI
**Pune 411 018**
■ *Phone : 82747*

# काश्मिरचा प्रश्न – मुलांचा प्रश्न आणि श्याम

## फिरोज रानडे

'ही मुलं आजकाल अगदी शेफारलीत !' राधा श्यामला एका संध्याकाळी रागात म्हणाली.

'हं' श्यामने एकशद्बी उत्तर दिले. बायकोच्या कोणत्याही बोलण्याला नवरा प्रथम लांबलचक उत्तर देत नाही वा प्रश्नही विचारत नाही, ह्याची कारणे दोन. एक तर नवऱ्याला बायकोशी कोणतीही गोष्ट गंभीरपणे चर्चावयाची नसते व दुसरे म्हणजे त्या वेळी बायकोला खरेच काही बोलावयाचे आहे की नाही, ह्याचा उलगडा झालेला नसतो.

"नुसतं 'हं' म्हणून कसे चालेल ?" आता राधाच्या मनात फक्त मुलांबद्दलच नव्हे तर श्यामबद्दलही राग होता. 'तुम्ही त्याना काही बोलत नाही, रागावत नाही त्यामुळे ती अगदी डोक्यावर चढली आहेत!"

'अग, पण असं झालं तरी काय ?' राधा ह्या प्रश्नाबद्दल फार गंभीर आहे हे पाहून श्याम म्हणाला, 'काय केलं अस त्यांनी ?'

'मग मी मघापासनं सांगते आहे काय ?"

खरं म्हणजे राधानं मघापासन जे काही सांगितलं होत त्यात मूळ मुद्दा असा काही नव्हताच; पण ते आत्ताच्या परिस्थितीत राधाच्या लक्षात आणून देण्याची सोय नव्हती. तेव्हा श्याम आपली गोलंदाजीची स्टाइल बदलत म्हणाला,

'माझ्याही ते लक्षात आले आहे बऱ्याच दिवसांपासून मी बघतो आहे. काही तरी करायला पाहिजे !"

श्याम आपल्याशी सहमत आहे हे बघून राधाला योग्य असा आनंद झाला. राधाला आनंद झाला म्हणून श्यामला हायसे वाटले. ह्या हायसे वाटण्यात व विषय बदलावा म्हणून तो म्हणाला,

'ह्या काश्मिरने आणखी ताप आणला आहे.'

ह्या वाक्याने राधा भडकलीच. ती मराठी वर्तमानपत्राची दररोजची प्रत व रविवारची तीनचार वर्तमानपत्रे घेत असे त्यामुळे तिला प्रांतीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रश्नाबाबत बरीच माहिती होती. काश्मिरचा आधीच चिघळलेला प्रश्न आता आणखी चिघळणार आहे असा मराठी संपादकाप्रमाणे तिचाही अंदाज होता; पण श्यामला त्याच्याशी *काय कर्तव्य ? असा तिला प्रश्न पडला. ती* तडकून म्हणाली, 'तुम्हाला काश्मिरशी काय करायचे आहे ? ती इंदिरा गांधी आणि तो काश्मिरचा मुख्यमंत्री – शेख अबदुल्लाचा मुलगा–काय ते पाहून घेतील.' राधाचे वाचन रागाच्या वेळी कामी आले !

'अगं, त्या अर्थी नाही म्हटलं मी" श्याम आपल्या प्रश्नाला वेगळेच वळण लागल्याचे पाहून बुचकळ्यात पडला. 'मी आपलं काश्मिरला बर्फ पडलाय त्यामुळे येथे शीत –लहर आली आहे त्या अर्थी म्हणत होतो. Please तू केलेला तो चॉकलेटी रंगाचा स्वेटर काढून दे ना !'.

बायकोने केलेला स्वेटर नवरा कधीही आवडीने घालत. नाही. श्याम आज आपण होऊन मागतो आहे ह्याने राधाला बरे वाटले. ती हातातले काम व हातातला मुलं शेफारण्याचा विषय बाजूला ठेवून स्वेटर आणायला म्हणून आतल्या खोलीत गेली.

गेले काही दिवस मुंबई–पुण्याकडे थंडीची अगदी लाट आली होती. प्रथम सिमल्याला बर्फ पडले होते म्हणून व आता काश्मिर खोऱ्यात पडले होते म्हणून. श्यामची स्वेटर–मागणी त्याकरताच होती.

'राधा म्हणते ते खरे आहे.' श्याम मनाशी विचार करत म्हणाला, "आपला आणि काश्मिरचा संबंध काय ? आपल्याला करायच्या काय आहेत त्या नसत्या भानगडी ? ती इंदिरा गांधी न् तो अबदुल्ला बघून घेतील काय करायचे ते !'

राधाने स्वेटर अगदी ट्रंकेत व्यवस्थित ठेवून दिला होता. त्यामुळे श्यामला विचाराला खूप वेळ मिळाला

'आपली धाव फक्त कुंपणापर्यंत म्हणजे महाराष्ट्राच्या कुंपणापर्यंत ! इकडे दोन गावे वा दोन तालुके कर्नाटकात वा गुजराथेत गेले म्हणून जीव पाखडणारे लोक तिकडे भारताच्या कुंपणावरचे आसाम व इकडे काश्मिर चालल्याय त्याकरता काय पाखडताहेत ? म्हणजे त्याचा अग्रलेखात उल्लेख असतो, या इंदिरा गांधींनी काय करावे वा करू नये ह्याचा सल्ला असतो, पण तेव्हढेच !

'पण बुवा, कोणी मराठी पत्रकार वा संपादक श्रीनगरला जाऊन तीन–चार महिने राहिलाय वा नव्या मुख्यमंत्र्याशी काही बोललाय व मग लिहिलंय असे काही दिसतच नाही !

'अगदी 'आसिंधु-सिंधुपर्यंता' म्हणणारेसुद्धा आपला भारत फक्त 'आतापी तु कृष्णा' समजतात ह्याला काय म्हणावे ? संयुक्त महाराष्ट्राकरता जवळजवळ शंभरांनी बलिदान दिले; पण संयुक्त भारताकरता ?'

तेवढ्यात राधा आली. काय रंग छान आहे, काय छान वीण आहे, काय मस्त बसतो वगैरे म्हणत श्यामने राधाला खूष केले व पुढे म्हणाला, 'चल, साडेआठ वाजले. जेऊन घेऊ या ! पण मुले कुठे आहेत ?'

'मोठा गेला आहे दिल्लीला व धाकटा फिल्म सोसायटीच्या सिनेमाला. तो आता साडेदहा–अकरा वाजता येईल !'

'काय दिल्लीला आणि ह्या थंडीत ?' स्वेटर घालूनसुद्धा श्यामची थंडी गेली नव्हती. म्हणून मोठा दिल्लीला गेला आहे म्हटल्यावर प्रथम त्याच्या मनात दिल्लीची थंडी आली; मग आपण कुटुंब-प्रमुख असूनही कोणी आपल्याला साधे सांगितलेसुद्धा नव्हते, मग परवानगीची बातच नको. अशा विचाराने तो भडकला–

'अरे, मला काही विचारावयाचे, सवरा-

वयाचे ? मला तर माहीतसुद्धा नाही !'

'अहो, मलासुद्धा विचारले नाही त्याने !' श्यामला एक वेळ विचारले नाही तरी चालते अशी राधाची भावना; पण तिलासुद्धा विचारले नाही ह्याचा जास्त राग ! 'सकाळी म्हणाला सध्याकाळी दिल्लीला studytour-वर जातो आहे, बुधवारी येईन ! बस्स !'

'पण त्याच्या खर्चाकरता काही पैसे– studytour ची वर्गणी वगैरे काही ?' आजकाल मुलं आपल्याकडे फक्त पैशाकरता येतात हे त्याने पाहून ठेवले होते; पण ह्या वेळी तेही नाही !

'अहो, ते त्याने महिन्यापूर्वीच नेले ! एक दिवस आला न म्हणाला, दीडशे रुपये हवेत. कॉलेजात भरावयाचे आहेत. मी कामात होते. मला वाटल फीचे वगैरे असतील. म्हणून म्हटलं कपाटातून घे ! आता हे खरं की विचारल्याशिवाय ती पैसे वगैरे घेत नाहीत !'

'नाही, ते खरे असेल ; पण काही परवानगी विचारणं वगैरे ?' श्यामला आता आपल्या अधिकाराची जाणीव झाली.

'मग मी काय म्हणत होते मघाशी ? शेफारली आहेत मुलं ! आपल्या मनाप्रमाणे वागतात. केव्हाही कुठेही जातात–येतात. आता तो धाकटा कोण्या Film Society चा मेंबर झाला आहे. दर आठवड्याला काही फ्रेंच, जर्मन सिनेमा पहातो व हिंदी चित्रपटाना नाके मुरडतो !' राधाने आपला मुद्दा उदाहरणासहित माडला.

'हे फार होतय. आई-वडिलाच्या परवानगीशिवाय असं जायचं ? तेसुद्धा दिल्लीसारख्या दूर ठिकाणी ?'

आता पन्नाशीला आलेल्या श्यामला आई-वडिलांना विचारल्याशिवाय काही करावयाचे नसते हे त्याच्या मनावर इतके बिंबवले होते की, आपल्या मुलानी असे वागावे ह्याचे त्याला प्रथम आश्चर्य वाटले व मग राग आला.

'तुम्ही त्यांना काही बोलत नाही. मीच बोलते ! मग आपली आई वाईट न् बाबा चागले अशी मुलाची भावना होते ; पण घरात काही शिस्त हवी का नको ?'

'हवी तर ! नाही कसं ? आता बघ मी त्याना चागलं फैलावर घेतो, नाही तर चागल्या शिक्षासुद्धा करतो !' श्याम निश्चयाने म्हणाला.

राधाला आपले म्हणणे श्यामला पटले ह्याचे समाधान वाटले ती म्हणाली, 'चला, जेवून घेऊ या !'

ती दोघे जेवली राधा धाकट्याला वाढण्याकरिता म्हणून थाबली. श्याम सुपारी चघळत चघळत कॉटवर जाऊन पडला.

आधीच थडीचे दिवस, त्यात थडीची लाट आलेली. राधाने केलेला स्वेटर आपला साध्या थंडीकरता ! श्यामला झोप काही येईना. थडीमुळे काश्मिरचा वा बेशिस्त वागण्यामुळे मुलाचा विषय त्याच्या मनात आळीपाळीने येत होता.

¤

हिंदुस्थानला नेहमी आपले कशाकशाचे प्रश्नच कसे असतात ? हिंदुस्थानने काश्मिरी लोकाच्या प्रगतीकरता केव्हढा पैसा खर्च केला ! मुस्लिम देशात मिळत नाही त्याच्यापेक्षा जास्त शांतता व सुबत्ता त्याना आपल्या देशात आहे मग ते आपल्याशी समरस का होऊ शकत नाहीत ?

¤

आता ह्या मुलाचेच पहा! त्याच्या आजारपणात काळजी घेतली, त्यांच्या शिक्षणाकरता व्यवस्था केली, त्याच्या हौशी-मौजी साभाळल्या. मग त्याना घराविषयी ओढ का वाटत नाही ?

¤

पाकिस्तानात कित्येक वर्षांत निवडणुका नाहीत विरोधी पक्षाच्या लोकाना नुसते तुरुगात टाकत नाहीत तर जिवानिशी मारतात! बागला देशचे ह्या लोकानी काय केले? आयुष्यात कधी बुरखा घातला नाही त्याना बुरखा घालायला लागेल, त्याचे स्वतत्र्य जाईल, सगळे आयुष्य बरबाद होईल!

¤

'आता तसं दिल्लीला जाण्यास काही हरकत नाही; पण वेळ आहे, प्रसंग आहे. माझ्या ओळखीचे काही लोक आहेत. मला विचारण्यात मोठ्याचा फायदाच होता !'

¤

'स्वतंत्र रहाण्यात वा पाकिस्तान मिळण्यात काश्मिरी लोकाचे फार मोठे नुकसान आहे हे त्याना कळत कसे नाही ? त्याना कोणी समजावून सागितले आहे का ? आता शिखाचा प्रश्न उभा राहील! त्यानासुद्धा हे समजावून सागायला नको का ?'

¤

'आता ह्या मुलाना करावे तरी काय ? लहानपणी श्यामची आई श्यामला कधी कधी मारत असे, कधी तासन्तास कोपऱ्यात उभ करत असे; पण आता का ह्या शिक्षा मुलाना करावयाच्या ? मग काय करावे ?'

¤

असा विचार करता-करता श्यामला आईची आणखी एक शिक्षा आठवली. आई फार रागावली म्हणजे श्यामला वा त्याच्या


कमलेश कन्स्ट्रक्शन कंपनी

प्रमोटर्स आणि बिल्डर्स

२८, शुक्रवार पेठ,

ऑफिस नं. ८,

पुणे–२

भावंडांना उपाशी ठेवत असे. शिक्षा तशी अघोरी होती; पण त्याने मुलांवर हवा तो परिणाम होत असे. आपण आई-वडलांवर आपल्या जेवणाकरता अवलंबून आहोत. बाहेरचे लोक बाकी सगळे काही देतील; पण जेवण फक्त घरीच मिळेल हे मुलांच्या पोटातले कावळे सांगू लागत.

'काश्मिरच्या लोकांना वा इतर अल्पसंख्याकांना हिंदुस्थानात रहाण्याचे फायदे माहीत आहेत. त्याचा लाभ ते उठवतात. येथे शांतता व सुव्यवस्था आहे हे त्यांना माहीत आहे; पण त्याची त्यांना जाण नाही! जसा ह्या देशावर अधिकार आहे तशी आपली काही कर्तव्यं आहेत ह्याचा त्यांना विसर पडला आहे.

'मग आपल्या आईचा हा मार्ग अल्पसंख्याकांना समजून सांगायला नाही का उपयोगी पडणार ?'

'म्हणजे अगदी काही कायमचा नाही; पण काही थोड्या दिवसांकरता त्यांच्यावर सामाजिक व आर्थिक बहिष्कार टाकावयाचा! नाही आर्थिक व्यवहार करावयाचा, नाही सामाजिक. म्हणजे त्यांचे त्यांनाच कळून येईल की, त्यांचे हितसंबंध कोणात गुंतले आहेत ते !'

हे सगळे विचार करता-करता श्यामला झोप लागली. धाकटा आला केव्हा, जेवला केव्हा हे त्याला कळलेदेखील नाही !

सकाळी श्यामला जाग आली. राधा उठून चहा करायला गेली होती. काश्मिरमधल्या पडलेल्या बर्फाची थंडी अजुनी जाणवत होती. श्याम तोंड वगैरे धुऊन जेवणाच्या टेबलावर गेला. धाकटा अजुनी झोपलाच होता.

'मग ?' राधाने एका शब्दाचा पण भरपूर अर्थ असलेला प्रश्न विचारला.

ह्यांच्यावर काही दिवस आर्थिक व सामाजिक बहिष्कार टाकायला पाहिजे !'

राधाचा प्रश्न मुलांबाबत होता, तर श्यामचे उत्तर काश्मिर–प्रश्नांबाबत होते. श्यामच्या उत्तराने राधा गोंधळली; पण आत्ताच चर्चा करण्यात काही अर्थ नाही समजून चहा आणायला स्वैपाकघरात निघून गेली.

□





Phone : 59 11 29
59 34 66

*With Best Compliments From :*

**Shrikrishna Brush Co.**

**Brahmin Society, Naupada, Thane - 400 602**

Manufacturers of :

FLAT PAINT BRUSHES, STEELWIRE BRUSHES
AND HOUSE–HOLD BRUSHES

*ON GOVERNMENT LIST*

# ॥ कृण्वन्तो विश्वमार्यम् ॥

कोणत्याही कर्माला वा कर्तव्याला क्षुद्र लेखू नका. मनुष्याची श्रेष्ठता त्याचे कर्म कोणते आहे यावरून ठरवता कामा नये, तर तो आपली कर्मे कशा रीतीने पार पाडतो, यावरूनच त्याची श्रेष्ठता ठरविली पाहिजे. प्रत्येक कर्तव्य हे पवित्र असून **कर्तव्यनिष्ठा** वा **स्वधर्मनिष्ठा** हीच सर्वोच्च ईश्वरोपासना होय.

**– स्वामी विवेकानंद**

*With Best Compliments From :*

## SOMAIYA ORGANO CHEMICALS LIMITED

(Manufacturers of high quality glacial acetic acid, rectified spirit, ethyl acetate and other organic chemicals).

**FACTORY :**
Sakarwadi,
(Stn. Kanhegaon C. Rly.)
Dist. Ahmednagar.

**REGISTERED OFFICE :**
Fazalbhoy Building,
Mahatma Gandhi Road, Fort,
Bombay 400 023.
Telegram : "MANIKAKA"
Telephone : 29 72 72

## दि पूना अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

२५ शुक्रवार पेठ, रामेश्वर चौक,
पुणे ४११ ००२.

– शाखा –

१) गुलटेकडी मार्केटयार्ड, पुणे ३७.
२) उत्तमनगर, पुणे २३.
३) येरवडा, पुणे ६.

❊ ५८ वर्षे बँकिंग सेवा
❊ विविध प्रकारचे कर्जाची सोय
❊ आकर्षक व्याजदर

म. अ. देशमुख — उपकार्याध्यक्ष
य. बा. जेधे — अध्यक्ष
प. बा. मनोलकर — कार्याध्यक्ष
प्र. शि. कुबले — उपव्यवस्थापक
शं. बा. ठोंबरे — व्यवस्थापक

तार : मुद्रा, पुणे
फोन : ४४४६३६
४४४४२८

आतापर्यंत १५ वेळा
भारत सरकारकडून
श्रेष्ठता प्रमाणपत्रे व
ताम्रपट मिळालेली

## प्रकाश टाईप फौंड्री

२५०–२६७ नारायण पेठ,
विजय चित्रमंदिराजवळ,
लक्ष्मी रोड, पुणे ४११ ०३०.

समृद्धीचा मार्ग सहकार

सहकारी बँकिंग क्षेत्रात सतत आघाडीवर असणारी

## सांगली अर्बन को–ऑप. बँक लिमिटेड

हरभट रोड, सांगली

आमच्या विविध आकर्षक योजनांच्या जोडीस नवीन योजना सादर करीत आहोत.

**" निरंतर योगक्षेम ठेव योजना "**

वरील योजनेच्या संबंधात अधिक माहितीसाठी बँकेच्या कोणत्याही शाखेस आजच भेट द्या.

७ जिल्ह्यात २७ शाखांसह जनतेची सेवा करीत आहोत.

पं. भा. टाकवेकर — कार्यकारी संचालक
बा. भा. पुजारी — कार्याध्यक्ष

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

MOHAN B. CHITALE'S

**RENUKA CONSTRUCTION COMPANY**

Promotors and Builders
214, Narayan Peth, N. C. Kelkar Road,
Near L. I. C. Building, PUNE 411 030.
PHONE: 30806
Contact FOR BOOKING
BETWEEN 10 A.M. TO 12 NOON
4 P.M. TO 8 P.M. EXCEPT SUNDAY

Adverto/A.J.A.

**साठे गादी कारखाना**

४१८ नारायण पेठ

पुणे ३०

फोन : ४४ ३५ ५६

हॉटेल **मनाली** ओपन एअर गार्डन रेस्टॉरंट

६४/सी/१ बॉम्बे–पूना रोड, शिवाजीनगर, पुणे

टेलीफोन : ५१७८९

पुण्यात उत्कृष्ट रहाण्याची सोय.

व्हेज./नॉन व्हेज./रुचकर पंजाबी डिशेससाठी प्रसिद्ध

( परमिटरूम / बिअर–बार )

चांदणी एंटरप्रायझेस

**नववर्षारंभीची अक्षर भेट**

**नव्या पिढीशी हितगुज !**

चं. प. भिशीकर यांच्या हृद्य चिन्तनातून उतरलेला वाचकप्रिय, उद्‌बोधक लेखांचा संग्रह.

पृष्ठे १७०. मुल्य रु. २०

: संपर्क :

**डॉ. स्वर्णलता भिशीकर**

९१७/१९, गणेशवाडी,

फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४

PRINTING material SUPPLIER

**Y. L. THATTE & Co.**

*Associates:-*

- PAMM Enterprises, Pune-2
- Thatte Graphic Sales, Pune-30

Phone: 442637, 440208

॥ श्री सोमेश्वर प्रसन्न ॥

शुभमंगल दिन सुवर्णमय करण्यासाठी

सर्व तऱ्हेचे उत्तमोत्तम आकर्षक सुवर्णालंकार !

सुवर्णाहून मौल्यवान असा

विश्वास संपादन केलेले सुवर्णकार !!

मे. **पांडुरंग हरी वैद्य**

ज्युवेलर्स

देव्हारे बिल्डिंग, भवानीशंकर रोड, दादर (पश्चिम) मुंबई-४०००२८

संचालक : टेलिफोन – ४५५९४१

महेश पांडुरंग वैद्य • दिलीप पांडुरंग वैद्य • श्रीमती सुशिलाबाई पांडुरंग वैद्य

**रेडिओ–टी. व्ही. कोर्स**

६–८–१४ महिने मुदतीचे रेडिओ रिपेअरिंगचे, रेडिओ–ट्रान्झिस्टर, रेडिओ–टेलिव्हिजन कोर्स १० जानेवारीपासून सुरू झाले आहेत. माध्यम मराठी असून वर्गाच्या वेळा सकाळ/संध्याकाळच्या आहेत. कोर्स पूर्ण झाल्यावर रंगीत टी. व्ही. चा कोर्स करता येईल. फी हप्त्याने भरता येते.

वरील वर्गामध्ये काही बॅचमध्ये काही जागा शिल्लक आहेत. ज्यांना अजूनही प्रवेश घेता आला नाही त्यांनी व प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी लवकरात लवकर प्रवेश घ्यावा. त्या सर्वांना मूळ फीमध्ये रु. ७५ सवलत मिळेल. प्रवेशासाठी उंबऱ्या गणपती चौकात न जाता पुढील पत्त्यावर भेटावे.

सकाळी ८ ते ११, संध्याकाळी ५–३० ते ८–३०

**प्रोग्रेसिव्ह टेक्निकल क्लासेस**

६६१ अ, शिवाजीनगर, मीना लॉजसमोर,

ट्रॅव्हल कॉर्नरचेवर २ रा मजला, डेक्कन जिमखाना, पुणे


**'झेलम विशेषांकामुळे 'माणूस'चा २२ जानेवारीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. यापुढील माणूसचा अंक दि. २९ जानेवारीचा.**

With Best Compliments From :

**SHREYAS ART PRINTERS PVT. LTD.**

Plot No. 2, Bhaktakavi Shivjibhai Devshi Marg,
Govandi, BOMBAY 400 088

Tel. : 52 70 96

MANOOS WEEKLY ( Licensed to pcst without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW– 28

